19-03-2013 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

BGO/ 10:00

19-03-2013 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A 1

BGO/ D/ KTG/ 10:00

सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी

पृ.शी : राज्यात महिलांवरील अत्याचारात झालेली वाढ

मु.शी.: राज्यात महिलांवरील अत्याचारात झालेली वाढ या विषयावर सर्वश्री विनोद तावडे,दिवाकर रावते रामदास कदम, डॉ.नीलम गोऱ्हे,सर्वश्री पांडुरंग फुंडकर, चंद्रकांत पाटील, डॉ.दीपक सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस, ॲड.अनिल परब सर्वश्री आशिष शेलार, विनायक राऊत, राजेंद्र जैन,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्कालीन चर्चा.

तालिका सभापती : आता अल्पकालीन चर्चेला सुरूवात होईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, गट नेत्यांच्या बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे ही चर्चा आपल्याला तासा भरात पूर्ण करावयाची आहे. आजच सत्ताधारी पक्षाच्या वतीने नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव घेण्यात येणार आहे. त्यावर इतर सन्माननीय सदस्यांनी सविस्तर बोलावे. ही जी अल्पकालीन चर्चा आहे त्यावर प्रामुख्याने सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, श्रीमती शोभाताई फडणवीस यांच्यासह महिला सदस्यांना बोलण्यास संधी द्यावी. एखाद दुसऱ्या अन्य सन्माननीय सदस्यांना बोलण्यास अनुमती दिली तरी चालेल. परंतु, ही अल्पकालीन चर्चा माननीय मंत्र्यांच्या उत्तरासह आज पूर्ण करावी अशी माझी विनंती आहे. तसे केले तर या विषयावर मुद्देसूद अशी चर्चा होईल.

तालिका सभापती : ठीक आहे. या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी माननीय मंत्र्यांच्या उत्तरासह एक तासाचा वेळ दिलेला आहे. सूचना देणाऱ्या सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे आपली सचूना वाचतील आणि भाषण करतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करते.

"भंडारा जिल्ह्यातील लाखनी ता.मुरमाडी येथील अनुक्रमे ११, ९ व ६ वर्षे वयाच्या ३ अल्पवयीन मुलींचे अपहरण व बलात्कार होऊन हत्या होणे, दिनांक १४ फेब्रुवारी, २०१३ ला अपहरण झालेल्या या मुलींचे दिनांक १६ फेब्रुवारी, २०१३ रोजी महामार्गावरील ढाब्याजवळच्या विहिरीत प्रेत आढळणे, अद्यापही पोलीसांना गुन्हेगार पकडण्यात आलेले अपयश, राज्यात अनेक ठिकाणी महिलांवर होत असलेले अत्याचार, विशेषत: धुळे, भंडारा, पुणे, मुंबई, अकोला, शिर्डी-अहमदनगर, रायगड, ठाणे, सातारा, नागपूर, या जिल्ह्यांमध्ये अल्पवयीन मुलींवरील बलात्कार, कुंटणखान्यात जबरदस्तीने देह विक्रय करावयास लावणे, फूस लावून लग्नाचे आमिष दाखवून फसवणूक करणे, अश्लील चित्रफीत करुन ब्लॅकमेल करणे, इत्यादी मार्गाने जानेवारी, २०१३ पासून अद्यापपर्यंत होत असलेल्या अत्याचाराच्या वाढत्या घटना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया. "

सभापती महोदय, दिनांक 14 फेब्रुवारी रोजी संपूर्ण जगात महिला अत्याचाराच्या विरोधात आंदोलन झाले व त्याच दिवशी महिलांवरील अत्याचाराच्या अनेक घटना दिल्यामुळे नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव आम्ही दिला होता.

भंडारा जिल्ह्यात जी घटना घडली त्यास मी भेट दिलेली आहे. विधानसभेचे, लोकसभेचे प्रतिनिधी आणि अनेक सामाजिक संघटनांनी या घटनेला भेट दिली असून माहिती घेण्याचा प्रयत्न केला आहे. यासंबंधी अस्वस्थता आणि नाराजी यासाठी आहे की, वेगवेगळ्या प्रकाराने या घटनेची माहिती येत आहे. एका बाजूला पोस्ट मार्टेमच्या रिपोर्टमध्ये बलात्कार करून खून झाल्याचे आढळून येते. तर दुसरीकडे भंडारा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री.आर.पी.सिंग यांनी जाहीर केले की, फोरेन्सिक अहवालावरून बलात्कार झाला नाही असे आढळून आले आहे. यात डीएनएचा कुठलाही मागसूस लागत नाही. मी या विभागाचे पोलीस महानिरीक्षक श्री.राजेंद्र सिंग यांना देखील भेटले व तपशीलवार माहिती घेण्याचा प्रयत्न केला. यात अनेक मुद्दे आहेत. अन्य सन्माननीय सदस्य देखील त्यांचे याबाबबतचे मुद्दे मांडतील.

भंडारा प्रकरणात पोस्ट मार्टेमच्या अहवालात एक तपशील येतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

त्यानुसार कलमे लावून कारवाई सुरू आहे असे पोलीस सांगतात. त्याच वेळी अनेक मोठमोठ्या वृत्तपत्रातून वाहिन्यांवरून बलात्कार झालाच नाही असे प्रश्नचिन्ह करून बातमी देण्यात येत आहे. शासनाची माहिती देणारी यंत्रणा कोण आहे याचा शोध घेतला पाहिजे. हा आरोप बिनबुडाचा आहे हे सिद्ध करण्यासाठी अत्यंत पद्धतशीरपणे दर दोन दिवसांनी यासंबंधातील बातम्या छापून येत आहेत. मी पोलीस महानिरीक्षकांना भेटले तेव्हा मागणी केली की, या संबंधात जे तज्ज्ञ म्हणून बातम्या देत आहेत ते कोण आहेत, याच शोध घ्यावा.

मी नागपूरला गेले तेव्हा राष्ट्रीय महिला आयोगाच्या सदस्या श्रीमती निर्मला सामंत-प्रभावळकर यांनी देखील भेट दिली होती. माझ्याकडे महाराष्ट्र शासनाचे संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, नागपूर अमरावती विभाग यांनी प्रसिद्ध केलेले पत्रक आहे. हे शासनाचे अधिकृत पत्रक नागपूरच्या सर्व मीडियामध्ये प्रसृत झाले आहे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.....

मी ते पत्र श्री.राजेंद्र सिंग यांना दिले. मला या ठिकाणी खेद वाटतो की, पोलिसांनी याचे कुठेतरी निराकरण करणे गरजेचे होते. कारण या पत्रकात असे म्हटले आहे की, "भंडारा जिल्ह्यात घडलेल्या तीन बहिणींच्या आत्महत्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या समितीच्या अध्यक्षपदी श्रीमती निर्मला सामंत-प्रभावळकर यांची निवड करण्यात आली आहे. त्या उद्या विमानाने येतील आणि मोटारीने भंडाऱ्याला जातील व जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि दुर्घटनेतील कुटुंबीयांशी चर्चा करतील. सायंकाळी 6.00 वाजता नागपूरला येऊन विमानाने दिल्लीला जातील." मी ते पत्रक आपल्यामार्फत माननीय गृहमंत्री महोदयांना देणार आहे.

सभापती महोदय, ज्या तीन बहिणींवर बलात्कार होऊन त्यांचा खून करण्यात आला त्या प्रकरणाची अजून चौकशी सुरु आहे. असे असताना सरकारच्या सोर्सेसमधून त्या बहिणींच्या आत्महत्या आहेत असे सांगण्यात येते. सहा, नऊ आणि एकरा वर्षाच्या मुली आत्महत्या करतात अशी माहिती सरकारच्या माध्यमातून देण्यात येत असेल तर दुस-या कोणत्या सोर्सेसमधून माहिती बाहेर जाते हे शोधण्याचा प्रश्न उद्भवत नाही. मला येथे राजकारण करावयाचे नाही. परंतु आम्हाला नाईलाजाने असे वाटायला लागले आहे की, या सर्व परिस्थितीमध्ये आरोपींना संरक्षण देणारी कोणीतरी मोठी व्यक्ती आहे. जी या घटनेमध्ये सातत्याने बलात्कार झालाच नाही सिध्द करण्याचा प्रयत्न करीत आहे.

सभापती महोदय, लोकसभा आणि राज्यमध्येमध्ये डिसेंबर 2012 मध्ये लहान मुलांच्या लैगिंक शोषण संदर्भातील विधेयक पारीत झालेले आहे. छोट्या मुलींवर पूर्णपणे बलात्कार होऊ शकत नाही कारण त्यांच्या शरीराची तशी वाढ झालेली नसते. बहुतेक वेळेला विकृत पध्दतीने बलात्कार होत असतात. सरकारने दखल घेऊन सुध्दा प्रत्येक गावा गावात, प्रत्येक वर्तमानपत्रात, प्रत्येक कानाकोपऱ्यात बलात्कार झाला की नाही, बलात्कार झाला की नाही अशी चर्चा होत आहे. त्या मुलींवर बलात्कार झाल्याचा पोस्टमार्टेममध्ये उल्लेख असून सुध्दा बलात्कार झाला की नाही या संदर्भातील बातम्या जे अधिकारी बेजबाबदारपणे देत असतील त्या सर्वांची चौकशी झाली पाहिजे असे माझे मत आहे. "टाईम्स ऑफ इंडिया" सारखा सर्वमान्य वर्तमानपत्रात सुध्दा सातत्याने एक दिवसा आड फॉरेन्सीक रिपोर्ट आणि पोस्टमार्टेम रिपोर्ट यामध्ये फरक येत आहे अशा प्रकारची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

बातमी येत आहे. फॉरेन्सीक रिपोर्ट नुसार बलात्कार झाला नाही. सातत्याने अशाप्रकारच्या बातम्या येतात तेव्हा त्यांच्याकडे माहिती मिळविण्याचा सोर्स काय आहे ? हा वृत्तपत्रांचा अधिकार असला तरी कोणी ना कोणी केमिकल एक्स्पर्ट अशाप्रकारे आरोपींना पाठिशी घालण्याचा प्रयत्न करीत आहे.

सभापती महोदय, मला त्यानिमित्ताने दोन मागण्या करावयाच्या आहेत. माझी पहिली मागणी आहे की, भंडाऱ्याच्या घटनेमध्ये बेजबाबदारपणे मीडियाकडे कोणत्या मार्गाने माहिती गेली याचा शोध घेतला पाहिजे. तसेच पोस्टमार्टेम रिपोर्ट येत असताना तो निग्लेट करण्यासाठी कोणता केमिकल रिपोर्ट वापरता येतो या संदर्भात स्पष्टीकरण झाले पाहिजे. किंबहुना मी असे म्हणेन की आपण पोस्टमार्टेम निराधार ठरवावयाला लागलो तर प्रत्येक घटनेमध्ये पोस्टमार्टेम निग्लेट करणारे फॉरेन्सीक अहवाल समोर येतील. त्यातून प्रत्यक्षात जी घटना घडली आहे त्याबाबत मोठी प्रश्न चिन्हे उभी राहतील किंबहुना आरोपी सुटण्यासाठी तो एक बुरखा वापरला जाईल असे आपणास म्हणता येऊ शकेल. (घंटी वाजविण्यात आली) मला भाषणास सुरुवात करुन फक्त नऊ मिनिटे झालेली आहेत आणि आपण लगेच घंटी वाजविली आहे. मला अजून इतर घटनांबाबत देखील बोलायचे आहे. अन्यथा उद्या आमच्यावर आम्ही तडजोड केली असे देखील आरोप होतील. तेव्हा आपण काही गोष्टी गांभीर्याने समजून घ्याव्यात अशी विनंती आहे.

सभापती महोदय, भंडाऱ्यात घडलेल्या घटनेच्या संदर्भात आम्हाला नि:संदिग्धपणे आश्वासन मिळाले पाहिजे. या घटनेकडे महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. पोस्टमार्टेम रिपोर्ट विरुध्द फॉरेन्सीक रिपोर्ट अशी चर्चा सुरु आहे. तेव्हा याची सखोल चौकशी करुन जी वास्तविकता आहे ती शोधून खऱ्या आरोपींना पकडले पाहिजे.

सभापती महोदय, श्रीरामपूर येथे दोन दलित महिलांवर अत्याचार झाले. त्या ठिकाणी काम करीत असलेल्या पोलीस अधिकारी श्रीमती सुनिता ठाकरे यांच्या कामाबद्दल मला समाधान व्यक्त केले पाहिजे. तसेच तेथील सरकारी वकिलांनी देखील चांगल्या प्रकारे काम केलेले आहे. या घटनेतील जो आरोपी आहे,

यानंतर श्री.बोर्डे..

अशोधित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

तो नंतर अतिरेकी केसमध्ये सापडला आहे. त्याच्यावर कठोर कारवाई करुन त्याला तडीपार केले पाहिजे, किंबहुना कठोर पाऊले उचलली पाहिजे यासाठी पोलिसांनी नगर जिल्हाधिकाऱ्यांकडे डिसेंबरमध्ये पाठविलेल्या प्रस्तावावर अद्याप कार्यवाही केली जात नाही.

महोदय, बीड जिल्ह्यातील अंभोरा येथील अत्याचारग्रस्त महिला मला भेटावयास आली होती. त्या महिलेने जी निरीक्षणे नोंदविली होती तीच निरीक्षणे सर्व ठिकाणी दिसून येत आहेत. अल्पवयीन मुलींवर बलात्कार झाल्यानंतर त्या कुटुंबात आणि गावात एकट्या पडतात. परंतु अशा घटनांमध्ये दुर्दैवाने पोलिसांचे संवेदनहीनतेचे नमुने पहावयास मिळतात.

महोदय, भंडारा जिल्ह्यातील मोहाडी येथील एका शाळेमध्ये शिक्षकाने मुलींवर लैंगिक अत्याचार केले. मी त्या शाळेला भेट दिली. त्या शाळेतील शिक्षिका मला घटनेबाबत माहिती देण्यास भीत होत्या. मला बघून त्या थरथर कापत होत्या. त्यांनी मला घटनेबाबत काहीच सांगितले नाही. महोदय, अशा परिस्थितीत मुलींना कोणीही समुपदेशन करीत नाही. शिक्षणाचा प्रश्न उपस्थित झाल्यानंतर आपण केवळ शिक्षकांपुरता विचार करतो.

महोदय, पुणे येथील ऑर्कीड स्कूल किंवा डॉन बॉस्को शाळेमध्ये मुलीवर अत्याचाराच्या घटना घटना घडली आहे. डॉन बॉस्को शाळेतील उप प्राचार्याला या प्रकरणी अटक करण्यात आली. त्या बाबत वर्तमानपत्रात बातमी आली. परंतु अशा घटनांची तक्रार दाखल करुन घेण्यास शाळाच विलंब करीत आहे ही वास्तवता आहे.

महोदय, धुळे येथील कुंटणखाना आणि अल्पवयीन मुलीवर करण्यात येत असलेल्या अत्याचाराबाबत एका मुलीने स्पष्ट निवेदन नोंदविले आहे. तिने सांगितले की, 12-13 अल्पवयीन मुलीची विक्री तिच्या डोळ्यासमोर झाली आहे. या प्रकरणी पोलीस टाईम्स प्रकाशित करणारा एक पत्रकार आणि दोन राजकीय पक्षाचे पदाधिकारी यांना अटक झाली आहे. परंतु ज्याच्या एरियाच्या अखत्यारित हा कुंटणखाना सुरु होता त्या अधिकाऱ्यावर कुठलीही कारवाई झाली नाही. महिलांवरील अत्याचाराची घटना घडल्यानंतर आम्ही दोषी अधिकाऱ्यांना सस्पेंड करण्याबाबत मागणी करतो. परंतु ज्या पध्दतीने आज भ्रष्टाचाराची वाळवी लागली आहे ती योग्य नाही. निर्भयाच्या घटनेनंतर या विषयावर खूप चर्चा झाली. अत्याचारग्रस्त मुलीला मेडीकल प्रोटोकॉल, मदत, दिलासा किंवा विशेषत: तिची तक्रार नोंदवून घेत असताना कोठेही संवेदनशीलता दिसून येत नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

महोदय, काल एका प्रकरणी मंत्री महोदयांनी बोलताना सांगितले की, ती मुलगी स्वत:हून गेली होती. महोदय, कामासाठी, नोकरीसाठी गेलेली मुलगी बलात्काराचा बळी झाली तर तिने स्वत:हून बलात्काराला कोठे तरी आमंत्रण दिले असे जे गृहीत धरले जाते ते चुकीचे आहे.

महोदय, या मध्ये परस्पर समन्वय, संवेदनशीलता कायद्याची बूज, कार्यतत्परता, परिवार, शाळांचे व्यवस्थापन, गाव पातळीवरील काम, पोलीस, आरोग्य, दिलासा, कोर्ट, वकील, माध्यमे, वाहतुकीच्या व्यवस्था, जिल्हा प्रशासन आणि तुरुंग हे 10 घटक महत्त्वाचे आहेत.

महोदय, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर आणि गोंदिया या जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयात छोट्या मुलींवर अत्याचार झाल्यानंतर त्यांच्यासाठी समुपदेशनाची व्यवस्था नाही. ही बाब पोलिसांनीच सांगितली आहे. या ठिकाणी महिला व बालविकास मंत्री उपस्थित आहेत. त्यांच्या विभागाशी संबंधित असलेल्या विषयावर आज सायंकाळी चर्चा होणार आहे. आज राज्यसभा आणि लोकसभेत एका कायद्यावर चर्चा होत आहे. महोदय, जिल्हा सामान्य रुग्णालयात समुपदेशक नसतील तर ते अशा घटनांकडे कसे लक्ष देतील ?

महोदय, विधी व न्याय विभागाकडून सरकारी वकील नेमले जातात. कलम-24 मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. उच्च न्यायालय व जिल्हा न्यायालय यांच्याशी कन्सल्ट करुन सरकारी वकील नेमले पाहिजे. सध्या विधी व न्याय विभागाशी कन्सल्ट केल्याचे दाखवून जे वकील नेमले जातात त्यांचा रिझल्ट चांगला नाही. माझी मागणी आहे की, कलम-24 च्या सुधारणेमध्ये बदल करण्यात यावा आणि उच्च न्यायालय व जिल्हा न्यायालय यांच्याशी कन्सल्ट करुन सरकारी वकील नेमले पाहिजे. तसेच ज्या प्रकरणात गृह विभाग वकिलाची मागणी करेल त्या प्रकरणामध्ये सरकारी वकील नेमत असताना त्यांच्या मताला प्राधान्य दिले दिले पाहिजे, अशी मी मागणी करते.

नंतर श्री.बरवड....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी नोंद

डॉ. नीलम गोऱ्हे ...

सभापती महोदय, सर्व्हिस रुल्समध्ये बदल केला पाहिजे. एखादी महिला कामावर असताना तिच्यावर असा अत्याचार झाला तर तिला वैद्यकीय रजा सुध्दा मिळत नाही. बीडमधील अंभोरे येथील प्रकरणातील ती महिला आर्मीमध्ये काम करते. अशा वेळी ती स्वत: जाऊन सांगणार का ? त्यामुळे सर्व्हिस रुल्समध्ये बदल केला पाहिजे. शिक्षण विभाग असेल, शाळा असेल त्या ठिकाणी याचा विचार केला पाहिजे. त्यांना परीक्षा अमेंड करुन करुन द्याव्या लागल्या तर ती एक दुरुस्ती करावी असे मला सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, तिसरी मागणी अशी आहे की, जी धर्माधिकारी समिती नेमली आहे त्या समितीवर आम्ही सर्व काम करीत आहोत. त्या समितीची मुदत मार्चमध्ये संपत आहे. त्यांच्या शिफारशी किती अंमलात आल्या आणि किती अंमलात आल्या नाहीत, त्याच्या निश्चित कारवाईच्या संदर्भात हे अधिवेशन संपण्याच्या आधी घोषणा केली पाहिजे तसेच अन्याय अत्याचाराच्या संदर्भात सरकारने सनद जाहीर केली पाहिजे. सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्य या चर्चेमध्ये बोलणार आहेत. परंतु आम्हाला भंडाऱ्याच्या प्रकरणाच्या संदर्भात समाधानकारक उत्तर मिळाले नाही तर आम्हाला सभागृहातच आंदोलन करावे लागणार आहे हे मी नम्रतापूर्वक नमूद करुन माझे भाषण संपविते.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी नियम 97 अन्वये जी चर्चा दिलेली आहे त्यामध्ये आपण अत्यंत महत्वाचा विषय घेतलेला आहे. भंडारा जिल्ह्यातील लाखनी येथील मुरमाडी गावतील 11 वर्षाच्या, 9 वर्षाच्या आणि सहा वर्षाच्या मुलींची जी हत्या झालेली आहे ती खरोखरच संशयास्पद आहे.

सभापती महोदय, 23 तारखेला जेव्हा मी जेव्हा मुरमाडीला भेट देण्यासाठी गेले आणि पहिल्यांदा मी पोलीस स्टेशनवर पोहोचले तेव्हा आरती सिंग, एसपी आणि राजेंद्र सिंग या दोघांच्याही भेटी झाल्या. त्यांनी जो रिपोर्ट दिला आणि त्यांचा कारभारातील जो संथपणा जाणवला त्याविषयी असे वाटले की, या पोलीस स्टेशनमध्ये काय चालले आहे ? एक तर ज्यावेळी या मुली 14 तारखेला बेपत्ता झाल्या त्यावेळी तिचे आजोबा आणि घरातील सर्व लोक त्या मुलींच्या शोध घेत गावभर फिरत होते. जेव्हा मुली कोठेच आढळल्या नाहीत तेव्हा ते पोलीस स्टेशनवर तक्रार करावयास गेले. त्यावेळी पोलीस स्टेनशमध्ये त्यांना जवळजवळ दीड ते दोन तास बसावे लागले. त्यानंतर तेथील जो रायटर असतो त्याने दीड ते दोन तास ते सर्व प्रकरण लिहून घेण्यासाठी वेळ लावला. पोलिसांना या प्रकरणाचे जेवढे गांभीर्य असावयास पाहिजे ते नसल्याचे आम्हाला त्या ठिकाणी जाणवले.

त्यानंतर जेव्हा त्या एसपी आमच्याशी बोलत होत्या तेव्हा त्यांनी आम्हाला सांगितले की, बेलारी, पालांदूर या ठिकाणी सातवीतील मुलीवर सुध्दा बलात्कार झालेला आहे. तिसरीच्या श्री. बोरकर नावाच्या शिक्षकाने तो बलात्कार केलेला आहे. ही माहिती आम्हाला आरती सिंग, एसपी यांनी दिली. त्यानंतर आम्ही त्यांना विचारले की, तो बलात्कार कधी झाला ? त्यांनी सांगितले की, बलात्कार 20 तारखेला झाला. 20 तारखेला बलात्कार झाल्यानंतर तुम्ही गुन्हेगाराला पकडले का, मुलीची वैद्यकीय तपासणी केली का असे आरती सिंग यांना विचारले तेव्हा त्यांनी सांगितले की, कालच आम्ही त्यांना हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले आहे. परंतु अजून त्या मुलीची मेडिकल झालेली नाही. एक एसपी अशा प्रकारचे उत्तर देत असताना मी त्यांना विचारले की, तिची मेडिकल का झाली नाही ? त्यांनी सांगितले की, तेथे लेडी डॉक्टर नव्हत्या.

सभापती महोदय, त्यानंतर आम्ही मुरमाडी गावातही भेटीला गेलो त्यानंतर ज्या गावात सातवीच्या मुलीवर बलात्कार झाला त्या ठिकाणी सुध्दा गेलो. पुन्हा आम्ही हॉस्पिटलमध्ये गेलो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण ....

आम्ही संध्याकाळी 5.00 वाजता हॉस्पिटलमध्ये पोहोचलो. त्यावेळी आम्ही त्या मुलीला आणि मुलीच्या आईला सुध्दा भेटलो. त्यानंतर एक गोष्ट आमच्या लक्षात आली की, सातवीतील मुलगी असूनही तिचा अंगठा घेतला होता, तिच्या आईचा अंगठा घेतला होता. हे प्रकरण इतके गंभीर असून त्याचा मेडिकल रिपोर्ट आम्हाला द्या अशी मागणी केल्यावर त्यांनी आम्हाल रिपोर्ट दिला नाही. डॉक्टरांना विचारले की, तुमच्याकडे लेडी डॉक्टर नाही का ? त्यांनी सांगितले की आमच्याकडे चार लेडी डॉक्टर्स आहेत. त्या ठिकाणी डॉ. शितल गजघाटे, डॉ. सी.एस.खोब्रागडे, डॉ. राऊत मॅडम आणि डॉ. निवाने अशा चार लेडी डॉक्टर्स असून सुध्दा तेथील एसपींनी त्या सातवीतील मुलीवर झालेल्या बलात्काराच्या बाबतीत तातडीने तिची वैद्यकीय तपासणी का केली नाही, हा सर्वात मोठा प्रश्न आहे.

सभापती महोदय, नंतर सिव्हिल सर्जन डॉ. चहांदे यांना आम्ही रिपोर्ट मागितला. त्यांनी सांगितले की, आम्ही रिपोर्ट पोलिसांकडे पाठविलेला आहे. आम्ही आरती सिंग यांना पुन्हा फोन करुन विचारले की, डॉक्टरांनी तुम्हाला रिपोर्ट दिला आहे का ? त्यांनी सांगितले की, माझ्याकडे रिपोर्ट नाही. तो रिपोर्ट नागपूरला गेला असेल. खरे म्हणजे डॉ. चहांदे यांनी त्यांच्या कार्यालयातील मेडिकल रिपोर्टची जी कॉपी होती ती आम्हाला दाखवावयास पाहिजे होती ती कॉपी त्यांनी आम्हाला दाखवली नाही. पुन्हा आरती सिंग यांनी सुध्दा टोलवाटोलवीची उत्तरे दिली. अशा प्रकारे कोणीही बलात्काराचा रिपोर्ट देण्यास तयार नव्हते. यामध्ये एक गोष्ट स्पष्ट होते की, मुरमाडीतील तीन मुलींवरील बलात्काराची किंवा हत्येची घटना असो किंवा सातवीच्या मुलीवर झालेला बलात्कार असो, त्यामध्ये पोलीस गंभीर नव्हते.

आता नवीन नवीन कायदे झालेले आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. खंदारे ...

श्रीमती विद्या चव्हाण....

परवा केंद्र शासनाने वटहुकूम काढून रेअरेस्ट टू रेअर केसमध्ये फाशीच्या शिक्षेची तरतूद केली आहे. अशी प्रकरणे केंद्र सरकारने गांभीर्याने घेऊन शिक्षेची तरतूद केलेली आहे. परंतु ही शिक्षा होण्यासाठी पोलीस स्टेशनने जी तत्परता दाखविली पाहिजे, त्यांनी जे गुन्हा नोंदवून घेतले पाहिजेत. केससाठी लागणारे पुरावे न्यायालय ग्राह्य धरत असल्यामुळे ते पुरावे एकत्रित केले पाहिजे. या सर्व कामात पोलिसांचा हलगर्जीपणा दिसून येतो. मुरमाडीच्या प्रकरणामध्येच नाही तर इयत्ता 7 वीच्या मुलीवरील अत्याचाराच्या प्रकरणात पोलिसांनी हलगर्जीपणा केल्याचे दिसून आलेले आहे. जी मुलगी सही करु शकते तिचा अंगठा पोलिसांनी घेतला. या तीन मुलींच्या संदर्भात मी त्यांच्या घरी गेले होते. त्यावेळी त्यांच्या घरातील वातावरण वेगळेच होते. त्यांच्या घराच्या शेजारीच मेश्राम नावाचे भाडेकरु संगणकाचे क्लास चालवत होते. घरात आजी-आजोबा, आई, आईची आई म्हणजे दुसरी आजीही होती. या तीन मुली लागोपाठ झाल्या होत्या. आजी-आजोबांच्या दोन मुलांपैकी एक अपघातात मरण पावलेला आहे. दुसरा मुलगा एचआयव्ही पॉझिटिव्हमुळे गेलेला होता. यातील खरी माहिती समजण्यासाठी पोलिसांनी बाहेरच्या लोकांची कसून तपासणी केलेली आहे. डॉक्टरांच्या रिपोर्टमध्ये रेप झाल्याचे नमूद केले आहे. पण फॉरेन्सिक लॅबच्या रिपोर्टमध्ये रेप झाला नसल्याचे नमूद केलेले आहे. यातील खरे शोधून काढणे महत्वाचे आहे. त्यानुसार खरे गुन्हेगार असतील मग ते जवळचे लोक असोत किंवा लांबचे असोत या सगळ्यांची पोलिसांनी चौकशी केली पाहिजे. परंतु या घटनेत जवळच्या व लांबच्या लोकांची पाहिजे तेवढी सविस्तर चौकशी झालेली नाही.

नागपूरच्या एका घटनेत पोलिसांना असाच त्रास झाला होता. त्यावेळी त्यांनी प्रत्येक घरात पत्र पाठवून चौकशी केली होती. तुम्हाला काही माहिती असेल तर ती पोलिसांना द्यावी, तुमचे नाव गुप्त ठेवले जाईल, असे पत्रात नमूद केले होते. अशा प्रकारे मुरमाडीच्या प्रकरणात पोलिसांनी दिशा ठरविली तर या मुलींच्या हत्यारांचा शोध लागू शकेल असे मला वाटते. एवढे बोलून मी येथेच थांबते. धन्यवाद.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये सुरु असलेल्या अल्पकालीन चर्चेत भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये होणारे अपघात, मुलींवर होणारे बलात्कर, त्यांचे होणारे खून हे विषय शासन लाईटलीच घेणार आहे का, हे विषय शासनाकडून गंभीरपणे घेतले जाणार आहेत की नाही ? आम्हाला न्याय मिळाला पाहिजे असे जनतेचे म्हणणे आहे. येथे मात्र अन्यायाचेच वातावरण दिसत आहे. भंडारा जिल्ह्यातील ही घटना तशीच आहे. या मुलींची आई व आजोबा रिपोर्ट देण्यासाठी गेले होते तेव्हाच तो रिपोर्ट घेतला असता तर कदाचित त्या मुलींना वाचविता आले असते. आम्ही 24 तासानंतर रिपोर्ट नोंदवून घेऊ, तोपर्यंत तुम्ही तपास करावा असे त्यांना सांगितल्यामुळे 16 तारखेला त्या मुलींची प्रेतेच सापडली. मी ती विहीर बघण्यासाठी गेले होते. परंतु त्या मुलींची विहीरीपर्यंत जाण्याएवढी स्थिती नव्हती. गावापासून 2.5 कि.मी.अंतरावर ती विहीर आहे. ती विहीर आतल्या शेतामध्ये आहे. तेथे काटेरी कुंपण आहे. त्या विहीरीजवळ रात्रीच्या वेळी त्या मुली जाऊच शकत नाहीत. त्या मुलींचे आत्महत्या करण्याएवढे वय सुध्दा नाही. या मुलींचे वय 11 वर्षे, 9 वर्षे व 6 वर्षे होते. या मुलींनी आत्महत्या केल्याचे दाखविले जाते. त्यामुळे पोलिसांच्या बुध्दीचे कौतुक करावे की काय असे वाटते. रात्रीच्या वेळी घराच्या बाहेर मुली पडण्यासाठी घाबरत असतात. असे असताना आत्महत्या करण्यासाठी त्या मुली रात्रीच्या वेळी घराबाहेर पडल्या होत्या असे भासविलेले आहे. त्यांच्या आत्महत्येची कारणे पोलिसांनी शोधलेली नाहीत.

या मुलींचे इन् कॅमेरा शवविच्छेदन करण्यात आले. शवविच्छेदनासाठी सहा तास लागले होते. त्यातही पोलिसांची गंमत अशी आहे की, सकाळी शवविच्छेदन केंद्रात प्रेते नेऊन ठेवली, परंतु त्याचा चौकशी रिपोर्ट नेला नव्हता. त्यामुळे डॉक्टरांनी शवविच्छेदनाची कार्यवाही थांबवून ठेवली. चौकशीचा रिपोर्ट दुपारी 12 वाजता दिला. त्यानंतर सहा तास पी.एम.करण्यात आले. पी.एम.साठी लागणारे तज्ज्ञ नव्हते म्हणून भंडाऱ्याला प्रेते नेली. तेथे अस्थिरोग तज्ज्ञ डॉ.गुल्हाने, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ.अर्पणा रंगारी, फिजिशिअन डॉ.प्रशांत पडोळे आणि अतिशय सिनिअर डॉक्टर खोब्रागडे, इएनटी तज्ज्ञ डॉ.प्रदिप आनंद या पाच डॉक्टरांच्या कमिटीने ते शवविच्छेदन केले. त्यांच्या अहवालात या तिन्ही बहिणींवर पाशवी अत्याचार झाला व त्यांची निर्घृण हत्या करण्यात आली, नैसर्गिक व अनैसर्गिक अत्याचार झाल्याचे नमूद केलेले आहे. त्यांच्या गुप्तांगावर असलेली सूज किंवा जखमांचीही नोंद रिपोर्टमध्ये केलेली आहे.

नंतर श्री.शिगम...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

आज ते पाचही डॉक्टर असे सांगतात की आम्ही दिलेला अहवाल बरोबर आहे. त्या अहवालातील एकही शब्द बदलण्यास ते तयार नाहीत.

त्यानंतर फॉरेन्सिक अहवालसाठी सॅम्पल पाठविले. आम्हाला अशी माहिती प्राप्त झाली की त्या सॅम्पलमध्ये विहिरीचे पाणी टाकून ते सॅम्पल पाठविण्यात आले. इतकेच नाही तर त्या पाण्यामध्ये मीठ देखील टाकण्यात आले. सॅम्पलच सदोष पाठविले असेल तर अहवाल देखील सदोषच येईल. फॉरेन्सिक अहवाल आणि पाठविलेली चित्रफित यावर ते आपले मत ठरविणार. फॉरेन्सिकचा अहवाल अत्याचार झाला नाही असा आला. मग ज्या पाच डॉक्टरांनी 6 तास तपासणी करुन अहवाल सादर केला तो अहवाल खोटा आहे काय ? मला या निमित्ताने माननीय गृहमंत्र्यांना विचारावयाचे आहे की, आता जेवढ्या काही बलात्काराच्या आणि खुनाच्या केसेस होतील त्या बाबतीत शवविच्छेदन न करता त्या केसेस फॉरेन्सिक लॅबला पाठविणार आहात काय ?

शवविच्छेदनाचा अहवालच कोर्टामध्ये ग्राह्य धरला जातो. फॉरेन्सिक अहवाल हा मोठ्या प्रमाणावर मॅनेज केला जातो. फॉरेन्सिक अहवाल दोन दोन महिने दिला जात नाही. सॅम्पल सापडत नाहीत एवढे सॅम्पलचे ढीग त्या लॅबमध्ये असतात. प्रत्येक जिल्ह्यामध्ये फॉरेन्सिक लॅब वाढवा अशी मागणी मी सदनामध्ये केली होती. परंतु शासनाने त्याकडे लक्ष दिले नाही. नागपूरच्या फॉरेन्सिक लॅबमध्ये सॅम्पल पाठविले. त्याचा रिपोर्ट बरोबर आला नाही. कारण सॅम्पलच बरोबर नव्हते. त्यानंतर चेन्नई आणि मुंबईला सॅम्पल पाठविले. हे सॅम्पल कोणते पाठविले ? मुंबईमध्ये ज्या पाठक नावाच्या व्क्तीला कमिटीवर घेतले त्याच्यावर केसेस आहेत. त्याची चौकशी सुरु आहे. अशा मानसिकतेच्या माणसाला रिपोर्ट देण्यासाठी का ठेवले ? फॉरेन्सिक अहवाल मॅनेज करण्यासाठी हे सर्व केलेले आहे.

पहिल्यांदा मी आय.जी.ना भेटले त्यावेळी त्यांनी मला सांगितले की या मुलींच्या पोटात पाणी निघालेले नाही त्यामुळे यांना मारुन नंतर विहिरत टाकलेले आहे. माझ्याबरोबर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या जिल्हा अध्यक्षा होत्या, पाच-सहा महिला होत्या, सरपंच होत्या. मी पुन्हा 9 तारखेला भेटल्यानंतर श्री. राजेंद्र सिंग यांनी उत्तरे दिली ती ऐकल्यानंतर पोलीसवाल्यांमध्येच काही तरी गडबड असल्याचे समजले. त्यांनी टोलवाटोलवीची उत्तरे दिली. आपण या प्रकरणी नागपूरच्या आणि मुंबईच्या फॉरेन्सिक लॅबमध्ये तपासणी केली. आता पुनश्च हैद्राबाद येथील फॉरेन्सिक

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

लॅबमध्ये तपासणी करण्यासाठी कोणते सॅम्पल पाठविले ? आपण लोकांना काही समजत नाही असे समजता काय ? लोक मूर्ख आहेत असे आपणास वाटते काय? हे प्रकरण आता आपणास दाबून टाकायचे आहे असे माझे स्पष्ट मत झालेले आहे. आपण या हत्या झालेल्या तीन मुलींना न्याय देणार नाही. ही सगळी कारवाई केवळ गुन्हेगाराना वाचविण्याच्या दृष्टीकोनातून झालेली आहे असा माझा स्पष्ट आरोप आहे.

दुसरे असे की, ती विहीर अडीच कि.मी.वर आहे. त्या मुली जर त्या ठिकाणी आत्महत्या करण्यासाठी गेल्या असे जर कोणी म्हटले तर आत्महत्या करण्यासाठी काही तरी कारण लागते. अगदी लहान मुलीला विहिरीत ढकलून दिले तर ती आत्महत्या होईल काय ? 6 वर्षाची मुलगी, 11 वर्षाची मुलगी कशाला आत्महत्या करील ? या मुलींचा एवढा निर्घृण छळ कोणी केला याचा तरी शोध पोलिसांनी लावयला पाहिजे होता. लाखणी या ठिकाणी त्या विहिरीच्या समोरच्या बाजूला नवीन हॉटले झालेले आहे. मला नक्की माहीत नाही परंतु उत्कर्ष असे त्या हॉटेलचे नाव असावे. त्या हॉटेलमध्ये या मुलीला चॉकलेट देतो असे सांगून कोणी तरी नेले होते असे त्या मुलीच्या आईने सांगितले होते. मग ते उत्कर्ष हॉटेल कुणाचे आहे, ती व्यक्ती कोण आहे ? या मुलींना त्या ठिकाणी नेऊन मारुन टाकले नसेल कशावरुन ? या प्रकरणाची चौकशी त्या मुलींनी आत्महत्या केली याच दिशेने केली जाणार असेल तर हे सरकार न्याय देऊ शकणार नाही. या तीन मुलींच्या मृत्यूस हे सरकार जबाबदार राहील. भविष्यामध्ये आमच्या मुलींना न्याय मिळू शकणार नाही.

आम्ही त्याचवेळी सीबीआय चौकशी मागितली होती. लोकांनी देखील ही मागणी केली होती. त्यावेळी ती मागणी मान्य केली नाही. इतके पोलीस आले होते तर ते गेले कुठे ? जी माहिती आम्हाला समजू शकते ती पोलिसांना का समजू शकली नाही ? कारण या प्रकरणी पोलिसांवर प्रचंड दबाव आहे. मोठ्या प्रमाणावर हुकुमशाही चालू आहे, पोलीस कोणतेही काम करायला तयार नाहीत अशी तेथील अवस्था आहे.

सभापती महोदय, चिमूरच्या केसमध्ये मुलीवर बलात्कार करण्यासाठी एक माणूस घरात घुसला. ती मुलगी ओरडल्या नंतर त्या मुलीच्या आजीने पाहिले त्यावेळी तो माणूस पळून गेला.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्या माणसाला आजीने ओळखले होते. दुस-या दिवशी सकाळी ती मुलगी घरात नव्हती. पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविण्यासाठी गेल्यानंतर पोलिसांनी तक्रार नोंदवून घेतली नाही. त्यांनी सांगितले की, पाहतो.

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

अमुक अमुक ठिकाणी हा मुलगा माझ्या मुलीवर बलात्कार करण्यासाठी आला होता. तो मुलगा अशा अशा ठिकाणी बसला आहे, असे सांगितल्यानंतर पोलीस त्याच्याकडे गेले. त्या ठिकाणी जाऊन त्याच्याशी काय गप्पा मारल्या याची माहिती नाही. परंतु त्या मुलास अटक करण्यासाठी गेलेले पोलीस परत आले. त्या मुलाला पोलिसांनी विचारले सुध्दा नाही. त्या दिवशी सायंकाळी त्या मुलीचे प्रेत सापडले. पोलीस स्टेशनला माहिती विचारावयास गेल्यानंतर महिलांच्या योग्य प्रकारे माहिती दिली जात नाही. उलट महिलांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम पोलीस स्टेशनमधील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडून होत असते. तर मग आम्ही कोणासाठी भांडावयाचे, कशासाठी भांडावयाचे, आम्ही कोणाची बाजू घ्यावयाची असा प्रश्न माझ्या मनात निर्माण होतो.

महोदय, ती मुलगी मृत्युमुखी पडल्यानंतर तिचा रिपोर्ट का घेतला नाही अशी आम्ही पोलीस स्टेशनमध्ये जाऊन विचारणा केली, पोलीस स्टेशनने रिपोर्ट घेतला नाही त्यामुळे लोकांमध्ये चीड निर्माण झाली. त्या पोलीस स्टेशनने मुलीचा रिपोर्ट लिहून घेतला नाही, त्या पोलीस स्टेशनमधील डायरीचे पान फाडून विशेष रिपोर्ट लिहिला गेला. त्या पोलीस स्टेशनमध्ये कार्यरत असलेल्या प्रत्येक पोलिसांकडे या बाबतची चौकशी करा. या पोलीस स्टेशनमधील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी रिपोर्ट लिहून घेण्या कामी काय काय केले याची आपण माहिती घ्यावी. पोलीस स्टेशनची डायरी फाडून खोटे रिपोर्ट सादर करणार आणि मग मात्र म्हणणार की, त्या मुलीने आत्महत्या केली. तुमचे पोलीस स्टेशनमधील अधिकारी, कर्मचारी मुलींना वाचवणार नसतील तर मुली आत्महत्या करणार नाहीत तर काय करतील ? मुलींचे जीवन काय वर आलेले आहे.

महोदय,माझ्याकडे बलात्काराच्या गुन्हयांसबंधीची उपलब्ध आहे, ती माहिती मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छिते. 2009 या वर्षात रजिस्टर केसेस 1483, चार्जशीट दाखल केलेल्या केसेस 1433, निकाल गुन्हेगारांच्या विरुध्द लागला अशा केसेसची संख्या फक्त 182 एवढी आहे. बाकीच्या केसेसचे काय झाले ? 2010 मध्ये रजिस्टर केसेस 1599, चार्जशीट दाखल केलेल्या केसेस 1498 आणि निकाल मात्र गुन्हेगाराच्या विरुध्द लागला, गुन्हेगारांना अटकेची शिक्षा झाली अशा केसेस फक्त 141 आहेत. 2011 मध्ये 1701 केसेस रजिस्टर झाल्या, चार्जशीट दाखल

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

झालेल्या केसेस 1885 आणि निकाल लागून गुन्हेगारांवर झालेली कारवाई अशा फक्त 205 केसेस आहेत. हा अहवाल डीएनए वृत्तपत्रात छापून आलेला आहे, तसेच ती माहिती वेबसाईटवर टाकण्यात आलेली आहे. सदर प्रकरणांच्या निकाल लागण्याचे प्रमाण अतिशय कमी आहे. मुलींच्या अपहरणाच्या बाबतीत फक्त 21 ते 30 टक्क्यांपर्यंतच निकाल लागतात. 70 टक्के गुन्हेगार गुन्हे करुनही सुटून जातात. कोर्ट अशा गुन्हयांचा निकाल देत नाही. कोर्टाकडून 5.7 टक्के निकाल लागतो. अशा प्रकरणांच्या बाबतीत संबंधित पोलीस स्टेशनमधील अधिकारी रिपोर्ट व्यवस्थित करीत नाही. त्यांच्याकडून चौकशीचे अहवाल बरोबर दिले जात नाहीत. अशा प्रकरणाच्या बाबतीत 90 दिवसांच्या आत अहवाल सादर करणे कायद्याने बंधनकारक आहे. 90 दिवसांच्या आत अहवाल सादर न केल्यामुळे चंद्रपूर जिल्हयातील पडोली गावातील मुलीवर बलात्कार करुन सुध्दा गुन्हेगारा विरुध्द चार्जशीट दाखल न केल्यामुळे बलात्कार करणारा गुन्हेगार मोकळा सुटला. अशी प्रकरणे सभागृहात चर्चेला आल्यानंतर शासनाकडून सांगितले जाते की, आम्ही सबंधित पोलीस स्टेशनचे पी.एस.आय.यांना निलंबित केले. तुम्ही पोलीस अधिकाऱ्याला या दाराने हाकलता आणि दुसऱ्या दाराने त्यांना आत घेता. तुम्ही त्यांचे जीवन वाचविता. परंतु अशा मृत्युमुखी पडलेल्या मुलींच्या कुटुंबीयांच्या मागे तुम्ही उभे राहणार नसाल तर ईश्वर सुध्दा तुम्हाला माफ करणार नाही. जनता देखील तुम्हाला माफ करणार नाही. भंडारा जिल्हयातील लाखनी येथे जो गुन्हा घडला आहे, त्या घटनेची सी.बी.आय.चौकशी लावल्याशिवाय महिलावर्ग चूप बसणार नाही, एवढे सांगून मी माझे मनोगत पूर्ण करते.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापतीस्थानी माननीय उपसभापती

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी या सभागृहात अल्पकालीन चर्चा उपस्थित करुन आम्हा भगिनींना स्त्रियांच्या दु:खावर बोलण्याची संधी उपलब्ध करुन दिली त्याबद्दल मी त्यांचे आभार मानते.

महोदय,भंडारा जिल्हयातील लाखनी तालुक्यातील मुरमाडी येथील तीन अल्पवयीन मुलींवर कोणी म्हणते की, बलात्कार झाला, कोणी म्हणते त्यांनी आत्महत्या केली. या बाबतची वस्तुस्थिती काय आहे, याची माहिती मिळावी म्हणून ही चर्चा सभागृहात उपस्थित करण्यात आलेली आहे. आपण नेहमी म्हणत असतो की, महाराष्ट्रामध्ये आणि मुंबई शहरामध्ये संस्कृती आहे. त्या संस्कृतीमुळे आम्ही महिला आजूबाजूला वावरत असतो. या ठिकाणी माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील हे उपस्थित आहेत. एक गोष्ट माझ्या लक्षात आली आहे की, पोलिसांना कोणीतरी मॅनेज केलेले आहे..

यानंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई.....

त्याचे कारण असे की, प्रत्येक घटनेमध्ये न्याय वैद्यक रासायनिक प्रयोगशाळेचा अहवाल आल्यानंतर तो चुकीचा आहे असे आपल्याला ठरविता येत नाही. मी वैद्यकीय क्षेत्राचा अभ्यास केलेला नाही, त्यामुळे मी अधिकारवाणीने काही बोलू शकत नाही. परंतु माझ्या शेजारी माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे बसलेले आहेत, ते यासंबंधी बोलू शकतील.

सभापती महोदय, एका बाजूला पोलीस विभागाचे म्हणणे आहे की, या प्रकरणात आमचा काही दोष नाही. आम्ही न्याय वैद्यक रासायनिक प्रयोगशाळेचा अहवाल सादर केला आहे. मला जी माहिती उपलब्ध झाली त्यावरुन असे दिसते की, प्रत्येक वेळी या घटनेच्या वेगवेगळ्या पैलूंना दिशा मिळत आहे. यामुळे या महाराष्ट्रामध्ये आम्ही महिला सुरक्षित आहोत की नाही? असा प्रश्न निर्माण होत आहे. दोन दिवसापूर्वी विलेपार्ले येथे बलात्काराची घटना घडली. दिल्ली येथील निर्भयाच्या घटनेनंतर दररोज दूरदर्शन चॅनेल व वृत्तपत्रातून अशा घटना वारंवार घडत असल्याचे निदर्शनास येते. सगळे स्पष्ट दिसत असताना आम्ही आंधळे झालो आहोत का? आम्हाला काही ऐकू येत नाही. आमचे कान बंद झाले आहेत का? विलेपार्ले येथील घटनेसंबंधी माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत अधिकारवाणीने बोलतील, कारण ते त्या भागात राहतात.

सभापती महोदय, भंडारा जिल्हयातील प्रकरणामध्ये कुटुंबातील जवळच्या मंडळींभोवती संशयाची सूई फिरत आहे असे मला वाटते. गृह खात्याने या दृष्टीने लक्ष घालून तपास केला पाहिजे. या तीन मुलींपैकी सर्वात मोठ्या मुलीचे वय 11 वर्षे होते. इतक्या कमी वयाच्या मुली घरापासून दोन ते अडीच किलोमीटर अंतरावर स्वत:हून जाणे अशक्य वाटते. त्यांना कोणीतरी नेले असावे, त्यांचा खून करुन त्यांना विहिरीत टाकण्यात आले का? कुटुंबातील किंवा ओळखीच्या व्यक्तिशिवाय या मुली इतक्या दूर जाणे शक्य नाही. त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना पकडून त्यांची चौकशी होणे अत्यंत आवश्यक आहे असे मला वाटते. पोलीस आपल्या परीने चौकशी करुन थकले आहेत. न्याय वैद्यक रासायनिक प्रयोगशाळेचा अहवाल आलेला आहे. तरीही या मुलींच्या मृत्यूला न्याय मिळत नाही. या घटनेला कोण जबाबदार आहे हे अद्यापही स्पष्ट झालेले नाही. म्हणून माझी मागणी आहे की, हे प्रकरण सीबीआयकडे सोपविण्यात यावे. त्यांच्याकडून या प्रकरणाचा उलगडा झाल्याशिवाय राहणार नाही. त्यांच्या घरातील व्यक्तींची चौकशी करण्यात यावी,

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई.....

वेळप्रसंगी त्यांना दंडुक्यांचा प्रसाद देण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. सतत दूरदर्शनवरील बातम्या मॅनेज करणाऱ्या, इंग्रजी वृत्तपत्रातील बातम्या मॅनेज करणाऱ्या व्यक्ती कोण आहेत? या व्यक्तींना शासन झाले पाहिजे अशी मागणी करुन मी माझे भाषण पूर्ण करते.

नंतर आय.1....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी (विधानसभेने निवडलेल्या) : सन्माननीय सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोदजी तावडे यांनी महत्वाच्या आणि गंभीर विषयावर चर्चा उपस्थित केली असून त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे. भंडाऱ्या जिल्हयामध्ये 3 अल्पवयीन मुलींचे अपहरण व बलात्कार करुन त्यांची हत्या करण्यात आलेली आहे. एक महिना उलटून गेल्यानंतरही या गुन्ह्यातील आरोपींना अद्याप पर्यंत अटक होऊ शकली नाही ही चिंतेची बाब आहे. महिलांवरील अत्याचारांच्या गुन्ह्यांसाठी कडक शिक्षेची तरतूद असलेले विधेयक आज लोकसभेत मांडले जात असून सर्व पक्षाच्या संमतीने, एकमताने ते मांडले जात आहे ही समाधानची बाब आहे. गेल्या काही महिन्यांपासून भारतामध्ये महिलांची असुरक्षितता वाढते आहे. दिल्ली, मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात महिलांवरील अत्याचार, बलात्कार व छेडछोडीच्या घटना वाढत आहेत ही चिंतेची बाब आहे. वर्तमानपत्र उघडून बघितले तर आपल्याला रोज विनयभंगाची घटना, बलात्काराच्या घटना घडल्याचीच माहिती दिसून येते व त्यामुळे महिलांची असुरक्षिता वाढते आहे हे दिसून येते. महिलांवरील सातत्याने वाढत जाणारे अत्याचार रोखण्यासाठी आपला कायदा अपुरा आहे त्यामुळे यासंदर्भात विचार होण्याची आवश्यकता आहे. आपणच आपल्या महिलांना समाजात सुरक्षित जगणे बहाल करु शकत नाही ही माठी विदारक वस्तुस्थिती आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

सभापती महोदय,दिल्लीमध्ये एका उच्चशिक्षित तरुणीवर बसमध्ये केलेला अमानुष बलात्कार असेल किंवा भंडारा जिल्हयातील 3 बहिणींवर झालेला अत्याचार असेल या घटना मन सुन्न करणाऱ्या आहेत. भारतात दर 26 मिनिटांनी एक महिलेचा विनयभंग तर 34 मिनिटांनी एका महिलेवर बलात्कार होतो असे एका संस्थेच्या पाहणीत आढळून आले आहे. महिलांसाठी स्वतंत्र धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असूनही त्याच महाराष्ट्रात आज सर्वाधिक महिला अत्याचाराला बळी पडत आहेत. काही दिवसापूर्वी राज्य सरकारने सीआयडीचा अहवाल प्रसिध्द केला होता व त्यामध्ये असे दिसून आले आहे की, गेल्या वर्षीच्या तुलनेत या वर्षी जवळपास 15 टक्क्याने वाढ झालेली आहे. मुंबई पाठोपाठ पुणे, बिहार,युपी, मध्यप्रदेश ही राज्ये सुध्दा आज महिलांसाठी सुरक्षित राहिलेली नाहीत. महिलांच्या अत्याचाराचा आलेख वाढत असल्यामुळे आपल्या सारख्यांना अस्वस्थ वाटते ही वस्तुस्थिती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी.....

सभापती महोदय, महिलांवरील अत्याचाराच्या, छेडछाडीच्या, विनयभंगाच्या आज ज्या काही घटना घडतात तेव्हा पोलीस काय करतात हा आता प्रश्न निर्माण झाला आहे. भंडाऱ्याची घटना 16 फेब्रुवारी, 2013 रोजी घडली असून एका विहिरीमध्ये या तिन्ही बहिणींची प्रेते सापडली होती. एक महिना उलटून गेल्यानंतरही गुन्हेगार पकडण्यामध्ये पोलिसांना यश आलेले नसल्यामुळे आजही या गुन्ह्यांतील आरोपी मोकाट सुटलेले आहेत.

सभापती महोदय,सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस आणि श्रीमती विद्या चव्हाण यांनी सांगितल्या प्रमाणे भंडाऱ्याच्या घटनेमध्ये तपासाची दिशा बदलण्याची आवश्यकता असून या गुन्ह्यातील आरोपींना लवकरात लवकर पकडावे अशी मागणी करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, बलात्कार झाल्यानंतर पोस्ट मार्टेम रिपोर्टमध्ये सर्व काही सिध्द होत असते. गुप्तांगावर झालेला बलात्कार सहज समजून येत असतो. कारण "हायमेन रपचर,टू फिंगर डायलेटेशन" झालेले आहे असे त्या रिपोर्टमध्ये म्हटलेले आहे. गुप्तांगावर बलात्कार करता करता ॲनल रेप देखील झालेला असून यासंदर्भातील माहिती सुध्दा रिपोर्टमध्ये आहे.

सभापती महोदय,पीडित मुलींना चॉकलेट दिले गेले असे सांगण्यात आले परंतु फॉरेन्सीक रिपोर्टमध्ये मुलीच्या पोटात चॉकलेट असल्याचे आढळून आले नाही.

सभापती महोदय, खरे म्हणजे त्या प्रकरणात डीएनए टेस्ट व्हावयास पाहिजे होती परंतु ती झालेली नाही. व्हीसेरा एक्झामिनेशनमध्ये बुडून मेल्या की मारुन विहिरीत टाकले याची माहिती मिळत असते. अशा या दोन वेगवेगळया गोष्टी आहेत. समजा अशा रीतीने त्यांना गोडया पाण्यात टाकले तर सदर व्यक्ती जिवंत राहण्यासाठी 10 ते 12 मिनिटे झगडत असते. परंतु समुद्राच्या पाण्यात टाकले तर 5 ते 7 मिनिटांमध्ये माणूस मरतो.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

त्यासाठी गेटलर टेस्ट येते. दुसरी डायटॉम टेस्ट येते. ह्या दोन्ही टेस्ट झालेल्या नाहीत, अशी माझी माहिती आहे. गेटलर टेस्ट झाली असेल तर आपल्या त्या मुली बुडून मेल्या की नाहीत हे समजेल. माझ्याकडे एक पुस्तक आहे. त्यातील दोन ओळीच मी आपल्याला वाचून दाखविणार आहे. त्यात नमूद करण्यात आले आहे की, "This water, by peristaltic movement, may enter the small intestine...." छोट्या आतड्यामध्ये जाऊ शकते."..and provide absolute proof of death from drowning...." जर छोट्या आतड्यामध्ये आपल्याला वनस्पती आढळल्या, फंगस आढळला तर तो मृत्यु ड्राऊनिंग मुळे झाल्याचे आढळून येते. "However, When the putrefaction sets..." त्यांना मारून पाण्यामध्ये टाकले असेल तर ती बॉडी डीकंपोझिंग होते. "..in cardiac and pyloric sphincters may relax and allow water with its contaminants like algae, weeds and sand to get into stomach and small intestine. This observation therefore has no significance in a putrefied body." जर त्यांना एक दिवस आधी मारले असेल तर त्यामध्ये सिग्नीफिकन्स काहीही नसतो.

सभापती महोदय, यात दोन गोष्टी महत्वाच्या आहेत. त्यांच्या श्वासनलिकेच्या मार्गात कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण झाला नव्हता. त्यांच्या कानातून रक्त आले नव्हते. हे पोस्ट मार्टेम रिपोर्टमध्ये सिद्ध झालेले आहे. ह्या महत्त्वाच्या साईन्स आहेत. त्या साईन्स ओव्हरलूक करण्यात आल्या असा माझा दावा आहे. त्यांच्या फफ्फुसाला सूज आली होती. त्या मुलींच्या छातीतील स्टर्नेम काढल्यानंतर त्यामध्ये पाणी सापडले आहे. त्यामुळे त्यांना मारून टाकले आहे हे सिद्ध होते. जठरातील पाणी आणि आतड्यातील पाणी हे सजेस्टीव्ह आहे. म्हणजे त्यांना काही तासापूर्वी मारून टाकले होते. त्यामुळे त्या बॉड्या डीकंपोझ व्हायला सुरूवात झालेली होती.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

सभापती महोदय, या मुलीच्या वडिलांचा मृत्यू कशामुळे झाला आहे ? या मुलीच्या वडिलांचा मृत्यू सन 2008 मध्ये झाला आहे. त्याबाबत कोणत्याही प्रकारचा पुरावा नाही. मी त्या मुलींच्या आजोबांना विचारले की, आपल्या मुलाचा मृत्यू कशामुळे झाला ? त्यांनी मला विविध कारणामुळे मृत्यू झाला असे सांगितले. आजोबांची या घरातील नेमकी भूमिका काय आहे ? ते यात सहभागी असतील याची शक्यता नाही. या मुलीच्या वडिलांचा मृत्यू एडसने झाला होता. त्यामुळे त्यांच्या पत्नीला आणि इतर मुलींनाही एडस होण्याचा संभव होता. कारण त्यांचा ब्लड टेस्ट रिपोर्ट अजूनही आलेला नाही. त्यांची आई सतत आजारी आहे. त्यामुळे फॉरेन्सिक दृष्टीने डायटॉम टेस्ट ही फार महत्त्वाची आहे. ती टेस्ट झालेली नाही. गेटलर टेस्टवर अवलंबून राहणे पूर्णपणे चुकीचे आहे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

.....

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील (गृह मंत्री) : सभापती महोदय, भंडारा जिल्ह्यामध्ये गंभीर घटना घडली आहे. त्यामुळे महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न सदनातील सन्माननीय महिला सदस्यांसह सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी उपस्थित केला आहे.

महाराष्ट्राला चांगली परंपरा आहे. महाराष्ट्रातील तमाम जनतेवर असलेल्या शिकवणीच्या प्रभावामुळे नेहमी महिलांचा सन्मान राखण्याचे धोरण राज्यातील सर्व जनतेले स्वीकारलेले आहे. जेथे चांगले लोक असतात तेथे नराधम देखील असतात. त्यापासून कुठल्याही समाजाची पूर्णपणे सुटका होऊ शकत नाही.

काल रात्री मी वेगवेगळ्या बातम्या पहात होतो. त्यावेळी मध्य प्रदेशातील एका घटनेची जोरदार चर्चा माध्यमामध्ये सुरू होती. अशा काही घटना घडत आहेत की, त्या अंतर्मुख होऊन सर्वांनाचा विचार करायला भाग पाडत आहेत. त्यापैकी भंडारा जिल्ह्यातील तीन मुलींच्या मृत्यूची घटना आहे. या चर्चेच्या माध्यमातून सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांच्या मी निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, महाराष्ट्रामध्ये बलात्काराचे पेव फुटले आहे, अन्याय होत आहेत, येथे चांगले लोक राहिलेले नाहीत, पोलीस काही लक्ष देत नाहीत, असाही संदेश जाता उपयोगाचा नाही.

सभापती महोदय, मला फार आकडेवारीमध्ये जायचे नाही. मुंबईतील लोकसंख्ये मागचा गुन्हेगारीचा दर 9.2 आहे. देशामधील 53 मोठ्या महानगरांमध्ये मुंबई शहराचे गुन्हेगारीमध्ये 48 क्रमांकावर स्थान आहे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

सर्व महानगरांमध्ये मुंबई हे महिलांच्या बाबतीत सुरक्षित शहर मानले जाते. हे श्रेय मुंबईतील जनतेचे आणि येथील एकूण व्यवस्थेमध्ये काम करणाऱ्यांचे तसेच पोलिसांचे आहे. दर लाख लोकसंख्येमागे हा दर 9.2 आहे. अहमदामध्ये हाच दर 27.7 आहे. भोपाळमध्ये 27.3 आहे. बँगलोरमध्ये 22.2 आहे. दिल्लीमध्ये 27.9 आहे. मुंबई हे महिलांच्या बाबतीत सुरक्षित शहर आहे. देशात सुरक्षित राज्यांमध्ये आपला महाराष्ट्र 18 व्या क्रमांकावर आहे. तेव्हा महिलांच्या सुरक्षितेच्या बाबतीत कोणी दुर्लक्ष करीत आहे अशातला काही भाग नाही.

सभापती महोदय, भंडारा जिल्ह्यातील मुरमाडी येथे घडलेल्या घटनेच्या संदर्भात येथे अल्पकालीन चर्चा उपस्थित करण्यात आलेली आहे. दिनांक 14.2.2013 रोजी रात्री 10.30 वाजता रात्री उशिरापर्यंत घरी आल्या नाहीत म्हणून श्री.रायभान गणपत बोरकर या मुलींच्या आजोबांनी पोलीस स्टेशनकडे धाव घेतली. कोणत्याही मिसींग केस मध्ये पोलीस तातडीने गुन्ह्यांची नोंद करतात असे कधी होत नाही. प्रथम आजूबाजूला, शेजाऱ्यांकडे, नातेवाईकांकडे चौकशी करण्यास सांगतात. तरी सुध्दा पोलिसांनी त्यांची आस्थेवाईकपणे विचारपूस करुन मुलींचा शोध घ्यायचा असेल तर मुलींनी कोणते कपडे घातले होते, मुलींचा फोटो आहे काय, आजूबाजूला जत्रा आहे त्याठिकाणी मुली गेल्या आहेत काय अशी विचारणा केली. या मुली मिसिंग झाल्याबरोबर शेजारच्या गावामध्ये भरलेल्या जत्रेमध्ये अमुक अमुक तीन मुली आल्या आहेत काय अशाप्रकारची अनाऊसमेंट देखील करण्यात आली. तरी सुध्दा तक्रार नोंदविण्यासाठी संबंधित व्यक्ती आली असताना तातडीने गुन्हा का नोंदविण्यात आला नाही हे एक तांत्रिक कारण काढण्यात आले.

सभापती महोदय, मुली मिसींग आहेत म्हटल्यावर पोलिसांनी शेजारी पाजारी चौकशी केली, जवळचे धाबे, हॉटेल्स इत्यादी ठिकाणी चौकशी केली. या तीन मुलींच्या तक्रारी नोंदवून घेण्यास रात्रीचा एक वाजला. तीन मुलींचा एफ.आय.आर.नोंदवून घे्ण्यास पाऊण तास लागतो म्हणजे तक्रारदरांना पोलिसांनी तेथेच बसवून घरी जाण्याची भूमिका घेतलेली नाही. पहिल्यांदा मुलींचा शोध घेऊन त्यानंतर मिसिंगची तक्रार घेतली. तरी सुध्दा वेळ लावला म्हणून शासनाने तेथील पी.एस.आय.ला सस्पेंड करण्याची भूमिका घेतली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

सभापती महोदय, दिनांक 14 फेब्रुवारी, 2013 रोजी पोलिसांनी एक शोध पथक तयार केले. दिनांक 15 फेब्रुवारी रोजी सर्वत्र शोध घेऊन सर्व जिल्ह्यांमध्ये बिनतारी यंत्रणेने माहिती दिली. त्या संदर्भातील पुरावे आहेत. दिनांक 16 रोजी गडेगाव शिवारातील एका विहिरीत सायंकाळी सहा ते साडेसहाच्या सुमारास तीन मुलींचे मृतदेह तरंगताना आढळले. दिनांक 16 रोजी एस.पी.नी देखील त्या पोलीस स्टेशनला भेट दिली होती. दिनांक 16 रोजी सायंकाळी ते तीनही मृतदेह पोलिसांनी ताब्यात घेऊन ते पोस्टमार्टेमसाठी पाठविले. परंतु तीन मुलींचे मृतदेह सापडले म्हणून लगेच तेथे आंदोलन सुरु झाले. तेथे पंचनाम्यासाठी, ओळखपरेडसाठी आणि त्या मुलीचें मृतदेह पोस्टमार्टेमसाठी नेण्यास अडथळे निर्माण करण्यात आले. तेथे घोषणाबाजी सुरु झाली. आंदोलन सुरु झाले. लोकांची समजूत काढून पोलिसांनी तेथून मृतदेह नेले.

सभापती महोदय, दिनांक 16 रोजी घरातील एकाही व्यक्तीला गावकऱ्यांनी ओळखपरेडसाठी जायचे नाही म्हणून सांगितल्यामुळे एकही व्यक्ती दवाखान्यापर्यंत येऊ शकली नाही आणि लोकांनाही जाण्यास प्रतिबंध केला. दिनांक 17 तारखेला वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी त्या मुलींच्या घरी जाऊन घरच्यांची समजूत घालून तुमच्या मुली आहेत त्यांचे मृतदेह सापडले आहेत असे सांगितल्यानंतर घरचे लोक तेथे गेले.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉक्टरांच्या पथकाने 17 तारखेला शव विच्छेदन केले. 18 तारखेला व्हिसेराचा अहवाल राखून ठेवून शव विच्छेदन अहवाल दिला. भंडारा येथील डॉक्टरांच्या पथकाने मुलींना मारुन पाण्यामध्ये टाकले आणि मारण्यापूर्वी बलात्कार झाला होता असा शव विच्छेदन अहवाल दिला. महोदय, हे प्रकरण दाबायचे असते तर पोलिसांनी या प्रकरणी 376 आणि 302 ही कलमे लावली नसती. शव विच्छेदन अहवाल आल्यानंतर ही कलमे लावली आहेत.

महोदय, ही गंभीर घटना असल्यामुळे गोंदिया, वर्धा, नागपूर, चंद्रपूर येथील 60 पेक्षा अधिक अधिकारी/कर्मचाऱ्यांना या घटनेची चौकशी करण्यासाठी पाचारण केले. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या घटनेची दखल घेतली. या पोलीस/अधिकाऱ्यांनी 10 वेगवेगळी पथके तयार केली. बलात्कार करणारे कोण असू शकतात, लहान मुलींवर लैंगिक अत्याचार करणारे कोण आहेत, आतापर्यंत मुलींचा विनयभंग करणारे कोण आहेत, परिसरातील कोण आरोपी असे करु शकतात, मुलींचा कोणत्या कारणासाठी खून वा मृत्यू झाला या बाबी तपासण्यासाठी निरनिराळ्या 10 टीम तयार केल्या. बलात्कार झाले असे शव विच्छेदनानंतर जाहीर झाल्यानंतर परिसरात कोण कोण येऊन गेले यासाठी राज्याचे पोलीस गुजरात, राजस्थान पर्यंत पोहोचले. स्वेटर विकण्यासाठी कोणी आले होते काय, अन्य कामासाठी कोणी आले होते काय हे सर्व पाहून त्या त्या ठिकाणी जाऊन चौकशी केली. महोदय, मी विनम्रपणे सांगू इच्छितो की, राज्यात रेप वा मर्डर केसमध्ये आतापर्यंत चौकशी केली नसेल तितक्या लोकांची या प्रकरणी चौकशी केली आहे. या प्रकरणी 500 लोकांची तपासणी केली आहे. शिवाय गावामध्ये पेट्या लावून या घटनेची कोणाला माहिती असेल तर त्यांनी या घटनेबाबत पोलिसांना निनावी माहिती द्यावी असे जाहीर केले. शिवाय 1 लाख रुपयांचे बक्षिस जाहीर करण्यात आले. आय.जी. पासून सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्या ठिकाणी तळ ठोकला. पोलिसांनी सर्व बाजूंनी तपासणी सुरुच ठेवली होती.

महोदय, व्हिसेराचा अहवाल फॉरेन्सिक लॅबकडे पाठविला होता. त्यांचा अहवाल प्राप्त झाला. त्यामध्ये मुलींच्या शरीरात विष किंवा गुंगीकारक पदार्थ आढळून आले नाही. महोदय, मुलींच्या शरीरावर मृत्यू होईल अशा जखमा नव्हत्या. फॉरेन्सिक लॅबचा अहवाल आल्यानंतर मुलींच्या शरीरात कोणतेही विष नसताना त्या मुलींचा मृत्यू कसा झाला हे तपासण्यासाठी अधिक खोलात जाण्याची पोलिसांना आवश्यकता वाटली. महोदय, दिल्लीच्या एम्स् संस्थेच्या न्याय वैद्यक

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

शास्त्र विभागाचे माजी विभाग प्रमुख आणि देशाचे वरिष्ठ न्याय वैज्ञानिक शास्त्रज्ञ डॉ.डोग्रा हे या क्षेत्रात उत्कृष्ट काम करणारे आहेत. जगभरातून अनेक घटनांमध्ये एम्स् सारख्या संस्थेकडून मत मागविले जाते. या घटनेतील सॅम्पल, शव विच्छेदन अहवालाची फिल्म, किंबहुना पोलिसांकडे जेवढे रेकॉर्ड होते ते सर्व रेकॉर्ड डॉ.डोग्रा यांच्याकडे पाठविले. त्याच बरोबरच के.ई.एम. रुग्णालय, त्यांचा फॉरेन्सिक विभाग आणि जे.जे. रुग्णालय यांच्याकडे सुध्दा या गोष्टी पाठविल्या. या तिन्ही संस्थांचे आणि तज्ज्ञांचे अहवाल आले. त्यामध्ये डॉ.डोग्रा यांनी तिन्ही मुलींचा मृत्यू पाण्यात बुडून श्वास गुदमरल्याने झाला असून, शव विच्छेदन अहवालातील लैंगिक दुखापतीसदृश्य निरीक्षणे ही मृतदेहाच्या डी-कम्पोझीशनमुळे निर्माण झालेल्या गॅसेस व बदलामुळे झालेले असावेत व या बदलांचाच शव विच्छेदन करणाऱ्या डॉक्टरांनी लैंगिक अत्याचार असा अर्थ लावलेला असावा, असे मत दिले.

या बाबत के.ई.एम. हॉस्पीटल, मुंबईच्या एक्स्पर्टनी माध्यमांसमोर येऊन सांगितले आणि शासनाला सुध्दा लेखी अहवाल दिला.

नंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील ....

त्यांच्या अहवालानुसार मुलींच्या मृत्यूचे कारण पाण्यात बुडून श्वास गुदमरल्याने मृत्यू असे असून शवविच्छेदन अहवालातील लैंगिक दुखापतीसदृश्य निरीक्षणे....

उप सभापती : माननीय मंत्र्यांच्या उत्तरासाठी सभागृहाच्या कामकाजाची वेळ 10 मिनिटे वाढविण्यात येत आहे.

श्री. आर. आर. पाटील : लैंगिक दुखापतीसदृश्य निरीक्षणे मृतदेहाच्या डिजिटल इन्सर्शनमुळे निर्माण झालेल्या पोस्टमार्टेम इफेक्टसमुळे आहेत व मुलीवर लैंगिक अत्याचार झालेला नसावा असा रिपोर्ट केईएम हॉस्पिटलमधील तज्ज्ञांनी दिला. जे.जे. हॉस्पिटलमधील तज्ज्ञांनी सुध्दा सर्व व्हिडिओ शुटींग, फोरेन्सिक अहवालानुसार तीनही मुलींवर लैंगिक अत्याचार झालेला नसल्याचा निष्कर्ष काढला. महिला आयोगाने जो अहवाल गठीत करुन त्यांचे प्रतिनिधी म्हणून श्रीमती निर्मला सामंत प्रभावळकर यांना पाठविला होता त्यांच्या अहवालाच्या आधारावर त्यांनीही आपला रिपोर्ट दिला.

सभापती महोदय, या तीन तज्ज्ञांची मते आलेली आहेत. आणखी एका दुसऱ्या राज्यातील फॉरेन्सिक लॅबला आम्ही हा अहवाल पाठविला आहे. त्यांचा रिपोर्ट अद्याप आलेला नाही. ही घटना घडल्यानंतर पालकमंत्री श्री. रणजित कांबळे, त्या मतदारसंघातील लोकसभेचे सदस्य श्री. प्रफुल्ल पटेल, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. माणिकराव ठाकरे, श्री. जोगेंद्र कवाडे, श्री. नानाभाऊ पटोले, श्रीमती विद्याताई चव्हाण, श्री.आर.आर.पाटील, श्री. नितीन गडकरी, श्रीमती शोभाताई फडणवीस, प्रा. वर्षाताई गायकवाड, डॉ. नितीन राऊत, श्रीमती रजनीताई पाटील, न्यायमूर्ती थूल, श्री. भालचंद्र मुणगेकर, श्रीमती निर्मला सामंत प्रभावळकर, शोभना शहा, कमल नेवारे, शोभाताई, श्री. रामदास आठवले यापैकी रोज एकदोन लोकांनी त्या ठिकाणी भेटी दिल्या, आंदोलने केली.

सभापती महोदय, तपास करतानाच या सर्व लोकप्रतिनिधींना माहिती देणे हे मुख्य काम सुध्दा तेथील पोलीस अधिकाऱ्यांना करावे लागले. मी आता या विषयावर जास्त बोलत नाही पण कधी तरी मी माझ्याही भावना व्यक्त करीन. पोलिसांनी एकदा हा रिपोर्ट आल्यानंतर मृत्यूची कारणे अंधश्रध्देसाठी मृत्यू असू शकतो, अपघाती मृत्यू असू शकतो किंवा मुलींना पाण्यात उचलून फेकून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील ....

मृत्यू झालेला असू शकतो. आम्ही आमचा तपास बजून बंद केलेला नाही. आम्ही आमच्या टीम्स अजून गुंडाळलेल्या नाहीत. सर्व टीम्स तपास करीत आहेत. तपास करीत असताना राज्यातील जनतेला आणि कुटुंबातील माणसांना सुध्दा तपास होत आहे असे वाटले पाहिजे. या तीन मुलींच्या मृत्यूचा तपास व्हावा ही माझी, पोलीस खात्याची, राज्यातील जनतेची आणि सर्व लोकप्रतिनिधींची प्रामाणिक भावना आहे. या ठिकाणी राजकीय वैमनस्य होते म्हणून कोणाला पाठीशी घालावयाचे आहे ? त्या ठिकाणी तीन निष्पाप मुली मेलेल्या आहेत. कोणालाही पाठीशी घालण्याची सरकारला बिलकुल गरज नाही. या ठिकाणी ज्या डायटॉम टेस्टचा उल्लेख करण्यात आला ती टेस्ट सुध्दा करण्यात आलेली आहे. तिचे नमुने पाण्यातील नमुन्याशी मिळतेजुळते आलेले आहेत. ती टेस्ट सुध्दा शासनाने घेतलेली आहे.

सभापती महोदय, खैरलांजीचा तपास सीबीआयकडे दिला पाहिजे अशी मागणी विधानसभेत आणि बाहेर लोकांनी केली. सीबीआयकडे तपास दिल्यानंतर पुन्हा तेथील स्थानिक लोकांनी टीका केली. सोनई येथे मध्यंतरी तीन दलितांच्या हत्या झाल्या. लोकप्रतिनिधी आणि मेहतर समाजाच्या संघटना अगदी श्री. आठवले साहेबांसह अनेक शिष्ट मंडळे मला भेटली, त्यामध्ये मेहतर समाज संघटनेने हा तपास सीआयडीकडे द्यावा अशी माझ्याकडे मागणी केली. एका समाजाचे संपूर्ण संघटन येऊन मागणी करीत आहे म्हणून मी सीआयडीकडे तपास देण्याची घोषणा केली आणि सीआयडीकडे तपास दिला. नंतर त्यांच्या भावाने हरकत घेतली की, पोलीस चांगला तपास करीत होते त्यामध्ये व्यत्यय आणण्यासाठी तुम्ही सीआयडीकडे तपास दिला का ?

सभापती महोदय, खैरलांजीचा तपास मी सीबीआयकडे दिला होता. त्यावेळी आमच्यावर टीका झाली की, पोलीस चांगले काम करीत होते, लोकांना अटक करीत होते, तुम्हाला तपास होऊ द्यावयाचा नाही का ? बीडला स्त्री भ्रूण हत्येची घटना घडली. सर्वांनी मिळून या सदनामध्ये आणि बाहेर मागणी केली की, श्री. उज्ज्वल निकम यांना वकील म्हणून द्यावे. श्रीमती देशपांडेताईंनी श्री. उज्ज्वल निकमवरच टीका केली. त्यामुळे त्यांनी केस नाकारली. त्यांनी जो वकील दिला त्यांना सरकारने वकील म्हणून नेमले. आता दुसरी स्थानिक टीका सुरु झाली. या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/ ST

श्री. आर.आर.पाटील .....

प्रकरणाच्या बाबतीत मलाही वाटते अत्यंत पारदर्शीपणाने राज्याच्या जनतेला पटेल असा तपास झाला पाहिजे, कोणत्याही गुन्हेगाराला कधीही पाठीशी घातले नाही आणि कोणी असलेच तर कोणालाही पाठीशी घालण्याची बिलकुल इच्छा नाही. मृत्यू कशाने झाला आहे हे जर पोलिसांनी पुढे आणले तर त्यावर विश्वासच ठेवावयाचा नाही अशा पध्दतीच्या भूमिका सुध्दा बरोबर नाहीत. आपण मनात अगोदरच गृहीत धरुन हा बलात्कारच झाला आहे, त्यांचे खूनच केले, पोलीस तपासच करीत नाहीत, पोलीस कोणाला अटकच करीत नाहीत असे म्हटले जाते. (अडथळा) ..

यानंतर श्री. खंदारे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माझे उत्तर पूर्ण होऊ द्यावे. असे गृहित धरुन बोलले गेले.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, चुकीचे रेकॉर्डवर येत आहे. आम्ही असे म्हटलेले नाही तर पोलिसांनीच असे म्हटलेले आहे.

श्री.आर.आर.पाटील : ज्यावेळी हा रिपोर्ट आला त्यावेळी पोलिसांनी हे सर्व गुन्हे नोंदविले आहेत. पोलिसांनी नाकारले नव्हते. फॉरेन्सिक लॅबचा रिपोर्ट आल्यानंतर पोलिसांनी देशातील तीन फॉनेन्सिक लॅबकडून रिपोर्ट मागविले आहेत. त्यांचेही रिपोर्ट आलेले आहेत. त्यामुळे कोणालाही पाठीशी घालण्याचे काम नाही. तसे असते तर भंडाऱ्यातून फॉरेन्सिक लॅबचे रिपोर्ट आल्यानंतर कलम 376 व 302 नुसार गुन्हे नोंदविले नसते. फॉरेन्सिक लॅबचा रिपोर्ट आल्यानंतर अनेक तज्ज्ञांचा सल्लाही घेतलेला आहे. या गुन्ह्यातील जी वस्तुस्थिती असेल ती पुढे आली पाहिजे. हा तपास सीबीआयकडे देण्यासाठी माझी 100 टक्के तयारी आहे. राज्य शासनाची तयारी आहे, शासनाला कोणालाही पाठीशी घालावयाचे नाही. यातील सत्य बाहेर आले पाहिजे. पण हा अधिकार मी त्या मुलींच्या कुटुंबीयांकडे देतो. त्या मुलींच्या आईने, आजी-आजोबांनी यापैकी कोणीही एकाने मागणी केली, त्यांचे एक साधे पत्र आले तरी त्या क्षणाला हा तपास सीबीआयकडे देण्यास मी तयार आहे. एका गरीब घरातील 3 मुलींच्या मृत्यूचे कारण पुढे आणण्यासाठी आपण जेवढे उत्सुक आहात तितकाच मीही उत्सुक आहे. सर्व पोलीस दलालाही तसे वाटते. सीबीआयने हा तपास त्यांच्याकडे घेईपर्यंत व त्यांनी संमती देईपर्यंत आमच्या टीम मृत्यूच्या कारणापर्यंत पोहोचण्यासाठी प्रयत्न करीत राहतील.

सभापती महोदय, या कुटुंबाला शासनाने आर्थिक मदतही दिलेली आहे. महाराष्ट्रात अशी घटना जेथे कोठे घडलेली आहे तेथे पोलिसांनी अतिशय संवेदनशीलतेने पाहिलेले आहे. जेथे पोलीस चुकलेले आहेत तेथे कठोरपणे कारवाई करण्यासाठी विभागाने मागेपुढे पाहिलेले नाही. महाराष्ट्रात महिला सुरक्षित असावयास पाहिजेत. ते त्यांचे धोरण राहील. परंतु यंत्रणा तपास करीत असताना राज्य सरकारने, विरोधी पक्षातील किती सदस्यांनी तेथे जावे याला कोठे तरी मर्यादा आली पाहिजे. पोलिसांनी तपास करावयाचा की, कॅमेरे घेऊन गेलेल्या व्हीआयपींना उत्तरेच

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

देत बसावयाचे हा देखील पोलिसांसमोर प्रश्न आहे. या निमित्ताने माझे वेगवेगळ्या सामाजिक कार्यकर्त्यांना विनम्र आवाहन आहे की, अशी घटना घडल्यावर तेथे जाऊन गर्दी करण्यापेक्षा यंत्रणांना काम करण्यासाठी थोडीशी उसंत दिली पाहिजे. शेवटी हा त्यांचा अधिकार आहे. या गुन्ह्याचा तपास सीबीआयकडे देण्याची शासनाची 100 टक्के तयारी आहे.

सभापती महोदय, या गुन्ह्यासंबंधी बोलत असताना सन्माननीय सदस्यांनी अन्य गुन्ह्यांसंबंधीचाही उल्लेख केलेला आहे. त्यासंबंधी मी दुसऱ्या चर्चेच्या वेळी उत्तर देईन. परंतु यातील प्रत्येक घटना पोलिसांच्या लक्षात आल्याबरोबर पोलिसांनी योग्य त्या कारवाया केलेल्या आहेत.

डॉ.नीलम गोऱ्हे: त्यांच्या कुटुंबीयांकडून तक्रार आल्यानंतर हा तपास सीबीआयकडे दिला जाईल असे मंत्री महोदयांनी आता सांगितलेले आहे. परंतु शासन अंतिम निष्कर्षाप्रत आलेले नाही. परंतु यासंबंधीच्या बातम्या पुन्हा पुन्हा वर्तमानपत्रातून येत आहेत. त्यांच्या चौकशीबाबत मंत्री महोदयांनी उत्तरात काहीही उल्लेख केलेला नाही. या बातम्यांचा सोर्स आपणच आहात काय अशी म्हणण्याची वेळ आलेली आहे. म्हणून आमचे म्हणणे आहे की.....

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या सरकारवरच हेत्वाआरोप करीत असतील तर बातम्यांचा सोर्स तुम्ही आतात की आम्ही आहोत ते शोधावे लागेल.

उप सभापती : माननीय मंत्री महोदयांनी या चर्चेला सविस्तर उत्तर दिलेले आहे. त्यामुळे अल्पकालीन चर्चा आता संपली आहे.

सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होऊन नियमित बैठक सकाळी 11.30 पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक 11 वाजून 09 मिनिटांनी स्थगित झाली.)

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखाही नाही

स्थगितीनंतर

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावच्या सूचनेसंबंधी

सभापती : आज सकाळी 9 वाजून 9 मिनिटांनी सन्माननीय सदस्य सर्वश्री. रामनाथ मोते व जयंत प्र. पाटील, यांनी व सकाळी 9 वाजून 35 मिनिटांनी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र. पाटील, सुमंतराव गायकवाड, डॉ. दीपक सावंत, श्री. रामनाथ मोते, डॉ. नीलम गो-हे, श्रीमती शोभा ताई फडणवीस, डॉ. रणजित पाटील यांनी मुंबई-गोवा महामार्गावर भरणानाका, खेड जिल्हा रत्नागिरी येथे अरुंद पुलामुळे महाकाली ट्रॅव्हल्सची बस जगबुडी नदीत कोसळून 36 लोकांचा मृत्यू होणे, अनेक जण जखमी होणे. 2010-2012 या कालावधीत 828 लोकांचा मृत्यू होणे, 2411 नागरिक जखमी होणे या विषयासंबंधी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना माझ्याकडे दिलेली आहे. या विषयी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी आपल्या भावना थोडक्यात मांडाव्यात.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मुंबई-गोवा मार्गावरील आतापर्यंत झालेल्या अपघातामध्ये अतिशय भयानक अशा प्रकारचा अपघात म्हणून या अपघाताची नोंद होईल. या अपघातामध्ये पहिल्यांदा 27 लोक मृत्यूमुखी पडले असे समजले, त्यानंतर हा आकडा 32वर गेला त्यानंतर मृत्यू पावणा-यांची संख्या 37 पर्यन्त पोहोचली. हा मृत्यूचा महामार्ग आहे. यासंबंधीची चर्चा दोन्ही सभागृहामध्ये सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या सदस्यांनी देखील केलेली आहे. हा अपघात ड्रायव्हरच्या हलगर्जीपणामुळे झालेला आहे काय? या अपघाताला कोणाचा हलगर्जीपणा कारणीभूत आहे ? कोकणात जाणा-या माणसाचा जीव महत्वाचा नाही काय ? अन्य ठिकाणचे रस्ते मोठे झालेले आहेत. कोकणातील रस्ते मात्र मोठे झालेले नाहीत. कोकणाला नावे ठेवणारी वक्तव्ये सत्ताधारी बाकावरुन झालेली आहेत. कोकणामध्ये जमिनी देत नाहीत अशी कारणे सांगितली जातात. हा जो भीषण अपघात झालेला आहे त्यातील मृतांना आपण श्रध्दंजली वाहिली पाहिजे.

रात्री अडीच वाजता हा अपघात झाला. त्या महामार्गावर 7 तपासणी नाके आहेत. मागे वास्तवतेच्या आधारे चर्चा करुन किमान अशा प्रकारचे अपघात पुढे होणार नाहीत, अपघात

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

होण्याची कारणे काय आहेत यासंबंधी स्पष्टता व्हावी म्हणून आजचा प्रश्नोत्तराचा तास झाल्यानंतर नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावासंबंधी चर्चा करावी. हा विषय फार महत्वाचा आहे. सकाळ पासून फोन येत आहेत. आता शिमगा जवळ आलेला आहे. त्या दरम्यान त्या रस्त्यावर प्रचंड प्रमाणात ट्राफिक असणार आहे. म्हणून या विषयावर चर्चा घ्यावी अशी माझी विनंती आहे.

सभापती : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी दु:खद भावना या ठिकाणी मांडावी. त्यानंतर सन्मननीय उपमुख्यमंत्री हे त्यांच्या भावना मांडतील. या विषयावर चर्चा घेण्याचे ठरले आहे. त्यावेळी सर्वांना बोलण्याची संधी मिळेल.

...नंतर श्री.गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, प्रश्नोत्तराचा तास सुरु होण्यापूर्वी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे यांनी अतिशय महत्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. या राज्यात अतिशय गंभीर घटना घडलेली आहे. म्हणून राज्य शासनाने तातडीचा निर्णय घेतला आहे की, आज दुपारी 1.30 वाजता सार्वजनिक आरोग्यमंत्री श्री.सुरेश शेट्टी व रत्नागिरी जिल्हयाचे पालकमंत्री श्री.भास्करराव जाधव यांना अपघातस्थळी पाठविण्यात यावे. या संदर्भात आम्ही चर्चा करीत असताना विधानसभेचे सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.एकनाथराव खडसे यांनी अशी सूचना केली की, विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे यांना देखील सोबत न्यावे. तसेच शिवसेनेचे आमदार श्री.रवींद्र

वायकर यांना देखील घटनास्थळांची पाहणी व माहिती घेण्यासाठी पाठविण्याचे ठरले आहे. चार-पाच व्यक्ती बसू शकतील अशाप्रकारे चॉपर उपलब्ध आहे. श्री.सुरेश शेट्टी, श्री.भास्करराव जाधव आणि श्री. विनोद तावडे, श्री.रवींद्र वायकर यांच्यासह साधारणत: दुपारी 1.30 वाजता चॉपर टेक ऑफ घेईल आणि तेथील घटनास्थळाची पाहणी केली जाईल. तत्पूर्वी राज्याचे प्रमुख माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण हे साधारणत: 4.00 वाजेपर्यंत या अपघाताबाबतची संपूर्ण माहिती विधानसभा आणि विधानपरिषद सभागृहांमध्ये देणार आहेत. या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींची संख्या 37 वर गेली आहे असे बातमीच्या माध्यमातून आपल्याला ऐकावयास मिळते.

महोदय,दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांना तातडीने घटनास्थळी पाठविण्याचा निर्णय सरकारने घेतलेला आहे. मुंबई येथून चॉपरने दुपारी 1.30 वाजता निघाल्यानंतर ते 2.00 वाजेपर्यंत घटनास्थळी पोहोचतील. त्या ठिकाणी दोन तास पाहणी केली तरी 4.00 वाजेनंतर तिथून टेक ऑफ घेतला तर सायंकाळी 4.30 ते 5.00 वाजेपर्यंत मुंबईला परत येतील. या अपघाताच्या ठिकाणी कोणत्या प्रकारची मदत केली पाहिजे,अशा घटना भविष्यात घडू नयेत म्हणून कोणकोणत्या प्रकारची काळजी घेतली पाहिजे, या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तीच्या नातेवाईकांना कोणत्या प्रकारची मदत केली पाहिजे, या ठिकाणचा रस्ता अरुंद आहे तो चौपदरी झाला पाहिजे अशी सूचना सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी केली. या अपघाताच्या संदर्भातील पूर्णपणे माहिती दोन्ही सभागृहांना सरकारच्या वतीने राज्याचे प्रमुख माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण साहेब देणार आहेत.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे व त्यांचे सर्व सहकारी यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. सूचनेतील विषय कोकणात जाणाऱ्या महामार्गावर झालेला गंभीर अपघाताबाबतचा आहे. या अपघातामध्ये जवळ जवळ 37 प्रवासी दुर्देवाने मृत्युमुखी पडलेले आहेत. या प्रस्तावाच्या सूचनेच्या अनुषंगाने विशेष बाब म्हणून मी या चर्चेला परवानगी देतो आहे. प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर सभागृहापुढील अन्य कामकाज बाजूला ठेवून सदरहू विषयावरील चर्चा आपल्याला सुरु करावयाची आहे. सभागृहाचे मध्यंतर होण्यापूर्वी ती चर्चा पूर्ण करावयाची आहे. आता प्रश्नोत्तरे चर्चेला घेण्यात येतील.

3...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.व मु.शी. : तोंडी उत्तरे

पिंपरी (जि.पुणे) येथील औंध उरो रुग्णालयाची जागा बीओटीच्या नावाने खाजगी विकासकाला देण्यात आल्याबाबत

(१) * ३८१५२ श्री.अनिल भोसले , श्रीमती दिप्ती चवधरी , श्री.सुभाष चव्हाण , श्री.संजय दत्त , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री. शरद रणपिसे : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी (जि.पुणे) येथील औंध उरो रुग्णालयाची सुमारे ९० एकर जागा बीओटीच्या नावाने खाजगी विकासकाला देण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदरहू रुग्णालयाची जागा विकासकाला देण्यास जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच सदर जागा खाजगी विकासकाला देण्यापासून रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा.फौजिया खान, श्री. सुरेश शेट्टी यांच्याकरिता : (१) हे खरे नाही.

(२),(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.अनिल भोसले : औंध उरी रुग्णालय हे पुणे शहरातील मोठे रुग्णालय आहे. त्या रुग्णालयातून नागरिकांना चांगल्या सुविधा मिळव्यात म्हणून शासन या अर्थसंकल्पात काही तरतूद करणार आहे काय ? हे रुग्णालय बी.ओ.टी.पध्दतीने देण्यात येणार आहे काय ?

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, या रुग्णालयाच्या श्रेणीवर्धनाचे काम मागील वर्षी झालेले आहे. ऑपरेशन थिएटर, ऑडिओ ऑपरेटिंग रुमची व्यवस्था केली आहे. 2012-13 मध्ये रु.2.60 कोटी रुपये खर्च केले असून 2013-14 मध्ये रु.2.07 कोटी इतकी रक्कम प्रस्तावित आहे. दिनांक 25.7.2012 रोजी माननीय अध्यक्ष, विधानसभा यांच्या दालनात बैठक झाली होती. या बैठकीला माननीय उप मुख्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य मंत्री हे देखील उपस्थित होते. या बैठकीमध्ये औंध रुग्णालयाच्या ठिकाणी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल सुरु करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला. तेथे नेफ्रॉलॉजी, ऑनकॉलॉजी व न्यूरॉलॉजी विभाग असावा असा निर्णय झाला होता. या निर्णयाच्या अनुषंगाने संचालक, आरोग्य सेवा यांच्याकडून प्रस्ताव मागविण्यात आला असून तो प्रस्ताव अद्याप अप्राप्त आहे.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी तोंडी उत्तर दिले की, बीओटीवर रुग्णालय चालविण्यास देण्याचे ठरविले आहे. लेखी उत्तरामध्ये हे खरे नाही असे म्हटले आहे. उत्तरामध्ये तफावत असण्याची कारणे काय आहेत?

प्रा.फौजिया खान : बीओटीचा कोणताही प्रस्ताव विचाराधीन नाही. शासनाचा ज्या पध्दतीचा विचार होता तशा पध्दतीचा प्रस्ताव मागविण्यात आला आहे.

सभापती : फक्त प्रस्ताव मागविण्यात आला आहे, परंतु तो बीओटीचा प्रस्ताव नाही.

श्री.अनिल भोसले : हे रुग्णालय बीओटी तत्वावर चालविण्यास देण्यात येणार नसेल तर कोणत्या पध्दतीचा प्रस्ताव मागविण्यात आला आहे?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, माननीय अध्यक्ष, विधानसभा यांच्या दालनात दिनांक 25 जुलै, 2012 रोजी बैठक झाली होती. त्या बैठकीला माझ्यासह माननीय उप मुख्यमंत्री उपस्थित होते. त्या बैठकीमध्ये इन्फॉर्मल चर्चा झाली होती. बीओटीवर रुग्णालयाची जागा विकासकास देण्याचा शासनाने निर्णय घेतलेला नाही. औंध रुग्णालय बीओटीवर चालविण्यास देण्यात येणार नाही. त्या भागात सुपर स्पेशालिटी रुग्णालयाची गरज आहे म्हणून सुपर स्पेशालिटी कार्डिऑलॉजी, ऑनकॉलॉजी विभाग सुरु करण्याचा निर्णय त्या बैठकीत घेण्यात आला. त्यासंबंधीचा प्रस्ताव संचालकांकडून मागविण्याचा निर्णय झाला. याशिवाय कोणताही निर्णय घेतलेला नाही. बीओटीचा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38152.....

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी हा विषय लाईटली घेण्याची गरज नाही. बीओटीवर प्रस्ताव विचाराधीन आहे का, या प्रश्नाला उत्तर देता असताना उथळ उत्तर देण्याची गरज नाही. माननीय सदस्यांची प्रश्न विचारण्यामागची भूमिका अशी आहे की, तीन महिने अगोदर प्रश्न विचारले जातात, त्यामुळे मनात शंका निर्माण झाली. माननीय अध्यक्षांच्या दालनात झालेल्या बैठकीमध्ये चर्चा इन्फॉर्मल झाली की फॉर्मल झाली हा विषय महत्वाचा नाही. आता मंत्री महोदयांनी जो खुलासा केला तो उत्तरामध्ये अंतर्भूत केला असता तर उपप्रश्न विचारण्याचा प्रश्न उद्भवला नसता. सुपर स्पेशालिटी विभागाबाबत जो प्रस्ताव संचालकांकडून मागविण्यात आला आहे, तो प्रस्ताव किती कालावधीत कार्यवाहीत येणार आहे? रुग्णालयाची 90 एकर जागा खाजगी विकासकाला दिली जाणार नाही याची दक्षता घेतली जाईल का?

नंतर आर.1..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 38152.....

श्री.सुरेश शेट्टी :सभापती महोदय, 90 एकर क्षेत्रामध्ये आपले हॉस्पिटल उभे राहणार असून त्या ठिकाणी दुसरीही काही ऑफिसेस सुरु आहेत. मी आपल्याला पुन्हा एकदा सांगू इच्छितो की, बीओटीवर देण्यासंबंधीचा शासनासमोर कोणताही प्रस्ताव नाही. त्या मिटिंगमध्ये ज्या सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलची चर्चा झाली होती त्याबाबतची माहिती डायरेक्टरेटकडून मागवली असून ती माहिती आल्यानंतर माननीय उप मुख्यमंत्री महोदयांबरोबर बैठक घेऊन, चर्चा करुन यासंदर्भात निधी कसा उपलब्ध होईल व हे काम किती वर्षात पूर्ण करावयाचे याबाबत निर्णय घेऊ.

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय,सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलला निधी उपलब्ध करुन दिला जाणार आहे काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलला निधी उपलब्ध करुन दिला जाणार आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील बलात्कार झालेल्या महिलेची वैद्यकीय तपासणी त्वरित करण्याकरिता करावयाची उपाययोजना

(२) * ३७६९१ डॉ.दिपक सावंत : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बलात्कार झालेल्या महिलेची वैद्यकीय तपासणी दोन तासांच्या आत होणे आवश्यक असते, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर वैद्यकीय तपासणी खाजगी किंवा शासकीय/निमशासकिस रुग्णालयात त्वरित होत नसल्यामुळे न्यायालयातील अनेक प्रकरणात सबळ पुरावा मिळत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, न्याय मिळण्याच्या दृष्टीने पीडित महिलेची वैद्यकीय तपासणी त्वरित करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

प्रा.फौजिया खान, श्री.सुरेश शेट्टी यांचे करिता : (१) होय. अशा प्रकरणांमध्ये पुरावा नष्ट होऊ नये यासाठी तपासणी लवकरात लवकर होणे आवश्यक असते.

(२) सदर वैद्यकीय तपासणी शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत केली जाते. तपासणी ताबडतोब करण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यत आल्या आहेत.

(३) Criminal Writ Petition (PIL) ०१/२०१० च्या संदर्भात मॅन्युअल व प्रोफार्मा तयार करण्याचे काम मा.उच्च न्यायालयाच्या सूचनेनुसार चालू आहे.

डॉ.दीपक सावंत :सभापती महोदय,पीडित महिलांची तपासणी केली जात असते. परंतु पीडित महिलेची तपासणी २ तासाच्या आत झाली तरच त्यातील पुरावे सक्षम होत असतात व आरोपीला शिक्षा होण्यासाठी त्या पुराव्यांची मदत होत असते. तपासणीच्या प्रोटोकॉलमध्ये अनेक टेस्ट घेतल्या जात असतात परंतु या टेस्ट वेळेवर घेतल्या जात नाहीत. यामध्ये आरोपीचे कपडे असतील,स्टेन्स असतील किंवा डीएनए टेस्टच्या प्रिस्क्राईब प्रोटोकॉल फॉरेन्सीक लॅबमध्ये असतात परंतु तो आपण घेत नाही. त्यामुळे यासाठी आपण प्रोटोकॉल मॅन्युअल बनविणार आहोत काय ? आपण उत्तरामध्ये म्हटले आहे की, "मॅन्युअल व प्रोफार्मा तयार करण्याचे काम माननीय उच्च न्यायालयाच्या सूचनेनुसार चालू आहे". त्यामुळे माझा पहिला प्रश्न असा आहे की, हे काम कधी पर्यंत पूर्ण होणार आहे ? दुसरी बाब अशी आहे की, ही तपासणी वैद्यकीय अधिकाऱ्यामार्फत होणे आवश्यक आहे व त्यामध्ये स्त्रीरोग तज्ञ असणे अत्यंत आवश्यक आहे. आपल्याकडे स्त्रीरोग तज्ञ नसेल तर आपण त्यासाठी पर्यायी कोणती व्यवस्था करणार आहात ?

ज्यावेळी आपण मॅन्युअल व प्रोफार्मा तयार करण्याचे काम कराल त्यामध्ये आपण लोकप्रतिनिधींना समाविष्ट केले जाईल काय ?

..३..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान :सभापती महोदय, युनिफॉर्म प्रोटोकॉल आपल्याकडे उपलब्ध नाही ही वस्तुस्थिती आहे. युनिफॉर्म प्रोटोकॉल असावा यासाठी आपण अनेक ऑर्गनायझेशनला सोबत घेणार असून यासंदर्भात कोर्टाच्या गाईडलाईन्स सुध्दा आहेत. तसेच यामध्ये सेहत, वर्ल्ड ऑर्गनायझेशनच्या गाईडलाईन्स आहेत तसेच चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या कमिटीचे रिपोर्ट आहेत. तसेच आपल्या डायरेक्टर हेल्थने सुध्दा प्रोटोकॉलचे गाईडलाईन सर्क्युलेट केलेले आहेत. यासंदर्भात दि. ४.५.२०१३ रोजी यासंदर्भातील एकत्रित बैठक होणार आहे. गाईडलाईन, प्रोटोकॉल ,प्रोफार्मा आणि मॅन्युअलचा निर्णय घेतला जाणार आहे. या महिन्याच्या अखेर हे सर्व करण्याचा मानस आहे.

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, प्रश्न क्रमांक २ च्या संदर्भात उत्तरामध्ये म्हटले आहे की, "ही तपासणी दोन दिवसाच्या आत म्हणजे लवकरात लवकर होणे आवश्यक आहे." गंभीर प्रकार असतांना जर आपण शासकीय डॉक्टर, लेडीज डॉक्टर बाधीत फिरत राहिलो तर त्यांना शोधण्यामध्ये पुरावे नष्ट होतात. त्यामुळे जवळचा जो दवाखाना असेल मग तो खाजगी असो किंवा सरकारी असो त्या ठिकाणी महिलेची तपासणी करुन पुरावे गोळा करणे आवश्यक आहे. त्यामुळे यासंदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही केली जाणार आहे ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, अशा घटना घडल्यानंतर त्वरित ॲक्शन घेणे आवश्यक असून त्यासंदर्भातील सूचना वैद्यकीय अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या नाहीत. या शिवाय डिपार्टमेंटच्या माध्यमातून सुमोटो सहभाग घेण्याचे ठरविण्यात आलेले आहे. फॉरेन्सीकचे आपले जे प्रत्येक जिल्हयात दोन दोन वैद्यकीय अधिकारी आहेत त्यांना ट्रेनिंग देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. वैद्यकीय डॉक्टरांना ट्रेन्ड करणे गरजेचे आहे. याशिवाय आपला जो आरएमओ आहे त्यांचे कन्व्हेजन करुन फॉरेन्सीक एक्सपर्ट म्हणून त्यांना प्रत्येक जिल्हयाच्या रुग्णालयामध्ये ठेवण्याचे शासनाच्या विचारधीन आहे. जेव्हा एखादी कॉम्प्लीकेटेड केस येते त्यावेळी मेडिकल कॉलेजच्या फॉरेन्सीक एक्सपर्टला बोलावून त्यांचा सल्ला घ्यावा असे देखील शासनाच्या विचाराधीन आहे.

यानंतर श्री. भारवि....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी नोंद

प्रा.फौजिया खान...

या शिवाय महिला वैद्यकीय अधिकाऱ्यांना फॉरेन्सिकमध्ये ट्रेन्ड करण्यासंबंधी डिपार्टमेंटने इनिशिएटीव्ह घेतला आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आपण मेडिकल प्रोटोकॉल हा शब्द वापरत आहात. मूळात जी घटना घडली हे सांगण्यासाठी त्या महिलेने धीराने वैद्यकीय अधिकाऱ्यांना सहकार्य केले पाहिजे. यासाठी मेडिकल सोशल वर्कर आणि समुपदेशक अत्यावश्यक आहेत. भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली या चारही जिल्ह्यासह अनेक सिव्हील रूग्णालयात मेडिकल सोशल वर्कर आणि समुदपेदशकच नाहीत. वैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी तपासणी संबंधातील WHO नुसार प्रोटोकॉल तयार आहे. महिलेने तिच्यावर केलेल्या शारिरीक अत्याचारासंबंधी बोलण्यासाठी मेडिकल सोशल वर्करची पदे भरणे आवश्यक आहे. सदर पदे शासन कधी पर्यंत भरणार आहे ? तरच हा प्रोटोकॉल प्रत्यक्षात येण्यासाठी डॉक्टरांचे सहकार्य आपल्याला मिळू शकेल.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मी आताच सांगितले की, अप्पर मुख्य सचिवांकडे बैठक होणार आहे. आज आपल्याकडे WHO यासह सर्वांचे प्रोटोकॉल उपलब्ध आहेत. या सर्वांवर विचार करून प्रोटॉकोल निश्चित करण्याचे काम होईल. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी समुपदेशकाची आवश्यकता आहे असा प्रश्न उपस्थित केला आहे. ती बाब खरी आहे. या प्रकरणातील सेन्सेटीव्हीटी पाहिली पाहिजे. यात लॉंगटर्म ट्रीटमेंट पासून सोशल आस्पेक्टसुद्धा गृहीत धरणे गरजेचे आहे. प्रोटोकॉल संपल्यानंतर समुपदेशकांच्या अपॉईंटमेंट संबंधीचा जरूर विचार करण्यात येईल.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, राज्यात घडत असलेल्या वाढत्या बलात्कारा संबंधातील हा प्रश्न आहे. आज राज्यातील गुन्हेगारीचे आणि बलात्काराचे प्रमाण अतिशय वाढले आहे. प्रोटोकॉलबाबत मला असे म्हणावयाचे आहे की, आपण सिस्टीमवर किती अवलंबून आहोत व पर्सनल ओपीनियन किती आहे यावर सगळे अवलंबून आहे. कारण बायस ओपीनियन देणे किंवा त्या ओपीनियनमध्ये दबावाखाली बदल करणे ही गोष्ट अगदी सहज शक्य आहे. यंत्रेणेवर दबाव आल्यानंतर उलट्या प्रकारचा अहवाल देण्यात येतो. त्यामुळे आपण कितीही प्रोटोकॉल केले तरी त्याचा काहीही उपयोग होणार नाही. तेव्हा आपला प्रोटोकॉलच्या सिस्टीमवर डिपेडन्स किती आहे व पर्सनल ओपीनियनला किती महत्व राहणार आहे यासंबंधातील विचार ही यंत्रणा राबविताना केला आहे काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, आपल्या सभागृहात फार महत्वपूर्ण प्रश्न उपस्थित झाला आहे. हा आरोग्य विभागाचा ॲकेडेमिक प्रश्न आहे. त्यासंबंधी आता पर्यंत कधीही चर्चा झालेली नाही. उच्च न्यायालयाच्या सुपरव्हिजनमध्ये सेक्स्युअल ॲसॉल्ट केससाठी नवीन प्रोटोकॉल करण्यात यावा असा निर्णय कोर्टाने दिला होता. यासाठी केंद्र शासनाने धर्माधिकारी समिती नेमली होती या समितीसह सर्व समित्यांचे अहवाल माझ्याकडे आहेत. त्या अहवालासंबंधी खूप चर्चा झाली आहे. यासंबंधातील निर्णय या महिन्याच्या अखेरीस होणार आहे. WHO यांचा अहवाल, धर्माधिकारी यांचा अहवाल, आणि चार संस्थांचा अहवाल हे सर्व एकत्र करून व्हिक्टीम फ्रेंडली अहवाल अहवाल करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

मी आपल्याला सांगू इच्छितो की, अशा प्रकारचा प्रोटोकॉल ॲडॉप्ट करणारे आपले पहिले राज्य आहे. देशात सेक्स्युअल ॲसॉल्ट केसमध्ये कुठल्याही प्रकारचा प्रोटोकॉल नाही.

यानतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37691....

श्री.सुरेश शेट्टी ....

डॉ.पारेख मोदी यांनी लिहिलेल्या पुस्तकातील प्रोटोकॉल आपण फॉलो करतो. सेक्च्युअल ऑफेन्स करणाऱ्यांच्या फेव्हरमध्ये तो प्रोटोकॉल ले-डाऊन आहे. अत्याचारित महिलेवर ज्या मेडिकल एक्झामीन कन्डक्ट केली जाते, जी प्रोसीजर फॉलो केली जाते ती ऑफेन्सीव्ह असते. It is against the consititutional rights of women. मग Tw0 Finger Test असो, फोटोग्राफ काढण्याची पध्दत असो. हॉस्पीटलमधील पुरुष स्टाफ समोर एक्झामीन करण्यात येते. पोलीस माहिती घेत असताना बाहेरील व्यक्ती समोर उभ्या असतात. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन आपण नवीन नियम बनवित आहोत. तसेच डीएनए ॲनालिससाठी सॅम्पल तयार करण्याबाबत नियम करीत आहोत. महिलांच्या एक्झामीनसाठी महिला डॉक्टर उपस्थित राहतील अशाप्रकारची व्यवस्था करीत आहोत. पोलिसांना ट्रेनिंग देण्यासाठी एक मॅन्युअल तयार करीत असून जिल्ह्यातील प्रत्येक पोलिसाला त्याप्रमाणे ट्रेनिंग दिले जाईल. जी मेडिको-लीगल ॲक्शन घ्यायची आहे त्यासाठी पोलीस विभागाचा काय प्रोटोकॉल राहील हे विचारात घेऊन त्याप्रमाणे त्यांना ट्रेनिंग देणार आहोत.

सभापती महोदय, ज्या महिलांवर अत्याचार होतात त्या महिलेचा कन्सेन्ट घेऊन तिची तपासणी करणे, फोटोग्राफी करताना देखील त्या महिलेचा कन्सेन्ट घेऊन तिच्या सोबत कंपेनियन राहील, जबरदस्तीने फोटोग्राफी केली जाणार नाही अशी नवीन मॉडेल्स स्वीकारत आहोत. तसेच ज्याची आवश्यकता आहे त्याबाबत मेडिकल एक्झामीन करणार आहोत. या सर्व गोष्टी करीत असताना त्या महिलेला अधिकार देऊन तिच्या सोबत कोणीही कंपेनियन घेण्याची परवानगी देणार आहोत.

सभापती महोदय, इन्ज्युरीच्या संदर्भात नियम करीत आहोत. Less than 30% इन्जुरी आहे काय, Less than 60 % इन्जुरी आहे काय, या संदर्भात देखील नियम आपण करणार आहोत. तसेच पुराव्यासाठी आवश्यक असेल तेवढीच टेस्ट करण्यात येईल असा आम्ही निर्णय घेत आहोत. एकदा एव्हीडन्स झाला, टेस्टींग झाली की डिस्चार्ज देण्यात येतो. त्यानंतर जे काऊन्सिलींग करावे लागते, ट्रीटमेंट द्यावी लागते ही फॉलोअप ॲक्शन फार महत्वाची आहे. मेजर कम्पोनंटमध्ये काऊन्सिलींग आणि रिहॅबिलीटेशन राहणार आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37691....

श्री.सुरेश शेट्टी ....

सावंत यांनी सांगितले की लोकप्रतिनिधींना चर्चेमध्ये घ्यावे. या संदर्भातील मसुदा तयार झाल्यानंतर मी माझ्या स्तरावर एक मिटींग घेऊन त्यामध्ये सर्व लोकप्रतिनिधींना बोलावून चर्चा करण्यात येईल त्यानंतर तो मसुदा मंजूर करण्यात येईल.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सविस्तर उत्तर दिल्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो. या प्रकरणी आपणास अगोदरच उशीर झालेला आहे. दिनांक 23 जानेवारी 2013 रोजी जस्टीस जे.एस.वर्मा यांनी दिलेल्या डिरेक्शनची कॉपी माझ्याकडे आहे. त्यातील पॅरा नंबर 7 मध्ये म्हटले आहे की, अशाप्रकारचा प्रोटोकॉल आम्ही बनविला आहे आणि तो इम्प्लीमेन्ट करावा. जस्टीस जे.एस.वर्मा यांनी जो प्रोटोकॉल तयार केला आहे तो आपणास बंधनकारक आहे काय, त्याची प्रत माननीय मंत्री महोदयांकडे आहे काय ? जस्टीस वर्मा यांनी जे सांगितले त्या आधारावर दिल्ली शासनाने प्रोटोकॉलची गाईडलाईन तयार केली आहे. ती आपल्याकडे आहे काय, असल्यास त्याबाबत विचार केला आहे काय ? जर दोन तासामध्ये इन्व्हेस्टीगेशनला मदत व्हावयाची असेल तर प्रायव्हेट प्रॅक्टीशनर्सला देखील यामध्ये सम्मिलित करण्यासाठी आपण निर्देश देणार आहात काय ?

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37691....

ॲड.आशिष शेलार....

तसेच इंडियन एव्हीडन्स ॲक्ट हा सुध्दा खूप महत्त्वाचा आहे. आज आपण केवळ मेडिको लीगल टेस्टवर बोलत आहोत. निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, पोलिसांना एव्हीडन्स कलेक्शनच्या डायरेक्शनबाबत इंडियन एव्हीडन्स ॲक्ट अंतर्गत आपण निर्देश देणार काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, जस्टीस वर्मा समितीचा अहवाल राज्य सरकारकडे आहे. त्या समितीच्या शिफारशी राज्य शासनावर बंधनकारक नाहीत. There are just Recommendations. We have gone through the recommendations of Justice Verma आणि त्यामध्ये महत्त्वपूर्ण मुद्दे असतील तर ते आम्ही आमच्या प्रोटोकॉलमध्ये समाविष्ट करुन घेऊ. केंद्र सरकारच्या ज्या गाईडलाईन्स आहेत त्या जस्टीस धर्माधिकारी यांच्या अहवालात मुळातच आहेत. त्यांच्या समितीने दिलेला अहवाल आमच्याकडे आहे. त्याचा अभ्यास आम्ही केला आहे. त्यांच्या अहवालातील बेसिक बाबी प्रोटोकॉलमध्ये समाविष्ट करणार आहोत. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्यानुसार इंडियन एव्हीडन्स ॲक्ट तपासून घेऊ. हे खरे आहे की, बलात्कारीत महिलेची ज्या टेस्टची गरज नाही त्या टेस्ट देखील केल्या जातात. अशा टेस्ट करुन त्यांना विनाकारण सफर केले जाते. ज्या टेस्टची पुराव्यासाठी आवश्यकता आहे त्याच टेस्ट कंडक्ट केल्या पाहिजे. त्या व्यतिरिक्त दुसऱ्या टेस्ट करुन बलात्कारीत महिलेला सफर करु नये असे माझे वैयक्तिक मत आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : महोदय, बलात्कार झालेल्या महिलेची दोन तासाच्या आत वैद्यकीय तपासणी होणे आवश्यक आहे. आरोग्य विभागाच्या माध्यमातून मंत्री महोदयांनी माहिती दिली आहे. अशा घटनांमध्ये पोलीस हा महत्त्वाचा दुवा आहे. अनुभव असा आहे की, बलात्कार झालेल्या महिलांनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केल्यानंतर दोन-दोन दिवस त्यांना वैद्यकीय तपासणीसाठी नेले जात नाही. राज्य सरकार या विषयाच्या बाबतीत जे नियम करणार आहे त्यामध्ये बलात्काराच्या घटनेची पोलीस स्टेशनमध्ये नोंद झाल्यानंतर त्या महिलेला दोन तासाच्या आत वैद्यकीय तपासणीला नेले पाहिजे अशा प्रकारचे कलम टाकणार काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान : महोदय, हा प्रकार घडू नये म्हणून जिल्हा स्तरावर आम्ही सर्व संबंधितांचे ट्रेनिंग घेणार आहोत. पोलीस कर्मचाऱ्यांचे सुध्दा ट्रेनिंग घेणार आहोत. फॉरेन्सिक एक्स्पर्ट सुध्दा त्या ठिकाणी उपस्थित राहतील. त्यांना ऑब्जेक्टीव्ह प्रकारचे फॉर्मेट देऊन हे स्ट्रीमलाईन कसे होईल याचे नियोजन विभागाच्या माध्यमातून होणार आहे.

डॉ.दीपक सावंत : महोदय, बलात्काराच्या घटनांमध्ये जे पुरावे मिळतात त्यांची हाताळणी आणि जतन ही महत्त्वाची बाब आहे. राज्य सरकार बनवित असलेल्या प्रोटोकॉलमध्ये या गोष्टींना अनन्यसाधारण महत्त्व देणार काय ? तसेच या बाबतीत जनजागृती करण्याची आवश्यकता आहे. बलात्काराच्या घटनेत कपडे बदलले तरी 46 टक्के पुरावे नष्ट होतात. महिलेने लघवी किंवा आंघोळ केली तरी पुरावे नष्ट होतात. त्या मुळे मी स्पेसिफिक विचारतो की, या संदर्भात जनजागृती करुन पीडित महिलेला न्याय देण्यासाठी विशेष मोहीम राबविणार काय ?

प्रा.फौजिया खान : महोदय, सन्माननीय सदस्यांच्या दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर 'होय' असे आहे. एव्हीडन्स गाईडलाईन्ससाठी प्रोटोकॉलमध्ये डीएनए सॅम्पल घेण्याची आवश्यकता नसेल तर ते का म्हणून घ्यावे ? जे अनावश्यक आहे ते करण्याची आवश्यकता नाही. खरोखरच जे सॅम्पल घेण्याची आवश्यकता आहे तेच घ्यावयास पाहिजे. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, या संदर्भात सन्माननीय सदस्यांच्या सूचना असतील तर त्यासाठी मंत्री महोदयांच्या स्तरावर बैठक घेण्याची गरज पडल्यास ती घेण्यात येईल. त्या बैठकीत सन्माननीय सदस्य ज्या सूचना करतील त्या प्रोटोकॉलमध्ये समाविष्ट करण्यात येतील.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दर्यापूर (जि.अमरावती) येथे अवैध वैद्यकीय व्यवसायिकांद्वारे उपचार होत असल्याबाबत

(३) * ३७०१६ श्री.प्रवीण पोटे पाटील , डॉ.रणजित पाटील : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दर्यापूर (जि.अमरावती) येथे ९४ वैद्यकीय व्यावसायिकांपैकी केवळ ३६ जणांकडे महाराष्ट्र कौन्सिलचे रजिस्ट्रेशन उपलब्ध असून उर्वरीत ५८ वैद्यकीय व्यावसायिक अवैध काम करुन रुग्णांच्या जीवाशी खेळत असल्याचे माहे जानेवारी, २०१३ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अवैध वैद्यकीय अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. विजयकुमार गावित : (१) अशा प्रकारची कोणतीही तक्रार संबंधीत पोलीस स्टेशनला प्राप्त झालेली नाही.
(२) व (३) शासन परिपत्रक क्र.सीआयएम - १०९९/१७२६/३५५ अधिनियम, दि. ७ फेब्रुवारी, २००० अन्वये राज्यातील बोगस डॉक्टरांचा शोध घेण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पुनर्विलोकन समिती स्थापन करुन, शासन निर्णय क्र. सीआयएम-१०९१/ प्र.क्र.१७२/ १९९१ / एमईडी-८, दि. ५ सप्टेंबर, १९९१ नुसार स्थानिक स्तरावर जिल्हा, तालुका, महानगरपालिका आणि नगरपालिका स्तरीय समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. सदर समितीने त्यांच्या परिक्षेत्रातील संबंधीत बाबींचा शोध घेऊन उपरोक्त नमूद पुनर्विलोकन समितीस आपला अहवाल सादर करण्याचे आदेश दिलेले आहेत.

तद्नुसार, उप-विभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समितीद्वारे संबंधीत दवाखान्याची तपासणीची कार्यवाही सुरु असून तपासणी अहवाल प्राप्त होताच पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

श्री.प्रवीण पोटे-पाटील : महोदय, या प्रश्नाच्या प्रश्न क्र.1 ला "अशा प्रकारची कोणतीही तक्रार संबंधित पोलीस स्टेशनला प्राप्त झालेली नाही" असे लेखी उत्तर देण्यात आलेले आहे. तसेच प्रश्न क्रमांक 2 ला "उप-विभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समितीद्वारे संबंधित दवाखान्याच्या तपासणीची कार्यवाही सुरु असून तपासणी अहवाल प्राप्त होताच पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे" असे लेखी उत्तर देण्यात आले आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, ही चौकशी कशी करण्यात येणार आहे आणि या समितीची स्थापना झाली आहे काय ?

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तपासणीचा अहवाल आतापर्यंत आपल्याकडे आलेला आहे का ? कंपाऊंडर म्हणून जे लोक काम करतात ते डॉक्टर म्हणून आमच्या जिल्ह्यामध्ये पुढे यावयास लागले आहेत. म्हणजे विनाकारण मेडिकल कॉलेजेस काढण्याची आवश्यकता नाही असे वाटावयास लागले आहे. यासाठी शासन काय उपाययोजना करणार आहे ?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, आपण ज्या समित्या नेमल्या त्यांच्या मार्फत तक्रार आल्यानंतर किंवा अधूनमधून धाडी घालून सर्टिफिकेट तपासण्याचे काम केले जाते तसेच खरोखर ते अवैध प्रॅक्टीस करीत आहेत का हे तपासले जाते. दर्यापूरच्या बाबतीत जे अवैध प्रॅक्टीस करतात त्यांच्यासाठी प्रांत अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली 10 जानेवारी, 2013 रोजी एक समिती नेमली होती. त्या कमिटीला संपूर्ण तपासणी करण्याचे आदेश दिले होते. त्यांच्या तपासणीनुसार त्या तालुक्यामध्ये 94 डॉक्टर्स आहेत त्यापैकी बाकीच्यांनी सर्टिफिकेटस सादर केलेली आहेत. आता फक्त 18 डॉक्टर्स आहेत त्यांनी या महिन्याच्या शेवटपर्यंत वेळ मागितलेला आहे. या महिनाअखेरपर्यंत जर त्यांनी सर्टिफिकेटस दिले नाहीत तर त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात येतील. जिल्हाधिकाऱ्यांनी जानेवारी, 2012 मध्ये आणि त्यानंतर जूनमध्ये दर्यापूरमध्ये नाही तर त्या जिल्ह्यात काही तपासण्या आदेशित केल्या होत्या. त्यामध्ये बाकीच्या ठिकाणी असे आढळून आलेले आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, हा प्रश्न गंभीर आहे. जरी असे 18 डॉक्टर्स असले तरी ते जर असे मोकाट सुटले, लोकांच्या जीवनाशी खेळत राहिले तर ती गंभीर बाब आहे. हा प्रश्न अंकगणिताचा नाही. जर त्यांच्याकडे प्रमाणपत्रे नसतील तर तत्काळ त्यांची प्रॅक्टीस बंद करावी. त्यांनी असेच सर्वसामान्य लोकांच्या जीवाशी खेळत राहावयाचे का ? ज्या 18 डॉक्टरांची प्रमाणपत्रे आपल्याकडे प्राप्त झालेली नाहीत त्यांची प्रॅक्टीस तत्काळ बंद करणार का ? त्यांच्यावर फौजदारी तर करुच पण मेडिकल कौन्सिलच्या माध्यमातून त्यांची मान्यता रद्द करणार का ?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, त्यांनी सर्टिफिकेटस वगैरे देतो म्हणून वेळ मागून घेतलेला आहे. तरी सुध्दा सन्माननीय सदस्यांच्या मागणीनुसार आज संध्याकाळपर्यंत जे सर्टिफिकेटस् देतील तेच प्रॅक्टीस करतील नाही तर त्यांची प्रॅक्टीस बद करण्याचे आदेश देण्यात येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एकलहरे (जि.नाशिक) औष्णिक विद्युत प्रकल्पासाठी जागा दिलेल्या प्रकल्पग्रस्तांना अद्याप प्रकल्पग्रस्तांचे दाखले मिळाले नसल्याबाबत.

(४) * ३७३५१ श्री.जयवंतराव जाधव , श्री.दीपकराव साळुंखे , श्री.हेमंत टकले , श्री.विक्रम काळे , श्री.अनिल भोसले , श्री.किरण पावसकर : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकलहरे (जि.नाशिक) औष्णिक विद्युत प्रकल्पासाठी ५० वर्षापूर्वी जागा दिलेल्या प्रकल्पग्रस्तांना अद्याप प्रकल्पग्रस्तांचे दाखले मिळाले नसल्याने या प्रकल्पाच्या विस्तारीकरणासाठी परिसरातील शेतकऱ्यांनी विरोध केल्याचे माहे डिसेंबर, २०१२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) राज्यामध्ये औष्णिक विद्युत केंद्र उभारणीसाठी नाशिक वगळून इतर जिल्ह्यातील ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित झाल्या त्यांना परिपत्रक १९८० नुसार नमुन्यातील प्रकल्पग्रस्तांचे प्रमाणपत्र प्रदान केले मात्र फक्त नाशिक जिल्ह्यातील एकलहरे प्रकल्पाच्या प्रकल्पग्रस्तांवर अन्याय करण्यात आल्याची नाशिक औष्णिक विद्युत केंद्र प्रकल्पग्रस्त सुशिक्षित बेरोजगार संघर्ष समितीने माहे डिसेंबर, २०१२ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे तक्रार केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अन्यायग्रस्त शेतकऱ्यांना प्रकल्पग्रस्तांचे दाखले प्रदान करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेंद्र मुळक, श्री. अजित पवार यांच्याकरिता : (१) होय,

(२) होय,

(३) सदर प्रकल्पग्रस्तांना दाखले देण्याबाबत महसूल व वन विभागाने (मदत व पुर्नवसन) निर्देशीत केले आहे त्यानुसार जिल्हाधिकारी, नाशिक कार्यालयाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, या प्रश्नाचे उत्तर मला मदत व पुनर्वसन खात्याकडून अपेक्षित आहे. मी आपल्याला विनंती करतो की, मला संबंधित मंत्री महोदयांकडून उत्तर अपेक्षित असल्यामुळे हा प्रश्न राखून ठेवावा.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी मला या संदर्भात पत्रही पाठविले आहे या प्रश्नाचे उत्तर त्यांना मदत व पुनर्वसन विभागाकडून पाहिजे.

श्री. जयवंतराव जाधव : या प्रश्नाचे उत्तर मला मदत व पुनर्वसन विभागाकडून पाहिजे.

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 37351 .....

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, हा प्रश्न एकलहरे वीज प्रकल्पासंबंधीचा आहे. तेथील प्रकल्पग्रस्तांना दाखले देण्याच्या संदर्भातील प्रश्न आहे. हा विषय महसूल, मदत व पुनर्वसन विभागाकडे येतो. सन्माननीय सदस्यांनी जी विनंती केलेली आहे त्यानुसार जर हा प्रश्न महसूल, मदत व पुनर्वसन विभागाकडे गेला तर त्यांना त्या उत्तरातून व्यवस्थित न्याय मिळू शकेल.

सभापती : आपण उत्तर देण्यास तयार आहात का ?

श्री. राजेंद्र मुळक : मी त्यांना कळवितो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37351.....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आपणही मदत व पुनर्वसन मंत्री म्हणून चांगले काम केलेले आहे. त्या ठिकाणी ज्या प्रकल्पांनी जागा घेतल्या आहेत त्याची ही जबाबदारी असते. शेतकऱ्यांच्या जागा 50 वर्षापूर्वी घेतल्या असताना त्यांना पी.ए.पी.चे दाखले दिले जात नाहीत ही शोकांतिका आहे. म्हणून माझी आपल्याला अशी विनंती आहे की, दोन्ही खात्यांनी या प्रश्नासंबंधी संयुक्तपणे उत्तर द्यावे.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आताच सांगितले आहे की, जोपर्यंत प्रकल्पग्रस्तांना दाखला दिला जाणार नाही तोपर्यंत ती व्यक्ती प्रकल्पग्रस्त आहे हे प्रमाणित होत नाही. ते प्रमाणित झाल्यानंतरच सदर व्यक्तीला नोकरी देण्याची कार्यवाही करता येईल. प्रकल्पग्रस्तांना वेळेवर दाखले दिले पाहिजेत हे खरे आहे. परंतु त्यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांना तांत्रिक अडचणी आल्या होत्या. त्यांना काही चौकशी करावयाची होती. त्या कालावधीत ती कार्यवाही झालेली आहे. हा संपूर्ण विषय महसूल विभागातील मदत व पुनर्वसन विभागाशी संबंधित आहे. या सर्व लोकांना प्रकल्पग्रस्त म्हणून दाखले मिळाले पाहिजेत. ते का मिळाले नाहीत हे मी सांगत आहे. (अडथळा) दोन महिन्यापूर्वी माननीय उप मुख्यमंत्र्यांनी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेतली होती. त्यामुळे आताच्या प्रचलित नियमानुसार दाखले देण्याची सुरुवात झालेली आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, 50 वर्षाच्या काळात हे दाखले देण्यात आले नाहीत. त्यांच्या हक्कापासून ते वंचित राहिले होते. ऊर्जा विभागाने 364 प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या देण्याचे काम केलेले आहे. परंतु ते रोजंदारी स्वरुपाचे आहेत. प्रकल्पग्रस्तांना दाखले देण्याचा निर्णय झाला असून त्यांना दाखले देण्याची सुरुवात झालेली आहे. पण 50 वर्षांच्या गॅप बाबत प्रमुख प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे. याबाबत मदत व पुनर्वसन विभागाकडून अधिक स्पष्टीकरण मिळू शकेल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, ही बाब अतिशय गंभीर आहे. प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याची सरकारने थट्टा सुरु केली आहे त्याचा प्रथम मी निषेध करतो. 364 प्रकल्पग्रस्तांना रोजंदारीवर घेण्यात आले असल्याची सरकारने थट्टा केली आहे त्याचाही मी निषेध करतो. 50 वर्षापूर्वी ज्यांचे वय 20 वर्षे असेल त्यापैकी काही लोक आता जीवंत आहेत की नाही

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हे देखील सांगता येणार नाही. त्यांची दुसरी किंवा तिसरी पिढी सुरु असेल. त्यामुळे आता जे हयात आहेत ते त्यांचे कुटुंबीय आहेत की नाही, नातेवाईक आहेत की नाही हे तपासले जाईल. त्यामध्ये आणखी काही वर्षे निघून जातील. महसूल विभागाची प्रक्रिया क्लिष्ट असते. शासनाच्या जाणीवा मेलेल्या आहेत हे यावरुन दिसून आलेले आहे. मदत व पुनर्वसन खात्याचे मंत्री यासंबंधी उत्तर देतील अशी राज्यमंत्री महोदयांनी भूमिका घेतली असती तर महत्वाचे ठरले असते. हा प्रश्न राखून ठेवल्यानंतर तो मदत व पुनर्वसन खात्याकडे जाईल. परंतु 50 वर्षानंतर त्यावेळच्या पिढीचे आज वय किती झाले असेल त्याचा विचार सरकार कधी करणार आहे, सरकार त्यांना न्याय देत नाही. न्याय देण्यासाठी सरकार आतुर असले पाहिजे. तेही यामधून दिसत नाही हे निषेधार्ह आहे.

श्री.राजेंद्र मुळक : जोपर्यंत प्रकल्पग्रस्तांना शासन दाखला देत नाही तोपर्यंत प्रकल्पग्रस्त आहे हे प्रमाणित होत नाही.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे असे म्हणणे आहे की, 50 वर्षापूर्वीच प्रकल्पग्रस्तांना दाखले देणे आवश्यक होते. परंतु त्यांना ते दाखले मिळाले नाहीत, त्यापैकी काही प्रकल्पग्रस्त मरण पावले आहेत. यामध्ये जवळजवळ दोन पिढ्या बाद झाल्या आहेत. हे सत्य आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितले ते देखील बरोबर आहे. ते दाखले दुर्दैवाने देता आले नाहीत म्हणून महसूल विभाग आणि ऊर्जा विभागाकडून हे दाखले देण्यास सुरुवात झालेली आहे. 358 लोकांना नोक-या देण्याचे ठरविलेले आहे. काही जणांना नोक-या दिलेल्या आहेत.

श्री. राजेंद्र मुळक : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी उपस्थित केलेल्या मुद्यासंबंधी मी उत्तर देत होतो. सन्माननीय सदस्यांची विनंती दाखले देण्यासंबंधीची नाही. मध्ये जो 50 वर्षाचा कालखंड गेला त्यामुळे अनेक कुटुंबे वंचित झालेली आहेत. दोन पिढ्या दाखल्याविना राहून गेल्या...

श्री. दिवाकर रावते : 50 वर्षे या कुटुंबांना वंचित ठेवणा-या अधिका-यांसंबंधी कारवाई करण्याचे आपण निदेश द्यावेत.

श्री. राजेंद्र मुळक : मदत व पुनर्वसन विभाग, महसूल विभाग आणि ऊर्जा विभाग अशा तीन विभागांची एकत्रित बैठक घेण्यात येईल. त्या बैठकीस सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना देखील बोलाविण्यात येईल. हा निर्णय मदत व पुनर्वसन आणि महसूल विभागाला घ्यावयाचा आहे. तरी देखील आमचा ऊर्जा विभाग या बाबतीत पुढाकार घेऊन बैठक घेईल 50 वर्षाच्या कालखंडामध्ये दोन पिढया नोकरीपासून वंचित राहिलेल्या आहेत. त्याबाबतीत निर्णय घेणे आवश्यक आहे.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी 8 दिवसामध्ये बैठक घ्यावी. ती बैठक झाल्यानंतर हा प्रश्न चर्चेला घ्यावा. तोपर्यन्त हा प्रश्न राखून ठेवावा.

श्री. पांडुरंग फुंडकर : एकलहरे औष्णिक विद्युत प्रकल्पाप्रमाणे राज्यात अनेक प्रकल्प आहेत. अकोला जिल्हयातील पारस औष्णिक प्रकल्पासाठी 30 वर्षापूर्वी शेतक-यांच्या जमिनी घेण्यात आल्या. अजून शेतक-याना प्रकल्पग्रस्त म्हणून दाखले मिळालेले नाहीत. प्रकल्पग्रस्तांना नोकरीमध्ये सामावून घेतलेले नाही. 10-10 वर्षे ते रोजंदारीवर काम करीत आहेत. अशा प्रकारचे राज्यामध्ये जे जे प्रकल्प आहेत त्या सर्व प्रकल्पाच्या बाबतीत बैठक घ्यावी अणि प्रकल्पबाधित लोकांना न्याय द्यावा अशी माझी विनंती आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37351....

श्री. राजेंद्र मुळक : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते व सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सांगितल्या प्रमाणे राज्यामध्ये जे प्रकल्प झालेले आहेत त्यासंदर्भात बैठकीत पूर्ण माहिती मिळेल.

सभापती : अशा प्रकारची बैठक माझ्या दालनामध्ये होईल अशी व्यवस्था करावी.

श्री. राजेंद्र मुळक : ठीक आहे.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बीड जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती व पाणी टंचाईमुळे फळबागा जळाल्याबाबत

(५) * ३७९२९ डॉ.निलम गोऱ्हे , श्री.अमरसिंह पंडित : सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती व पाणी टंचाईमुळे पाचशे हेक्टरवरील फळबागा जळाल्या, हे खरे आहे काय,

(२) तसेच, माहे फेब्रुवारी, २०१३ मध्ये वा त्या दरम्यान आणखी पाचशे हेक्टरवरील बागांना दुष्काळाचा फटका बसणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यात दुष्काळाची परिस्थिती बिकट झाल्याने पिण्याच्या पाण्याची स्थिती, जनावरांचे हाल तसेच शहरात मोठी बांधकामे करण्यास मनाई केल्यामुळे या कामावरील मजूर, मिस्त्री, बांधकामावर अवलंबून असलेल्या चार हजारांवरील कुटुंबासमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी तसेच फळबाग धारक शेतकऱ्यांना एकरी पन्नास हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. विजयकुमार गावीत : (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

(४) दुष्काळावर मात करण्यासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन, करण्यात येत असून फळ झाडांभोवती आच्छादन, सूक्ष्म सिंचनाचा वापर, फळबागांचे पुनरूज्जिवन इत्यादीमार्फत मदत करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ. नीलम गो-हे : बीड जिल्हयामध्ये अतिशय गंभीर परिस्थिती आहे. या जिल्ह्यातील किती बागांचे नुकसान झालेले आहे याची पाहणी मंत्री महोदयांनी केलेली आहे काय ? जालना आणि मराठवाड्याच्या अनेक जिल्ह्यामध्ये फळबागांचे नुकसान झालेले आहे. या नुकसानीची मंत्री महोदयांनी पाहणी केलेली आहे काय, असल्यास हेक्टरी किती नुकसान भरपाई देण्याचे शासनाने ठरविलेले आहे ?

डॉ.विजयकुमार गावित : मी बीड जिल्ह्यामध्ये गेलो नाही. परंतु जालना, बुलढाणा आणि औरंगाबाद या भागातील फळबागांची पाहणी केलेली आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुद्धीत प्रत / परिपृच्छेसाठी नाही

या ठिकाणी देशाचे कृषी मंत्री माननीय श्री.शरदचंद्र पवार साहेब तेथे गेले होते, माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार साहेब तेथे गेले होते. तसेच त्या ठिकाणी मोठे अधिकारी सुध्दा जाऊन आले. त्या भागात मोठया प्रमाणात फळबागा जळत आहेत. तेथील फळबागा जळू नयेत म्हणून फळबाग शेतकऱ्याला प्रति हेक्टर 60 हजार रुपये असे पॅकेज केंद्र सरकारने जाहीर केलेले आहे. फळबागा जीवंत कशा ठेवता येतील यासाठी केद्र सरकारने पॅकेज जाहीर केलेले आहे. यात 30 हजार रुपये शेतकऱ्याचे आणि 30 हजार रुपये केंद्र शासनाचे अशा पध्दतीचे ते पॅकेज आहे. यामध्ये फळबागांची छाटणी आणि देखरेख यासाठी शेतकऱ्याला 30 हजार रुपये दिले जाणार आहेत. यात 15 हजार रुपये शासन देणार आहे. त्यानंतर प्लॅस्टीक मर्चीगसाठी 10 हजार, इतर काही उपाय करणे यासाठी एकंदर 60 हजार रुपये देण्यात येणार आहे. सदर पॅकेज 30 मार्च पूर्वी शेतकऱ्यांना मिळेल यासंबंधीची व्यवस्था शासन करीत आहे.

श्री.अमरसिंह पंडित : बीड जिल्हयात दुष्काळी परिस्थिती व पाणी टचाईमुळे फळबागा जळाल्याबाबत असे प्रश्नाचे मूळ टायटल आहे. आमच्याकडे मुळात पाणीच उपलब्ध नाही. त्या ठिकाणी असलेल्या पाण्याच्या साठांमधील पाणी इरिगेशचे रेट देऊन स्वत:च्या टँकरने पाणी घेऊन जाण्यासंबंधी शेतकऱ्यांना परवानगी मागितली तर तशी परवानगी जिल्हाधिकारी यांनी नाकारली आहे. या बाबतीत माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, त्या ठिकाणी उपलब्ध असलेल्या पाण्याच्या जलसाठयामधून इरिगेशनचे रेट आकारुन शेतकऱ्यांना पाणी घेऊन जाण्याची परवानगी शासन देणार आहे काय ?

डॉ.विजयकुमार गावित : त्या जिल्हयांमध्ये किंवा परिसरामध्ये पाण्याचे साठे आहेत, त्यात पिण्यासाठी लागणारे पाणी राखून ठेवून जो काही साठा उरेल त्या साठयामधून शेतकऱ्यांना पाणी देण्याची निश्चितपणे परवानगी देण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय मंत्री महोदयांनी दोन उत्तरे दिली आहेत, त्यातील एका उत्तराच्या बाबतीत माझा आक्षेप आहे. त्यांनी ती माहिती सदनाच्या पटलावर आणली म्हणून माझा आक्षेप आहे. त्यांनी असे सांगितले की, मी जालना येथे गेलो होतो. बीड जिल्हयास मी भेट दिली नाही. बीड जिल्हयाला माननीय श्री.शरद पवार आणि माननीय श्री.अजित पवार यांनी भेट दिली. त्यामुळे मी बीड येथे गेलो नाही. आपण मंत्री आहात...

डॉ.वियजकुमार गावित : मी असे म्हटलेले नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37929...

श्री.दिवाकर रावते : आपण या विभागाचे मंत्री आहात. मंत्री म्हणून तेथे जाणे वेगळे आहे. एका पक्षाचे प्रमुख या नात्याने त्यांनी जाणे आणि केंद्रीय मंत्री कृषी मंत्री म्हणून जाणे यात फरक आहे. ते तेथे गेले होते ही माहिती सांगितली. आपण चुकीची माहिती सभागृहात दिलेली आहे. फळबागा जळाल्या आहेत. परवा मी जत येथे गेलो होतो, त्यावेळी तेथील जळालेल्या अनेक फळबागा बघितल्या. त्या शेतकऱ्यांच्या फळबागेच्या ठिकाणी काहीच शिल्लक नाही. माननीय मंत्री महोदयांनी उत्तरात सांगितले की, केंद्राने प्रति हेक्टर 60 हजार रुपयांचे पॅकेज दिले आहे. ते पॅकेज बागायतदार होण्यासाठी दिले आहे. परंतु शेतकऱ्यांच्या फळबागा पूर्णपणे जळाल्या आहेत, त्यामुळे त्या जगविण्याचा प्रश्नच येत नाही. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांचा मूळ प्रश्न असा आहे की, ज्यांच्या फळबागा जळाल्या आहेत, ज्या फळबागा पूर्णपणे उद्वस्त झालेल्या आहेत. भविष्यातील 15-20 वर्षाचे शेतकऱ्यांचे उत्पन्न बुडणार आहे. पुन्हा फळबागा लावून त्यांचे उत्पन्न घ्यावयाचे असेल तर त्या शेतकऱ्याला पाच वर्ष थांबावे लागेल. ज्यांच्या फळबागा पूर्णपणे जळालेल्या आहेत, त्या फळबाग शेतकऱ्यांना शासनातर्फे काय मदत दिली जाणार आहे?

डॉ.विजयकुमार गावित : ज्या विभागात फळबागा जळत आहेत, ज्या ठिकाणची 50 टक्क्यांपेक्षा कमी आणेवारी आहे, तेथील शेतकऱ्यांसाठी शासन प्रति हेक्टरी 8 हजार रुपये मदत करते, ती मदत या शेतकऱ्यांना दिली जाईल. हे अधिवेशन संपण्या अगोदर फळबाग शेतकऱ्यांना जास्तीचे काही देता येईल काय या बाबतचा निर्णय घेतला जाईल. ज्या शेतकऱ्यांच्या फळबागा जळाल्या आहेत, त्या फळबागा पुन्हा लावण्यासाठी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून फळबाग योजना चालू होती, ती योजना त्या शेतकऱ्यांसाठी लागू करील.

श्री.दिपक साळुंखे : फळबागा जगविण्यासाठी प्रति हेक्टरी 60 हजार रुपये देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे अशा प्रकारची माहिती दिली गेली. त्यातील 30 हजार रुपये केंद्र शासन देणार आहे. ते पैसे शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होऊ लागले आहे. प्रति हेक्टरी 30 हजार रुपये राज्य सरकारकडून दिले जाणार आहेत, तर ती संपूर्ण रक्कम फळबाग शेतकऱ्यांच्या नावे मार्च अखेर जमा करण्यात येईल काय ?

यानंतर श्री.भोगले...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

ता.प्र.क्र.37929.....

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, ही सर्व रक्कम केंद्र शासन देणार आहे. त्यांच्याकडून मार्गदर्शक सूचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यांनी मदतीबाबत दोन टप्पे करण्याचे ठरविले असून पहिल्या टप्प्यामध्ये 15 हजार रुपये प्रती हेक्टर द्यायचे आणि नंतर ज्या बागा जगविण्यात येत आहेत त्याबाबत तपासणी केल्यानंतर उर्वरित रक्कम द्यायची असा निर्णय झालेला आहे. माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांच्याबरोबर झालेल्या बैठकीत सांगितल्याप्रमाणे संपूर्ण रक्कम एकाच वेळी कशी देता येईल यादृष्टीने ते प्रयत्न करणार आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, बीड जिल्हयात एकूण किती क्षेत्रातील फळबागा उद्ध्वस्त झाल्या आहेत? 31 मार्चपर्यंत रक्कम खात्यामध्ये जमा होणार असे मंत्री महोदय म्हणाले आहेत. केंद्र सरकारकडून याबाबत राज्याला किती निधी मंजूर करण्यात आला, त्यापैकी किती निधी प्राप्त झाला आहे आणि 31 मार्चपर्यंत निधी वितरित करण्याबाबत नियोजन कसे केले आहे?

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, जे बागायतदार आहेत त्यांच्याकडे कृषी सेवकांना पाठवून त्यांचे क्षेत्र किती आहे, किती क्षेत्रातील फळबागांचे नुकसान झाले याचा सर्व्हे करावयाचा आहे. बीड जिल्हयातील एकूण 4416.32 हेक्टर क्षेत्रातील फळबागा जळाल्या आहेत किंवा जळण्याच्या अवस्थेत आहेत. या क्षेत्रापैकी 2024.53 हेक्टर क्षेत्र पूर्णत: उद्ध्वस्त झालेले आहे. केंद्र शासनाने सांगितले आहे की, 31 मार्चपर्यंत ज्यांचे नुकसान झाले त्या सर्वांना मदत दिली जाईल. यासाठी सर्व्हे करुन खाते क्रमांक घेऊन त्या खात्यावर निधी जमा करण्याचे आदेश केंद्र शासनाने दिले आहेत. पहिला हप्ता अगोदरच रिलिज केला आहे.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, ज्या फळबागा पूर्णत: जळालेल्या आहेत त्या जागेत पुन्हा लागवड करण्यास येणारा संगोपन खर्च गृहीत धरुन राज्य शासन मदत करणार आहे का?

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, राज्य शासनाची पूर्वीची जी रोजगार हमी योजना होती त्याच पध्दतीने योजना राबविली जाईल. ज्या फळबागा जळाल्या आहेत त्या ठिकाणी पुन्हा लागवड करण्यासाठी रोपे उपलब्ध करुन दिली जातील काय? असा प्रश्न माननीय सदस्यांनी विचारला आहे. ही बाब तपासून रोपे उपलब्ध होणार असतील तर ती निश्चितपणे देण्याचा प्रयत्न केला जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यात वैद्यकीय सेवा शुल्कात सुसूत्रता आणण्यासाठी खाजगी डॉक्टरांनी रुग्णालयाच्या दर्शनीय भागावर रेटबोर्ड लावण्याच्या योजनेबाबत

(६) * ३७४२५ श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे , श्री.विक्रम काळे , श्री.किरण पावसकर , श्री.नरेंद्र पाटील , श्री.प्रकाश बिनसाळे , श्री.दिपकराव साळुंखे , श्री.संदिप बाजोरिया , श्री.सतीश चव्हाण , श्री.नागो गाणार : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वैद्यकीय सेवा शुल्कात सुसूत्रता आणण्यासाठी खाजगी डॉक्टरांनी त्यांच्या रुग्णालयाच्या दर्शनीय भागावर रेटबोर्ड लावण्याची शासनाने सक्ती केली असून याची अंमलबजावणी माहे मे, २०१३ पासून केली जाणार आहे, हे खरे आहे काय,

(२) या योजनेचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुरेश शेट्टी : (१) हे खरे नाही.

तथापि मेडीकल कौन्सिल ऑफ इंडिया यांनी Code of Ethics & Regulation २००२मध्ये वैद्यकीय व्यवसायीकांनी त्यांच्या शुल्काबाबत बोर्ड लावण्याबाबत तरतूद विहित केलेली आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, राज्यात वैद्यकीय सेवा शुल्काबाबत एकाच शहरामध्ये खाजगी डॉक्टरांचे वेगवेगळे रेट असतात. त्यामुळे सर्वसामान्य व गोरगरीब रुग्णांना एखादी शस्त्रक्रिया किंवा औषधोपचारासाठी रुग्णालयात दाखल व्हायचे झाले तर उपचारानंतर रुग्णालयाचे किती बिल होईल याबाबत धास्ती वाटते. राज्यामध्ये जे खाजगी डॉक्टर प्रॅक्टिस करीत आहेत त्यांचे प्रत्येक शस्त्रक्रियानिहाय किंवा उपचारानिहाय दरपत्रक किंवा रेटबोर्ड त्यांच्या दवाखान्याच्या दर्शनी भागात लावले जाईल काय आणि त्या दरपत्रकाप्रमाणे आकारणी करण्यात येईल काय?

सभापती महोदय, सध्या ग्रामीण भागात आणि काही प्रमाणात शहरी भागातही खाजगी डॉक्टरांकडून आकारणीप्रमाणे पावती दिली जात नाही. त्याकरिता खाजगी डॉक्टरांना आकारणीप्रमाणे पावती देण्याचे आदेश दिले जातील काय आणि त्या आदेशाची अंमलबजावणी केली जाईल काय?

नंतर एए.1...

अशुद्धीत मत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :37425 .....

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, महाराष्ट्रातील अशासकीय हॉस्पिटलमध्ये अशा प्रकारची सूची लावण्याचा नियम नाही. परंतु दिनांक 11.3.2002 रोजी घोषित केलेले कोड ऑफ एथिक ॲन्ड रेग्युलेशन 2002 यातील नोटीफिकेशन चॅप्टर 3 मधील 3.7.1 अनुसार दर सूची लावण्यात यावी अशा पध्दतीची गाईडलाईन आहे परंतु अशा प्रकारची माहिती लावणे बंधनकारक नाही. परंतु आता नवीन क्लिनिकल ॲक्ट लोकसभेत पास झाला असून काही राज्याने हा ॲक्ट लागू सुध्दा केलेला आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये हा ॲक्ट लागू करण्याचा विचार असून त्यामध्ये अशा प्रकारची सूची लावणे बंधकारक करण्यात आले आहे. सदर ॲक्ट मंत्रीमंडळासमोर गेला असून पुढील अधिवेशनात हा ॲक्ट लागू करण्याचा डिपार्टमेंटचा विचार आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बुलढाणा जिल्ह्यात भ्रूणहत्या होत असल्याबाबत

(७) * ३८१२० श्रीमती विद्या चव्हाण , श्री.संदिप बाजोरिया , श्री.हेमंत टकले , श्री.विक्रम काळे , श्री.रमेश शेंडगे , श्री.जयवंतराव जाधव : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यात गत दहा महिन्यात १७२ भ्रूणहत्या झाल्याचे माहे जानेवारी, २०१३ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार वैद्यकीय अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

प्रा.फौजिया खान, श्री.सुरेश शेट्टी यांचे करिता : (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय,बुलढाणा येथील पाठक गल्लीमधील एक गर्भपात केंद्र असून ते अनाधिकृतपणे चालविले जात आहे. यासंदर्भात अशी माहिती मिळाली आहे की, डॉ. सय्यद हुसेन यांच्या केंद्रामध्ये गेल्या १० महिन्यात १७२ स्त्रीभ्रूण हत्येचे सँपल घेतले गेले आहे तसेच या डॉक्टरांना १५ हजार रुपयांची फी घेतांना रंगेहात पकडले गेले आहे. परंतु उत्तरामध्ये "हे खरे नाही, प्रश्नच उद्भवत नाही" असे म्हटले आहे, त्यामुळे यासंदर्भात मंत्रीमहोदयांनी खुलासा करावा अशी विनंती आहे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, प्रश्न असा विचारण्यात आला होता की, बुलढाणा जिल्हयात गेल्या १० महिन्यात १७२ भ्रूण हत्या झालेल्या आहेत. त्यामुळे यासंदर्भात अशी वस्तुस्थिती नाही, हे खरे नाही असे सांगितले आहे. सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे त्यासंदर्भात मी सांगू इच्छिते की, बुलढाणा येथील पाठक गल्लीमध्ये डॉ.यासीन हुसेन यांना दक्षता पथकाने रंगेहात पकडले असून या डॉक्टरांवर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर :सभापती महोदय, बुलढाणा येथे गेल्या १० महिन्यात १७२ स्त्री भ्रूण हत्या झाल्या आहेत असा प्रश्न विचारण्यात आला होता. परंतु या प्रश्नाला "हे खरे नाही" असे उत्तर दिले गेले आहे. परंतु बुलढाणा जिल्हयात एकंदर किती भ्रूण हत्या झाल्या याची माहिती मंत्री महोदयांनी देणे आवश्यक होते. बुलढाणा तसेच खामगाव येथे अनेक केंद्रामध्ये डॉक्टरांना ट्रॅप

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर.....

करण्यात आलेले आहे. परंतु पुढे या डॉक्टरांचे काय झाले ते मात्र काही समजू शकले नाही. त्यामुळे ज्या ज्या दवाखान्यावर छापे टाकून डॉक्टरांना पकडण्यात आले त्या डॉक्टरांवर कडक कारवाई करण्यासंबंधीचे शासनाचे धोरण नाही. त्यामुळे माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, पुन्हा एकदा या प्रकरणाची फेर चौकशी करुन ज्या ज्या लोकांनी अशा प्रकारचे कृत्य केले असेल त्यांच्यावर कडक कारवाई करण्यासंबंधी शासन पुन्हा एकदा निर्णय करणार आहे काय ?

प्रा. फौजिया खान :सभापती महोदय, बुलढाणा जिल्हयातील अशा केंद्रातील डॉक्टरांवर कडक कारवाई करण्यात आलेली आहे. बुलढाणा जिल्हयामध्ये एकूण गर्भपात केंद्र ८९ असून १६ केंद्र सरकारी असून ७३ केंद्र खाजगी आहेत. या सर्वांची तपासणी करण्यात आली असून उणिवा आढळलेले केंद्र ५ आहेत, बंद केलेले केंद्र ३ असून कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेले केंद्र २ आहेत. डीकॉय केसेस सुध्दा करण्यात आलेल्या आहेत. डिकॉय केसमध्ये क्षमा हॉस्पिटलवर गुन्हा दाखल करण्यात आला असून. या केंद्राला सील सुध्दा लावण्यात आलेले आहे. या ठिकाणच्या डॉक्टरांना अटक करण्यात आली असून त्यांना १३.१.२०१३ रोजी पोलीस कोठडी देण्यात असून न्यायालयीन कोठडी १४.१.२०१३ रोजी देण्यात आली असून सदर डॉक्टरांना २२.१.२०१३ रोजी जामीन मिळालेला आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, मी येथे थोडी माहिती देऊ इच्छिते. महाराष्ट्रात स्त्री भ्रूण हत्ये विरोधात जे काम सुरू आहे त्याचे कौतुक सर्वोच्च न्यायालयाने केले आहे. सर्वोच्च न्यायालयाने 7 राज्यांच्या सचिवांना न्यायालयात बोलाविले होते. दुसऱ्या राज्यांनी महाराष्ट्राचे मॉडेल समोर ठेवून काम करावे असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे. सर्वोच्च न्यायालयाने दुसऱ्या राज्यांना असेही सांगितले आहे की,आपण महाराष्ट्रामध्ये जाऊन ते कसे काय काम करीत आहेत हे पहावे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सभागृहातील सर्व माननीय सदस्यांकडून अशा प्रकारचे विविध स्वरूपाचे प्रश्न येत आहेत त्या आधारे मी मंत्रिमहोदयांना प्रश्न विचारू इच्छिते. गेल्या 31 मार्च पासून आपण डॉक्टरांना रंगे हाथ पकडले आहे. त्या केसेसची आजची सद्य:स्थिती काय आहे ? आपण सत्र न्यायालयात केसेस हरल्यानंतर देखील हायकोर्टामध्ये अपील करणे भाग होते. त्याप्रमाणे शासनाने हायकोर्टात अपील केले आहे काय ? यासंबंधातील माहिती मंत्रिमहोदय, पुढच्या आठवड्यात पटलावर ठेवतील काय ? आता येथे सविस्तर उत्तर दिली नाही तरी चालेल. पण माननीय मंत्र्यांनी यासंबंधी लेखी उत्तर द्यावे म्हणजे आम्ही त्याचा पाठपुरावा करू शकू.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, माझ्याकडे अशी माहिती आहे की, सध्या आपण 4 हजार केसेस कोर्टात दाखल केल्या आहेत. त्यापैकी 100 केसेस डिसाईड झालेल्या आहेत. 46 केसेसमध्ये कन्व्हीक्शन झालेले आहे. 30 केसेसमध्ये तुरुंगवास झालेला आहे. 16 केसेसमध्ये पेनल्टी झालेली आहे. हे फक्त महाराष्ट्रातच झालेले आहे. संपूर्ण देशात महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे की, डॉक्टरांना तुरुंगवासाची शिक्षा झालेली आहे. आपण रेड टाकतो, डिकॉय केसेस करतो, ज्युडिशिअरीची ट्रेनिंग करतो, प्रॉसिक्युटरचे ट्रेनिंग करतो आपल्याकडे जे रिजनल स्क्वॉड आहेत ते दुसऱ्या कुठल्याही राज्यात नाही. फक्त महाराष्ट्रामध्ये आहेत. त्यामुळे महाराष्ट्राकडे मॉडेल म्हणून बघितले जात आहे. सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यांनी जी अन्य माहिती विचारली आहे ती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.मनीष जैन : सभापती महोदय, डॉ.सय्यद अबीब यांचे नावे मंत्रिमहोदयांनी घेतले आहे. त्यांचे क्लिनीक सील करण्यात आले आहे काय, त्यांचे किंवा त्यांच्या सहकाऱ्यांचे लायसेन्स जप्त करण्यात आले आहे काय, तसेच रजिस्ट्रेशन रद्द करण्यात आले आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सदर कारवाई अद्याप पर्यंत झालेली नाही. त्यांचे क्लिनीक अद्याप बंद करण्यात आलेले नाही. त्यांचे रजिस्ट्रेशन सुद्धा रद्द करण्यात आलेले नाही. मात्र, ते रद्द करण्यासंबंधातील शिफारस कौन्सिलला करण्यात येईल.

सभापती : सन्माननीय मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण होण्या आधीच सन्माननीय सदस्य कुरकुर करता. त्यांनी उत्तर द्यायला सुरूवात केल्यानंतर आवाज करता. यावरून असे दिसते की, आपली उत्तर ऐकून घेण्याची इच्छाच दिसत नाही.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, एनटीपी ॲक्ट मध्ये तशा प्रकारची तरतूद नसल्यामुळे तसे करण्यात आलेले नाही.

डॉ.रणजीत पाटील : सभापती महोदय, मॉडेल राज्य म्हणून महाराष्ट्राचा उल्लेख मंत्री महोदयांनी केला आहे. महाराष्ट्र राज्य हे लिंग गुणोत्तराच्या बाबतीत सुद्धा संपूर्ण देशात मॉडेल राज्य म्हणून प्रसिद्ध होते हे देखील आपण नमूद करायला पाहिजे. आपण लिंग गुणोत्तराच्या बाबतीत मागून तिसऱ्या ते चौथ्या क्रमांकावर होतो ही आपल्या राज्याला लाजीरवाणी गोष्ट आहे. एखाद्या जिल्ह्यात 2-3 वेळा स्टींग ऑपरेशन होते. त्या डॉक्टरला, रूग्णाला पकडले जाते. त्याच्या विरूद्ध पुरावे सापडत नाहीत. तो सुटून जातो. त्यासंबंधीच्या बातम्या प्रसिद्ध होतात. काय चालते हे सगळ्यांना माहीत असते. साध्या रिक्षावाल्याला देखील गावात काय चालले आहे हे माहीत असते. परत त्याचा दवाखाना सुरू होतो. ही अभिमानाची बाब नव्हे. एकदा नव्हे तर दोन वेळा स्टींग ऑपरेशन झाले. आपल्याकडे काही जिल्हे हे कलंकित आहेत तेथे हे प्रकार जास्त होतात. बुलढाणा जिल्हा हा त्यातील कलंकित जिल्हा आहे. आज बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथे दोनदा स्टींग ऑपरेशन झालेले आहे. तेव्हा त्या डॉक्टरांचे रजिस्ट्रेशन शासन रद्द करणार आहे काय असा माझा प्रश्न आहे ?

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38120.....

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, आपण रजिस्ट्रेशन सुध्दा रद्द केलेली आहेत. आपण ॲक्ट नुसार कारवाई करतो. एमटीपी ॲक्ट नुसार धाडी टाकण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार कारवाई झालेली आहे. सन्माननीय सदस्यांनी येथे रजिस्ट्रेशन रद्द करण्यासंबंधी सांगितलेले आहे त्या संबंधीचा प्रस्ताव एमसीआयकडे पाठविण्यात येईल.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन बाबत</u>

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा पॉईन्ट ऑफ इर्न्फेशन आहे. काल या सभागृहात मी पुरवणी मागण्यांवर बोलत असताना पोलीस अधिकारी श्री.सूर्यवंशी यांच्या संदर्भातील मुद्दा उपस्थित झाला होता. विधानसभा सभागृहातील काही सन्माननीय सदस्य श्री.सूर्यवंशी यांच्या विरोधात हक्कभंग प्रस्ताव देत असताना श्री.सूर्यवंशी तेथे आले आणि ते सन्माननीय सदस्यांना उलटसुलट बोलले. असा प्रकार घडल्यानंतर त्यांच्यामध्ये बाचाबाची झाली. तेव्हा नेमके काय घडले आहे हे या सभागृहाला समजले पाहिजे. कारण या सभागृहात ती चर्चा उपस्थित झाली होती. त्या ठिकाणी मारामारी झालेली आहे, आपण या परिसराचे प्रमुख आहात. तेव्हा विधानमंडळ परिसरात जे काही घडले ते आम्हाला कळले पाहिजे.

सभापती : या संदर्भातील माहिती घेऊन ती सभागृहाला अवगत करण्यात येईल.

..3.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेबाबत</u>

सभापती : आज सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र.पाटील, सुमंत गायकवाड, चंद्रकांत पाटील, डॉ.दीपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे,श्री.रामनाथ मोते, डॉ.रणजित पाटील,वि.प,स.यांनी "राज्यातील पाटबंधारे महामंडळातील गैरव्यवहाराच्या चौकशीसाठी गत अधिवेशनात राज्य शासनातर्फे श्री.चितळे यांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष तपास समिती स्थापन करण्याची घोषणा. दिनांक 31 डिसेंबर, 2012 समितीच्या स्थापनेचा आदेश निर्गमित झाल्यानंतर माहितीच्या अधिकाराद्वारे प्राप्त झालेले पुरावे समितीसमोर सादर करण्याबाबत माननीय विरोधी पक्ष नेते, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी समितीच्या अध्यक्षांना विनंती करणे, परंतु श्री.चितळे यांनी कोणत्याही आरोपाची शहानिशा करण्याची बाब समितीच्या कार्यकक्षेत येत नसल्याची बाब उघड करणे, या गैरव्यवहार प्रकरणी नेमलेल्या समितीच्या कार्यकक्षेत आरोपाची शहानिशा करण्याची बाब येत नसल्याने राज्यातील शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना." या विषयावर नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे.

या संदर्भात माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना जाणीवपूर्वक दिलेली आहे. सिंचन घोटाळ्या संदर्भात भरपूर चर्चा झाली. नागपूरच्या अधिवेशनात सतत पाच दिवस सभागृहाचे कामकाज बंद पाडल्यानंतर एस.आय.टी.ची घोषणा करण्यात आली. आम्ही एस.आय.टी.ची मागणी केली तेव्हा आमची अपेक्षा होती की, अंडर दी इन्क्वॉयरी कमिशन ऑफ ॲक्ट खाली दिली जाईल. सिंचन घोटाळ्या संदर्भात राज्यात प्रचंड असंतोष होता. लोकांमध्ये खदखद होती. या घोटाळ्यातील वास्तव बाहेर आले पाहिजे अशी अपेक्षा होती. आम्ही पाच दिवस विधिमंडळाचे कामकाज बंद पाडल्यानंतर एस.आय.टी.ची मागणी मान्य करण्यात आली. आम्ही एस.आय.टी.ला पत्र लिहिले की या संदर्भातील पुरावे आमच्याकडे आहेत. ते आपणास द्यायचे आहेत. त्यावर आम्हाला उत्तर देण्यात आले की, टर्म्स ॲन्ड रेफरन्सप्रमाणे कार्यकारी संचालक जी माहिती देतील तीच माहिती घ्यावयाची आहे. आज आर्थिक पाहणीचा अहवाल येणार आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

माझी खात्रीपूर्वक माहिती आहे की, आज सादर होणाऱ्या आर्थिक सर्वेक्षण अहवालामध्ये सिंचनाखालील क्षेत्र किती आहे या बाबतची माहिती उपलब्ध नाही असे नमूद केले आहे. श्री.माधवराव चितळे या बाबतची माहिती देणार असल्यामुळे सिंचनाची माहिती देण्यात आलेली नाही. महोदय, आर्थिक सर्वेक्षण अहवालामध्ये या बाबतची माहिती एस.आय.टी.च्या नावाखाली लपविली जात आहे. भ्रष्टाचारी अधिकारी, भ्रष्टाचारी मंत्री यांच्या माध्यमातून राज्यात सिंचन किती झाले हे लपविले जात आहे. एस.आय.टी.कडून सिंचनाची माहिती घेण्यात येईल असे नमूद केले असेल तर ते योग्य होणार नाही.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, आर्थिक सर्वेक्षण अहवाल अद्याप सभागृहासमोर आलेला नाही. माननीय विरोधी पक्ष नेत्यांकडून 'जर-तर' च्या आधारावर देण्यात येत असलेल्या माहितीवर माझी हरकत आहे.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, आर्थिक सर्वेक्षण अहवाल फुटला आहे काय, हे माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जाहीर करावे. त्या अहवालात नेमके काय नमूद केले आहे हे माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जाहीर करावे.

श्री.विनोद तावडे : महोदय, आर्थिक सर्वेक्षण अहवाल आज सायंकाळपर्यंत सभागृहासमोर येईल. त्यावेळी तो अहवाल फुटला की नाही हे सभागृहाला समजेल.

सभापती : मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, आपण दिलेली सूचना नियम 289 अन्वये कशी योग्य आहे या मर्यादेपर्यंतच आपण बोलावे. मला वाटते आपले बोलून झालेले आहे.

श्री.विनोद तावडे : महोदय, एस.आय.टी.च्या माध्यमातून जनतेच्या मनात भ्रष्टाचाराविषयी जी साशंकता आहे ती खरी आहे असे आमचे मत आहे. ही बाब खरी आहे की खोटी आहे या बाबतची माहिती व्हावी म्हणून या विषयावर चर्चा घ्यावी अशी आमची विनंती आहे.

श्री.अनिल देशमुख : महोदय, आर्थिक सर्वेक्षण अहवाल विधानसभेत सादर होणार आहे. जो अहवाल अजूनपर्यंत सभागृहाला सादर झाला नाही त्यावर आपण चर्चा करीत आहोत. मला वाटते शासनाने या संदर्भातील रेकॉर्ड सभागृहासमोर ठेवल्यानंतर त्यावर चर्चा करावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप : महोदय, आर्थिक सर्वेक्षण अहवालाच्या अनुषंगाने जी चुकीची वक्तव्ये रेकॉर्डवर आलेली आहेत ती कृपया कामकाजातून काढून टाकावीत.

श्री.दिवाकर रावते : महोदय, आर्थिक सर्वेक्षण अहवाल येईल तेव्हा येईल. आज सन्माननीय सदस्य त्या बाबत आकांडतांडव करीत आहोत. ज्यावेळी हा अहवाल सादर होईल त्या वेळी हेच सन्माननीय सदस्य खाली गप्प बसून राहतील. असो. हा माझा भाग नाही.

महोदय, गेल्या अधिवेशनात सिंचन घोटाळा आणि श्वेतपत्रिका हा महत्त्वाचा विषय पुढे होता. माननीय मुख्यमंत्र्यांनी श्वेतपत्रिका जाहीर करुन वर्तमानपत्राच्या माध्यमातून दिलेला शब्द पाळला. त्यानंतर माननीय श्री.अजितदादांचे मंत्री वा उप मुख्यमंत्री म्हणून पुनरागमन झाले. त्याचे काही लोकांना कौतुक झाले. या बाबत महाराष्ट्रभर कौतुक सुरु झाले. त्या अधिवेशनात मी दुसऱ्याच दिवशी पत्र दिले होते. अधिवेशनात सिंचनाच्या श्वेतपत्रिकेवर सबंध दिवसभर चर्चा ठेवावी यासाठी कामकाज सल्लागार समितीची बैठक घ्यावी अशी मी मागणी केली होती. मी या बाबत दोन-तीन वेळा मागणी केली होती. त्यावेळी आपण सांगितले की, यासाठी कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीची आवश्यकता नाही, चर्चा घ्यायची की नाही हा माझा अधिकार आहे. महोदय, मी दिलेल्या पत्राकडे पूर्णत: दुर्लक्ष झाले. अधिवेशन संपून गेले. परंतु श्वेतपत्रिकेवर चर्चा झाली नाही. त्या अधिवेशनात जर सिंचनाच्या श्वेतपत्रिकेवर चर्चा झाली असती तर आज आम्हाला प्रस्ताव द्यावा लागला नसता. श्वेतपत्रिकेच्या बाबतीत सभागृहामध्ये चर्चा झाली असती तर विरोधी पक्ष आणि सरकारची भूमिका सभागृहासमोर आली असती. विरोधी पक्षाच्या वतीने मागच्या अधिवेशनात करण्यात आलेली मागणी मान्य न करण्यात आल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे या विषयावर चर्चा होणे आवश्यक आहे अशी माझी आग्रही भूमिका आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, नागपूरच्या अधिवेशनात सरकारने श्री.माधवराव चितळे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. या समितीचे प्रमुख श्री.माधवराव चितळे यांनी टी.व्ही. वरुन जाहीर केले की, ज्यांच्याकडे सिंचनाच्या घोटाळ्याच्या बाबतीत पुरावे असतील त्यांनी ते माझ्याकडे द्यावेत. त्यानुसार आम्ही पुरावे जमा केले आहेत. परंतु राज्यातील जनतेच्या डोळ्यात धूळ फेकण्याचे काम राज्य सरकार या ठिकाणी करीत आहे.

नंतर श्री.बरवड...

अशोधित प्रत / शोधनीयाची नाही

श्री. जयंत प्र. पाटील ....

म्हणून या ठिकाणी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 289 अन्वये जी प्रस्तावाची सूचना दिलेली आहे त्याचे मी समर्थन करतो. मी माननीय मंत्री श्री. अनिल देशमुख यांनी जी हरकत घेतली त्याचे खंडन आणि माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे त्याचे समर्थन यासाठी करतो की, आर्थिक पाहणी अहवाल किंवा अर्थसंकल्प गुप्त ठेवण्यचे काम आणि जबाबदारी राज्य शासनाची आहे. ते कोठेही बाहेर पडणार नाही हे पाहण्याची जबाबदारी राज्य शासनाची आहे.

सभापती : मी जर चर्चेला परवानगी दिली तर आपल्याला सविस्तर बोलता येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या सभागृहामध्ये माननीय विरोधी पक्ष नेते बोलत असताना या ठिकाणी हरकत घेतली जाते..

सभापती : ते हरकत घेऊ शकतात. एखादे सन्माननीय सदस्य बोलत असताना, एखादे मंत्री बोलत असताना आपणही हरकत घेऊ शकता. त्यावेळी मी आपल्याला परवानगी देतो. मी जर परवानगी दिली नाही तर आपण काही वेळा तसेही बोलता. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये जी प्रस्तावाची सूचना दिलेली आहे त्या बाबतीत माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, जयंत पाटील यांनी आपले म्हणणे मांडले तसेच सत्ताधारी पक्षाकडून काही सन्माननीय सदस्यांनी हरकतीच्या मुद्याच्या माध्यमातून काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. नियम 289 अन्वये देण्यात आलेली प्रस्तावाची सूचना पाहिल्यानंतर असे दिसते की, आज दिवसाच्या कामकाज पत्रिकेमध्ये या बाबतचा कोणताही विषय समाविष्ट नाही. त्यामुळे मी या नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावाच्या सूचनेला परवानगी नाकारत आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, शासनाचे काय म्हणणे आहे हे समोर आले पाहिजे. आमची एसआयटीची मागणी होती.

सभापती : मी निर्णय दिलेला आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : मी निर्णय दिलेला आहे. आपण नियम 289 च्या प्रस्तावाच्या सूचनेच्या माध्यमातून एखादी बाजू मांडता त्यावेळी ज्या बाबीच्या संदर्भात नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे त्याबाबत परवानगी मिळविण्याकरिता जे काही मुद्दे मांडणार असाल ते त्रोटकपणे सांगता. त्यानंतर सभापती दोन्ही बाजूचा काय विचार आहे हे समजून घेतात. नियम 289 अन्वये ज्या विषयाच्या संदर्भात प्रस्तावाची सूचना दिलेली आहे तो विषय त्या दिवसाच्या कामकाजामध्ये समाविष्ट नसेल तर अशी प्रस्तावाची सूचना आपण स्वीकारत नाही. त्या अनुषंगाने मी निर्णय दिलेला आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे. दिवसाच्या कामकाज पत्रिकेमध्ये जर उल्लेख असेल तर आम्ही नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना कशाला देणार ? हा विषय महत्वाचा असल्यामुळे बाकीचे विषय बाजूला ठेऊन या विषयाची चर्चा झाली पाहिजे असे आम्हाला वाटते. कारण या भ्रष्टाचारामुळे राज्य बुडाले आहे. राज्यावर 2 लाख 34 हजार कोटी रुपयांचे कर्ज झालेले आहे.

सभापती : आपण नियम 289 अन्वये दिलेली प्रस्तावाची सूचना मी नाकारलेली आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आपण आम्हाला न्याय दिला पाहिजे.

सभापती : मी आपल्याला सतत न्याय देतो.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सरकारची भूमिका सभागृहासमोर येऊ द्यावी. ते भ्रष्टाचाराबद्दल बोलण्यास तयार नाहीत.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, यामध्ये 70 हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार आहे. या बाबतीत एसआयटी नेमली गेली आहे. या बाबतीत शासनाची भूमिका स्पष्ट झाली पाहिजे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देतात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभागृहाच्या कामकाजाबाबत

सभापती : प्रश्नोत्तरे झाल्यानंतर नियम 93 अन्वयेच्या सूचना घेण्यात येतील. त्यानंतर खेड येथील अपघाताच्या संदर्भात नियम 97 अन्वये चर्चा होईल. त्यानंतर शिक्षकांच्या संदर्भातील प्रस्तावावर माननीय मंत्री उत्तर देतील.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये जमून घोषणा देत असतात.)

सभापती.....

मध्यंतरानंतर सन 2012-13 या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा घेण्यात येईल. त्यानंतर सत्तारुढ पक्षातर्फे मांडण्यात येणारा नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव घेण्यात येईल. परंतु आजच्या कामकाज पत्रिकेवरील लक्षवेधी सूचना घेण्यात येणार नाही. विशेष उल्लेखाच्या सूचना घेतल्या जाणार नाहीत. अर्धा-तासाच्या चर्चा आणि नियम 93 वरील निवेदने देखील आज होणार नाहीत.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये जमून घोषणा देत असतात.)

पृ.शी.: लेखी उत्तरे

मु.शी.: तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

प्रा.फौजिया खान (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "राज्यातील आदिवासी भागातील कुपोषित बालकांच्या मृत्यूच्या प्रमाणात झालेली वाढ" या विषयावरील श्री.छगन भुजबळ, श्री.वसंत चव्हाण, श्री.बबनराव ढाकणे, श्रीमती विद्या बेलोसे, श्रीमती रजनी सातव, श्री.व्यंकाप्पा पतकी, श्री.अरुण मेहता, श्री.अजहर हुसैन, श्री.कृपाशंकर सिंह, श्री.अनिल पटेल, श्रीमती वसुधा देशमुख, श्री.रविंद्र मिर्लेकर, श्री.अरविंद सावंत, श्रीमती निला देसाई, श्री.जयप्रकाश बाविस्कर, श्रीमती उमेशा पवार, श्री.बाळासाहेब साळुंखे, श्री.नितीन शिंदे, श्री.किसनराव राठोड, श्री.मधुकर किंमतकर, श्री.किशोर काशिकर, श्री.अशोक चव्हाण, श्री.शरद वाणी, श्री.विजय पाटील, श्री.दिवाकर पांडे, श्री.शाळीग्राम बसैये, श्री.पांडुरंग हजारे, श्रीमती इंदूमती नाकाडे, माजी वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक 21090 ला दिनांक 19/12/1997 रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवते.

सभापती : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : सोबत जोडलेली अधिक माहिती छापण्यात यावी.)

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.संजय देवतळे (पर्यावरण मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "नवी मुंबई, ठाणे, रायगड परिसरातील प्रदुषण करणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत" या विषयावरील श्री.पांडुरंग फुंडकर, श्री.नितीन गडकरी, श्री.विनोद तावडे, वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक 24737 ला दिनांक 13/4/2007 रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : सोबत जोडलेली अधिक माहिती छापण्यात यावी.)

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये जमून घोषणा देत असतात.)

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री.राजेंद्र मुळक (वित्त व नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्राची आर्थिक पाहणी सन 2012-2013 सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी सन 2012-13 सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

5.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये जमून घोषणा देत असतात.)

नियम 93 अन्वयेच्या सूचना

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी "भारत निर्माण कार्यक्रम पाणीपुरवठा योजनेंतर्गत सुटाळा खु.ता.खामगांव अंतर्गत असलेल्या शुक्ला ले-आऊट व सावजी जे-आऊट मधील ग्रामीण पाणीपुरवठा योजनेत झालेला भ्रष्टाचार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, भगवान साळुंखे यांनी "मुंबईतील अनुदानित व विना अनुदानित शाळांना नवीन निकष लावल्यामुळे या शाळांमधील शिक्षकांना नोकरीपासून वंचित होण्याचा निर्माण झालेला धोका" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी " श्रीमती शितल कदम या विवाहितेच्या सासरच्या मंडळीकडून शारीरिक व मानसिक छळ केला जात असल्याचे उघडकीस येणे, सदर महिलेची तक्रार दाखल करुन घेण्यास पोलिसांकडून होत असलेली टाळाटाळ " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार, सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, भाई गिरकर यांनी "मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या जमिनीवर अनेक वर्षांपासून असलेली धार्मिक स्थळे नियमित करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

6....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये जमून घोषणा देत असतात.)

सभापती.....

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "मुंबई-गोवा महामार्गावर महाकाली ट्रॅव्हल्स कंपनीची बस जगबुडी नदीत कोसळून झालेला अपघात" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे, ॲड.आशिष शेलार, श्री.चंद्रकांत पाटील यांनी "मच्छीमार वापरत असलेली वायरलेस यंत्रणा तसेच अन्य खाजगी बिनतारी यंत्रणा सदोष असल्याचे केंद्रीय दूरसंचार विभागाला कळवूनही त्यावर कारवाई न होणे, यामुळे भविष्यात सागरी सुरक्षा व्यवस्थेला निर्माण झालेला गंभीर धोका" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे. उर्वरित नियम 93 अन्वयेच्या सूचनांना मी दालनात अनुमती नाकारलेली आहे.

सभागृहात गोंधळाचे वातावरण असल्यामुळे सभागृहाची बैठक मी 15 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक 1.00 ते 1.15 पर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

स्थगितीनंतर

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी)

तालिका सभापती : आता नियम ९७ अन्वये चर्चेला सुरुवात करण्यात येईल. या चर्चेसाठी माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरासह २ तासाचा वेळ देण्यात आलेला आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : तालिका सभापती महोदय, सभागृहामध्ये कोणत्याही खात्याचे मंत्री महोदय हजर नाहीत. या चर्चेला परिवहन खात्याचे, बांधकाम खात्याचे की गृह खात्याचे मंत्री महोदय उत्तर देणार आहेत ?

श्री. पांडुरंग फुंडकर : तालिका सभापती महोदय, सभागृहामध्ये मंत्री महोदय हजर नाहीत. त्यांची किती वेळ वाट पहायची ? आपण सभागृहाची बैठक १० मिनिटासाठी तहकूब करावी.

तालिका सभापती : सभागृहाची बैठक १० मिनिटासाठी तहकूब करण्यात येत आहे.

(दुपारी १.१५ ते १.२५ पर्यंत सभागृहाची बैठक तहकूब झाली.)

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.मोहन जोशी)

सभागृहाच्या कामकाजाबाबत

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : मी या सभागृहाला सांगू इच्छितो की,...

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, एकही मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. त्यांना सरकार चालवावयाचे नसेल तर त्यांनी राजीनामे द्यावेत. आम्ही प्रत्येक वेळा उभे राहून माननीय मंत्री महोदय हे सभागृहात उपस्थित नाहीत ही बाब निदर्शनास आणून देत असतो. माननीय मंत्र्यांनी सभागृहात यावे असे आम्ही त्यांना वारंवार सांगावयाचे काय ? सभापती महोदय, या सरकारमधील मंत्र्यांना तंबी देण्यात यावी. मंत्र्यांच्या अनुपस्थितीबाबतचा विषय मी कामकाज सल्लागार समितीमध्ये देखील उपस्थित केलेला होता.

तालिका सभापती : आपली अडचण नेमकी काय आहे ?

श्री.जयंत प्र.पाटील : या चर्चेला उत्तर कोण देणार आहे. या चर्चेशी संबंधित मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत.

(परिवहन राज्यमंत्री सभागृहात उपस्थित होतात.)

श्री. दिवाकर रावते : महामार्गावर अपघात झालेला आहे. सदर महामार्गावर 1500 अपघात झालेले आहेत. महामार्गावरील अपघात हा चर्चेचा विषय होत असेल तर इतर अनेक वेळेला महामार्गांवर अपघात झाले आहेत, त्या वेळी त्या अपघातांची चर्चा का झाली नाही ? महामार्गांवर झालेल्या अपघातामध्ये मोठमोठे दिग्गज मृत्यूमुखी पडले आहेत. या सदनात आयत्या वेळी कोणकोणते कामकाज ठरविले जाते याची मला आज माहिती मिळाली.

तालिका सभापती : या विषयाच्या बाबतीत नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना मांडण्यात आली होती, त्यावर प्रश्नोत्तराच्या तास संपल्यानंतर चर्चा घेण्यात येईल अशी माहिती मघाशी माननीय सभापती महोदयांनी या सभागृहात दिली आहे. माननीय विरोधी पक्ष नेते यांनी देखील सदर चर्चा घेण्यास मान्यता दिली आहे.

(गोंधळ)

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : प्रश्नोत्तराचा तास सुरु होण्यापूर्वी खेड येथे झालेल्या अपघातासंबंधीचा प्रश्न उपस्थित केला गेला. त्यावर माननीय सभापती महोदयांनी एक तासाची चर्चा मान्य केली. प्रश्नोत्तरे संपल्यानंतर आम्ही सिंचना संबंधी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली होती. सिंचनाच्या बाबतीत एस.आय.टी. नेमली गेलेली आहे. त्यांना पूर्णपणे अधिकार न दिल्यामुळे सिंचनासंबंधीची चौकशी व्यवस्थितपणे होत नाही. सिंचनात जो भ्रष्टाचार झालेला आहे, त्याचे पुरावे देखील घेण्यास चितळे समिती तयार नाही. या विषयाच्या अनुषंगाने नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली होती व त्यावर चर्चा करण्यात यावी अशी मागणी केली होती. ती मागणी माननीय सभापती महोदयांनी फेटाळली. आमचे म्हणणे असे होते की, किमान शासनातर्फे सिंचनाच्या बाबतीत निवेदन सभागृहासमोर ठेवले गेले पाहिजे. ही पध्दत आहे. त्यामुळे आम्ही सभागृह बंद केले.

महोदय,आज कोकणातील गोवा महामार्गावर खेड येथे मोठा अपघात झालेला आहे, महाराष्ट्रात यापूर्वी अशा प्रकारचा मोठा अपघात कधी झाला नाही एवढा मोठा अपघात खेड येथे झालेला आहे. या अपघाताची चर्चा झाल्यानंतरही माझी मागणी आहे की, सिंचनाच्या बाबतीत सरकारने आपले मत व्यक्त केले पाहिजे. आम्ही जी इन्क्वॉयरी मागितली होती, ती इन्क्वॉयरी दिली गेली नाही. सिंचनातील भ्रष्टाचार दाबण्याचा प्रयत्न शासनाकडून चाललेला आहे. सभापती महोदय, सिंचनाचा विषय आम्ही सोडलेला नाही. परंतु आताचा विषय गंभीर असल्यामुळे सिंचनाचा विषय थोडा बाजूला सारतो असे मला नमूद करावयाचे आहे.

तालिका सभापती : आता नियम 97 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेवरील चर्चा सुरु करण्यात येत आहे. चर्चेला किती वेळ द्यावा हे सभागृहाने ठरवावयाचे आहे ?

श्री.भाई गिरकर : या चर्चेला कृपया दोन तास वेळ देण्यात यावा.

तालिका सभापती : ठीक आहे. या विषयावरील चर्चा दोन तास होईल. माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरासह सदर चर्चा दोन तासात संपवू.

श्री.दिवाकर रावते : कोकणातील मुंबई-गोवा महामार्गावर मोठा अपघात झाला आहे, तो विषय सभागृहात चर्चेला येणार आहे. बुलढाणा येथे बसचा अपघात झाला, त्या अपघातात बसमधील सर्व जीवंत प्रवासी जळले होते. मी त्या घटनास्थळी गेलो होतो. हा तर भीषण अपघात आहेच.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

परंतु या अपघातापेक्षाही तो अपघात भीषण होता. त्या अपघातास शासन जबाबदार होते. रस्त्यावरील खड्डे यामुळे तो अपघात झाला होता. त्या अपघातात जीवंत प्रवासी जळाले. भविष्यामध्ये इतर ठिकाणच्या बाबतीत सुध्दा रस्त्यांच्या बाबतीत शासन कोणती भूमिका घेणार आहे यासंबंधीची माहिती आजच्या अपघाताच्या चर्चेच्या माध्यमातून सभागृहाला देण्यात यावी.

यानंतर श्री.भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

जिवंत माणसे होरपळून मेली. तो भीषण अपघात होता. आजच्या या चर्चेमधून शासनाकडून ठाम उत्तर येणे अपेक्षित आहे. भविष्यात इतर ठिकाणी अपघात घडल्यास शासन कोणती भूमिका घेणार आहे? या चर्चेमधून कोकणातील रस्त्यांसाठी अर्थसंकल्पात ठोस तरतूद होणार नसेल तर आम्ही अर्थसंकल्प मांडू देणार नाही.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, अत्यंत गंभीर अशा प्रकारचा विषय विरोधी पक्षाकडून उपस्थित केला गेला. खेड येथे झालेल्या भीषण अपघातात 37 जण मृत झालेले आहेत. प्रचंड जीवितहानी झालेली आहे. या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रश्नोत्तराच्या तासानंतर या विषयावर चर्चा घेण्यास अनुमती देण्यात आली आहे. अशा परिस्थितीत इतर विषय उपस्थित करुन या विषयाचे गांभीर्य कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे तो चुकीचा आहे. सन्माननीय सदस्य श्री.विजय गिरकर यांनी मान्य केलेल्या विषयावरील चर्चा त्वरित उपस्थित केली पाहिजे. या चर्चेमध्ये जे सन्माननीय सदस्य सहभागी होणार असतील त्यांना बोलण्यासाठी पुरेसा वेळ दिला गेला पाहिजे. काल रात्री खेड येथे जो अपघात झाला त्याचे गांभीर्य सदनाला कळले असल्यानेच या विषयावर चर्चा घेण्याचे निश्चित केले आहे. या चर्चेमधून शासनाला देखील काही महत्वाचे निर्णय घेण्यास मदत होऊ शकते.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, नियम 97 अन्वये सुरु होणारी चर्चा ही खेड येथील भरणा नाका येथे झालेल्या अपघातासंबंधी व कोकणातील मुंबई-गोवा महामार्ग या रस्त्याच्या चौपदरीकरणासंबंधीच्या विषयापुरती मर्यादित असावी. या चर्चेला व्यापक स्वरुप दिले तर चर्चेच्या विषयाला न्याय देता येणार नाही.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नाहीत.

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, परिवहन विभागाचा राज्यमंत्री या नात्याने मी सभागृहात उपस्थित आहे. रस्ते, परिवहन किंवा गृह या विभागाशी संबंधित जे काही मुद्दे मांडण्यात येतील त्या मुद्यांबाबत माननीय मुख्यमंत्री सविस्तरपणे उत्तर देतील.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, या विषयाचा संबंध परिवहन, गृह, सार्वजनिक बांधकाम व सार्वजनिक आरोग्य या चार विभागाशी येतो. त्यामुळे माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री व सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी देखील सभागृहात उपस्थित असणे आवश्यक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: भरणा नाका खेड (जिल्हा रत्नागिरी) येथे जगबुडी नदीत खाजगी प्रवासी बस कोसळून 37 लोकांचा झालेला मृत्यू

मु.शी.: भरणा नाका खेड (जिल्हा रत्नागिरी) येथे जगबुडी नदीत खाजगी प्रवासी बस कोसळून 37 लोकांचा झालेला मृत्यू या विषयावर सर्वश्री रामनाथ मोते, जयंत प्र.पाटील, विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, सुमंतराव गायकवाड, चंद्रकांत पाटील, डॉ.दीपक सावंत, डॉ.नीलम गोऱ्हे, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ.रणजित पाटील, वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी दोन तासांची वेळ दिलेली आहे. माननीय सदस्य श्री.भाई गिरकर सूचना मांडतील आणि भाषण करतील.

श्री.विजय गिरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :-

"मुंबई-गोवा महामार्गावर भरणा नाका खेड, जि.रत्नागिरी येथील अरुद पुलामुळे महाकाली ट्रॅव्हल्सची बस जगबुडी नदीत कोसळून 36 लोकांचा मृत्यू होणे, अनेकजण जखमी होणे, सदर महामार्गावर 2010 ते 2012 या कालावधीत 828 लोकांचा मृत्यू व 2411 नागरिक जखमी होणे, महामार्गाचे चौपदरीकरण करण्यास शासनास अपयश येणे, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना."

सभापती महोदय, दोन दिवसांपूर्वी एका पुलाच्या उद्घाटन कार्यक्रमासाठी माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.छगन भुजबळ हे कोकणात गेले होते. त्यावेळी त्यांनी असे उद्गार काढले की, "गोवा राज्याच्या तुलनेत आपण निधी उपलब्ध करुन देण्यात कमी पडत आहोत, त्यामुळे अनेक कामे रेंगाळलेली आहेत." गेल्या दोन वर्षात जवळजवळ 2500 पेक्षा जास्त लोक एन.एच.17 या मुंबई-गोवा महामार्गावरील अपघातात जखमी झालेले आहेत, 828 लोकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत.

नंतर जे.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई गिरकर ....

सर्व राजकीय पक्षांनी आंदोलने केली. इतकेच नव्हे तर कोकणातील पत्रकार एकत्र येऊन त्यांनी लॉंग मार्च काढला, आंदोलने केली, रास्ता रोको केले. परंतु तरी सुध्दा काहीही झाले नाही. कोकणामध्ये जे निरनिराळे उत्सव साजरे होतात त्यासाठी मुंबईतून लाखो लोक कोकणात जातात. पुढील आठवडयात होळीचा सण असून मुंबईतील लाखो लोक कोकणात जाणार आहेत. कोकणामध्ये गणपती उत्सव, भराडी देवीची यात्रा, अंगणेवाडीची यात्रा, मार्लेश्वराची यात्रा, कुणकेश्वराची यात्रा मोठया प्रमाणात भरते. कोकणामध्ये ज्या ज्या वेळी यात्रा होतात त्या वेळी लाखो मुंबईकर कोकणातील आपापल्या गावी जात असतात.

सभापती महोदय,या सभागृहामध्ये कोकणातील 1/3 आमदार आहेत. मुंबईसाठी कोकणाच्या लोकांनी मोठया प्रमाणात त्याग केलेला आहे, असे असतांनाही कोकणातील भूमीपुत्रांवर सातत्याने रस्त्याच्या संदर्भात भेदभाव होत आहे.

सभापती महोदय,आज मुंबई गोवा मार्गावर महाकाली ट्रॅव्हल्सची ए.सी. बस पहाटे 3.30 वाजता जगबुडी नदीच्या पुलावर कठडा नसल्यामुळे खाली कोसळली. या बसमध्ये एकंदर 53 प्रवासी होते त्यातील 43 प्रवासी मृत्यू पावले असून बाकीचे प्रवासी अत्यवस्थ आहेत.

सभापती महोदय, कोकणामध्ये 17 महामार्ग आहेत. दोन पदरी रस्त्यांचा सहा पदरी रस्ता करावा, अशी मागणी कोकणातील जनतेने केलेली आहे परंतु त्याकडे शासन दुर्लक्ष करीत आहे. जगबुडी नदीवर एक पदरी रस्ताच आहे. जगबुडी नदीच्या पुलावर कठडा नाही. तसेच रस्त्यावर स्पीड ब्रेकर्स सुध्दा नाहीत. जगबुडी नदीवर आतापर्यंत 5 अपघात झालेले आहेत. या पूर्वी एकदा जगबुडी नदीवरुन एस.टी.बस खाली कोसळली होती तसेच खाजगी बस देखील खाली पडली होती. कोकणातील रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये 4 ट्रॉमा केंद्र मंजूर झालेले आहेत. परंतु या ठिकाणचे एकही ट्रॉमा सेंटर सुरु झालेले नाही. या रस्त्यांवर नेहमी अपघात होत असतात त्यामुळे या ठिकाणच्या रस्त्यावर ॲम्ब्युलन्सची आवश्यकता आहे. परंतु सध्या येथे एकही ॲम्ब्युलन्स उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई गिरकर ....

सभापती महोदय,मुंबई ते गोवा या महामार्गावर खाजगी बसेसचा सुळसुळाट झालेला आहे. परिवहन किंवा गृह विभागाचे पूर्वी कसेळी घाटावर चेक पोस्ट होते. कसेळी घाट उतरतांना आणि चढतांना ड्रायव्हर दारु प्यायला आहे की नाही, त्याची तब्येत बरी आहे की नाही या संदर्भात टेस्ट घेतली जात होती. परंतु आता अशा प्रकारची टेस्ट घेतली जात नाही. या ठिकाणचे तपासणी नाके बंद झालेले आहेत.

सभापती महोदय, या महामार्गावरुन ज्या खाजगी बसेस चालतात त्यांच्या टपावर मोठया प्रमाणात बोझी असल्यामुळे या वळणावरच्या रस्त्यावर त्या पलटी होतात. गेल्या डिसेंबरमध्ये स्मीत चित्रा ट्रॅव्हलच्या बसला खेड बाजार पेठेत दि. 26 डिसेंबर, 2012 रोजी अपघात झाला व त्यामध्ये 6 जण मृत्यू व 40 प्रवासी जखमी झाले होते. परंतु एवढे अपघात होऊन सुध्दा ज्या ठिकाणी अपघात होतात त्या ठिकाणी भविष्यात अपघात होणार नाहीत या करिता सूचना देणारी यंत्रणा बसवली जात नाही.

सभापती महोदय, कोकणामध्ये अनेक खाजगी टुरीस्ट बसेस सुटतात. त्या मानाने एस.टी. महामंडळाच्या बसेसची संख्या कमी आहे. आज सुध्दा कोकणामध्ये एसटी फायद्यामध्ये चालत आहे.

यानंतर श्री. भारवि....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई गिरकर...

होळी, गणपती आणि मे महिन्यात कोकणात प्रवासी जास्त जातात. त्यासाठी प्रत्येक विभागातून बसगाड्या मागविल्या जातात. असे असताना आता आपण एस.टी.बसचालकांची तपासणी थांबवली आहे. खाजगी बसगाड्यांवर तर कुणाचेही नियंत्रण नाही. प्रवासी क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी घेऊन वाहतूक करण्यात येते. एवढेच नव्हे तर या प्रवाशांना स्टुलावर बसून प्रवास करावा लागतो. प्रवासी वाहनाची क्षमता 50-40 असेल तर त्या वाहनातून 60-70 प्रवाशांची वाहतूक केली जाते. रात्रीच्या प्रवासाच्या वेळी दोन चालक असणे आवश्यक आहे. एक चालक थकला तर दुसरा गाडी चालवू शकेल. या बरोबर आपण गाडी चालवण्याच्या वेग मर्यादेला देखील आळा घातला पाहिजे. आज कोणत्याच प्रकारची तपासणी होत नसल्यामुळे येथे अपघात होत आहेत. या विभागात ट्रॉमा केअर आणि रूग्णवाहिका नाही. त्यासंबंधी मी मागणी केली आहे. माझी अशी मागणी आहे की, या मार्गाचे चौपदरीकरण झाले पाहिजे. पहिल्या टप्प्याचे चौपदरीकरण झाले आहे. पण पुढच्या टप्प्याचे चौपदरीकरण झालेले नाही. हा केंद्रीय मार्ग आहे. यासाठी आपण केंद्र शासनाकडून निधी प्राप्त करून घ्यावा. श्री.भुजबळ साहेबांच्या मतदार संघातील नाशिक-औरंगाबाद रस्ता मोठा झाला आहे. हा रस्ता चौपदरी झाला असून त्यासाठी निधी उपलब्ध होतो. हा रस्ता येवल्या पर्यंत गेलेला आहे. प्रत्येक माननीय मंत्र्यांनी आपल्या भागातील रस्ते आणि पूल रूंद केलेले आहेत.

कोकणात इन्फ्रास्ट्रक्चर उभे केले तर पर्यटनाला चालना मिळेल. त्यातून लोकांना रोजगार उपलब्ध होईल. मालवण येथे सी-वर्ल्ड उभारण्यात येणार असल्याची माहिती माननीय श्री.छगन भुजबळ साहेबांनी दिली आहे. आपण बांद्याची सीमा ओलांडली की चांगल्या रस्त्यांना सुरूवात होते. कारण ते गोवा राज्यातील रस्ते आहेत. परंतु, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यातील रस्त्यांवर खड्डे आहेत. या रस्त्यांची दुरूस्ती व देखभाल नीट होत नसल्यामुळे खड्डे पडतात. खरे म्हणजे या रस्त्यांच्या देखभाल व दुरूस्तीसाठी निधीची आवश्यकता आहे. पण निधीची तरतूद न केल्यामुळे येथील रस्त्यांची अवस्था बिकट आहे. जगबुडी पुलावर अनेक अपघात झाले आहेत. या पुलाला कठडे का नाहीत ? अशा प्रकारचे अनेक पूल कोकणात आहेत. या पुलांवरून एकच वाहन जाते. अशा पुलांची दुरूस्ती होत नाही. त्यासाठी निधीची तरतूद करण्यात येत नाही. आज खाजगी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई गिरकर...

प्रवासी वाहतुकीवर नियंत्रण कोणाचेही नियंत्रण नाही. बसगाड्यांच्या टपावरून क्षमतपेक्षा जास्त सामान वाहून नेले जाते. त्याकडे शासनाचे लक्ष नसते. मुंबईवरून आंगणेवाडी जत्रेला अनेक गाड्या जातात. गाडी आणि ट्रेलरचा अपघात झाला तर कोकणातील वाहतूक 2-3 दिवस खोळंबून राहते. कोकणी माणसाला एका जागेवर 36-40-48 तास अडकून बसावे लागते.

कोकणी माणूस हा वर्षातून चार वेळा गावी जातो. कोकणी माणसाला कोकण रेल्वेचा काहीच फायदा होत नाही. त्याला रेल्वेचे तिकीटच मिळत नाही. त्यामुळे कोकणी माणसाला एस.टी.बसगाडी आणि खाजगी बस सेवेवर अवलंबून रहावे लागते. परिहवन, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम या विभागांनी कोकणातील समस्यांकडे लक्ष देऊन काम केले पाहिजे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई गिरकर....

सभापती महोदय, परिवहन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, आरोग्य विभाग आणि पर्यटन विभागांनी या बाबत स्वत: लक्ष दिले पाहिजे. कारण आज कोकणाकडे पर्यटक आकृष्ट होत आहेत. मुंबई-गोवा महामार्गाची चांगली डागडुजी न केल्यामुळे त्या ठिकाणी अपघातांचे प्रमाण वाढत आहे. हा महामार्ग सहापदरी करण्याची आवश्यकता आहे. आपण तेथील रस्ते रुंद केले नाहीत तर होळी सणासाठी, गणपती सणासाठी आणि इतर सणासाठी कोकणात जाणाऱ्या माणसांना आपला जीव मुठीत घेऊन जावे लागेल. हा राष्ट्रीय महामार्ग असल्यामुळे शासनास निधीची आवश्यकता असल्यास त्यासाठी केंद्राकडे मागणी करावी. तेव्हा या महामार्गावर होत असलेल्या अपघातांची संख्या विचारात घेऊन शासनाने हा महामार्ग लवकरात लवकर सहापदरी करावा अशी विनंती करुन मी माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, कोकणातील खेड तालुक्यातील जगबुडी नदीवरील पूलावर पहाटे 3.30 वाजता खाजगी ट्रॅव्हल्सला झालेल्या अपघातामध्ये आता मिळालेल्या माहितीनुसार 53 पैकी 43 जणांचा मृत्यू झालेला आहे. या अपघातामागची कारणे काय आहेत ? भविष्यात अशाप्रकारे अपघात होऊ नये या दृष्टीने कोणत्या उपाय योजना हाती घेतल्या पाहिजेत या अनुषंगाने येथे चर्चा उपस्थित झालेली आहे. विरोधी पक्षाकडून देखील अतिशय गांभीर्याने चर्चेला सुरुवात झालेली आहे.

सभापती महोदय, मुंबई-गोवा या महामार्गावरुन गोवा येथे जाणाऱ्यांची संख्या खूप मोठी आहे. कोकणात गणपती आणि होळीचा सण मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यात येतो. त्यासाठी मुंबईतून अनेक लोक कोकणात जातात. कारण कोकण आणि मुंबईचा अतिशय घनिष्ट संबंध आहे. कोकणातील अनेक लोक मुंबईत नोकरी करीत असून सणाच्या निमित्ताने कोकणात ये-जा करीत असतात आणि गोव्याला जाणाऱ्यांची संख्या सुध्दा मोठ्या प्रमाणावर आहे.

सभापती महोदय, कोकणात एकूणच पहाडी क्षेत्र असल्यामुळे त्या ठिक्राणी अनेक वळणे, अरुंद पूल, रस्ते, वाढलेली वाहतूक, तसेच अवजड वाहनांची होत असलेली वर्दळ यामुळे त्या ठिक्राणी अपघातांचे प्रमाण जास्त असून मृत पावलेल्यांची संख्या सुध्दा मोठ्या प्रमाणावर आहे.

सभापती महोदय, खेड येथे झालेल्या अपघातामध्ये मृत पावलेल्यांच्या नातेवाईकांना मदत करण्याचा निर्णय शासन घेईल. मृत पावलेल्यांच्या कुटुंबीयांचे सात्वंन करण्यासाठी राज्यातील ज्येष्ठ मंत्री तेथे गेले आहेत. परंतु झालेला अपघात मोठा आहे. अपघातामध्ये ज्या कुटुंबातील व्यक्तीचा मृत्यू होतो किंवा तिला कायमस्वरुपी अपंगत्व येते किंवा त्यांच्या कहाण्या हृदय हेलावणाऱ्या असतात.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

अशा प्रकारे संपूर्ण राज्यातील अपघातांची परिस्थिती आपल्यासमोर आहे. मुळात वाढत्या अपघातांची संख्या हा विषय गांभीर्याचा आहे. मागच्या वेळी सुध्दा या सभागृहात वाढत्या अपघातांच्या विषयी चर्चा करण्यात आली होती. त्या चर्चेला माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर दिले होते. शिवाय या विषयाशी संबंधित असलेल्या इतर विभागाच्या मंत्री महोदयांनी सुध्दा उत्तरे दिली होती.

महोदय, राज्यात होत असलेल्या अपघातांचा अहवाल दर वर्षी परिवहन विभागाकडून तयार करण्यात येतो. त्या अहवालामध्ये वाहतुकीचे नियम पाळण्याबाबत काही सूचना नमूद केलेल्या असतात. त्या सूचनांचे पालन काटेकोरपणे केले पाहिजे. अपघातांच्या विषयामध्ये इतरही अनेक विभागांचा संबंध येत असल्यामुळे संयुक्तपणे यावर आळा घालण्यासाठी उपाययोजना करणे गरजेचे आहे. केवळ वरचेवर बैठका घेऊन अपघातांचे प्रमाण कमी होणार नाही. या संदर्भात संयुक्तपणे प्रयत्न झाला तरच निश्चितपणे अपघात टळू शकतात. शिवाय त्यामुळे अपघातातील मृत्यूंचे प्रमाण सुध्दा निश्चितपणे कमी झाल्याशिवाय राहणार नाही.

महोदय, परिवहन विभागाचे गेल्या दोन-तीन वर्षांतील अहवाल माझ्याकडे आहेत. केवळ या वर्षीचा अहवाल माझ्याकडे नाही. सन 2009 ते 2011 या तीन वर्षांच्या कालावधीत वेगवेगळ्या वाहनांचे 2 लाख 11 हजार 700 अपघात झालेले आहेत. या अपघातांमध्ये 36 हजार लोकांचा मृत्यू झाला आहे. एखाद्या अपघातात मृत्यू झाल्यानंतर आपण त्यावर चर्चा करतो. शासनाकडून सुध्दा ती बाब गांभीर्याने घेऊन आवश्यक त्या उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला जातो. महोदय, तीन वर्षात 36 हजार व्यक्तींचा मृत्यू झाल्यामुळे त्या कुटुंबांची अवस्था काय होत असेल याची कल्पना न केलेली बरी. त्यामुळे हा विषय गांभीर्याने घेतला पाहिजे अशी माझी सन्माननीय मंत्र्यांना विनंती आहे.

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती ॲड.अनिल परब)

महोदय, आर्थिक पाहणी अहवालानुसार राज्यामध्ये 2 लाख 943 हजार कि.मी. लांबीचे रस्ते आहेत. आपल्या राज्यामध्ये सर्वात जास्त रस्ते आहेत. त्याच बरोबरच आपल्या राज्यात वाहनांच्या अपघातांचे प्रमाण सुध्दा जास्त आहे. त्यामुळे वाढत्या अपघातांचे प्रमाण कमी करणे आवश्यक आहे. या सभागृहातील बहुतांश सन्माननीय सदस्य रस्त्याने प्रवास करतात. रस्त्याने प्रवास करताना त्यांना वाहने कशा पध्दतीने चालविली जातात, अवजड वाहने कशी चालविली

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

जातात, वाहनांमध्ये क्षमतेपेक्षा जास्त माल कसा भरला जातो, रस्त्यांची कामे सुरु असताना त्या ठिकाणी फलक लावले जात नाही इ. अनेक बाबी निदर्शनास येतात.

महोदय, आपण मुंबई-पुणे हा 6 पदरी रस्ता केला. 6 पदरी रस्ता करुन सुध्दा त्या रस्त्यावरील अपघातांचे प्रमाण कमी झाले असे नाही. त्या रस्त्यावर वेगाने वाहने चालविली जातात. खरोखरच त्या वाहनांची त्या वेगाने धावण्याची क्षमता आहे की नाही हे पाहिले जात नाही. त्या वाहनांचे टायर्स बरोबर आहेत की नाहीत, त्या टायर्समध्ये पुरेशी हवा आहे की नाही, ते वाहन त्या क्षमतेचे आहे की नाही या बाबी तपासण्याची कोणतीही यंत्रणा आज अस्तित्वात नाही. बाहेरच्या देशात 6-10 पदरी रस्ते असतात. त्या रस्त्यावरील वाहने आपली लेन सोडत नाहीत. कोणतेही वाहन आपल्या लेनच्या बाहेर जात नाही. परंतु आपल्याकडे आडव्या-तिडव्या गाड्या चालविल्या जातात. लेनची शिस्त पाळली जात नाही. आपल्याकडे केवळ रस्त्यावरील फलकांवर 'लेन सोडून नये' इतकीच सूचना लिहिलेली असते. वास्तविक पाहता रस्त्यांवर पोलिसांनी किंवा हायवे वरील यंत्रणेने जी वाहने लेन सोडून इतर लेनमध्ये प्रवेश करतात त्यांना शिक्षा केली पाहिजे. आपली लेन सोडून दुसऱ्या लेनमध्ये जाता कामा नये असे त्यांना सांगावयास पाहिजे.

आपण वारंवार चार-सहा पदरी रस्त्यांची मागणी करतो. परंतु अशा रस्त्यांवरुन पाळावयाच्या नियमांची अंमलबजावणी केली जात नाही. त्या रस्त्यांवर वाहतुकीचे नियम आपण पाळतो की नाही, किंबहुना ते पाळण्याकरिता सक्षम यंत्रणा उभारणे, वाहनांना शिस्त लावण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या सूचना देणे आणि चांगले वातावरण निर्माण करणे हे खऱ्या अर्थाने महत्त्वाचे आहे हे मला या निमित्ताने सांगावेसे वाटते.

नंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठी नोंद

श्री. माणिकराव ठाकरे .....

यामध्ये वेगवेगळ्या विभागांचा संबंध येतो. यामध्ये शिक्षण विभागाचा संबंध येतो. विद्यार्थी रस्ता ओलांडत असताना अपघात झाल्याचे चित्र दिसते. वाहन रस्त्यावर उभे करुन ठेवले जाते. काही कारण नसताना रात्रीच्या वेळी वाहन उभे करुन ठेवतात. त्या ठिकाणी कोणत्याही सूचना नसतात किंवा मागच्या बाजूला लाईट नसतात. मागून गाड्या येऊन त्या वाहनावर आदळून अनेक अपघात झालेले आहेत. पण अशी वाहने उभी करु नका असे सूचना फलक रस्त्यावर फार ठिकाणी आढळून येत नाहीत. काही ठिकाणी सूचना फलक लावतो. बीओटीखाली नवीन रस्ता झाला असेल, त्या रस्त्यावर टोल सुरु करावयाचा असेल तर काही दिवस सर्व चकचकीत दिसते. परंतु ज्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वाहने चालतात त्या ठिकाणी सूचना फलक नसतात किंवा अमुक किलोमीटरमध्ये नियमावली पाळली जात नाही या संदर्भात जर काही सूचना असतील, तक्रारी असतील तर त्या संदर्भात पथके तयार करुन तशी व्यवस्था बांधकाम विभागाने आणि परिवहन विभागाने तयार करणे गरजेचे आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, एकूणच या संदर्भामध्ये आपण लक्ष घातले पाहिजे. आज झालेल्या अपघाताचे अत्यंत विदारक चित्र आपल्यासमोर आहे. खेडमधील हा अपघात अत्यंत भयंकर अशा प्रकारचा अपघात आहे. पहाटे साडेतीन वाजता ज्यांच्या कुटुंबातील कर्ता पुरुष निघून गेला असेल, ज्यांची मुले फिरण्याकरिता गोव्याला गेली असतील, त्यांना किती वेदना होत असतील याची आपण कल्पनाही करु शकत नाही. पण या सदनामध्ये चर्चा होऊन त्या बाबतीत गांभीर्याने पुढे गेलो पाहिजे अशा प्रकारचे जर काही निर्णय आपण घेऊ शकलो तर ते योग्य होईल. सर्व विभागांनी ही बाब गांभीर्याने घेतली पाहिजे. यामध्ये परिवहन विभागाची नियमावली पाळण्याच्या संदर्भामध्ये त्यांच्याकडे किती यंत्रणा आहे, किती ठिकाणी तपासणी होते, त्यांची तपासणी करण्याची काय पध्दत आहे, त्यांच्या संयुक्तपणे वरचेवर बैठकी होतात का, हे पाहणे महत्वाचे आहे.

सभापती महोदय, आपल्याकडे मोठ्या प्रमाणावर अहवाल आलेले असतात. दरवर्षी अहवाल मागवितात. माझ्या माहितीप्रमाणे 1999 पासून 2001 मध्ये, 2002 मध्ये आणि 2003 मध्ये अहवाल आले पण नंतरचे अहवाल मला दिसले नाहीत. पण दरवर्षी आपल्याकडे पाहणी अहवाल सादर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ....

होतो. त्यामध्ये कोणत्या विभागाने काय करावयास पाहिजे याबाबतच्या शिफारशी असतात. शिक्षण विभागाने काय करावे, वित्त विभागाने काय करावे, परिवहन विभागने काय करावे, बांधकाम विभागाने काय करावे, याबाबत सूचना केलेल्या असतात. परंतु त्या सूचना पाळल्या गेल्या की नाही याबाबत बाकीचे विभाग संबंधित विभागाला कळवितात की नाही याही बाबतीत एकत्रितपणे, सामूहिकपणे विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, एका वर्षात जर 13-13 हजार लोक मरत असतील तर ही गंभीर बाब आहे. जेव्हा एखाद्या ठिकाणी वीज पडते किंवा वादळ होते त्यामध्ये काही लोक मृत्युमुखी पडतात आणि त्याबाबत आपण या सदनामध्ये मोठ्या प्रमाणावर चर्चा करतो. इतर कारणांनी निधन होणे हा भाग वेगळा आहे. आरोग्याच्या संदर्भात आपण उपाययोजना करतो पण 13 हजार लोकांचे अपघाती मृत्यू होणे् ही भयंकर परिस्थिती आहे. यामध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीकोनातून तशा प्रकारची पावले उचलली गेली पाहिजेत अशी माझी अपेक्षा राहील.

सभापती महोदय, इतर देशातील उदाहरणे नाहीत असे नाही. चीनचे उदाहरण द्यावयाचे झाले तर 2004 मध्ये त्या ठिकाणी अपघातांची संख्या किती होती, त्यामध्ये मृत्युमुखी पडलेल्या लोकांची संख्या किती होती, नंतर ती संख्या त्यांनी कशी कमी केली, हे सर्व ठीक आहे. त्यांच्यासारखे रस्ते आपल्याकडे असू शकत नाहीत. त्यांच्यासारखी शिस्त आपल्याकडे असू शकत नाही. अनेक वेळा अपघाती निधन झाल्यानंतर लोक बोलतात की, काय करणार, परमेश्वराची मर्जी. या धारणेवर बाकीचे देश राहिले असते तर त्यांच्याकडील अपघातांचे प्रमाण कमी झाले नसते. शेवटी परमेश्वर कोणावर उपकार करावयाचे, कोणावर उपकार करावयाचे नाही, कोणत्या भागावर उपकार करावयचे हे ठरवित नाही. यामध्ये मानवनिर्मित अपघात किती आहेत, नियमानुसार न चाललेल्या वाहनांमुळे किती अपघात झाले, दारु पिऊन गाडी चालविल्यामुळे किती अपघात झाले, हायवेला दारुची दुकाने दिली पाहिजेत का, त्यांचा परवाना कसा रद्द केला पाहिजे या सर्व गोष्टी आहेत.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

मुंबईत दारु पिऊन गाडी चालविणाऱ्या व्यक्तींच्या तोंडाला मशिन लावून अल्कोहोलची तपासणी केली जाते. तशा प्रकारची व्यवस्था इतर ठिकाणी झालेली नाही. मोठ्या हाय-वे वर अशी तपासणी पोलिसांकडून केली जाते. परंतु अशा गोष्टी नियमित स्वरुपात झाल्या पाहिजेत. तरच त्यावर नियंत्रण येऊ शकते. यादृष्टीने हा विषय गंभीरतेने घेतला पाहिजे. खेड-भरणा नाक्याजवळ झालेला अपघात भयंकर आहे. अपघातात मृत पावलेल्या नातेवाईकांना शासनाने मदत दिली आहे. काही लोकांना वैद्यकीय सेवा उपलब्ध करणे, शस्त्रक्रिया करण्यासाठी मदत करण्याची पावले उचलली आहेत. या पुढील काळात त्या रस्त्यावर अपघात होऊ नये या दृष्टीने तेथे चौपदरीकरणाचे काम सुरु आहे. अरुंद पूल रुंद होणार आहेत. इतर ठिकाणचे अरुंद पूल देखील रुंद केले पाहिजेत. त्यासाठी अधिक खर्च येणार आहे. या रस्त्यावर दरवर्षी 13 हजार लोकांचा अपघाती मृत्यू होतो, पण पुढील 4-5 वर्षात हे प्रमाण कमी करण्याचा शासनाने निर्धार करण्याच्या दृष्टीने या विषयाकडे बघावे अशी मी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली होती. त्याऐवजी या विषयाची चर्चा नियम 97 अन्वये सुरु झालेली आहे. या चर्चेत भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, कोकणातील चाकरमान्यांची पावले भराडी देवीची यात्रा, कुणकेश्वरची यात्रा, होळी, गणपती या सणावाराच्या निमित्ताने कोकणाकडे वळतात. विमानाने जाण्याऐवजी ते रस्त्याने जाणे पसंत करतात. परंतु मुंबई-गोवा हा महामार्ग मृत्यूचा सापळा झाल्याचे दिसत आहे. आज पहाटे खेड-भरणा नाक्याजवळ खाजगी बस जगबुडी नदीमध्ये कोसळल्यामुळे भयंकर अपघात झालेला आहे. गॅस कटरने कापून लोकांना बाहेर काढावे लागले इतका भयंकर हा अपघात होता. परंतु या अपघातामध्ये गाडीचा चालक वाचलेला आहे. अशा प्रकारच्या अपघातामध्ये चालक नेहमी वाचतात हा एक संशोधनाचा भाग आहे. असे अपघात वडखळ नाका, पेण, महाड, पोलादपूर, रोहा, कणकवली, लांजा, अशा ठिकाणी प्रामुख्याने होतात. खेडचा अपघात हृदयद्रावक आहे. मुंबई-गोवा या महामार्गावर एकूण 114 अतिअपघात प्रवण स्थळे आहेत. या अपघातप्रवण भागामध्ये सातत्याने अपघात होत असतात त्याचे प्रमाण कमी झालेले नाही किंवा त्यात काहीही सुधारणा झालेली नाही. त्या भागातील पूल रुंद केलेले नाहीत. त्या भागात बोर्ड लावल्याचे दिसत नाहीत.

या संदर्भात तत्कालीन सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर, श्री.राजन तेली, ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांनी चर्चा उपस्थित केली होती. त्यावेळी मंत्री महोदयांनी कर्नाळा येथील रस्त्याचे रुंदीकरण होऊ शकत नाही म्हणून काम अडले आहे असे सांगितले होते. त्या अभयारण्यामध्ये खरोखरच पक्षी राहिले आहेत काय, ते अभयारण्य आहे असे म्हणण्यासारखे ते अभयारण्य राहिले आहे काय ? ते केवळ डेसिग्नेटेड अभयारण्य आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

या बाबतीत शासनाला पर्याय शोधण्याची आवश्यकता आहे. राज्यात तुमच्या पक्षाची सत्ता आहे आणि केन्द्रामध्ये देखील तुमच्याच पक्षाची सत्ता आहे. त्यामुळे हा पर्यावरणाचा प्रश्न सोडविणे सर्वस्वी आपल्या हातामध्ये आहे. पर्यावरणाची सबब पुढे करुन मुंबई-गोवा महामार्ग चारपदरी किंवा सहापदरी करण्यापासून वंचित ठेवू नये. परशुराम घाटातील वळणरस्ते थोडे थोड रुंद झालेले आहेत.

या मुंबई-गोवा महामार्गावर कंटेनर्सची वाहतूक खूप मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहे. 1985 ते 1990 या काळामध्ये रस्ता ओलांडताना आम्हाला एखादे वाहन नजरेस पडायचे. आता तर कोण वेगात पुढे जातो अशी जीवघेणी स्पर्धाच सुरु असते. वाहनाच्या वेगावर कुणाचे नियंत्रण राहिलले नाही. मी कसा 8 तासामध्ये कणकवलीला जाईन 9 तासामध्ये गोव्याला जाईन अशा इर्षेने वाहन चालविले जाते. ही मानसिकता बदलण्याची आवश्यकता आहे. अपघात झाले की आपण वाहतूक विभागाला, रस्ते-बांधकाम विभागाला दोष देतो. खरे म्हणजे गाडी चालविणा-या ड्रायव्हरने किती तास ड्रायव्हिंग केले पाहिजे हे सुध्दा कुठे तरी पाहिले गेले पाहिजे. आता जो खेडला अपघात झाला त्या महाकाली ट्रॅव्हल्सच्या ड्रायव्हरने किती तास ड्रायव्हिंग केले होते. त्याने दिवसा डयुटी करुन पुन्हा रात्रीची डयुटी केली होती काय, तशी ती केली असेल तर, पहाटे त्याचा डोळा लागला असेल, पहाटेची झोप ही साखर झोप असते त्या झोपेमध्ये त्याच्या हातून अपघात घडला असावा . त्या ड्रायव्हरची झोप इतर प्रवाशांची काळ झोप ठरली असण्याची शक्यता नाकारता येत नाही. गाडी चालविणा-या ड्रायव्हरच्या जिवावर इतर 50 कुटुंबाचे जीवन अवलंबून असते. ड्रायव्हरने जादा डयुटी करुन 50 कुटुंबे उद्ध्वस्त करण्यापेक्षा त्याने ड्रायव्हिंग न केलेले चांगले. म्हणून ड्रायव्हरने किती तास ड्रायव्हिंग केले पाहिजे यासंबंधी देखील काही तरी बंधन असले पहिजे.

सभापती महोदय, महामार्गावर दारु पिऊन गाडी चालविली जाते की नाही याची तपासणी करण्याची व्यवस्था नाही. पूर्वी कशेळी घाटामध्ये एस.टी.च्या ड्रायव्हरची तपासणी करण्यासाठी एक चौकी होती. ती चौकी आता तेथे नाही. या मुंबई- गोवा महामार्गावर ड्रकन ड्रिव्हन तपासणीची व्यवस्था करण्याची आवश्यकता आहे. परवाने नसलेल्या गाडया देखील महामार्गावरुन चालविल्या जातात. अशा गाडयांच्या तपासणीच्या वेळी परवाना मागितल्या नंतर ट्राफिकवाल्याला पैसे देऊन

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत....

वाहन पुढे नेले जाते. गाड्या सुस्थितीत न ठेवणे, गाडयांचे टायर फुटणे, गाडयांच्या मागे लाल दिवा नसणे अशा गोष्टींमुळे देखील अपघात होत असतात.

सभापती महोदय, रस्ते चांगले करण्याच्या बाबतीत कोकणावर कसा अन्याय झालेला आहे हे मी या निमित्ताने आपल्या निदर्शनास आणून देत आहे. पुणे-मुंबई एक्सप्रेस हायवे झाला. एनएच-4 झाला. मुंबई-नाशिक महामार्गाचे काम सुरु आहे. मुंबई-अहमदाबाद, पुणे-कोल्हापूर हे महामार्ग झाले. पुणे-औरंगाबाद महामार्गाचे काम प्रगतीपथावर आहे. पुणे-सोलापूर महामार्गाचे काम प्रगतीपथावर आहे. फक्त मुंबई-गोवा या महामार्गाचे काम अनेक वर्षे अडलेले आहे. दुसरे असे की, या मुंबई-गोवा महामार्गावर अपघातांचे प्रमाण खूप जास्त आहे. अपघातामध्ये मृत्यू पावणा-यांची संख्या नेहमी वाढत असते.

सभापती महोदय, गोल्डन अवर प्रोजक्टचा उल्लेख नेहमी केला जातो. अपघातातील जखमीला एका तासात ट्रीटमेण्ट मिळाली तर त्याचे प्राण वाचू शकतात. अशा प्रकारची व्यवस्था कोकणामध्ये नाही. कोकणामध्ये एखाद्याला हार्ट ॲटॅक आला तर त्याला उपचारासाठी कोल्हापूरला किंवा मुंबईला घेऊन जावे लागते. कोकणातील आरोग्य केन्द्रामध्ये इसीजीची सोय नाही. कोकणामध्ये ट्रॉमा सेंटर करण्याचे आपण ठरविले. पण हे ट्रामा सेंटर कोठे आहे ? मुंबई-गोवा महामार्गावर ओरोस येथील दवाखान्यामध्ये सिटीस्कॅनची सोय नाही. सिटीस्कॅनसाठी कोल्हापूरला जावे लागते.

..नंतर श्री. गिते..

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठ नाही

डॉ.दीपक सावंत...

सभापती महोदय, कणकवली येथील हायवेला लागून ट्रॉमा केअर सेंटर आहे. परंतु ट्रॉमा कोअर सेंटर्समध्ये ओ.टी.सेक्शन आहे काय ? आपण गोल्डन अवर प्रोजेक्ट म्हणतो. परंतु त्या गोल्डन अवर प्रोजेक्टमध्ये न्यूरॉलॉजिस्ट नाहीत. तेथे अनॅस्थेटीस्ट नाही, सर्जन नाहीत, अर्थोपेडीक सर्जन नाहीत, तेथील सर्व रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रे बीएमएस शिक्षण घेतलेले चालवितात किंवा एमबीबीएस पदवी घेतलेले डॉक्टर्स चालवितात. अपघात झालेल्या रुग्णांना खरोखरच वाचवावयाचे असेल व औषधोपचार करावयाचा असेल तर ट्रॉमा केअर सेंटर्स मोठया प्रमाणात उघडली गेली पाहिजे. कोकणातील रस्त्यावर अपघात झाला तर त्या प्रवाशांना कोल्हापूर येथे घेऊन जावे लागते. तो जखमी प्रवासी कोल्हापूरला जाईपर्यंत मृत्युमुखी पडतो. कोकणामध्ये ब्लड बँक नाहीत. ब्लड बॅकेचा प्रोजेक्ट आहे. अपघात झाल्यानंतर जखमी रुग्णांना मोठया प्रमाणात ब्लड लागते. माननीय आरोग्य राज्यमंत्री महोदया, आपण परवा या सभागृहात घोषणा केली की, "ब्लड ऑन कॉल ". परंतु कॉल केल्यानंतर ब्लड येत नाही. आमच्या कोकणात सेप्रेशन युनीट नाही. ब्लड स्टोरेज युनीट नाही.

महोदय,ओरस येथील ब्लड बँक चालू करा म्हणून कोकणातील श्री.राजन तेली, श्री.उपरकर, कै.गुरुनाथ कुलकर्णी व आम्ही सर्वांनी कंठशोष केला. परंतु ओरस येथील ब्लड बँक अजूनही सुरु करण्यात आलेली नाही ही दुर्देवाची गोष्ट आहे. अपघातग्रस्त रुग्णास उपचार घेण्यासाठी सावर्डे येथेपर्यंत यावे लागते, किंवा त्याला मुंबई अथवा पनवेल येथे आणावे लागते. पनवेल अथवा मुंबई पर्यंत आणताना तो जखमी रुग्ण दगावतो. तो अपघातग्रस्त रुग्ण जास्त ब्लिडींग झाल्याने दगावतो. मुंबई-पुणे एक्सप्रेसवर ट्रॉमा केअर ॲम्ब्युलन्स सुरु शकला नाहीत. इतर महामार्गाच्या काय सुरु करणार ? महामार्गांवर अपघात होऊन प्रवासी मृत्युमुखी होत आहेत. म्हणून माझी आग्रहाची मागणी आहे की, मुंबई-गोवा महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम लवकरात लवकर करण्यात यावे. सदर चौपदरीकरणाचे काम पुढील वर्षाच्या आत होणे अत्यावश्यक आहे जेणेकरुन कोकणात गणपतीसाठी व शिमगा सणासाठी जाणारी माणसे निर्धोकपणे जाऊ शकतात.

सभापती महोदय, दुसरी गोष्ट अशी आहे की, वडखळ, जि.रायगड येथे ट्रॉमा केअर सेंटर उभारले गेले पाहिजे. ओरस, कणकवली येथील ट्रॉमा केअर सेंटर कार्यान्वित केले पाहिजेत. या महामार्गावर छोटे छोटे पूल आहेत, त्या पुलांच्या रुंदीकरणाची कामे तातडीने केली पाहिजेत. या

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

महामार्गावर किमान दोन ते तीन ब्लड बँका कार्यान्वित झाल्या पाहिजेत तरच अपघातग्रस्त रुग्णांचा जीव वाचू शकेल. अपघातग्रस्त रुग्णास कशा प्रकारे हॅन्डल करावयाचे याचे प्रशिक्षण असलेले कर्मचारी या सेंटर्समध्ये नेमले गेले पाहिजेत. आरोग्याच्या बाबतीत चांगली सेवा द्यावयाची असेल तर मी ज्या गोष्टींचा या चर्चेच्या निमित्ताने उल्लेख केलेला आहे, त्या गोष्टी कार्यान्वित केल्या तरच आजच्या या चर्चेला न्याय मिळेल असे मला वाटते. कोकणात जातात आणि येताना प्रवाशांचा जीव वाचेल. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि माझे या चर्चेवरील मनोगत पूर्ण करतो.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महामार्ग क्रमांक 17 वर असंख्य अपघात होत आहेत. अधिवेशन कालावधीत अपघात झाला तर त्या अपघाता विषयी सभागृहात चर्चा केली जाते. या अपघाताचे दोन-तीन दिवस वृत्तपत्रात फोटो छापून येतील. या अपघाताच्या अनुषंगाने या सभागृहात आश्वासनांची सरबत्ती केली जाईल की, मुंबई-गोवा हा महामार्ग चौपदारी अथवा सहा पदरी करण्यात येणार आहे. हा प्रश्न मुंबई-गोवा महामार्गापुरता नाही तर मुंबई येथून निघाल्यानंतर ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या पाच जिल्हयांमधून निघून हा 17 क्रमांकाचा महामार्ग गोवा येथे जातो आणि तेथून तो कर्नाटकमध्ये जातो. या सभागृहात असलेले कोकणातील सर्व सन्माननीय सदस्य आपल्या पध्दतीने या महामार्गाच्या बाबतीत सभागृहात चर्चा उपस्थित करीत असतात. तारांकित प्रश्न, पुरवणी मागण्या, अशी वेगवेगळी आयुधे वापरुन या महामार्गाच्या बाबतीत चर्चा करतात. पर्यटन विभागाचा विषय आला की, त्या वेळी देखील सदर महामार्गाच्या कामाच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांकडून उल्लेख केला जातो. या महामार्गाच्या कामाबाबतची सद्य:स्थिती काय आहे, या महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम चालू आहे व या कामासाठी केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध करुन दिला जातो आहे अशा प्रकारचे उत्तर शासनाकडून देण्यात येते.

सभापती महोदय, या महामार्गावर झालेल्या एकूण अपघातांची संख्या आपण बघावी...

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर.....

कदाचित बोलणे हे थोडेसे अडचणीचे होईल. जे मृत पावले, ते आपल्यातून निघून गेले आहेत. परंतु जखमींची संख्या पाहिली तर त्यांच्या कुटुंबावर ते भार ठरलेले आहेत. आयुष्यभर ते स्वत: काही करु शकत नाहीत. त्यांच्या उर्वरित आयुष्यात त्यांची सेवा करण्यासाठी कुटुंबातील एका व्यक्तीला आपला वेळ द्यावा लागत आहे. त्यांच्या बाबतीत आजपर्यंत कुठेही उल्लेख झालेला नाही. गेल्या दोन वर्षात या महामार्गावर 828 लोकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. 2200 हून अधिक लोक जखमी झालेले आहेत. मुंबई-गोवा महामार्ग हा मृत्यूचा सापळा बनलेला आहे. सरकारने गांभीर्याने विचार करुन या रस्त्याचे तातडीने चौपदरीकरण पूर्ण केले पाहिजे.

सभापती महोदय, कोकण रेल्वे सुरु झाली. कोकण रेल्वेतून रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्हयातील किती प्रवाशांना तिकीट मिळते हा एक संशोधनाचा विषय आहे. आम्ही आमदार म्हणून कोकण रेल्वेतून प्रवास करतो त्यावेळी आम्हाला दोन ते तीन बर्थ मिळण्यासाठी सोबत कोट्यातून सीट मिळण्यासाठी पत्र घेऊन जावे लागते. कोकण रेल्वेचा खरा उपयोग कर्नाटक आणि गोवा राज्यातील नागरिकांना होत आहे. कोकणासाठी जादा बोगी किंवा जादा सीट उपलब्ध करुन दिल्या आहेत, प्रवाशांना सुखसोयी दिल्या आहेत असे घडलेले नाही. रेल्वेचे टायटल नाव म्हणून 'कोकण रेल्वे' आहे. कोकणातील लोकांना या रेल्वेचा फारसा उपयोग होत नाही. कोकण रेल्वेच्या कारभाराबद्दल आम्ही कोणताही प्रश्न विचारला तरी कोकण रेल्वेकडून पॉझिटिव्ह उत्तर मिळत नाही.

सभापती महोदय, सागरी महामार्गाचा वर्षानुवर्षे केवळ उल्लेख ऐकावयास मिळतो. 840 कि.मी.चा सागरी किनारा उपलब्ध असताना सागरी महामार्गाबाबत हालचाल होताना दिसत नाही. पूर्वी चौगुले कंपनीच्या कोकण सेवक बोटीतून कोकणात जाण्यासाठी आम्ही प्रवास केलेला आहे. आज ती बोट कुठे आहे? उच्च तंत्रज्ञानाच्या आणि ग्लोबलायझेशनच्या गप्पा मारल्या जातात. महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाने सागरी महामार्गाचा अभ्यास केला तर कोकणासाठी आणि कोकणातील पर्यटनाच्या दृष्टीने चांगला उपयोग होऊ शकतो. परंतु तसा प्रस्ताव तयार झाल्याचे कुठेही दिसून येत नाही. कोकण रेल्वे आणि सागरी महामार्गाचा विषय गांभीर्याने घेतला जात नाही. आज जो महामार्ग मृत्यूचा सापळा बनलेला आहे त्या महामार्गाचे चौपदरीकरण तातडीने कसे होईल याकडे लक्ष दिले पाहिजे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर.....

सभापती महोदय, मुंबई गोवा महामार्गावर प्रवास करुन सुखासुखी इच्छित स्थळी पोहोचलात तर ठीक, अन्यथा श्रध्दांजली वाहण्यास मोकळे आहेत. पर्यटनाच्या दृष्टीने 'बॉम्बे टू गोवा' ही फिल्म देखील येऊन गेली आहे. पर्यटक गोव्यात जाण्यासाठी आकर्षित असतात. पर्यटक कोकणात कसे वाढतील या दृष्टीने महाराष्ट्र सरकारने कधी गांभीर्याने पाहिलेले नाही. कोकणात फक्त हॉटेलांची संख्या वाढली आहे, खाजगी वाहनांची संख्या वाढली आहे. आज कोकणात सुख-संपत्ती आली आहे.

सभापती महोदय, मी स्वत: या सभागृहात मी चर्चा उपस्थित केली होती. महालक्ष्मी ट्रॅव्हल्स कंपनीला तिच्या खाजगी प्रवासी बसमधून किती प्रवासी वाहून नेण्यास अनुमती देण्यात आली होती? महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाला पर्याय म्हणून खाजगी ट्रॅव्हल्स व्यावसायिकांना कर लावून व्यवसाय करण्यास शासनाने परवानगी दिली. राज्यात खाजगी बसेसची संख्या किती आहे? माननीय सदस्य श्री.छाजेड यांनी देखील त्या चर्चेमध्ये सहभाग घेतला होता. महामंडळाच्या बसेसची संख्या 17646 असून ऑक्टोबर, 2012 अखेर राज्यातील खाजगी ट्रॅव्हल्स कंपनीच्या बसेसची संख्या 36406 इतकी आहे. याचा अर्थ परिवहन महामंडळाच्या बसेसच्या संख्येपेक्षा खाजगी बसेसना प्रवासी वाहतूक करण्यास शासनाने परवानगी दिलेली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी दिनांक 14.12.2012 रोजी सभागृहात जे निवेदन केले होते, त्यात कितीतरी त्रुटी होत्या. मी मुद्दाम एक बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. खाजगी बसेसच्या माध्यमातून जी प्रवासी वाहतूक होते याबाबत खाजगी ट्रॅव्हल्स कंपन्यांकडून शासनाचा कर बुडविला जातो. हे निदर्शनास येत नाही, परंतु प्रत्यक्षात कर बुडविला जात आहे.

नंतर 2एस.1...

अशुध्दीत प्रत / शीघ्रलेखाची नाही

श्री. किरण पावसकर .....

सदर नंबरसह दिलेली ही बातमी आहे.

आज सकाळी ज्या बसला अपघात झाला त्या बसला 48 प्रवासी वाहून नेण्याची परवानगी होती की 53 प्रवासी वाहून नेण्याची परवानगी होती ? या अपघातामध्ये आता पर्यंत 43 प्रवासी मृत्युमुखी पडले आहेत. सदर अपघातात किती प्रवासी जखमी झाले, किती मृत्यू झाले व महाकाली बसचा स्टाफ किती होता याची माहिती मिळाल्यानंतर आपल्याला कळून येईल की, या बसला 42 किंवा 48 प्रवासी वाहून नेण्याची परवानगी असेल. मात्र असे असतांनाही त्या बसमध्ये 53 प्रवासी कसे काय होते ? त्यामुळे या संदर्भात आपण काय कारवाई करणार आहात ? मुंबई गोव्यासाठी वाहतूक करताना ही बस भरली जाते. एकदा बस भरल्यानंतर पनवेल पर्यंत आल्या नंतर त्या कंपनीच्या दोन बसमधील प्रवासी एका बसमध्ये चढवले जातात. या बसमध्ये जे प्रवासी होते ते कोंबले गेलेले आहेत. बसच्या क्षमतेएवढेच प्रवासी या बसमध्ये असते तर मृतांचा आकडा कमी झाला असता. त्यामुळे महाकाली बसचा आज जो अपघात झालेला आहे त्या बसला किती प्रवासी वाहून नेण्याची परवानगी होती याची माहिती सदनाला मिळण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, खाजगी बसेस वापरात नसल्याचे (नॉन युज) दाखवून बस मालक कर बुडवतात. तर काही बसेस कर न भरता, पासींग न करता व्यवसाय करीत असतात. तसेच काही बसेस तर कमी आसनाचा कर भरुन जादा आसने भरुन अनाधिकृतपणे शासनाचा कर बुडवतात. सर्व साधारणपणे बसला प्रती वर्षी 1 हजार रुपये प्रती आसन असा कर लावला जातो परंतु पर्यटकांची साधी बस असेल तर त्या बसला प्रती आसन प्रर्ती वर्षी 5500 रुपये कर भरावा लागतो. वातानुकुलीत बसला प्रती आसन प्रर्ती वर्षी 6500 रुपये कर भरावा लागतो. वातानुकुलीत स्लीपर बसला प्रती आसन प्रर्ती वर्षी 5000 रुपये कर भरावा लागतो. वातानुकुलीत स्लीपर बर्थला प्रती आसन प्रर्ती वर्षी 7 हजार रुपये कर भरावा लागतो. एवढया प्रमाणात 36 हजार बसेसचा कर गोळा होत असेल तर आपला रेव्हेन्यू जास्त यावयास पाहिजे होता मात्र तरी देखील तो कमी का येतो ?

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर .....

सभापती महोदय, काही बसेस एसी स्लीपर न घेता नॉन एसी बसेस म्हणून रस्त्यावर आणतात व त्यांनाही परिवहन कार्यालय परमिट देते. परंतु यासंदर्भात आतापर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नाही. या बाबत परिवहन आयुक्तांनी जे उत्तर दिले होते ते हास्यास्पद आहे. त्यांनी सांगितले आहे की, निता ट्रॅव्हलच्या 21 बसेस पैकी 2 बसेसवर 3 खटले दाखल करण्यात आले असून 5 बसेसच्या ना वापराबाबत कंपनीला कळविले आहे. 13 बसेसचा कर 6 ते 12 महिन्यांपासून थकीत आहे. हे शासनाचे उत्तर आहे. प्रवाशांच्या जीवाशी खेळ खेळणारे असे आकडे येत असतील तर आपण संबंधितावर कडक कारवाई करणार आहात काय ? यासंदर्भात आपण उत्तर दिले नाही तर आज 43 जण गेले उद्या 50 जण जातील व आपण त्यांच्या विषयी अशाच पध्दतीने बोलत राहू. मी शासनास विनंती करतो की, काही अधिकाऱ्यांच्या वाईट वागण्यामुळे, काही अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचारामुळे प्रवाशांचा नाहक जीव जात आहे. ज्यांच्यामुळे कर बुडवेगिरी होते, ज्या अधिकाऱ्यांनी पैसे घेऊन कंपन्यांना रस्त्यावर मोकाट सोडले आहे अशा अधिकाऱ्यांवर, परिवहन आयुक्तांवर आपण कोणती कडक कारवाई करणार आहात ?

सभापती महोदय, कोकणातील अन्यायाविषयी सन्माननीय सदस्य, भाई जगताप, सन्माननीय सदस्य श्री. भाई गिरकर, सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी नेहमी आवाज उठवलेला आहे. कोकणच्या जनतेवर सातत्याने अन्याय झालेला आहे. मी राज्यातील इतर कोणत्याही जिल्हयांची कोकणाशी तुलना करु इच्छीत नाही सिंधुदुर्ग व रत्नागिरीमध्ये विजेची थकबाकी शून्य टक्के आहे.

यानंतर श्री. भारवि....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.किरण पावसकर....

कोकणातील शेतकऱ्यांनी आपली विजेची बिले थकवली असे कधीच झालेले नाही. राज्यातील काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांची खोटी संख्या दाखविली जाते. रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शाळांवर आज पर्यंत असा कुठलाही आरोप झालेला नाही. कोकणातील शाळेत विद्यार्थी आहेत, पण बेंच नाही. तरी देखील मुले शिक्षण घेत आहेत व शिक्षक शिकवत आहेत.

स्त्री भ्रूण हत्या होते म्हणून बीड जिल्ह्यासह सर्व जिल्ह्यात कडक कारवाई केली जाते. कोकणात स्त्री भ्रूण हत्येच्या किती केसेस मिळाल्या आहेत ? एकही मिळालेली नाही. आज पर्यंत येथील कुठल्याही सोनीग्राफी सेंटरवर धाड टाकावी लागली नाही. येथे स्त्री व पुरूषांचे प्रमाण देखील समतोल आहे. येथे महिलांना तेवढाच आदर दिला जातो. कोकणातील महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण अत्यंत नगण्य आहे. ते प्रमाण टक्केवारीमध्ये देखील येत नाही. हुंडा बळीची तर केसच नाही. आता येथे बहुतेक विभागाचे माननीय मंत्री उपस्थित आहेत. या सर्वच मुद्यांवर आपण सर्वजण भांडत असतो आणि कारवाई करावी असे सांगत असतो. पण कोकणात वीज बिल, स्त्री भ्रूण हत्या, महिला अत्याचार, खोटी पटपडताळणी यासंबंधी कोणत्याही प्रकारची केस नाही. असे असताना आपण तेथील रस्त्यांची कामे न करता त्यांची हत्या का करत आहात ? या निष्पाप लोकांची हत्या होऊ नये म्हणून आपण कोणता मार्ग काढणार आहात ?

कोकणात फळफळांची लागवड मोठ्या प्रमाणावर आहे. आंबा, काजू, कोकम, जांभूळ, करवंद, फणस, यांची मोठ्या प्रमाणावर लागवड होते. पण त्या भागात कोणतेही प्रोसेसिंग युनिट नाही. पर्यटन जिल्हा म्हणून तुम्ही कोकणात हेलिकॉप्टरने यायचे. आम्ही पुष्पवृष्टी करायची. एवढे करून पर्यटनामध्ये वाढ होत नाही. कोकणातील माणूस हा साधाभोळा, पापभीरू आहे. तो बुद्धिवान आहे. पण सरकारी यंत्रणेने या माणसांकडे पाठ फिरवली आहे, असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर...

सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केल्याबद्दल आम्ही सर्व सिंधुदुर्गवासियांनी स्वागत केले. येथील रस्ते चांगले होतील, दळणवळणाची साधने उपलब्ध होतील असे आम्हाला वाटले होते. विजेची व्यवस्था होईल असे वाटले होते. येथील संस्कृती सुधारेल असे वाटले होते. आमची बॉर्डर गोव्याला लागून आहे. आज गोव्यातील सर्व खाणी बंद आहेत. तरी देखील गोवा राज्य पर्यटनावर चालते. आपल्या राज्याचा महसूल वाढवू शकू एवढी क्षमता पर्यटन जिल्ह्यात आहे. मात्र सरकारी यंत्रणा त्याकडे पाठ फिरवत आहे.

मी आपल्याला आणखी एक गोष्ट सांगू इच्छितो की, कोकणात पाऊस जास्त पडतो. पाण्याचे दुर्भिक्ष्य असल्यामुळे आपण सर्वजण सदनामध्ये बोलत आहोत. मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग येथे पाण्याची क्षमता चांगली आहे. कोकणात पाऊस चांगल्या प्रकारे पडतो. इतर जिल्ह्यापेक्षा येथे पावसाचे प्रमाण जास्त आहे. मात्र पाणी अडविण्याचे प्रयत्न केलेले नाहीत. कोकणात पडणारे पावसाचे पाणी चांगल्या पद्धतीने अडविले तर हे पाणी आपण संपूर्ण महाराष्ट्राला पुरवू शकू. एवढा पाऊस कोकणात पडतो. आज कोयनेचे पाणी आपण समुद्रात सोडून देतो.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (ॲड.अनिल परब) : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या ठिकाणी खेड येथे झालेल्या अपघातासंबंधीची चर्चा सुरु आहे. आपणास कोकणावर बोलावयाचे असल्यास त्या संबंधीचा वेगळा प्रस्ताव देऊन त्यावर बोलावे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी उद्याच आपणाकडे कोकणाच्या विकासा संदर्भातील प्रस्ताव देतो. आपण त्यावर ताबडतोब चर्चा घ्याल काय ?

तालिका सभापती : मी तालिका सभापती म्हणून सन्माननीय सदस्यांना सूचना केली.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी आपल्या सूचनेचे स्वागत करतो.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी विधानसभेमध्ये विरोधी पक्ष नेते म्हणून काम केलेले आहे. राज्यमंत्री महोदयांना ज्या प्रमाणे लिमिटेशन्स आहेत त्याप्रमाणे तालिका सभापतींना देखील लिमिटेशन्स आहेत.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी आपणाकडे कोकणच्या विकासा संदर्भातील प्रस्ताव देतो. त्या संदर्भात आपण माननीय सभापतींना भेटून त्यांच्याकडून परवानगी घ्यावी.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, आपण जी सूचना केली ती स्वागतार्ह आहे. परंतु माझा उद्देश एवढाच होता की, कोकण सर्वतोपरी महाराष्ट्राला पाण्याच्या बाबतीत असेल वा इतर गोष्टींच्या बाबतीत मदत करतो. पण एवढे असूनही मुंबई-गोवा महामार्गाच्या दुरुस्तीसाठी निधी मिळत नाही. तेव्हा या महामार्गाकडे जातीने देऊन या रस्त्यावरील अपघात कमी करण्याच्या दृष्टीने कार्यवाही व्हावी अशी अपेक्षा करुन माझे भाषण पूर्ण करतो.

तालिका सभापती : आपण ही चर्चा पुढे सुरु ठेवावी की मध्यंतर घेऊन पुन्हा चर्चा सुरु करावी या बाबत सदस्यांनी मला मार्गदर्शन करावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण ही चर्चा पूर्ण केल्यानंतर मध्यंतर घ्यावे.

तालिका सभापती : ठीक आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, गेल्या नऊ वर्षामध्ये मी प्रथमच अगोदर बोलण्यासाठी विनंती केलेली आहे. सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांचे मी आभार मानतो कारण त्यांचा भाषण करण्याचा क्रमांक असताना त्यांनी मला बोलण्याची संधी दिली.

सभापती महोदय, मी विषयांतर करणार नाही. कोकण हा एक मोठा विषय आहे. कोकणावर एक दिवस चर्चा ठेवली तरी दिवस अपुरा पडेल. माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर व इतर सन्माननीय सदस्यांचा कोकणाबद्दल सांगण्याचा मुद्दा एवढाच होता की, कोकणाने महाराष्ट्राला एवढे काही दिले, तरी सुध्दा कोकणाला साधा रस्ता द्यावयाचा नाही असा त्या मागाचा गर्भित अर्थ होता.

सभापती महोदय, खेड मध्ये झालेला अपघात मोठा आहे. या अपघातामध्ये 43 जणांचा मृत्यू झालेला आहे. त्यांना प्रथम श्रध्दांजली अर्पण करतो. या अपघातामध्ये 10-12 जण जखमी झालेले आहेत त्यांच्यावर तातडीने वैद्यकीय उपचार करण्याची गरज आहे. आवश्यकता वाटल्यास त्यांना एअरलिफ्ट करुन वैद्यकीय सुविधा पुरविण्यात याव्यात. त्यांना रत्नागिरी, पुणे वा मुंबई येथे हलविण्याची आवश्यकता असल्यास त्या प्रमाणे कार्यवाही करावी.

सभापती महोदय, मला येथे एक गोष्ट मुद्दाम निदर्शनास आणावयाची आहे की, मुंबई-गोवा या राष्ट्रीय महामार्गावर अपघातांची संख्या आणि या अपघातामध्ये मृत पावलेल्यांची संख्या इतर ठिक्राणच्या महामार्गापेक्षा जास्त आहे. त्या संदर्भातील आकडेवारी येथे सांगण्याची आवश्यकता नाही.

सभापती महोदय, हा राष्ट्रीय महामार्ग गोव्याला जोडणारा आहे. तसेच तो देशातील इतर राज्यांना जोडणारा महत्वाचा राष्ट्रीय महामार्ग आहे. परंतु या महामार्गाच्या बाबतीत उदासीनता दाखविली जात आहे. आपण रस्ता रुंदीकरणाच्या गोष्टी केल्या..

यानंतर श्री.बोर्डे..

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.भाई जगताप....

केंद्रीय विभागामध्ये असलेल्या कर्नाळा अभयारण्याच्या भागाबाबत संबंधित विभागांशी बोलून तो निकाली काढला जाईल असे माननीय मंत्र्यांनी या ठिकाणी आश्वासन दिले होते. त्यावर मी आता बोलणार नाही.

महोदय, सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांचा आग्रह राहिला आहे की, हे रस्ते सहा पदरी का नकोत ? मी या बाबत बोलून वाद निर्माण करणार नाही. या बाबत सांगू इच्छितो की, आपण गेल्या पाच वर्षातील आणि त्या पूर्वीच्या पाच वर्षातील रस्त्यांवरील वाहनांची आकडेवारी पहावी. आपण गेल्या पाच वर्षांची आकडेवारी पाहिली तर ज्या रस्त्यांचे चौपदरीकरण केलेले आहे ते रस्ते अशाच प्रकारे मृत्यूचा सापळा होणार आहेत. कारण कोकणातील वळणदारपणा आणि टोपोग्राफी तुम्ही-आम्ही बदलू शकणार नाही. मग या डोंगराळ भागाला पर्याय काय आहे ?

महोदय, पूर्वी यावर सागरी महामार्गाच्या पर्यायाचा आपण विचार केला होता. परंतु त्या बाबत अंमलबजावणी केली नाही. मी विधानसभा सदस्य असताना त्या ठिकाणी या विषयी चर्चा उपस्थित झाली होती. त्यावेळी आम्हाला अशी माहिती देण्यात आली होती की, कोकणामध्ये जास्त पूल बांधायचे आहेत. परंतु आता अशी माहिती मिळाली आहे की, रायगड ते रत्नागिरीला जोडणारे महत्त्वाचे पूल असतील, मांदाडचा पूल असेल, रत्नागिरी ते सिंधुदुर्गला जोडणारे पूल असतील त्यातील बहुतेक पुलांची कामे झालेली आहेत. केवळ दोन-तीन पुलांची कामे शिल्लक आहेत. तो रस्ता तीन-चार राज्यांना जोडणारा महामार्ग आहे. 6-8 पदरी रस्ते केले तरी पर्यायी रस्त्यांबाबत नक्कीच विचार करणे आवश्यक आहे. या विषयी राज्य सरकारने पुढाकार घेतला तरच केंद्र सरकार त्यात लक्ष घालेल. आपण सागरी महामार्गाचा पर्याय पूर्ण करु शकलो नाही तर पुढील पाच वर्षानंतर पुन्हा याच वाईट आणि धोकादायक परिस्थितीला तोंड द्यावे लागेल असे मला वाटते.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी यावर आणखी एक पर्याय सुचविला आहे. जगभरातील वाहतुकीमध्ये सागरी वाहतूक हा सर्वात स्वस्त पर्याय आहेत. मुळात कोकणामध्ये पूर्वी सागरी मार्ग होता. सागरी मार्गानेच लोक ये-जा करीत होते. परंतु आपण तो नंतर बंद केला. मुंबई ही कोकणात येते. आज मुंबईत काय परिस्थिती आहे या बाबत मी बोलणार नाही. महोदय, रस्ते वाहतुकीला पर्याय म्हणून सागरी वाहतूक देऊ शकलो तर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप....

रस्त्यांवरील ताण कमी होईल. पूर्वी सागरी वाहतूक सुरु असल्यामुळे या बाबतचा सर्व्हे झालेला आहे. आता पुन्हा सर्व्हेची गरज काय आहे ? कारण पूर्वी सागरी मार्गावरुन बोटी जात होत्या, त्या बोटींच्या माध्यमातून प्रवासी वाहतूक होत होती. त्या ठिकाणी आता अजून वेगळा सर्व्हे करुन काय करणार आहोत ? अशा प्रकारचे अपघात झाल्यानंतर आपण सभागृहात चर्चा करतो आणि हळहळ व्यक्त करतो. शासनाकडून मृताच्या कुटुंबीयांना मदत केली जाते, किंबहुना अशा प्रकारची मदत करणे हे शासनाचे कर्तव्य आहे.

महोदय, रस्ते वाहतुकीवर आपण ज्या पर्यायाचा विचार करीत आहोत तो आपल्यासमोर उपलब्ध आहे. परंतु त्या अनुषंगाने आपण अंमलबजावणी करीत नाही किंवा त्या बाबतीत कोणी बोलताना दिसत नाही. माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये सागरी महामार्गाचा पर्याय असेल किंवा जल वाहतुकीचा पर्याय असेल, या दोन्ही पर्यायांच्या बाबतीत सरकारचे धोरण काय आहे, या बाबत सरकारने काय ठरविले आहे याचा खुलासा केला पाहिजे. कोकणातील चार जिल्ह्यांच्या बाबतीत चर्चा करीत असताना आणि दुसऱ्या राज्यांना जोडणाऱ्या महामार्गाचा विचार करीत असताना या सर्व बाबी करणे आवश्यक आहे.

महोदय, एक गोष्ट आपल्या सर्वांच्या लक्षात आली आहे आणि ती वस्तुस्थिती आहे. 720 कि.मी. लांबीच्या समुद्र किनाऱ्यावर जवळजवळ 4-5 मोठी बंदरे आहेत. त्यातील दिघी बंदराचे काम सुरु आहे.

नंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप .....

जयगड बंदराचे काम सुरु होत आहे. अनेक बंदरे होत आहेत. ही बंदरे जेव्हा होतील त्यावेळेला या रस्त्याची काय अवस्था होईल याची कल्पना सुध्दा करवत नाही. आपण जेएनपीटीच्या रस्त्यावर जाऊन पहावे. एकेकाळी त्या ठिकाणी ट्रेलर्सची वाहतूक नव्हती तेव्हा आम्ही कोठे तरी परदेशात आलो आहोत असे वाटावे इतके सुदर रस्ते होते. आज त्या ठिकाणी वाहतुकीची प्रचंड कोंडी होते. जेएनपीटीवरुन होणारी जी वाहतूक आहे त्यामध्ये जे मोठमोठे ट्रेलर्स आहेत त्यांची आपण वाहतूक पाहिली तर असे दिसते की, सर्व रस्त्यांची विल्हेवाट लागलेली आहे. भविष्यामध्ये राज्याच्या दृष्टीने आपण बंदरांचा विकास करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, आपण या ठिकाणी पर्यटनाच्या बाबतीत बोलतो. या राज्यातील सिंधुदुर्ग जिल्ह्याला टुरिझम जिल्हा म्हणून जाहीर केले आहे. सगळा कोकणपट्टीचा भाग राज्याच्या टुरिझममध्ये भर टाकणारा आहे, आम्हाला रोजगार मिळवून देणारा आहे. हा भाग देशाच्या आणि जगाच्या नकाशावर अग्रक्रमाने येणार आहे. त्यामुळे आम्ही नॅशनल हायवे 47 किंवा नॅशनल हायवे 17 हे पूर्ण करणे तर आवश्यक आहेच पण त्याचबरोबर त्याला ज्या पर्यायी व्यवस्था आपण आज आखलेल्या आहेत, ज्याचे सर्व्हे झालेले आहेत, ज्यांचे काम सुरु आहे, ते सुध्दा या निमित्ताने जर आपण पूर्ण् केले तरच हे जे 43 लोक मृत पावले, आतापर्यंत जे हजारो लोक अधू झालेले आहेत, जे लोक अपंग झालेले आहेत आणि आतापर्यंतच्या अपघातात मृत्यू पावलेल्यांना खऱ्या अर्थाने श्रध्दांजली दिल्यासारखे होईल तसेच आपण आपले कर्तव्य पार पाडल्यासारखे होईल.

सभापती महोदय, मला मुद्दाम आणखी एका गोष्टीकडे आपले लक्ष वेधावयाचे आहे. ज्यावेळेला अपघात होतो त्यावेळेला आपण काही विशिष्ट लोकांना या ठिकाणी टार्गेट करतो. मी टार्गेट करण्याचा प्रश्न उपस्थित करीत नाही परंतु या ठिकाणी परिवहन विभाग असेल, रस्ते विकास असतील किंवा पोलीस यंत्रणा असेल या तिघांचाही समन्वय कोठेही दिसून येत नाही. आपण त्या रस्त्यांवर जाऊन पहावे. याबाबत सन्माननीय सदस्य श्री. भाई गिरकर तसेच इतर सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला. पूर्वी कशेळी घाटामध्ये दारु पिऊन गाडी चालविणारे असतील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप .....

तर त्यांची तपासणी करण्याची व्यवस्था होती. त्या बाबत सन्माननीय सदस्य श्री. भाई गिरकर यांनी बोलणे अपेक्षित होते. काय कारणे आहेत ती मला माहीत आहेत. आपण सर्व सन्माननीय सदस्य या ठिकाणी पोटतिडिकीने बोलत आहोत. ज्या एका ठिकाणी ती व्यवस्था केली होती ती सुध्दा आता पूर्णपणे बंद आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी ट्रॉमा सेंटरचा उल्लेख केला. 1 ट्रॉमा सेंटर कणकवलीला आहे. एक ट्रॉमा सेंटर रायगडला आहे. माझी अशी मागणी राहील की, राज्याच्या दृष्टीने विचार करता हा महामार्ग चार जिल्ह्यातून जातो त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यामध्ये एक ट्रॉमा सेंटर उभे करावयास पाहिजे. आपण जिल्ह्यांचा विस्तार पाहिला, जिल्ह्यांच्या रस्त्यांची लांबी पाहिली तर त्या 100 ते 125 किलोमीटरच्या परिसरामध्ये प्रत्येक जिल्हयामध्ये एक ट्रॉमा सेंटर पाहिजे. ट्रॉमा सेंटर म्हणजे नुसती इमारत नव्हे. याचा उल्लेख सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत तसेच सन्माननीय सदस्य भाई गिरकर, सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी केला. आज त्या ठिकाणी नुसत्या इमारती आहेत. त्या ठिकाणी ज्याला आपण यत्रसामुग्रीने सुसज्ज सेंटर म्हणतो तसे ट्रॉमा सेंटर उभे केले पाहिजे. त्या ठिकाणी डॉक्टर असला पाहिजे. त्या ठिकाणी ब्लड बँक असली पाहिजे. या ज्या सर्व ॲसेसरीज आहेत त्या सर्व त्या ट्रॉमा सेंटरमध्ये असल्या पाहिजे अशा प्रकारची मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, पनवेलपासून पुढचा रस्ता 475 किलोमीटरचा आहे. आपण ज्यावेळेला पर्याय शोधू, ज्यावेळी आपण पर्याय तयार करु तेव्हा करु, हा रस्ता ज्यावेळी चौपदरी, सहा पदरी होईल तेव्हा होईल पण आजच्या घडीला या प्रत्येक जिल्ह्यामध्ये आपल्याकडील जे ट्राफीक डिपार्टमेंट आहे त्या बाबतीत विचार करण्याची आवश्यकता आहे. यामध्ये तीन चार खात्याचा संबंध आहे. त्या ठिकाणी बसचा अपघात झला आहे म्हणून केवळ परिवहन खात्याला मी जबाबदार धरणार नाही. त्यांची तर जबाबदारी आहेच. ती जबाबदारी नाकारता येणार नाही. परंतु हे जे ट्राफीक पोलीस आहेत,

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप....

ते पनवेलनंतर थेट महाडला पोलीस दिसतात, त्यानंतर थेट रत्नागिरीला दिसतात, त्यानंतर गोव्याच्या सीमेवर दिसतात. एवढ्या परिसरामध्ये 114 ठिकाणांना अपघातप्रवण क्षेत्र म्हणून जाहीर केलेले आहे. त्या भागातच हे अपघात होतात हे माहीत असल्यामुळे त्याच्या आजूबाजूला यंत्रणा असावयास पाहिजे. त्याबाबत अभ्यास झालेला आहे. त्या क्षेत्राच्या बाजूला वाहतूक पोलिसांची व पोलिसांची व्यवस्था असणे आवश्यक आहे. यामध्ये परिवहन विभागाचा महत्वाचा रोल आहे. राजकीय क्षेत्रातील अनेकजण या रस्त्यावरुन प्रवास करतात. प्रत्येकजण राजकीय, सामाजिक कामासाठी, पक्षाच्या कामासाठी या रस्त्यावरुन प्रवास करीत असतो.

या रस्त्याच्या राईट साईटवरुन मोठ्मोठ्या ट्रेलर्सची लाईन लागलेली असते. या ट्रेलर्सची टेल लाईट चालू नसते. तसेच मोठमोठ्या पाईपने भरलेले ट्रेलर्स सुध्दा या रस्त्यावरुन जाताना दिसतात. यापैकी काही गाड्यांमधील पाईपना लाल कपडा लावलेला असतो. पावसाच्या हंगामामध्ये तो कपडा भिजल्यानंतर अपघाताचा धोका अधिक असतो. अशा प्रकारची बेपवाई केल्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढलेले आहे. त्यामुळे ट्रॅफिक रेग्युलेशन करणे हे परिवहन विभागाचे काम आहे. या रस्त्यावर सीसीटीव्ही लावावेत असे मी म्हणणार नाही. परंतु ट्रॅफिक नियंत्रण करण्याचे काम अत्यंत सावधगिरीने केले पाहिजे. या ट्रेलर्सनी एका लाईनमधून गेले पाहिजे. या रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम चालू आहे. परंतु सध्याच्या रस्त्यावरुन जात असलेल्या वाहतुकीवर नियंत्रण असणे आवश्यक आहे. या रस्त्यावर होणाऱ्या अपघातांची संख्या जास्त आहे. या सगळ्या गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, खाजगी बस गाड्यांना परिवहन विभागाने लायसन्स दिलेले आहेत. माझ्या माहितीप्रमाणे एका आराम बसची 37-40 प्रवाशांची क्षमता असते. मग या बसमध्ये 53 प्रवासी कसे आले ? या अपघातामध्ये गाडीचा चालक वाचलेला आहे, त्याच्याकडून याबाबतची माहिती उपलब्ध होऊ शकते. तसेच प्रवासी गाडीचे जे मालक असतात ते गैरफायदा घेत असतात. अशा बस मालकांवरही कारवाई केली पाहिजे. तरच या अपघातांना आळा घालता येईल. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/

ॲड.आशिष शेलार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये सभागृहामध्ये महत्वाच्या विषयावर चर्चा सुरु आहे. या चर्चेत सहभागी होण्यासाठी मी येथे उभा आहे.

सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी या अपघाताबाबत आपली मते मांडलेली आहेत. त्यामुळे मुद्यांची द्विरुती टाळून आवश्यक आहे तेवढेच मी बोलणार आहे. अपघातात मृत पावलेल्या व्यक्तींना श्रध्दांजली वाहायची किंवा नाही हा भाग वेगळा आहे. परंतु या सभागृहात प्रामुख्याने दोन मुद्यांबाबत चर्चा होताना दिसत आहे. जो अपघात झाला त्याला दोषी कोण आहे आणि अशा पध्दतीची घटना पुन्हा घडू नये यासाठी काय केले पाहिजे या दोन मुद्यांवर चर्चा झाली तर स्वाभाविकपणे त्याचा चांगला उपयोग होऊ शकतो. खेड-भरणा नाक्याजवळ असलेल्या जगबुडी नदीवरुन जात असलेल्या बसला हा अपघात झालेला आहे. या नदीचे नावच जगबुडी आहे. या अपघातात 43 जण मरण पावले आहेत.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. आशिष शेलार....

जगबुडी नदीवर घडलेल्या घटनेचा निषेध करण्यासाठी मी उभा आहे.

श्री. हेमंत टकले : या विषयावरील चर्चेला सुरुवात होताना चर्चेमध्ये भाग घेणा-या सन्माननीय सदस्यांची नावे पक्षप्रतोदांकडून आपणाकडे पाठविली होती. मी आमच्या पक्षाच्या सहा सन्माननीय सदस्यांच्या नावांची यादी आपणाकडे पाठविलेली आहे. ती आपण पाहून घ्यावी.

तालिका सभापती : ठीक आहे. सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

ॲड. आशिष शेलार : या चर्चेच्या प्रस्तावामध्ये म्हटलेले आहे की मुंबई- गोवा या महामार्गावर 2010-2012 या दोन वर्षाच्या कालावधीत 828 लोकांचा मृत्यू झालेला असून 2411 नागरिक जखमी झाले आहेत. याचा अर्थ या महामार्गावर दरदवशी दीड माणसे मृत्यू पावतात आणि 4-5 माणसे जखमी होतात असे हे प्रमाण आहे. या अपघाताची माहिती घेण्याचा मी प्रयत्न केला. ही बस गोवा ते बांद्रा अशी चालविली जाते. आमच्याच मतदारसंघातील ही बस असल्यामुळे या अपघातामध्ये बांद्रयामधील लोक मृत्यूमुखी पडले आहेत काय याची माहिती घेण्याचा प्रयत्न मी केला. सभापती महोदय, परिवहन विभागाने जे काही नॉर्म्स घालून दिलेले आहेत त्याबाबतीत स्पष्टीकरण करण्याची आवश्यकता आहे. आपल्याकडे परमिट सिस्टिम आहे. स्टेट परमिटसाठी 4600 रुपये फी घेतली जाते. राज्याबाहेर जाणारी बस असेल तर त्यासाठी 464 रुपये फी द्यावी लागते. ही बस महाराष्ट्र सोडून गोव्याला गेली तर गोव्यामध्ये स्टेट परमिटची फी 4 हजार रु. आहे.

सभापती महोदय, वाहनाच्या कंडिशनचा उल्लेख वारंवार केला जातो. काही वेळा वाहनाची कंडिशन चांगली नसते. वाहनांचे टायर, इंजिन, चेसिस बरोबर नसतात. खरे तर शासनाच्या परिवहन विभागाकडून वाहनाची नेहमी वार्षिक तपासणी होत असते. या तपासणीसाठी 350 रु. फी घेतली जाते. ही वार्षिक तपासणी करीत असताना किती वाहने "चालविण्यासाठी अयोग्य" करण्यात आलेली आहेत ? चालविण्यासाठी अयोग्य अशा किती बसेस घोषित केलेल्या आहेत ? शासनाने सांगितल्या प्रमाणे किती वाहनांच्या इंजिनमध्ये, चेसिसमध्ये बदल करुन त्या सुस्थितीत ठेवण्यात आल्या. खरे तर टेस्टिंगच्या वेळी 350 रुपये फी घेतली जाते, पण टेबलाखालून 550

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. आशिष शेलार...

रुपये देऊन वाहन पास करुन घेतले जाते. अशा प्रकारे बस पास करुन घेतल्यानंतर तिची कुठे तरी जगबुडी होते आणि 40-40 लोक मृत्युमुखी पडतात. अशा प्रकारचे अपघात होऊ नये यासाठी काटेकोरपणे वाहनांची टेस्टिंग केली पाहिजे.

सभापती महोदय, जेव्हा खाजगी बसने प्रवासी वाहतूक केली जाते त्यावेळी प्रोफॉर्म्यामध्ये प्रवाश्याचे नाव, त्याचा पत्ता, फोन नंबर आदी माहिती भरुन तो प्रोफॉर्मा परिवहन विभागाकडे द्यावा लागतो. त्या प्रोफॉर्म्यावरुन बसमध्ये किती प्रवाशी आहेत हे समजते. या प्रोफॉर्म्यानुसार परमीटची फी ठरविलेली असते. या अपघातातील बसचा जो अर्ज आहे त्याची प्रत मी आपणास देणार आहे. त्या अर्जामध्ये शासनाच्या प्रोफॉर्म्याचा कुठेच उल्लेख नाही. प्रोफॉर्म्यामध्ये एजण्टचे नाव नाही, प्रवाशाचे नाव नाही. सभापती महोदय, अशा अपघाताच्या वेळी प्रवाशाची बॉडी आयडेण्टिफाय झाली नाही तर ते आयडेण्टिफिकेशनचे काम तर अत्यंत कठीण असते.

...नंतर श्री. गीते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार...

सभापती महोदय, मी या ठिकाणी अतिशय जबाबदारीने बोलतो आहे. माझ्याकडे जी यादी आहे, ती यादी मी आपणास सादर करणार आहे. या अपघातात एक विदेशी महिला देखील मृत्युमुखी पडलेली आहे. त्या महिलेच्या नावाची कोठेही नोंद नाही. यादी फक्त "फॉरेनर" असे नमूद केले आहे. ही रशियन महिला असून तिच्या नावाचा, दूरध्वनी, पत्ता यासंबंधी काहीही उल्लेख नाही. फक्त एजंटचे नाव आहे. त्या एजंटचे नाव हमीद ट्रॅव्हल्स असे आहे. त्या महिलेचे नाव,पत्ता कशा प्रकारे शोधावयाचा हाही एक महत्वाचा प्रश्न आहे. मला या परदेशी महिलेच्या बाबतीतील विषय पुढे वाढवावयाचा नाही. त्याचे कारण असे आहे की, आपल्या कोकणातील मृत्युमुखी पडलेल्या माणसांबद्दल न बोलता रशियन महिलेच्या बाबतीत बोललात म्हणून माझ्यावर टीका करतील. मानवतावादी दृष्टीकोनातून पाहिले तर या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या चार व्यक्तींच्या नावांचा उल्लेख नाही. यासंबंधीचा प्रोफार्मा नीट भरला पाहिजे, प्रोफॉर्मा नीट भरला आहे किंवा नाही यासंबंधी शासनाच्या ट्रान्स्पोर्टच्या अधिकाऱ्यांनी तपासणी केली पाहिजे. या प्रकरणाकडे आपण किती गांभीर्याने बघतो आहे हे या अपघातातून दिसून आले आहे. गोव्यातील रुबी एजंटने येथे काम केलेले आहे. त्या एजंटच्या बाबतीतही काहीही नोंदी नाहीत. खाजगी ट्रॅव्हल कंपन्यांनी योग्य प्रकारे पावत्या दिल्या पाहिजेत. त्या एजंटकडे तसेच त्या पावत्यांवर प्रवास करणाऱ्या व्यक्तींची नावे, त्यांचे दूरध्वनी क्रमांक असले पाहिजे. या गोष्टींची तपासणी कोण करणार हा एक महत्वाचा प्रश्न आहे. या गोष्टी ट्रॉन्स्पोर्ट डिपार्टमेंट करण्यास तयार नाही.

महोदय, वाहतूक पोलिसांचा या ठिकाणी उल्लेख झाला. त्यांचा नियम आहे की, खाजगी ट्रॉन्सपोर्टच्या बसमधून जे प्रवाशी प्रवास करतील, दर्शनीभागी जर प्रवाशांना एखादी अडचण वाटली तर ते सांगण्यास नंबर डिस्प्ले करावा लागतो. नागपूर अधिवेशन सुरु असताना माझा सख्खा मेहुणा प्रवास करीत होता. त्यांची देखील बस जगबुडी नदीत गेली, परंतु त्या अपघातामध्ये कोणी प्रवासी मृत्युमुखी पडले नाहीत. दर्शनीभागी पाहिल्यानंतर प्रवाशाला वाटले की, वाहन चालकाने मद्य प्राशन केलेले आहे, तो वाहन चालक झोपेची डुलकी काढतो आहे, त्या बस मालकाशी भांडण करण्यापेक्षा प्रवाशांनी ही बाब महामार्गावरील ट्राफीक पोलिसांना अमुक अमुक नंबरवर फोन करुन कळवावी अशा प्रकारच्या सूचना वाहतूक विभागाने सर्व प्रवाशांना दिल्या पाहिजेत. परंतु तशा सूचना दिल्या गेलेल्या दिसून येत नाही. या अपघातामध्ये 37 प्रवासी

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार...

मृत्युमुखी पडले, त्यातील एखाद्या व्यक्तीकडे वाहतूक शाखेचा नंबर असता तर ही घटना टाळली असती असे मला वाटते. ट्रान्स्पोर्ट विभागाचे काम तेच आहे, ट्राफीक विभागाचे काम देखील तेच आहे. डॉ.दीपक सावंत यांनी ज्याचा उल्लेख केला तो उल्लेख भयंकर असा आहे. मुंबई-गोवा महामार्ग चारपदरी एक्सप्रेस-वे करण्यात येणार आहे अशा प्रकारचे आश्वासन शासनाकडून 2008 साली दिले. परंतु तो महामार्ग चारपदरी एक्सप्रेस-वे म्हणून अद्याप झाला नाही ही खेदाची गोष्ट आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी कर्नाळयाचा उल्लेख करण्यात आला. त्याच्या स्फूर्तीसाठी वर्गीकरणाचा प्रश्न अद्याप अलिबाग व रोहा येथील उपवन संरक्षक यांच्याकडे प्रलंबित आहे. हा वर्गीकरणाचा प्रश्न सात वर्षापासून प्रलंबित आहे. या बाबतीत शासनाने लक्ष घालणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ज्या अधिकाऱ्यांकडून सात-सात वर्षे जमीन संपादनाचे प्रश्न प्रलंबित राहिले, त्यामुळे मुंबई-गोवा रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम झाले नाही. आजच्या क्षणापर्यंत दोन ते अडीच हजार प्रवासी जखमी झाले असतील, त्या अपघातांना जे सार्वजनिक विभागाचे अधिकारी, परिवहन विभागाच्या अधिकाऱ्याने ज्याने प्रोफॉर्मा व्यवस्थितपणे भरुन घेतले पाहिजे होते ते परिवहन विभागाचे अधिकारी, ज्याने डिस्प्लेचा बोर्ड आहे किंवा नाही याची पाहणी केली नाही ते ट्राफीक विभागाचे अधिकारी यांना या अपघातास जबाबदार धरुन त्यांच्याविरुध्द सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करण्यात यावेत. तशा प्रकारचे गुन्हे दाखल करण्यामागचे कारण असे आहे की, सदर अधिकारी या पुढे देखील त्यांचे काम व्यवस्थितपणे करणार नाहीत. त्यामुळे 40-40 प्रवाशी आपले प्राण गमावतील. आजच्या अपघातात 40 प्रवाशी मृत्युमुखी पडले आहेत. दोन वर्षात 800 प्रवाशी मृत्युमुखी पडले आहेत.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे म्हणाले की, देशभरात एका वर्षात 13 हजार प्रवाशी मृत्युमुखी पडले आहेत. दिवसाला दीड व्यक्ती मृत्युमुखी होतील. एका आठवडयात 80 लोक मृत्युमुखी होतात. म्हणून सार्वजनिक बांधकाम विभाग, ट्रॉफीक विभागाचे अधिकारी आणि ट्रान्स्पोर्ट विभागाचे अधिकारी हे कामात कामचुकारपणा करीत असतील तर त्यांच्यावर जोपर्यंत गुन्हे दाखल करणार नाहीत, तो पर्यंत या यंत्रणेचे अधिकारी व्यवस्थितपणे काम करणार नाहीत.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार...

या अपघातास तिन्ही विभागाचे अधिकारी जबाबदार आहेत म्हणून त्यांच्या विरुध्द सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करावेत अशी माझी सरकारला विनंती आहे. महोदय, आपण मला या विषयावर बोलण्याची संधी उपलब्ध करुन दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, भरणा नाका खेड, जि.रत्नागिरी येथील जगबुडी नदीत खाजगी ट्रॅव्हल्स कंपनीची बस कोसळून 42 लोकांचा मृत्यू झाल्याबाबत नियम 97 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या अल्पकालीन चर्चेमध्ये सहभाग घेण्यासाठी आणि त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या अपघातामध्ये 42 लोकांचे प्राण गेलेले आहेत. खेड तालुक्याचा लोकप्रतिनिधी म्हणून मी 20 वर्षे काम केले आहे. जगबुडी नदीवरील पुलाची रुंदी वाढवावी म्हणून अनेकदा आम्ही शासनाकडे मागणी केली आहे, सभागृहात प्रश्न उपस्थित केला होता. या विषयाबाबत आम्ही महामार्गावरील वाहतूक रोखून धरली होती, भरणा नाका बंद केला होता, आंदोलने केली होती. तरी पण सरकारला जाग आली नाही. या पुलाला 100 वर्षे पूर्ण झालेली आहेत. काही वर्षापूर्वी हा पूल हलत होता म्हणून काही काळ या पुलावरील वाहतूक बंद ठेवण्यात आली होती. तात्पुरती दुरुस्ती केल्यानंतर वाहतूक पूर्ववत सुरु करण्यात आली. कोकणाच्या विकासासाठी कोणतीही गोष्ट मागिततली की शासनाकडे निधी नाही. त्याच वेळेला तात्पुरती दुरुस्ती न करता पुलाची रुंदी वाढविली असती तर आज 42 लोकांचे प्राण वाचले असते.

सभापती महोदय, मी एक महत्वाची मागणी करतो. संबंधित विभागाचे जे मंत्री आहेत त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे. लहान मासे का पकडता? हा अपघात होण्यास विभागाचे मंत्री जबाबदार आहेत. महाराष्ट्रात सगळ्या ठिकाणच्या महामार्गाचे चौपदरीकरण केले जाते. मुंबई-गोवा महामार्ग हा पर्यटनाचा एक भाग आहे. या रस्त्याच्या चौपदरीकरणासाठी निधी देण्यास कोणती अडचण येते? कोकण म्हटले की निधी द्यायचा नाही ही भावना आहे. जिस की लाठी उस की भैंस, हाच अनुभव आम्हाला सातत्याने अनुभवायला मिळतो.

सभापती महोदय, कशेळी आणि भोस्ते घाटामध्ये मोठया प्रमाणात अपघात होत असतात. रत्नागिरी जिल्हयातील सर्वपक्षीय आमदारांनी मिळून माननीय मुख्यमंत्र्यांकडे हट्ट धरला की, या परिसरात 100 खाटांचे रुग्णालय व्हावे. रुग्णालय बांधून पूर्ण झाले व त्याचे उद्घाटन करण्यात आले. या रुग्णालयासाठी 62 पदे आम्ही मंजूर करुन घेतली, निधी देखील मंजूर करुन घेतला. मंत्री महोदयांकडे 50 वेळा मागणी करुनही पदे भरण्यात आलेली नाही. वारंवार आश्वासन देऊन आमची बोळवण केली जाते. आमदारांनी प्रश्न विचारला की आश्वासन देऊन मंत्र्यांनी आपली.....

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

सोडवणूक करुन घ्यायची. पुढे पुन्हा जैसे थे परिस्थिती निर्माण होते. आज याच रुग्णालयात या अपघातातील जखमींना दाखल केलेले आहे. परंतु तेथील ऑपरेशन थिएटर सुरु नाही. डॉक्टर्स उपलब्ध नाहीत. वारंवार मागणी करुनही तेथील रिक्त पदे भरली जात नाहीत. सभागृहात केवळ आश्वासने दिली जातात. जर दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करता येत नसेल तर मंत्री महोदयांनी राजीनामा देऊन घरी जावे. लोकांच्या जिवाशी खेळू नये. पदे भरण्यात यावीत म्हणून आम्ही सभागृहात वारंवार मागणी करायची आणि मंत्री महोदयांनी आश्वासन देऊन वेळ मारुन न्यायची हा प्रकार वाढीस लागला आहे. आज मंत्री महोदया लाल दिवा लावलेल्या ज्या वाहनातून प्रवास करतात ते वाहन सर्वसामान्य जनतेच्या घामाच्या पैशातून विकत घेण्यात आलेले आहे याची त्यांनी जाणीव ठेवावी. म्हणून माझी पहिल्यांदा मागणी आहे की, आरोग्य राज्यमंत्र्यांसह सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांविरुध्द सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे. शासनाला या विषयाचे गांभीर्य आहे असे वाटत नाही.

सभापती महोदय, जगबुडी नदीवरील पुलाला 100 वर्षे पूर्ण झाली आहेत. या पुलावरुन दर दोन-तीन महिन्यात एक वाहन जगबुडी नदीत कोसळून अपघात होतो. या मुद्याबाबत मंत्री महोदय उत्तर काय देणार आहेत याची मला पूर्वकल्पना आहे. मी कालच सभागृहात मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाबाबत प्रश्न उपस्थित केला होता. त्या प्रश्नाच्या अनुषंगाने जे उत्तर दिले होते तेच उत्तर या चर्चेच्या अनुषंगाने दिले जाणार आहे.

नंतर 3बी.2...

अशुद्धीत मत / शुद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती ॲड. अनिल परब)

श्री. रामदास कदम .....

एका रात्रीतून काही एक प्रकाश पडणार नाही. हे शासन कोकणाची केवळ थट्टा करण्याचे काम करीत आहे. काल या सभागृहात सायंकाळी सहा वाजता मुंबई गोवा रस्त्याच्या संदर्भात प्रश्न विचारला जातो आणि सकाळी त्याच ठिकाणी 43 माणसांचा जीव जातो, हा काय प्रकार आहे ? कितीही लोकांचे जीव गेले तरी या शासनाला काही एक फरक पडणार नाही.

आपण मला सांगा की, नाशिक-मुंबई रस्ता कसा झाला, पुणे-कोल्हापूर, पुणे-सोलापूर रस्ता कसा पटकन झाला. परंतु कोकणातील रस्ते होण्यासाठी तुम्हाला कशाची अडचण आहे ?. बाकीच्या रस्त्यांना पैसे मिळतात परंतु कोकणाच्या रस्त्यांना मात्र पैसे का मिळत नाहीत ? ज्या ठिकाणी रस्त्यांची आवश्यता आहे त्या ठिकाणी रस्त्याचे काम झाले पाहिजे, याबद्दल मला काही बोलावयाचे नाही. परंतु कोकणातील रस्ते होण्यामध्ये तुम्हाला काय अडचण येते ? कोकणातील रस्त्यांवर सतत अपघात होत असतात. त्यामुळे मंत्री महोदयांनी सुरुवातीलाच सांगू इच्छितो की, शिल्लक असलेली 40-42 पदे त्वरीत भरा. आम्ही कोकणाच्या विषयाच्या संदर्भात बेंबीच्या देठापासून बोलायचे मात्र आम्हाला काहीच द्यावयाचे नाही हे जे काही चालले आहे, ते आता आम्ही पुढे चालू देणार नाही. 43 प्रवाशांचा जीव गेलेला असतांना सुध्दा या शासनाला त्या घटनेचे काहीच गांभीर्य नाही. जबाबदार मंत्री या ठिकाणी उपस्थित नाहीत.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या ठिकाणी आजच्या अपघाताच्या गंभीर विषयावर चर्चा सुरु आहे. हा जो अपघात झालेला आहे, तो रस्त्यामुळे झालेला आहे. त्यामुळे सभागृहात सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांनी उपस्थित राहणे आवश्यक होते परंतु ते सभागृहात उपस्थित नसल्यामुळे मी त्यांचा धिक्कार करतो, निषेध करतो व सभात्याग करतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, चर्चेला सुरुवात करण्यापूर्वी माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री नाहीत असे सांगितले असता सन्माननीय परिवहन मंत्री श्री. गुलाबराव देवकर यांनी सांगितले होते की, मी आहे ना ? मात्र या विषयाच्या चर्चेत परिवहन विभागाचा फारसा संबंध येत नाही.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (ॲड.अनिल परब): सभागृहात गंभीर विषयावर चर्चा सुरु असल्यामुळे या चर्चेच्या निमित्ताने किमान सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य मंत्र्यांनी या बाबतीमध्ये .....

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी)

तालिका सभापती (श्री. मोहन जोशी): ज्यावेळेस आपण ही चर्चा सुरु केली त्यावेळेस शासनाच्या वतीने राज्यमंत्री श्री. देवकर साहेब तसेच बाकीचे मंत्री नोटींग घेऊन .....माझे पूर्ण रुलींग तुम्ही ऐकूनच घेत नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या ठिकाणी मी हरकतीचा मुददा अशासाठी उपस्थित केला होता की, आज जो भयंकर अपघात झालेला आहे, त्या अपघातावर चर्चा करण्यासाठी आपण दोन तासाची वेळ दिली. या अपघाताचे मूळ कारण रस्ता आहे. या पुलावर वारंवार अपघात होत असतात. अशा गंभीर विषयावर चर्चा सुरु असल्यामुळे या सभागृहात सार्वजनिक बांधकाम खात्याच्या मंत्र्यांनी उपस्थित रहावयास पाहिजे होते. आपण सांगता की, राज्यमंत्री नोटींग करीत आहेत. कालही पुरवणी मागण्यांवर नोटींग घेतले गेले परंतु सदस्यांनी उपस्थित केलेल्या एकाही मुद्याचे उत्तर मंत्री महोदयांच्या तोंडून आले नाही. त्यामुळे अशा नोटींगला काय अर्थ आहे ? गंभीर घटना घडल्यामुळे 4-5 सन्माननीय सदस्य आणि मंत्री महोदय घटनास्थळी गेलेले आहेत. सभागृहात अपघाताच्या संदर्भात चर्चा सुरु असतांना संबंधित खात्याचे मंत्री उपस्थित नसतील तर आम्ही या ठिकाणी चर्चा करुन त्याचा काय उपयोग होणार आहे ? एकतर सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांना सभागृहात बोलवा अन्यथा या चर्चेला काही अर्थ उरणार नाही. या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या मंत्री महोदयांनी उत्तर देण्याची आवश्यकता आहे.

(सभागृहातील अनेक सदस्य उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

यानंतर श्री. भारवि....

अशुधारित प्रत / शोधनेसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी सुरूवातीला जेव्हा मुद्दा उपस्थित केला होता तेव्हा माननीय मंत्री श्री.जयदत्त क्षीरसागर सभागृहामध्ये उपस्थित होते. त्यांनी सभागृहाला अवगत केले की,मी उपस्थित आहे. परंतु, त्यांच्या विभागाचा या विषयाशी संबंध नाही असे मी निदर्शनास आणून दिले होते. हा जो विषय आहे तो सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित आहे. आता ते देखील सभागृहात उपस्थित नाहीत. आम्ही येथे रस्त्यासाठी चर्चा करीत आहोत. काल हा रस्ता चौपदरी करण्याचा विषय सन्माननीय सदस्य सर्वश्री. रामदास कदम आणि विनायक राऊत यांनी मांडला होता. परंतु, त्यावर काहीच उत्तर आले नाही आणि आज अपघात झाला. त्याच गोष्टीवर माननीय सदस्य चर्चा करण्यासाठी उभे आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी दोन्ही माननीय विरोधी पक्ष नेत्यांना आणि काही माननीय मंत्र्यांना शासकीय हेलिकॉप्टरने अपघातस्थळी पाठविले आहे. खरे म्हणजे ही चर्चा ते आल्यानंतर व्हायला पाहिजे होती. पण ती चर्चा आपण सुरू केली. त्यास आमची हरकत नाही. आपण सभागृहात भावना मांडायला दिल्याबद्दल धन्यवाद. काल चर्चा झाली त्याला माननीय मंत्र्यांनी उत्तर दिलेले नाही. त्यामुळे आपण संबंधित विभागाच्या माननीय मंत्र्यांना बोलवावे अशी आमची विनंती आाहे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, भयंकर अपघात होऊन 24 तास उलटले नाहीत. सभागृहातील दोन्ही बाजूकडील सन्माननीय सदस्य पोटतिडकीने हा विषय मांडत आहेत. आज सकाळी झालेल्या अपघात एवढाच मर्यादित प्रश्न नाही. या रस्त्यावर वारंवार अपघात होत असून सन्माननीय सदस्यांनी अपघातांची संख्या देखील सांगितली आहे. हा विचार करण्या सारखा प्रश्न आहे. येथे सन्माननीय सदस्य ज्या काही सूचना करीत आहेत त्याचा भविष्यात उपयोग होणार आहे. या मृत्युच्या सापळ्यात आणखी लोकांना टाकायचे नसेल तर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माननीय मंत्र्यांना आपण तात्काळ बोलावून घ्यावे. तो पर्यंत सभागृहाचे कामकाज दहा मिनिटांकरिता स्थगित करावे.

तालिका सभापती : माननीय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मंत्र्यांना माननीय मंत्री श्री.गुलाबराव देवकर यांनी बोलावून घ्यावे. माननीय मंत्री येई पर्यंत मी सभागृहाची बैठक दहा मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 3.12 ते 3.25 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

.....

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

ॲड.पद्माकर वळवी : सभापती महोदय, मंत्रिमंडळाची बैठक आताच संपली आहे. मंत्री महोदय सभागृहात येतीच. तोपर्यंत आपण चर्चेला सुरुवात करावी अशी विनंती आहे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सभागृहात अतिशय गंभीर विषयावर चर्चा सुरु आहे. या गंभीर विषयावर दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य गांभीर्याने चर्चा करीत आहे. विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी येथे आक्षेप नोंदविला होता की, सभागृहात मंत्री किंवा राज्यमंत्री उपस्थित नसतील तर आम्ही उपस्थित केलेल्या मुद्यांची नीट उत्तरे मिळत नाहीत. हा त्यांचा आक्षेप मी ग्राह्य समजतो आणि तो योग्य आहे असेही मी समजतो. परंतु माझी विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, मंत्रिमंडळातील जे सहकारी येथे उपस्थित आहेत ते आपण उपस्थित केलेल्या मुद्यांची व्यवस्थितपणे नोंदी घेतील..तेव्हा आपण ही चर्चा पुढे सुरु ठेवावी अशी विनंती आहे.

तालिका सभापती : मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 3.27 वाजता 10 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.मोहन जोशी)

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सभागृहात सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री उपस्थित नाहीत.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : सभागृहात सार्वजनिक बांधकाम विभागाचे माननीय राज्यमंत्री उपस्थित असल्यामुळे आपण चर्चेला सुरुवात करावी.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपले आदेश आम्हाला शिरसावंद्य आहेत. सध्या विधानसभा सभागृहाचे कामकाज बंद पडलेले आहे. विधानपरिषद सभागृहात अपघाताच्या बाबतीत महत्त्वपूर्ण चर्चा सुरु असल्यामुळे त्या सभागृहात जावे असे सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांना वाटले नाही काय ? विधानसभा सभागृह बंद पडल्यामुळे ते रिकामे आहेत. त्यामुळे त्यांना या महत्त्वाच्या चर्चेला येता आले असते.

तालिका सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सभागृहापुढे इतरही बरेच कामकाज आहे. माननीय मुख्यमंत्री स्वत: या चर्चेला उत्तर देणार आहेत. कृपया आपण चर्चेला सुरुवात करावी.

श्री.रामदास कदम : महोदय, या विषयात सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री प्रा.फौजिया खान यांचा महत्त्वाचा रोल आहे. परंतु त्या सुध्दा सभागृहातून निघून गेल्या आहेत. या चर्चेशी संबंधित असलेले मंत्री महोदय येथून निघून जात आहेत. मला कळभणी रुग्णालयाच्या बाबतीत मुद्दे मांडायचे आहेत. जर सार्वजनिक आरोग्य विभागाचे मंत्री किंवा राज्यमंत्रीच सभागृहात उपस्थित नसतील तर मी माझे मुद्दे कसे मांडणार ? या अपघातामध्ये जे लोक जखमी झालेले आहेत त्यांच्यावर कळभणी रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

(श्री.छगन भुजबळ, माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री सभागृहात प्रवेश करतात.)

तालिका सभापती : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, शासनाचे आणि विरोधी पक्षाचे प्रतिनिधी घटनास्थळी गेलेले आहेत. शिवाय या घटनेवर माननीय मुख्यमंत्री स्वत: लक्ष ठेवून आहेत. ते स्वत: या चर्चेला उत्तर देणार आहेत. माझी विनंती आहे की, आता आपण भाषणास सुरुवात करावी. आपण जे मुद्दे मांडणार आहात त्याला उत्तरे मिळतील.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : महोदय, आपण माझ्या भावना समजून घ्या. राजकारण बाजूला ठेवून सर्व पक्षाचे आमदार एकत्र आले. कशेळी आणि भोस्ते घाटात अपघात होत असल्यामुळे आम्ही कळंबणी येथे 100 खाटांचे उप जिल्हा रुग्णालय मंजूर करुन घेतले. ते रुग्णालय सुरु होऊन सहा वर्षे झाली आहेत. आम्ही गेल्या सहा वर्षांपासून त्या ठिकाणी स्टाफ मागत आहोत. स्टाफ मंजूर होऊन आणि निधी मंजूर होऊ पाच वर्षे झाली आहेत. परंतु तरी सुध्दा स्टाफ दिला जात नाही. या बाबतचे उत्तर कोण देणार आहे ? माझी विनंती आहे की, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री प्रा.फौजिया खान यांना सभागृहात बोलवावे. केवळ बोलायचे म्हणून बोलायचे असेल किंवा केवळ रेकॉर्डसाठी बोलायचे असेल तर मला बोलायचे नाही. या अपघातामध्ये 43 प्रवासी मृत्युमुखी पडले आहेत. महोदय, या चर्चेला स्पेसिफिक उत्तर मिळण्यासाठी सर्व संबंधित विभागाचे मंत्री उपस्थित असणे आवश्यक आहे.

तालिका सभापती : माझी सन्माननीय सदस्यांना पुन्हा विनंती आहे की, कृपया त्यांनी आपले भाषण पुढे सुरु ठेवावे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मुंबई-गोवा रस्त्याची मागणी आम्ही सतत करीत आहोत. एकही अधिवेशन असे नाही की, ज्या अधिवेशनात या रस्त्याबाबत प्रश्न विचारला नाही किंवा त्याला माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले नाही. काल सुध्दा या रस्त्याच्या बाबतीत मी पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये मुद्दा उपस्थित केला होता. त्याला माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर दिले आणि आज सकाळी त्या रस्त्यावर अपघात झाला. ज्या पुलावर अपघात झाला त्या पुलाला 100 वर्षे पूर्ण झाली आहेत. त्या ठिकाणी महिन्यातून 1-2 अपघात होतच असतात. या विषयी मी आंदोलन केले होते. तेथील हायवे बंद पाडला होता. मी त्या ठिकाणी नवीन पूल बांधण्याची मागणी केली होती. परंतु राज्य सरकारने केवळ त्या पुलाची दुरुस्ती करुन दिली. त्या पुलाच्या आजूबाजूला कठडा नाही. केवळ लोखंडी सळ्या लावलेल्या आहेत.

नंतर श्री.बरवड....

अशुद्ध मुद्रित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. रामदास कदम .....

मी त्या ठिकाणी सातत्याने पाठपुरावा करीत होतो. कशेळी घाट असेल किंवा भोस्ते घाट असेल त्या ठिकाणची गेल्या पाच वर्षाची आकडेवारी काढली तर आपल्या लक्षात येईल. माननीय आरोग्य राज्यमंत्री प्रा. फौजिया खान यांच्याशी माझी वैयक्तिक दुष्मनी नाही. मी त्यांच्याकडे सातत्याने व्यथा मांडतो परंतु त्यांना त्याचे काही गांभीर्य नाही. मग आम्ही फक्त सभागृहामध्ये रेकॉर्डवर ठेवण्यासाठी भाषणे करावयाची का ? त्यांनी अनेक वेळा सभागृहात आश्वासने दिलेली आहेत.

सभापती महोदय, माननीय मंत्री श्री. छगन भुजबळ यांना सांगू इच्छितो की, आपण मुंबई-नाशिक रस्ता व्यवस्थित केला आहे. आम्ही महिन्यातून एकदा शिर्डीला जातो. ज्यावेळी आम्ही त्या रस्त्याने जातो तेव्हा बरे वाटते की, माननीय श्री. भुजबळ साहेबांनी चांगले काम केले. तशा पध्दतीने आम्ही कोकणात जाऊ तेव्हा आम्हाला वाटले पाहिजे की माननीय श्री. भुजबळ साहेबांनी चांगले काम केले. माननीय श्री. भुजबळ साहेब हे फक्त नाशिकचे नाहीत तर संपूर्ण महाराष्ट्राचे आहेत, ही भावना आमच्यामध्ये निर्माण झाली पाहिजे. ज्यावेळी आम्ही गणपतीला कोकणामध्ये जातो त्यावेळी साडेचार तासांच्या प्रवासाच्या ठिकाणी आम्हाला 10 तास प्रवास करावा लागतो इतके खड्डे असतात. दरवर्षी हीच परिस्थिती असते. मग आमची आंदोलने होतात, रास्ता रोको होतात. असे झाले नाही असे एकही वर्ष जात नाही. आता उद्या होळी येणार आहे, शिमगा येणार आहे तेव्हा ट्राफीक जाम असणार आहे. आम्ही कोकणी माणसे त्या ठिकाणी 10-10 तास अडकून बसणार. आपण यातून आम्हाला कधी मोकळे करणार हे एकदा स्पष्ट झाले पाहिजे.

सभापती महोदय, काल माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, आम्ही दिल्लीमध्ये प्रस्ताव पाठविला आहे, दोन वेळा माननीय श्री. भुजबळ साहेब गेले पण अजून निधी मिळालेला नाही, मंजुरी मिळालेली नाही. हे उत्तर माननीय श्री. भुजबळ साहेबांनी अनेक वेळा दिले आहे. त्यांनी नवीन काय सांगितले ? आम्ही हे माननीय श्री. भुजबळ साहेबांकडून अनेक वेळा ऐकले आहे. त्यांनी जे सहा महिने अगोदर सांगितले तेच माननीय राज्यमंत्र्यांनी काल आम्हाला सांगितले. कदाचित आज माननीय श्री. भुजबळ साहेब आम्हाला परत तेच सांगतील. मला कल्पना आहे की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

माननीय श्री. भुजबळ साहेब यांच्या खात्यासाठी महाराष्ट्र शासन पैसे देत नाही. परंतु हे पैसे दिल्लीचे असल्यामुळे, केंद्र शासनाचे असल्यामुळे माननीय श्री. भुजबळ साहेब यांच्यावर अन्याय होतो अशातील काही भाग नाही. मग यामध्ये काय अडचण आहे ? यामध्ये राज्य शासनाला 20 टक्के रक्कम द्यावयाची आहे. बाकी सर्व बाजूला ठेऊन आपण चौपदरीकरणाची मंजुरी कधी आणणार हे माहीत नाही परंतु आजचा प्रसंग आपल्या डोळ्यासमोर पुन्हा आल्यानंतर याचे गांभीर्य आपल्या लक्षात अधिक येईल असे मला वाटते. ताबडतोब त्या पुलाचे बांधकाम नव्याने हाती घेणार का ? याबाबत आपल्याला विनंती आहे. आम्ही त्या बाबतीत सातत्याने मागणी करतो. त्या पुलाला शंभर वर्षे झालेली आहेत. मध्ये तो पूल हलत होता. तो पूल कधीही पडेल अशी त्या पुलाची अवस्था होती. पाहिजे तर आपण संबंधित अधिकाऱ्यांना विचारुन घ्यावे.

सभापती महोदय, माझी आपल्या मार्फत शासनाला विनंती आहे की, काही लोक मुंबई-गोवा रस्त्याचे सहापदरीकरण करावे असे म्हणतात पण सहा पदीकरण होईल तेव्हा होईल पण आधी चौपदरीकरण होऊ द्या. केवळ रेकॉर्डवर ठेवण्यासाठी मागणी नको. या बाबतीत आपण आम्हाला स्पेसिफिक कालावधी द्यावा. आम्ही दिल्लीमध्ये जाऊन बसू, आमचे वजन वापरु, माननीय मुख्यमंत्र्यांचे वजन वापरु, 3700 कोटी रुपये किंवा 4 हजार कोटी रुपये जो निधी आवश्यक आहे तो तातडीने आणू, दुसरा टप्पा देखील चालू करु, असे सांगण्यात आले. जोपर्यंत 500 बळी जात नाहीत, 2 हजार बळी जात नाहीत तोपर्यंत काम करावयाचे नाही असे काही उद्दिष्ट शासनाने ठरविले आहे का ? कोकणासाठी या सर्व गोष्टी बाजूला ठेऊन हे काम केले पाहिजे. मी स्वत: त्या ठिकाणी आंदोलन केले आहे. आम्ही हायवे बंद केला होता. अजून केसेस चालू आहेत. ज्याचे जळते त्याला कळते. बाकीचे अनेक विषय आहेत ते सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी मांडले. माझी सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांना विनंती आहे की, आपण कोकणातील सर्व आमदार पक्ष बाजूला ठेऊन एकत्र येऊन कोकण म्हणून चर्चा करुन घेऊ. आज हा जो अपघात झाला आहे त्या अनुषंगाने मुंबई-गोवा महामार्गाचा विषय घेऊ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

सभापती महोदय, माझी मंत्री महोदया प्रा. फौजिया खान यांना विनंती आहे की, आपण सर्व गोष्टी बाजूला ठेवा. मी कळंबणी येथील हॉस्पिटलच्या बाबतीत काल त्या विभागाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा नसताना सुध्दा आपल्याला आठवण करुन दिली होती की, आपण कळंबणी हॉस्पिटलच्या बाबतीत काय केले ? त्या हॉस्पिटलला आपण मुद्दाम भेट द्यावी. तेथील ऑपरेशन थिएटर चालू नाही. तेथील आयसीयू युनिट चालू नाही. ते चालू असेल तर मला सांगावे. आपण सांगाल ते मी हरुन जाईन. आम्ही सर्व आमदारांनी पक्ष बाजूला ठेऊन त्या ठिकाणी 100 बेडचे हॉस्पिटल आणले, त्याला मंजुरी घेतली. पदे मंजूर करुन घेतली. आर्थिक तरतूद करुन घेतली.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

मग तुम्ही आम्हाला निधी का देत नाही ? त्या ट्रॉमा केअर हॉस्पिटलसाठी 62 पदे मंजूर करण्यात आली आहेत. ती पदे भरण्याबाबत गेल्या 5-6 वर्षात आश्वासन देऊनही ती पदे अद्याप रिक्त का ठेवली आहेत, त्या रस्त्यावर आणखी अपघात होण्याची व आणखी काही माणसे मरण्याची शासन वाट पहात आहे का ? रत्नागिरी येथील उप जिल्हा रुग्णालय 150 कि.मी.अंतरावर आहे. शासन त्या हॉस्पिटलसाठी कर्मचारी नेमत नाही, डॉक्टर्स नेमत नाही, शस्त्रक्रिया कक्षासाठी व आयसीयूसाठी लागणारी यंत्रणा उभी करीत नाही, या शासनाकडे केवळ कोकणासाठी पैसा नाही. म्हणून माझी या निमित्ताने माननीय आरोग्य राज्यमंत्र्यांना प्रश्न विचारावयाचा आहे की, ही रिक्त पदे किती दिवसात भरली जाणार आहेत, आयसीयू व ऑपरेशन थिएटर कधी सुसज्ज करुन चालू करणार आहे ? तेथे येणाऱ्या प्रत्येक पेशंटला उपचार कधीपासून मिळणार आहेत, या अपघातातील दोन व्यक्तींना कळंबणी येथून मुंबईला हलविले आहे. त्यापैकी एखादी व्यक्ती मरण पावली तर त्याला जबाबदार कोण ? त्यासाठी प्रथम आरोग्य राज्यमंत्र्यांविरुध्द गुन्हा दाखल केला पाहिजे, त्यानंतर माननीय मंत्री श्री.भुजबळ यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला पाहिजे. या मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामासाठी मंत्री महोदयांनी स्वत:ची प्रतिष्ठा पणाला लावावी. मुख्यमंत्री महोदयांचे सहकार्य घ्यावे. आम्ही कोकणातील सर्वपक्षीय आमदार आपल्याबरोबर स्वत: खर्च करुन येण्यास तयार आहोत. आम्ही आपल्याला हात जोडून विनंती करतो. येरे माझ्या मागल्या असे करु नका. या सभागृहात अशा अपघातांवर चर्चा करण्याची शासनाने आमच्यावर पुन्हा वेळ आणू नये असे सांगून मी माझे दोन शब्द संपवितो. जय हिंद, महाराष्ट्र.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मुंबई-गोवा महामार्गावर झालेल्या अतिशय हृदयद्रावक अपघाताबाबत बोलण्यासाठी व संवेदना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, प्रथम मी या अपघातामध्ये मृत पावलेल्या व्यक्तींना अभिवादन करतो. या रस्त्यावरुन प्रचंड वाहतूक सुरु असते. या रस्त्यावरील अपघातांचे प्रमाणही जास्त आहे. अपघातामध्ये लोकांना आकस्मिकपणे मृत्यू येतो ही योगायोगाची गोष्ट नसते. माणसाला निसर्गदत्त मृत्यू येणे ही स्वाभाविक गोष्ट आहे. परंतु या रस्त्यावरील प्रवाशांचा मोठ्या प्रमाणात मृत्यू होत आहे. या अपघातामध्ये ज्या व्यक्ती मरण पावल्या आहेत, त्या व्यक्ती प्रवासाला निघाल्या होत्या त्यांचे नातेवाईक त्यांची वाट पहात असतील आणि जेथून ते निघाले होते त्या लोकांना असे वाटले असेल की, हे लोक प्रवासाला निघाल्यानंतर इच्छित स्थळी पोहोचतील. परंतु आकस्मिकपणे अपघात झाल्यानंतर ती माणसे मरावीत ही गोष्ट सार्वजनिक जीवनामध्ये, आपल्या महाराष्ट्राला खचितच चिंता वाटणारी बाब आहे असे मला वाटते. अशा प्रकारे होणारे मृत्यू टाळता येऊ शकतात. कोकणातील आमच्या सन्माननीय सदस्यांनी आपली मते मांडताना त्या रस्त्यासंबंधी, वाहतूक विभागातील प्रशासनासंबंधी मते मांडली. विशेषत: कोकणाच्या विकासासंबंधी मते मांडली. मी त्यांच्या विचारांशी काही अंशी सहमत आहे. लोकशाहीमध्ये मागे पडलेला प्रांताचा विकास झाला पाहिजे ही भावना अत्यंत रास्त आहे. एखादा विभाग मोठ्या प्रमाणात मागे पडलेला असतो आणि अशा प्रकारची घटना घडल्यानंतर त्याबाबत तीव्र भावना व्यक्त केली जाते.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. जयदेव गायकवाड...

असे असले तरी कोकण हा भाग भारतामध्ये पर्यटनाच्या दृष्टीने सर्वांना आवडणारा असा भाग आहे. या भागामध्ये पर्यटनाच्या दृष्टीने मूलभूत सुविधा निर्माण करण्याची गरज आहे.

मी या निमित्ताने आपल्याला आठवण करुन देऊ इच्छितो की, हा अतिशय भयावह असा अपघात असला तरी काही दिवसांपूर्वी मुंबई-पुणे रस्त्यावर खालापूर येथेही अशाच प्रकारचा अपघात झाला होता आणि त्यामध्ये 28 माणसे मृत्युमुखी पडली होती. मागील चार-पाच महिन्यामध्ये मुंबई-पुणे महामार्गावर दोन-दोन, तीन-तीन माणसे अपघातामध्ये मृत्युमुखी पडली. या अपघातांची कारणमिमांसा करणे म्हणजे तो एक संशोधनाचा विषय होतो. अपघात का होतात, अपघाताला कोण जबाबदार होते या प्रश्नांची उत्तरे मिळवित असताना जे जे काही निरीक्षण केले जाते, संशोधन केले जाते त्यानुसार उपाययोजना करण्याची आवश्यकता असते. एक गोष्ट निश्चित आहे की, अपघाताला वाहन चालक जबाबदार असतो. वाहन चालकावर विश्वास ठेवून बसमधील 40-50 प्रवासी प्रवास करतात. हा वाहनचालक गाडी चांगल्याप्रकारे चालवून आपल्याला जेथे जायचे आहे तेथे तो सुखरुप पोहोचविल अशा प्रकारचा प्रवाशांचा विश्वास चालकावर असतो. प्रवासी वाहतूक करणा-य ज्या संस्था आहेत त्या संस्थावर लोकांचा विश्वास असतो. त्यांच्यावर विश्वास ठेवून लोक प्रवास करीत असतात. अशा प्रकारच्या घटना घडतात त्यावेळी लोकांच्या अनेक प्रतिक्रिया आपल्याला ऐकावयास आणि वाचावयास मिळतात. एखादा म्हणतो की, मी त्या बसने जाणार होतो, पण माझी बस चुकली ते बरे झाले, नाही तर मी देखील गेलो असतो.

सभापती महोदय, मी या विषयावर जास्त बोलणार नाही. रस्त्यावरुन जी वाहतूक होत असते या वाहतुकीवर नियंत्रण नाही असे माझ्या निरीक्षणामध्ये मला आढळून आलेले आहे. प्रचंड वेगाने वाहतूक होत असते. या वेगावर नियंत्रण ठेवले पाहिजे. वळणावर वाहनांचा वेग नियंत्रित केला पाहिजे. वाहतुकीच्या नियमांचा अवलंब न केल्यामुळे अपघात घडतात. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितल्या प्रमाणे काही पॉईण्टसला वाहतुकीवर नियंत्रण ठेवले तर अपघात टळू शकतील. अशा प्रकारच्या सर्व गोष्टीमध्ये प्रशासन योग्य प्रकारे काम करीत आहे की नाही हे पाहिले पाहिजे. या अपघातामध्ये मृत्यू पावलेल्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खात मी सहभागी आहे एवढे बोलून मी थांबतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक राऊत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, भरणेनाका, खेड, येथील जगबुडी नदीवर आज पहाटे भीषण अपघात होऊन अनेक प्रवाशांचा मृत्यू झाला, त्या अनुषंगाने आणलेल्या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगू इच्छितो की, केन्द्र सरकारच्या निष्क्रियतेमुळे, केन्द्र सरकारच्या उदासीनतेमुळे, कोकणाकडे पाहण्याची जी सापत्नपनाची भूमिका केन्द्र सरकार घेत आलेले आहे त्या भूमिकेमुळे दुर्दैवाने काल 37 लोकांचा जीव गेलेला आहे. अपघातातील मृतांना श्रध्दांजली अर्पण करीत असताना केन्द्र सरकारने दाखविलेल्या निष्क्रियतेचा मी धिक्कार करतो.

सभापती महोदय, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 17 हा केवळ कोकणाचा महामार्ग नाही किंवा रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांसाठी तयार केलेला नाही तर हा महामार्ग संपूर्ण राज्य आणि देश आणि त्याच बरोबर संपूर्ण जगातील पर्यटकासाठी केलेला आहे. जगातील पर्यटक या महामार्गाने प्रवास करीत असतात. असा हा महत्वाचा महामार्ग आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक राऊत...

"मुंबई ते गोवा" पर्यटनाच्या दृष्टीने तो अतिशय महत्वाचा महामार्ग आहे. अतिशय सुरक्षित असावयास पाहिजे असा हा महामार्ग आज दुर्देवाने मृत्यूचा सापळा बनतो आहे. कालची घटना ज्या ठिकाणी झालेली आहे, तेथील पूल अतिशय अरुंद आहे. दक्षिणेकडून उत्तरेकडे येणारी वाहने किंबहुना उत्तरेकडून दक्षिणेकडे येणारी वाहने भरणा नाका क्रॉस केल्यानंतर जगबुडी नदीच्या वळणावर येतात, त्यावेळी वाहन चालकास वाहन कंट्रोल करणे फार कठीण होते. ज्याच्या हातात वाहनाची स्टिअरींग असते, त्यालाच वाहन कंट्रोल होत नाही असे कळते, दुसऱ्याला ते कळू शकत नाही. या नदीवरील पूल अरुंद आहे असे नाही. आपण त्या पुलाचे छायाचित्र पहा. ब्रिटीशांच्या राजवटीमध्ये दगडाचा कॉलम असलेला पूल आहे. दगडाचे कॉलम, दगडाची भिंत त्यावर संपूर्ण डांबर टाकलेले आहे. परंतु या पुलाच्या बाजुला मात्र साधी एक इंचाची जीआयए पाईपची रेलींग आहे. कदाचित सदर बस चालकाचा स्टिअरींग वरील ताबा सुटला असेल आणि त्यामुळे ती प्रवासी बस पुलाचे रेलींग तोडून नदीमध्ये गेली असेल. सध्या त्या नदीमध्ये पाणी नसले तरी तेथे खडक मोठया प्रमाणात आहेत. या महामार्गावर अशा पध्दतीचे अनेक पूल आहेत. अपघाताच्या ठिकाणापासून ते सावंतवाडीपर्यंतचे पूल मजबूत आहेत, परंतु रेलींग मात्र जीआयए पाईपने केलेले आहेत. या महामार्गावर सिधुदुर्ग नगरी आहे, त्याच्यापुढे गेल्यानंतर पिकढवळ नदी आहे. त्या सर्व पुलांवर एक इंचाच्या पाईपचे रेलींग केलेले आपल्याला दिसून येईल.

महोदय,कोकणातील नद्यांमध्ये बारमाही पाणी असते. कुडाळ येथे कर्ली नदी आहे, ती नदी देखील बारमाही वाहत असते. परंतु त्या नदीच्या पुलावर देखील रेलींग एक इंच पाईपचे आहे. पुलांवर पाईपचे रेलींग करुन किती मृत्यूचे सापळे तयार करुन ठेवलेले आहेत. जवळ जवळ या 600 कि.मी.च्या अंतरात 114 धोकादायक ठिकाणे आहेत. काल ज्या ठिकाणी अपघात झाला हे 114 मधील एक धोकादायक ठिकाण आहे. आपण 114 ठिकाणे शासनाने आयडेंटीफाय केलेली आहेत, त्या ठिकाणची कामे करण्यासाठी करोडो रुपयांचा निधीची तरतूद केल्याची बातमी वृत्तपत्रात छापून येते. महाराष्ट्र शासन, केंद्र शासन, महामार्गांची दुरुस्ती करणारी यंत्रणा असेल त्यांच्याकडून निधीची पूर्तता केली गेली होती, तो निधी योग्य कामांवर खर्च करण्यात आला आहे काय या बाबतचा खुलासा शासनाने करावा.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक राऊत...

महोदय, या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम मंत्री माननीय श्री.छगन भुजबळ साहेब उपस्थित आहेत. आम्ही कोकणातील सर्व आमदार त्यांना भेटलो. कोकणामध्ये आंदोलने केली, या महामार्गाच्या बाबतीत माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी स्वत: पाठपुरावा केला. त्यांनी या महामार्गाचे चौपदरीकरणाबाबतचा प्रस्तावास तांत्रिक मान्यता घेऊन तो प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर केला. पार्लमेंटच्या पिटीशन कमिटीने या बाबतीत कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेतली. संबंधित मंत्र्यांची साक्ष घेतली. या महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामासंबंधी सर्व तांत्रिक बाबींची पूर्तता झालेली आहे, परंतु दिल्लीतील निर्ढावलेले राज्यकर्ते महाराष्ट्रावर अन्याय करीत असतील तर महाराष्ट्राला न्याय कसा मिळेल आमच्या समोर प्रश्न उभा राहिलेला आहे.

महोदय, महाराष्ट्र शासनाने सदर महामार्गाच्या कामाबाबतच्या सर्व तांत्रिक बाजू पूर्ण करुन प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविला. या कामास केंद्रीय पर्यावरण विभागाची देखील मंजुरी मिळालेली आहे. राष्ट्रीय महामार्गांच्या दुरुस्तीमध्ये मुंबई-गोवा या महामार्गाचा समावेश झालेला नाही. त्याचाच परिणाम म्हणून आज पहाटे 37 प्रवाशांना आपल्या घर संसारावर पाणी सोडून मृत्यूला कवटाळावे लागले. त्यांना आपले जीवन अर्धवट सोडून निघून जावे लागले. मृत्युमुखी पडलेल्या प्रवाशांची कुटुंबे आक्रोश करीत आहेत. ते वाहन चालकाच्या नावाने, बस मालकाच्या नावाने आक्रोश करीत आहेत. वाहन चालक आणि बस मालक ज्यांनी या प्रवाशांना मृत्यूच्या खायीत ढकलले त्यांना या अपघाता बाबतीत जबाबदार धरले पाहिजे.

सभापती महोदय, आजच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीत प्रश्न क्रमांक 36774 हा महाड येथे ट्रामा युनिट सुरु करण्याबाबत सन्माननीय सदस्य श्री.विजय सावंत यांनी प्रश्न विचारलेला आहे.

यानंतर श्री.भोगले...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.विनायक राऊत.....

केंद्र सरकार जसे निष्क्रिय आहे तसे महाराष्ट्र सरकार देखील त्यात मागे नाही. कोकण म्हटल्यानंतर फक्त दोन-तीन जिल्हे, मेले काय आणि जगले काय, श्रध्दांजलीच वाहायची आहे अशा दृष्टीकोनातून सरकारने उत्तर दिलेले आहे. मुंबई-गोवा महामार्गावर ज्या पध्दतीने अपघात होतात त्या अपघातातील रुग्णांना उपचारासाठी तातडीने गोवा किंवा कोल्हापूर येथे न्यावे लागते. अपघातात डोक्याला गंभीर मार लागलेल्या रुग्णांपैकी 99 टक्के रुग्ण अर्ध्या वाटेतच आपले प्राण सोडतात, कारण मोठ्या प्रमाणात रक्त सांडलेले असते.

सभापती महोदय, आम्ही नेहमी मागणी करीत आहोत की, तेथे एक ट्रॉमा केअर सेंटर सुरु करण्यात यावे. सरकारने उत्तर दिले की, महाड, जि.रायगड येथे ट्रॉमा केअर युनिटसाठी बांधलेल्या इमारतीमध्ये ट्रॉमा केअर युनिट कार्यान्वित करणे शक्य होऊ शकले नाही, कारण सदर ट्रॉमा केअर युनिटसाठी बांधलेल्या इमारतीच्या पहिल्या मजल्यावर ऑपरेशन थिएटरसाठी रॅम्प व उद्वाहन यंत्रणेची सोय झालेली नाही, त्यामुळे ट्रॉमा केअर युनिट सुरु झालेले नाही. फक्त रॅम्प आणि उद्वाहन यंत्रणा बसविण्यासाठी सरकारकडे पैसा नाही हे कोणाला खरे वाटेल का? ही यंत्रणा बसविण्यासाठी फक्त 10 लाख रुपये खर्च येणार आहे. तेथील अपघातग्रस्तांना मदत केली पाहिजे अशी सरकारची मानसिकताच नाही. मी स्वत: महिन्यातून किमान दोन ते तीन वेळा या रस्त्यावरुन प्रवास करीत असतो.....(वेळ संपल्याबाबत बेल वाजल्यानंतर)..... सभापती महोदय, आमच्या दृष्टीने हा जिव्हाळ्याचा विषय आहे. त्यामुळे मला भाषण करण्यास थोडा वेळ वाढवून द्यावा.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री.विनायक राऊत : सभापती महोदय, आमच्या कुटुंबातील सदस्य अपघातात मृत झाले आहेत. या अपघातात कोणाची बहिण गेली, कोणाचा भाऊ गेला, कोणाचा भाचा गेला आहे.

तालिका सभापती : माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री.विनायक राऊत : सन्माननीय सभापतींनी मला भाषण करण्यास पुरेसा वेळ न दिल्यामुळे मी सभात्याग करतो.

(माननीय सदस्यांनी बहिर्गमन केले)

--------- ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) सभापती महोदय, नियम 97 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या चर्चेमध्ये सहभागी होण्यासाठी आणि त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, अत्यंत गंभीर स्वरुपाचा अपघात राष्ट्रीय महामार्ग क्रमांक-17 वर झालेला आहे. आज सकाळी सभागृहाची बैठक सुरु झाली त्यावेळी अशी माहिती दिली गेली की, या अपघातात 37 जण मृत झालेले आहेत. काही वेळापूर्वी मला अशी माहिती मिळाली की, या अपघातातील मृतांची संख्या 42 वर पोहोचली आहे. मुंबई-गोवा हा राष्ट्रीय महामार्ग केवळ एका भागाला जोडणारा नसून महाराष्ट्र आणि गोवा या दोन राज्यांना जोडणारा महामार्ग आहे. हा महामार्ग गोव्याहून पुढे कर्नाटक राज्यात जातो. गोव्यामधून पुढे बेळगावकडे जाणारी लिंकअप आहे.

सभापती महोदय, आज संपूर्ण देशात हजारो कि.मी.रस्त्यांच्या चौपदरीकरणाचा धडक कार्यक्रम केंद्र शासनाने हाती घेतला आहे. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक-17 च्या पहिल्या टप्प्याच्या कामाला मंजुरी मिळाली आहे. पळस्पे फाटा ते इंदापूर पर्यंतचे काम जून, 2014 पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. काही दिवसापूर्वी मला या महामार्गावरुन प्रवास करण्याचा योग आला. आतापर्यंत फक्त 10 ते 15 टक्केच काम पूर्ण झालेले आहे. त्यामुळे जून, 2014 पर्यंत हे काम कसे पूर्ण होणार याबाबत मी स्वत: साशंक आहे. इतक्या महत्वाच्या रस्त्याबाबत शासनाने एवढी उदासिनता दाखविण्याचे कारण काय आहे? या देशात 20 हजार कि.मी.रस्त्याच्या चौपदरीकरणाची कामे केंद्र शासनाच्या माध्यमातून सुरु करण्यात आली आहेत. त्यात या महामार्गाच्या इंदापूर-कशेडी-संगमेश्वर-राजापूर-झाराप यापैकी कोणत्याही टप्प्यातील कामाचा समावेश केलेला नाही अशी माझी माहिती आहे, यात काही चूक असेल तर माननीय मंत्री महोदय ती दुरुस्ती करु शकतील.

नंतर 3के.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे .....

मला आश्चर्य वाटले की, काही दिवसापूर्वी स्वत: माननीय भुजबळसाहेबांनी महाराष्ट्रातील अनेक खासदारांना पत्र लिहिले की, हा अत्यंत महत्वाचा प्रकल्प असून या ठिकाणी अनेक अपघात होतात त्यामुळे हा प्रकल्प होणे गरजेचे असून त्या करिता केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्यात यावा. माझी दुसरी माहिती अशी आहे की, हे काम 20 हजार कि.मीटरच्या रस्त्याचे घेतलेले नाही. केंद्र सरकारच्या पिटीशन कमिटीमध्ये या संदर्भातील माहिती तेथील सेक्रेटरींनी दिली होती. 80-84 कि.मीटरचे काम करावयाचे आणि पुढील रस्त्याचे काम करावयाचेच नाही, अशा प्रकारचे या रस्त्याचे काम अर्धवट होणार असेल तर ते योग्य होणार नाही. या संदर्भात माझे म्हणणे आहे की, सर्व विषय बाजूला ठेवून रस्त्यांच्या संदर्भात या सभागृहाने एकमुखी ठराव पास करुन केंद्र सरकारकडे मागणी केली पाहिजे की, पुढील दीड वर्षाच्या कालावधीत या राष्ट्रीय महामार्गावरील सर्व टप्प्यांची कामे सुरु झाली पाहिजेत. असे जेव्हा होईल तेव्हाच या महामार्गावरील अपघात थांबू शकतील. हा केवळ कोकणाचा विषय नाही तर संपूर्ण महाराष्ट्राचा, महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाच्या संदर्भातील विषय आहे. या विषयामध्ये अनेक गोष्टींचा अंतर्भाव आहे. आपल्याकडे पैसे नाहीत, हे मला मान्य नाही. आपण रस्त्याच्या कामासाठी पेट्रोलवर एक रुपया सेस लावला आहे. महाराष्ट्र शासन पेट्रोलवर जो एक रुपयाचा सेस घेते त्यातून किती पैसे उपलब्ध होतात ? सेसच्या माध्यमातून जे पैसे जमा होतात ते पैसे रस्त्याच्या कामासाठी खर्च होतात की, नाही हा विषय देखील महत्वाचा आहे.

अध्यक्ष महोदय, या ठिकाणी केवळ रस्त्याचा विषय नाही. कोकणातील रस्ते अतिशय वळणदार आहेत. वळणावर समोरुन येणारे वाहन दिसत नाही त्यामुळे अपघात मोठया प्रमाणात होतात. कोकणामध्ये अतिशय अरुंद पूल आहेत. त्यामुळे कोकणातील रस्त्यांची अलाईनमेंट होण्याची आवश्यकता आहे. कोकणातील ज्या रस्त्यावर नेहमी अपघात होतात त्या ठिकाणी तातडीने सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. परिवहन विभागाकडून परमीट देताना ड्रायव्हरने किती तास वाहन चालवले पाहिजे, किती स्पीडने वाहन चालवले पाहिजे यासाठी काही बंधने घातलेली आहेत. प्रवासी वाहतुकीच्या ज्या बसेस आहेत त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याकरिता गव्हर्नर

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे .....

बसविला पाहिजे असे आपण म्हणतो. मुंबई-गोवा किंवा मुंबई-पुणे महामार्गावरील लक्झरी बसेस ताशी 100-120-130 कि.मी च्या स्पीडने जात असतात. या बसने स्पीड लिमिट क्रॉस करता येणार नाही यासाठी आपण काही उपाययोजना करु शकत नाही ? परंतु याकडे लक्ष देण्यास कोणालाही वेळ नाही. बसेस स्पीडने जातात त्यामुळे स्पीड ब्रेकर्सची मागणी केली जाते. परंतु आज ज्या पध्दतीने स्पीड ब्रेकर्स टाकले जातात त्यांना मी स्पीड ब्रेकर्स नाही तर कार ब्रेकर्स असे म्हणतो. गाडया तुटतील अशा पध्दतीचे स्पीड ब्रेकर्स लावले जातात. या स्पीड ब्रेकर्सच्या संदर्भात हाय कोर्टाने ताशेरे ओढले होते. अशा प्रकारचे स्पीड ब्रेकर्स रस्त्यावर बसविता येणार नाही, असे सांगितले होते. असे असतांनाही आज रोज नवीन -नवीन स्पीड ब्रेकर्स बसविले जात आहेत. ते थांबण्याची आवश्यता आहे. सुरक्षा लक्षात घेऊन स्पीड ब्रेकर्स लावले पाहिजेत.

सभापती महोदय, प्रवासी बसमध्ये दोन ड्रायव्हर्स असले पाहिजेत. एका ड्रायव्हरची सहा तासाची पाळी असेल तर त्याची पाळी संपल्यानंतर दुसऱ्या ड्रायव्हरने ते वाहन चालवले पाहिजे. मात्र या गोष्टींकडे लक्ष देण्याची आपल्याकडे कोठेही यंत्रणा नाही.

सभापती महोदय, गोव्याकडे जातांना पनवेलच्या डाव्या रस्त्याच्या बाजूला कंटेनर यार्ड तयार करण्यात आलेले आहे. मुळात हा रस्ता अरुंद आहे. असे असतांना या ठिकाणी मोठ मोठे कंटेनर्स उभे केले जातात. या ठिकाणी कंटेनर्स यार्डची परवानगी कोणी दिली व ती कोणत्या आधारे दिली हा सुध्दा संशोधनाचा विषय आहे.

सभापती महोदय, मुंबई कोल्हापूर या मार्गावर टोल सुरु झाल्यापासून जेएनपीटी मधून निघालेले सर्व कंटेनर्स या मार्गावरुन जावयास लागले आहे. खरे म्हणजे मुळातच हा रस्ता लहान असल्याने त्यावरुन कंटेनर्सचे होणारे ट्रॅफिक योग्य नाही. केंद्र सरकार जर या हायवेचे रुंदीकरण करणार नसेल तर राज्य सरकारने या रस्त्यावरुन जाणाऱ्या जड वाहनांना बंदी घालण्याची आवश्यकता आहे. लोकांच्या सुरक्षेसाठी मोठया वाहनावर बंदी घालण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. भारवि....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे...

ही पावले आपण तातडीने उचलावीत. आज मुंबई-गोवा हायवेवर मृत्यूचा सापळा तयार झाला आहे. महाराष्ट्राच्या जनतेलाच नव्हे तर देशाच्या संपूर्ण भागातून येथे जे पर्यटक येतात त्यांना सुरक्षा देण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने तातडीने पावले उचलणे गरजेचे आहे. या अपधातात जे मृत पावले आहेत त्यांना श्रद्धांजली अर्पण करतो आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खात सहभागी होतो. धन्यवाद.

....

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, खरे म्हणजे मी देखील या चर्चेमध्ये सहभागी होणार होतो. माझ्याकडे मागचे सर्व बोलण्याचे उतारे आहेत. पण मी स्वत:च सांगितले की, कोकणील संबंधित सन्माननीय सदस्यांनाच बोलण्याची संधी द्यावी. त्यामुळे मी सन्माननीय सदस्य सर्वश्री किरण पावसकर, विनायक राऊत यांना विनंती केली. एवढेच नव्हे तर सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम तर या विषयावर बोलणार नव्हते. पण त्यांना देखील मी बोलण्यासाठी आग्रह केला. कारण या सर्वांचा त्या भागाशी रोजचा संबंध येतो. जाता-येता या सर्वांना वेदना होतात. सन्माननीय सदस्य श्री.विनायक राऊत अगदी तडफेने आपले विचार मांडत होते. ते मूळ मुद्यावर आले होते. कोकणात ट्रामा सेंटर व्हावे अशी अनेक जणांनी सूचना केली आहे. इमारत तयार आहे, पण दहा लाखाकरिता ते सुरू होत नसेल तर ते चुकीचे आहे.

सन्माननीय सदस्य श्री.विनायक राऊत त्याच मुद्यांवर बोलण्यासाठी येत होते. आपण त्यांना चर्चेसाठी आणखी दोन-तीन मिनिटे वेळ द्यायला पाहिजे होता. माननीय सदस्य वेदना सांगत होत्या. त्यांचा अनुभव बोलत होता. त्यांना मरे पर्यंत कोकणात जायचे आहे. या रस्त्यामधील ज्या काही वेदना आहेत ते मांडत होते. मी आणि सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे जनरल भाषण करू. गाडीचा स्पीड किती असावा, ड्रायव्हर दोन असावेत अशा प्रकारचा विचार मांडू. पण सन्माननीय सदस्य श्री.विनायक राऊत यांच्या भाषणामध्ये असल्या कुठल्याही गोष्टी नव्हत्या.

माननीय सदस्य श्री.विनायक राऊत यांचे भाषण आपण जेव्हा खंडित केले तेव्हा मी निषेध व्यक्त करायला पाहिजे होता. पण प्रसंगाचे भान राखून मी गप्प बसलो. येथे सुरू असलेली चर्चा अवमानीत होऊ नये म्हणून मी सभात्याग केला नाही. सन्माननीय सदस्य सर्वश्री रामदास कदम आणि विनायक राऊत या दोघांना बोलण्यासाठी कमी वेळ दिल्यामुळे त्यांनी सभागृह सोडून जाण्याची भावना व्यक्त केली होती. पण त्यापासून त्यांना परावृत्त करण्यात आले. आपला त्यात काहीही उद्देश नसेल. पण आपण थोडा अवधी त्यांना द्यायला पाहिजे होता. एवढे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. कारण माननीय सदस्य हे त्या मार्गावरील दु:ख भोगणारी माणसे आहेत. आपण आणि मी कधी तरी पर्यटक म्हणून कोकणात जाऊ. या चर्चेवर कोणताही परिणाम होऊ नये म्हणून मी ही बाब उचलून धरली नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना सांगू इच्छितो की, या अल्पकालीन चर्चेला दुपारी 1.30 वाजता सुरूवात झाली. त्यावेळी सदर चर्चा माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरासह 2.00 तासात संपविण्याचा निर्णय सभागृहाने घेतला होता. चर्चा सुरू होऊन अडीच तास झाले होते. माननीय सदस्य श्री.विनायक राऊत यांना विचारले असता त्यांनी मला दहा मिनिटे बोलायचे असे सांगितले. दहा मिनिटे होऊन गेल्यानंतर मी एकदा बेल वाजवली. यात कदाचित त्यांचा काही तरी गैरसमज झाला असेल. आता माननीय मंत्र्यांनी उत्तरास सुरूवात करावी.

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ (सार्वजनिक बांधकाम मंत्री) : सभापती महोदय, आज सकाळी जो अपघात झाला आहे ती अतिशय दु:खद घटना आहे. महाकाली ट्रॅव्हल्सची खाजगी बस रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील भरणे गावाच्या जगबुडी नदीच्या पुलावरून खाली कोसळली. अधिकृत माहिती नुसार आता पर्यंत या अपघातात 37 व्यक्ती मृत पावल्या आहेत. त्यात 7 महिला आहेत. तसेच 12 व्यक्ती जखमी झाल्या आहेत. त्यात 2 महिला आहेत. प्राथमिक माहिती नुसार पहाटे बसचालकाचे गाडीवर नियंत्रण न राहिल्यामुळे अपघात झाला असावा असा अंदाज आहे. ही घटना दु:खदायक आहे, अशी भावना या सदनातील सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केली आहे. सन्माननीय सदस्यांनी येथे जे आक्षेप नोंदविले आहेत ते मला मान्य आहेत.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ....

हे पुलाचे काम फार अगोदर झाले पाहिजे होते त्याबद्दल माझ्या मनात शंका नाही.

सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी हा फार जुना पूल आहे, त्यास शंभर वर्षे झालेली आहेत, तो दगडी पूल आहे असे सांगितले. हा फार जुना पूल आहे हे मला मान्य आहे. हा सबमर्सिबल पूल आहे आणि ज्या ज्या ठिकाणी सबमर्सिबल पूल आहेत त्या ठिकाणी पाईपचे रेलिंग असते. आपण जो चौपदरीकरणाचा कार्यक्रम हाती घेतलेला आहे त्यामध्ये नवीन पुलाची देखील योजना आहे.

सभापती महोदय, या अपघाताच्या निमित्ताने आपण पुन्हा मुंबई-गोवा या महामार्गाची चर्चा करीत आहोत आणि ती रास्त देखील आहे. या सदनाचे माजी सदस्य कै.गुरुनाथ कुलकर्णी हे नेहमी अरोंदा-किरणपाणी पुलाच्या संदर्भात वारंवार चर्चा उपस्थित करायचे. अन्य सदस्य देखील त्या पुलाबाबत चर्चा करायचे. त्या पुलासाठी 22 कोटी रुपये खर्च केलेले आहेत. या पुलासाठी गोवा राज्याने देखील काही निधी द्यावयाचा होता परंतु त्यांनी तो दिला नाही म्हणून आपणच सर्व खर्च करुन पुलाचे काम पूर्ण केले. आता त्या पुलाचे उद्घाटन देखील झालेले आहे. पुलाच्या उद्घाटनासाठी गोव्याचे माननीय मुख्यमंत्री देखील उपस्थित होते. या पुलामुळे गोवा आणि कोकणातील मालवण आणि अन्य परिसरातील अंतर 30-40 कि.मीटरने कमी होणार आहे.

सभापती महोदय, तळवणे येथील पुलाच्या कामाचे भूमीपूजन आम्ही केलेले आहे. त्यासाठी चार-पाच कोटी रुपये खर्च आहे. आपण सागरी महामार्गाचे रखडलेले काम पुढे नेण्याचा प्रयत्न केलेला आहे. मागील वर्षी नाबार्डकडून जे 700 कोटी रुपये मिळाले त्यातील 300 कोटी रुपये बाणकोट पुलाच्या बांधकामासाठी ठेवले आहेत. आपण त्या कामाचे भूमीपूजन करुन कामास सुरुवात देखील केलेली आहे. म्हणजे आपण काम पुढे नेण्याचा प्रयत्न करीत आहोत.

सभापती महोदय, मुंबई-गोवा हा महामार्ग केंद्र सरकारच्या अखत्यारितील आहे. या रस्त्याची सर्व कामे केंद्र सरकारने करावयाची आहेत. मी जेव्हा पासून मंत्री झालो तेव्हा पासून या कामासाठी पाठपुरावा करीत आहे. माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार साहेबांना देखील मी मिटींगसाठी घेऊन गेलो होतो. या प्रयत्नामुळे पळस्पे ते इंदापूर या पहिल्या टप्प्याचे काम सुरु झालेले आहे. या कामासाठी जो करार झाला त्यानुसार ठेकेदाराने जून 2014 पर्यंत या रस्त्याचे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ....

काम पूर्ण करावयाचे आहे. साधारणत: 900 कोटी रुपयांचे हे काम आहे. या कामाच्या संदर्भात केंद्र शासनाकडून ज्या काही गोष्टी सुचविण्यात येतात त्याची आपण पूर्तता करतो. केंद्र सरकारने सांगितले की, आम्हाला सुसाध्यता अहवाल तयार करुन द्या. आम्ही तसा अहवाल तयार करुन दिला. पर्यावरणाची मंजुरी मिळण्यासाठी प्रयत्न करावेत, आम्ही स्वत: जाऊन प्रयत्न केले. परंतु शेवटी हे सर्व मंजूर करायचे, त्यासाठी पैसे द्यायचे, त्याला व्हीजीएफ द्यायचा, निविदा काढून त्या मंजूर करायच्या, त्याची ॲग्रीमेंट करायची ही सर्व कामे केंद्र सरकारने करावयाची आहेत. ही कामे लवकर व्हावीत म्हणून आपण प्रयत्न करतो.

सभापती महोदय, मी या पूर्वी देखील सांगितलेले आहे आणि काल पुरवणी मागण्यांच्या वेळी देखील त्याचा उल्लेख झाला असेल, पहिल्या टप्प्यातील चार भागांचे काम अजून शिल्लक आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ....

झाराप-पत्रादेवीच्या रस्त्याचे काम अडले होते. आता ते जवळजवळ पूर्ण केले आहे. पुढील महिन्यात त्याचे उद्घाटन होईल. या कामासाठी 200-250 कोटी रुपये बजेटच्या माध्यमातून उपलब्ध करुन दिले. हे काम इंदापूरपर्यंत सुरु केले आहे. इंदापूर ते झाराप हे 366 कि.मी. लांबीचे अंतर आहे. या अंतराचे चार भाग केले. या चार भागांच्या बाबतीत मे.कन्सल्टींग इंजिनियरींग इडिया प्रायव्हेट लि, आणि मे. सोल्युशन प्रायव्हेट लि. या कंपनीच्या माध्यमातून वेगवेगळे अहवाल तयार करुन ते केंद्राला पाठविले आहेत. या कामी 375 ते 400 कोटी रुपयांची जमीन संपादित करावयाची आहे. भूसंपादान करण्यासाठी केंद्र सरकारने एनएचडीपी-2, एनएचडीपी-3, एनएचडीपी-4 असा कार्यक्रम केला आहे. या कार्यक्रमात जोपर्यंत हे काम येत नाही तो पर्यंत केंद्र सरकार भूसंपादनाचे पैसे देत नाही. हा रस्ता एनएचडीपी-3 मध्ये नव्हता. हा रस्ता त्यात घेण्यासाठी आम्ही प्रयत्न केले. परंतु त्यामध्ये या रस्त्याचा समावेश होऊ शकला नाही. त्यानंतर त्यांनी हा रस्ता एनएचडीपी-4 या कार्यक्रमात समाविष्ट केला आहे. अशाच इतरही अनेक अडचणी आहेत.

महोदय, 4 हजार कोटी रुपयांचे हे काम आहे. माझ्या माहितीनुसार या कामासाठी केंद्र सरकारतर्फे 1250 कोटी रुपयांचा व्हीजीएफ लागणार आहे. शिवाय वेगवेगळ्या चाळण्या कराव्या लागतात. या कामी पर्यावरण विभागाची प्राथमिक स्वरुपाची परवानगी प्राप्त झाली आहे. राज्य सरकारने केंद्राला हेही सांगितले की, हे काम पूर्ण करण्यासाठी आपल्याला वेळ लागत असेल तर राज्य सरकार तो रस्ता करण्यास तयार आहे. परंतु त्यासाठी केंद्र सरकारच्या नियमानुसार आपण राज्य सरकारला मदत करावी. जर हे काम राज्य सरकारला करु द्यायचे नसेल तर किमान तुम्ही तरी ते लवकरात लवकर पूर्ण करावे. महोदय, या कामाची फाईल बऱ्याच महिन्यांपासून केंद्रीय मंत्र्यांकडे आहे. मला आजच निरोप आला की, आज दुपारी 3.00 वाजता माननीय केंद्रीय मंत्री महोदय या विषयी बैठक घेणार होते. त्या बैठकीत हा रस्ता एक्झिक्युशनसाठी महाराष्ट्र सरकारकडे द्यावयाचा की केंद्राने स्वत: करावयाचा या बाबतचा निर्णय ते घेतील.

महोदय, मागे मी सभागृहात सांगितले होते की, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांनी देशातील सर्व राज्यांच्या सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांची बैठक बोलाविली होती. त्या बैठकीत मी या रस्त्याचा मुद्दा उपस्थित केला होता. आम्ही 2004 पासून या महत्त्वाच्या विषयावर बोलत आहोत,

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ....

परंतु त्या बाबत अजूनपर्यंत काहीही कार्यवाही होत नाही, असे मी सांगितले. मी माझ्या भाषेत जी काही टीका करायची होती ती केली. त्या बाबत दिल्ली आणि राज्यातील वर्तमानपत्रात छापून आले. त्यानंतर संबंधित माननीय केंद्रीय मंत्र्यांनी माननीय तत्कालीन मुख्यमंत्री आणि माननीय पंतप्रधान यांच्याकडे माझी तक्रार केली. मी त्यांना सांगितले की, 2004 सालापासून हे काम होत नसल्यामुळेच मी माझे म्हणणे मांडले. केंद्राने त्या रस्त्याचे काम करावे एवढाच माझा उद्देश होता असे सांगितले. त्या नंतर सुध्दा मला या रस्त्याचे काम करु, एवढेच सांगितले गेले.

महोदय, या कामाबाबत सन्माननीय सदस्यांनी चर्चा उपस्थित करायची आणि मी तीच तीच उत्तरे द्यायची असा प्रकार होत होता. त्यानंतर मी सांगितले की, हे काम पूर्ण करण्यासाठी सर्व आमदारांना सामील करुन घेऊ इच्छितो. मी दि.9 मे, 2012 रोजी राज्यातील सर्व आमदार, सर्व केंद्रीय मंत्री आणि सर्व खासदारांना चार पानी पत्र लिहीले. त्या रस्त्यांवर कसे अपघात होतात, काय काय अडचणी निर्माण होतात, आतापर्यंत आम्ही काय काय प्रयत्न केले इ. माहिती त्यात नमूद केली. हे काम होत नाही म्हणून माननीय खासदार व माननीय केंद्रीय मंत्र्यांनी हा प्रश्न संसदेमध्ये किंवा ज्या ज्या ठिकाणी शक्य असेल त्या त्या ठिकाणी लावून धरावा असे आवाहन केले. तसेच हा रस्ता लवकरात व्हावा या कामी आपण सर्वांनी मिळून प्रयत्न करावेत अशीही विनंती केली.

नंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ .....

सभापती महोदय, केंद्राची पार्लमेंटरी पिटीशन कमिटी आहे. सुदैवाने त्या कमिटीचे चेअरमन आपल्या कोकणातील श्री. गिते साहेब आहेत. एके दिवशी मला त्यांचा फोन आला आणि त्यांनी सांगितले की, तुमचे पत्र मिळाले आणि तुमचे जे पत्र आहे तीच तक्रार म्हणून मी माझ्या कमिटीसमोर घेतली आहे. त्या कमिटीचे काम कोर्टासारखे चालते. सह्याद्रीवर त्यांची बैठक झाली. त्या बैठकीमध्ये त्यांनी केंद्रीय सचिवांना बोलविले तसेच रोड डेव्हलपमेंटचे डायरेक्टर जनरल यांनाही संसदीय पिटीशन कमिटीने बैठकीला बोलविले आणि त्यांना विचारले की, तुम्ही काम का करीत नाही ? मंत्री सतत सांगत आहेत, महाराष्ट्र सरकार तुम्हाला सांगत अहे असे असताना तुम्ही काम का करीत नाही ? त्यांनी सांगितले की, आता पहिला जो भाग करीत आहोत त्यामध्ये जवळजवळ 20 हजार किलोमीटरचे काम देशभरामध्ये करीत आहोत, त्यामध्ये हा रस्ता घेतलेला नाही. हे त्यांनी त्या ठिकाणी मान्य केले. त्या कामामध्ये गोवा हायवे नाही असे त्यांनी सांगितले. पुढे त्यांनी असेही सांगितले की, पुढे 40 हजार किलोमीटरचा जो कार्यक्रम ताबडतोब घेत आहोत त्यामध्ये मात्र हा कार्यक्रम आम्ही घेत आहोत. त्यावेळी काय झाले हे मी आपल्याला सांगत आहे.

मला आता असे कळले आहे की, चौपदरीकरणाच्या बाबतीत सध्या दिल्लीमध्ये बैठक सतत सुरु आहे. मला अशी माहिती मिळाली की, जी एक अट होती ती शिथिल करुन बीओटीवर सुसाध्य होणाऱ्या सर्व प्रकल्पांना मान्यता देण्याचा केंद्र शासनाचा प्रयत्न आहे. जे जे बीओटीवर आहेत ते ताबडतोब करा अशा प्रकारचा त्यांचा निर्णय होत आहे.

सभापती महोदय, आपल्याकडून, महाराष्ट्र सरकारकडून आपण पूर्ण प्रयत्न करीत आहोत की, हा रस्ता ताबडतोब झाला पाहिजे. ही अतिशय मोठी गरज आहे. त्या ठिकाणी मोठमोठ्या बसेस, ट्रक्स, मोठमोठे कंटेनर्स यांची प्रचंड मोठी वाहतूक आहे. रात्रीच्या वेळेला या सर्व गाड्या सुटतात. कालचा अपघात सुध्दा रात्रीच्या वेळीच झालेला आहे. हा अपघात पहाटे साडेतीन ते चार वाजण्याच्या दरम्यान झालेला आहे. या पुलाला कठडे आहेत. काही सदस्यांनी सांगितले की, त्या ठिकाणी साईनेज नाहीत. त्या ठिकाणी दोन्ही बाजूने साईनेज वगैरे आहेत. त्या रस्त्याचे फोटो

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ .....

आपल्याकडे आलेले आहेत. त्या पुलावर ती गाडी जवळपास 20 मीटर सरळ आलेली आहे. 20 मीटर गाडी पुढे आल्यानंतर ती रस्ता सोडून खाली गेलेली आहे. थोडासा पूल पास केल्यानंतर त्या गाडीने ट्रॅक सोडला. 20 मीटर आत ती गाडी पुलावर आली आणि त्यानंतर एकदम ती खाली गेलेली आहे.

सभापती महोदय, रात्रीच्या वेळेला मोठ्या गाड्या असतात, बसेस असतात. प्रत्येकाला लवकर पोहोचावयाचे असते, वेळेवर पोहोचावयाचे असते. ड्रायव्हरांच्या बाबतीत सुध्दा या झोपेच्या वेळा असतात. तो ड्रायव्हर जखमी आहे. त्यावेळी तो कोणत्या परिस्थितीमध्ये होता याची माहिती त्याच्याकडून मिळेल. परंतु पोलिसांचा असा रिपोर्ट आहे की, ड्रायव्हरच्या चुकीमुळे त्यांचा कंट्रोल गेलेला आहे. मला यामध्ये कॉन्ट्रॉव्हर्सी उभी करावयाची नाही. एका बाजूला आपण सांगतो की, चौपदरी रस्ता झाला पाहिजे त्याच वेळेला अशा प्रकारे ज्या ठिकाणी चौपदरीकरण झाले आहे त्या ठिकाणी सुध्दा मोठ्या प्रमाणावर अपघात होण्यास सुरुवात झालेली आहे. ही गोष्ट खरी आहे की, आमची जबाबदारी आहे. मी जबाबदारी झटकून टाकू शकत नाही. रस्ते मोठे झालेच पहिजेत. त्यावरची वळणे कमी झाली पाहिजेत. त्यावरील वारंवार अपघात होणाऱ्या ज्या जागा आहेत ते स्पॉट कमी झाले पाहिजेत.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ.....

त्याचबरोबर चौपदरी रस्त्यावरुन इम्पोर्टेड गाड्या अतिशय वेगाने धावत असतात.

पूर्वी 40-50 स्पीडच्या वेगाने गाडी चालली तर आपली गाडी किती वेगाने धावत आहे ते समजत होते. परंतु आता नवीन टेक्नोलॉजीच्या गाड्यांमुळे 80-90 च्या गतीने गाडी चालत असली तरी ते समजत नाही. परंतु अचानकपणे कोणी तरी मध्येच येतो. त्यामध्ये आपली चूक असेल किंवा नसेल. चूक दुसऱ्याची असली तरी त्याच्या चुकीचा फटका आपल्याला बसतो. चौपदरी रस्त्यावरुन, सहापदरी रस्त्यावरुन किंवा 3 लेन वरुन गाड्या कशा चालवावयाच्या असतात त्याचा सेन्स त्या चालकांना असावयास पाहिजे. आपण आपल्या राज्यातील चालकांना त्याची माहिती देऊ शकतो, प्रशिक्षण देऊ शकतो. परंतु अन्य राज्यातूनही राज्यात गाड्या येतात त्यांना कोण शिकविणार ? सार्वजनिक बांधकाम विभागाची जबाबदारी टाळण्यासाठी मी हे वक्तव्य करीत नाही. परंतु चालकांच्या बाबतीत जो काही अहवाल आहे त्यानुसार अपघातांसंबंधी जो अहवाल आहे त्यामध्ये 85 टक्के अपघात हे चालकांच्या चुकीमुळे होतात. कदाचित ते अल्कोहोलच्या नशेमध्ये असतात किंवा रात्रीच्या वेळी झोप लागलेली असते, काही वेळेला कोणी तरी मध्ये येतो, त्याला वाचविण्यासाठी अपघात होतो. याबाबतीत मी एवढेच सांगू इच्छितो की, हा रस्ता लवकरच व्हावा यासाठी सरकार प्रयत्नशील आहे.

मी नुकताच कोकणामध्ये गेलो होतो. 4 हजार कोटी रुपयांचा रस्ता होईल तेव्हा होईल. निदान या रस्त्यावर जे पूल आहेत ते रस्त्याचा भाग समजून त्यांचे नव्याने बांधकाम सुरु करावे अशा प्रकारची सूचना काही सन्माननीय सदस्यांनी केलेली आहे. मी या सूचनेबाबत जरुर विचार करीन व केंद्र सरकारकडे आग्रह धरणार आहे. त्या पुलांचे डिझाईन तयार आहे. निदान ते पूल बांधण्यासाठी आम्हाला परवानगी द्यावी. ते पुलांचा समावेश मूळ कार्यक्रमात करावा. हे पूल बांधण्यासाठी शासनाला मदत करावी अशा प्रकारची मागणी घेऊन आम्ही केंद्र सरकारकडे जाऊ. मला हेही सांगितले पाहिजे, अनेक खासदारांनी संसदेमध्ये हा विषय मांडलेला आहे. मी व माननीय मुख्यमंत्री आणि कोकणातून निवडून येणारे माननीय उद्योग मंत्री श्री.नारायण राणे यांनी माननीय केंद्रीय मंत्री श्री.पी.सी.जोशी यांना धाराप ते पत्रादेवी व इतर कामे लवकर करावीत असे सांगितले पाहिजे. ते मंत्री महोदय मुंबईला आल्यानंतर सह्याद्रीवर बैठक झाली होती. त्यावेळी मी

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/

श्री.छगन भुजबळ....

या रस्त्याबाबत त्यांना सांगितले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनीही सर्व शक्तीनिशी या गोष्टी मांडल्या आहेत. तेथे उपस्थित असलेल्या राज्याच्या मंत्री महोदयांनी आणि खासदारांनी सुध्दा या रस्त्याचे काम लवकर झाले पाहिजे असे सांगितले आहे. धाराप ते पत्रादेवी पर्यंतच्या कामाला पैसे कमी दिले होते. परंतु त्याचे पैसे दिल्यानंतर कंत्राटदाराने ते काम पूर्ण केलेले आहे. पण बाकीची कामे कुर्मगतीने सुरु आहेत.

मी पुन्हा एकदा राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांना घेऊन आज जी घटना घडली आहे ती केंद्रीय मंत्री महोदयांसमोर नेईन. राज्याच्या खासदारांना सांगेन की, राज्यात कोणाचेही शासन असले तरी लोकांना न्याय मिळत नसेल तर त्यासाठी संसदेत आवाज उठवावा लागेल, बोलावे लागेल, लढावे लागेल. त्यासाठी सर्व खासदारांची मी मदत सुध्दा घेईन. हे काम होण्यासाठी सन्माननीय सदस्य जे जे सांगतील ते ते करण्याची माझी तयारी आहे. मी प्रामाणिकपणे प्रयत्न करीत आहे. ज्या अपघाती घटना झाल्या आहेत त्या दु:खद घटना आहेत. या घटनेत 38 लोक मरण पावले आहेत. जे लोक अपघात मरण पावतात त्यांच्या कुटुंबीयांचे भविष्य अंध:कारमय होऊन जाते. मनुष्य जातो, पण कुटुंबीयांना आयुष्यभर दु:खामध्ये सोडून जातो.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. छगन भुजबळ...

अशा या सगळया गोष्टी आहेत. या चर्चेला माननीय मुख्यमंत्री उत्तर देणार होते. परंतु विधानसभेमध्ये काही प्रश्न उद्‌भवल्यामुळे मी उत्तर दिलेले आहे. मी हेही सांगू इच्छितो की, जेव्हा आवश्यकता असेल त्यावेळी आपणा सर्वांना दिल्लीला घेऊन जाऊन तेथे बैठक मारल्या शिवाय राहाणार नाही.

श्री. रामदास कदम : कोकणाच्या बाबतीत केन्द्र सरकार किती उदासीन आहे हे आता मंत्री महोदय श्री. छगन भुजबळ यांनी सांगितले. माझी त्यांना विनंती आहे की, केन्द्र सरकार पैसे देईल अथवा न देईल किमान जगबुडी नदीवरचा पूल तातडीने बांधणे आवश्यक आहे. हा पूल जुना झालेला आहे. एकाच वेळी पाच-सहा गाड्या तेथे आल्या तर फार मोठा भयानक असा अपघात होईल. हा पूल व्हावा म्हणून मी आंदोलन देखील केले होते. तेव्हा खास बाब म्हणून राज्य शासनाच निधीतून हा पूल तातडीने बांधून द्यावा अशी माझी विनंती आहे.

श्री. छगन भुजबळ : हा एकच नाही तर अशा प्रकारच्या दोन-चार पुलांना प्राधान्य देऊन ते पूर्ण करण्याची गरज आहे. या पुलाच्या बाबतीत मी केन्द्र सरकारशी निश्चितच बोलेन. त्यानंतर काय करता येईल ते मी जरुर सांगेन.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान (सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, ही दुर्दैवी घटना आज पहाटे 3 वाजून 20 मिनिटांनी घडली. नुकत्याच प्राप्त झालेल्या माहिती प्रमाणे या अपघातामध्ये 37 लोकांचा मृत्यू झालेला आहे. 31 शवांचे शवविच्छेदन झालेले आहे. माननीय आरोग्यमंत्री घटनास्थळी गेलेले आहेत. 14 लोक कळमणी रुग्णालयात गेले होते. त्यापैकी 8 जणांना डिस्चार्ज दिलेला आहे. एक जण सिरियस असून उपचार चालू आहेत. 5 जणांवर उपचार चालू आहेत. ते गंभीर नाहीत. अशी या रुग्णालयातील स्थिती आहे. मुंबईला दोन लोक रेफर झालेले आहेत. डेरवण रुग्णालयामध्ये 10 लोक रेफर झालेले आहेत.

या ठिकाणी ट्रामॉ केअर सेंटरच्या बाबतीत विचारणा करण्यात आली. राज्यात एकूण 110 ट्रॉमा केअर सेंटर्स आहेत. पूर्वीची 68 ट्रॉमा सेंटर्स कार्यरत आहेत.

श्री. रामदास कदम : माननीय मंत्री महोदयांनी कोकणाच्या संदर्भातील माहिती द्यावी.

प्रा. फौजिया खान : ट्रॉमा केअर सेंटर्स् बाबत शासनाने काय पावले उचललेली आहेत ते मला येथे सांगावे लागेल. कोकणामध्ये अलिबाग, पनवेल, महाड, चिपळूण, संगमेश्वर, रत्नागिरी, कणकवली आणि सावंतवाडी येथे ट्रॉमा केअर सेंटर्स आहेत. हे ट्रॉमा केअर सेंटर्स जवळ जवळ व्हावेत यासाठी बृहत आराखडयामध्ये ते वडखळ नाका, पळवणी, राजापूर आणि तराळा या ठिकाणी प्रस्तावित केलेले असून लवकरच त्यांचे काम सुरु होइल. बृहत आराखड्यामध्ये मंजूर झालेले कोकणातील सर्व ट्रॉमा केअर सेंटर्स हे पहिल्या टप्प्यामध्ये येतील.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखाही नाही

प्रा.फौजिया खान...

सभापती महोदय, आज वेगवेगळया ठिकाणच्या परिस्थिती बाबत मी माहिती सांगू इच्छिते. मी सर्व माहिती सदनासमोर सांगणार आहे. एकाच वेळी सर्व प्रश्नांची माहिती मला सांगणे शक्य होणार नाही. एकेका रुग्णालयाच्या बाबतीतील माहिती मी देऊ शकते. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी कळंभणी येथील रुग्णालयांच्या बाबतीत अनेक वेळा मुद्दा सभागृहात उपस्थित केलेला आहे. मी या रुग्णालयाच्या बाबतीत सांगू इच्छिते की, या रुग्णालयात पदे भरण्यात आलेली आहेत. आजच्या परिस्थितीत तेथे एक सुपरीडेंट आहे आणि 14 पदे मंजूर करण्यात आलेली आहेत. त्यातील 10 पदे भरण्यात आलेली आहेत. आजच्या परिस्थितीत त्या रुग्णालयात फक्त 6 कर्मचारी कार्यरत आहेत, तीन कर्मचारी ॲबस्कॉंडींग आहेत. या ॲबस्कॉंडींग कर्मचाऱ्या विरुध्द कायदेशीर कारवाई सुध्दा प्रस्तावित केलेली आहे. त्या कर्मचाऱ्यांना सेवेतून कमी करण्यात येईल. 1 कर्मचारी दीर्घ मुदतीच्या रजेवर आहे.

श्री.रामदास कदम : हे रुग्णालय 30 खाटांचे होते, ते आता 100 खाटांचे झालेले आहे. त्यावेळी आपण नव्याने 62 पदे मंजूर करुन घेतलेली आहेत. माझ्याकडे कर्मचारी मंजुरीचे पत्र उपलब्ध आहे. या 62 मंजूर पदांपैकी प्रत्यक्षात किती पदे भरली आहेत व किती पदे रिक्त आहेत ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मी तीच माहिती या ठिकाणी देत आहे. या रुग्णालयात मंजूर पदे 94 आहेत. त्यातील 51 पदे भरण्यात आलेली आहेत. मेडीकल ऑफिसरच्या बाबतीत माहिती देऊ इच्छिते. यात गायकॉनॉलॉजीस्ट, पेडियाट्रिशन आहेत, अर्थोपेडीक सर्जन भरलेले होते, अनॅस्थेसीस्ट आहे, परंतु या विभागामध्ये खरोखरच वैद्यकीय अधिकाऱ्यांचा मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. या पदांच्या संदर्भात मागच्या वेळी जाहिरात दिली होती, त्यावेळी उमेदवारांची निवड करुन त्यांना नेमणुकीचे आदेश दिलेले आहेत, परंतु ते या ठिकाणी हजर होत नाहीत. जे उमेदवार हजर होतात ते नंतर फरार होऊन जातात. पदे भरण्याबाबतचा प्रश्न कायमचा आहे ही गोष्ट मी नाकारु शकत नाही. आपण त्यासाठी अशा प्रकारची उपाययोजना केली आहे की, त्या विभागातील रुग्णालयातील रिक्त असलेली मेडीकल ऑफिसरची पदे प्राधान्याने भरली जावीत यासाठी जो कोणी डिप्लोमा झालेला उमेदवार असेल तर त्यास तीन वेतनवाढी

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान...

अधिकच्या देण्याच्या बाबतीत निर्णय घेतला आहे. ज्या उमेदवाराने डिग्री घेतली असेल त्यास सहा वेतनवाढ देण्याचा निर्णय घेतलेला आहे. ते उमेदवार परीक्षेत मेरीटमध्ये आले नसतील, त्यांना प्राधान्य देऊन त्यांना मेरीटमध्ये आणून ती पदे भरण्यासंबंधीचा निर्णय घेतलेला आहे. तशा पध्दतीची भरती देखील करण्यात आली, परंतु निवड झालेले उमेदवार या विभागातील रुग्णालयांमध्ये हजर होत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. हा लॉंग टर्म विषय असला तरी त्या बाबतची माहिती रेकॉर्डवर आणणे गरजेचे आहे असे मला वाटते. या भागामध्ये मेडीकल कॉलेज होणे खूप आवश्यक आहे. याचा शासन स्तरावर विचार व्हावा असे मला वाटते.

महोदय,या रुग्णालयात 4 एमबीबीएस मेडीकल ऑफिसर कार्यरत आहेत. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी सांगितले हे 100 खाटांचे रुग्णालय अपघाताच्या ठिकाणापासून फक्त पाच कि.मी.अंतरावर आहे. त्यांनी दिलेली माहिती बरोबर आहे. त्या रुग्णालयातील सिव्हील सर्जनकडून ऑपरेशन थिएटर संदर्भात माहिती घेतली आहे. ऑपरेशन थिएटर व्यवस्थितपणे चालू आहे. त्या ठिकाणी विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया केल्या जात आहेत. त्या रुग्णालयातील आयसीयू युनीट मात्र कार्यरत नाही. तेथे फिजिशियन मिळत नाहीत म्हणून आयसीयू युनीट कार्यरत नाही असे त्या मागचे कारण आहे. फिजिशियन मिळण्यासाठी बऱ्याच वेळा जाहिराती देण्यात आल्या आहेत. फिजिशियन पदासाठी 1 लाख रुपये पगार शासन देण्यासाठी तयार आहे. जर त्या विभागात कोणी फिजिशियन या पदावर काम करण्यास तयार असेल तर ती बाब माझ्या निदर्शनास आणून द्यावी. त्या फिजिशियनला 1 लाख रुपये पगार देऊन त्याची तातडीने नेमणूक करु. फिजिशियन अभावी आयसीयू युनीट कार्यरत होऊ शकलेले नाही. या रुग्णालयात सर्व प्रकारच्या सुविधा आहेत. या ठिकाणची पदे भरण्याच्या बाबतीत सर्व प्रकारचे प्रयत्न करण्यात आले आहेत व यापुढे देखील करणार आहोत. कोकण विभागास प्राधान्य देऊन स्पेशालिस्ट केडर निर्माण करुन पदे भरण्याचा आम्ही प्रयत्न करतो आहोत.

महोदय, या रुग्णालयाकडून सर्व प्रकारच्या रुग्णांची चांगल्या प्रकारे काळजी घेण्यात येत आहे. अपघाताच्या ठिकाणी सर्व सिनियर ऑफिसर उपस्थित आहेत. अपघातग्रस्त रुग्णांच्या उपचारामध्ये कमतरता आहे अशी मुळीच परिस्थिती नाही.

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

प्रा.फौजिया खान.....

नर्सेसची पदे 25 मंजूर असून त्यापैकी 22 पदे भरली आहेत व 3 पदे रिक्त आहेत. इतर पदांबाबतची माहिती मी पटलावर ठेवू शकते. सध्या नर्सेस व डॉक्टरांची पदे महत्वाची असल्यामुळे त्या बाबतची माहिती मी दिलेली आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की 94 पदे मंजूर असून त्यापैकी 50 पदे भरली आहेत. म्हणजे 44 पदे आजही रिक्त आहेत. त्यामुळे रुग्णांना त्या रुग्णालयात ट्रिटमेंट कशी मिळणार?

प्रा.फौजिया खान : प्रामाणिकपणे सगळी पदे त्वरित भरण्याचा प्रयत्न करीत आहोत. यात जी अडचण येत आहे ती मी सभागृहापुढे मांडली आहे. ही अडचण दूर करण्यासाठी आम्ही वेतन वाढवून देण्यास तयार आहोत, वेतनवाढ देण्यास तयार आहोत.

श्री.रामदास कदम : कालपर्यंत शासनाने ज्या डॉक्टरांची तेथे नेमणूक केली ते डॉक्टर निवासाची व्यवस्था नसल्यामुळे रुजू होण्यास तयार नव्हते. मूळ कारण निवास व्यवस्थेचे आहे, ते मंत्री महोदयांनी सांगितले नाही. निवासस्थाने बांधण्याचे काम जवळजवळ 95 टक्के पूर्ण होत आले आहे. उर्वरित काम तातडीने आठ दिवसात पूर्ण केले तर डॉक्टरांची निवासव्यवस्था करता आली तर नेमणूक दिलेले डॉक्टर तेथे काम करण्यास उत्सुकता दाखवू शकतील. उर्वरित रिक्त पदे तातडीने भरण्याचे काम केले जाईल काय?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मी जी माहिती सभागृहाला देणार होते ती माहिती माननीय सदस्यांनी अगोदरच दिलेली आहे. वर्ग 1 आणि 2 च्या निवासस्थानांचे काम पूर्ण होत आले आहे. वर्ग 3 आणि 4 च्या निवासस्थानाचे काम सुरु आहे. सगळ्या प्रकारची निवासस्थाने तेथे उपलब्ध होणार आहेत. पदे भरण्यासाठी युध्द पातळीवर प्रयत्न करीत आहोत. तातडीने पदे कशी भरता येतील यासाठी प्रयत्नशील आहोत.

सभापती महोदय, कामथे येथील ट्रॉमा केअर युनिटचे काम पूर्ण होत आले आहे. 1.26 कोटी रुपये मंजूर केले होते, त्यापैकी 1.09 कोटी रुपये खर्च झालेला आहे. डिसेंबर, 2013 पर्यंत हे ट्रॉमा केअर युनिट सुरु होईल. संगमेश्वर येथील ट्रॉमा केअर युनिटसाठी 1.11 कोटी रुपये मंजूर केले होते, त्यापैकी 1.07 कोटी रुपये खर्च झालेला आहे. हे ट्रॉमा केअर युनिट एका महिन्याच्या आत सुरु होईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान.....

सभापती महोदय, कणकवली आणि सावंतवाडी येथील ट्रॉमा केअर युनिटचे काम मास्टर प्लॅनमध्ये घेण्यात आले आहे. प्राधान्याने ही कामे सुरु करु. सावंतवाडी येथील ब्लड बँक एका महिन्यात सुरु होईल. ओरोस येथे ब्लड सेप्रेशन कॉम्पोनन्ट युनिट कार्यरत आहे. महाडच्या रुग्णालयाबाबत महत्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. 3.99 कोटी रुपये मंजूर केले होते, त्यापैकी 3.91 कोटी रुपये आतापर्यंत खर्च झालेला आहे. सगळी इक्वीपमेंट देण्यात आली आहेत. हे काम दोन महिन्याच्या आत पूर्ण होईल, त्यानंतर हे रुग्णालय सुरु होऊ शकेल. क्षुल्लक बांधकाम शिल्लक राहिले आहे. यासाठी निधीची अजिबात कमतरता नाही.

सभापती महोदय, पनवेल येथे 100 खाटांच्या रुग्णालयाला मंजुरी दिली आहे. त्या रुग्णालयाचे बांधकाम लवकरच सुरु होईल. सध्या 20 खाटांचे रुग्णालय आहे. वडखळ येथील रुग्णालयासाठी अद्याप जागा उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे तो प्रश्न मार्गी लागलेला नाही. जागा उपलब्ध झाल्यानंतर तेथील रुग्णालयाचे काम सुरु होईल. ट्रॉमा केअर युनिटबाबत जे काही प्राधान्याने करता येण्यासारखे आहे ते करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. याशिवाय राज्यात जे महत्वाचे प्रकल्प आहेत, त्यात इमर्जन्सी मेडिकल सेवा पुरविण्यासाठी ईएमएस सिस्टिम सुरु करीत आहोत. या कार्यक्रमांतर्गत अत्याधुनिक ॲम्ब्युलन्स संपूर्ण राज्यात उपलब्ध होणार आहेत.

नंतर 3टी.1...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

प्रा.फौजिया खान ....

वेगवेगळया स्पॉटची निश्चिती झालेली आहे व त्या स्पॉटवर अत्याधुनिक ॲम्ब्युलन्सची योजना शेवटच्या टप्प्यात असून ही लवकरच लाँच होणार आहे.

सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांची भावना लक्षात घेऊन मी सांगू इच्छिते की, आरोग्य संचालकाला त्या ठिकाणी तत्काळ पाठवून डॉक्टर्स, कर्मचारी हॉस्पीटलमध्ये उपस्थित राहतील तसेच ऑपरेशन थिएटर्स, आयसीयू सुरु करण्याची सूचना संचालकांना दिली जाईल व ही सर्व व्यवस्था दि. 28.3.2013 पर्यंत मार्गी लावली जाईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी बस चालकाने प्रोफार्मा भरला होता की नव्हता एवढया पुरती माहिती माननीय परिवहन मंत्र्यांनी द्यावी अशी विनंती केलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी प्रोफार्मा भरण्याच्या संदर्भात अतिशय महत्वाची सूचना केली असून या संदर्भात तातडीने कार्यवाही केली जाईल ,एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. रेग्युलर प्रोफार्मा भरण्याची व्यवस्था केली तर बसमध्ये प्रवासी किती आहेत, त्यांचा पत्ता काय आहे याची माहिती आपल्याला कायमस्वरुपी उपलब्ध राहील व अशा प्रकारची व्यवस्था करण्यात येईल. ही व्यवस्था लागलीच सुरु करण्यासाठी सूचना दिल्या जातील. या अपघातामध्ये परिवहन विभागाच्या ज्या त्रुटी असतील त्या दुरुस्त केल्या जातील व त्यामध्ये जे कोणी जबाबदार असतील अशा जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल. आज ज्या वाहनाचा अपघात झालेला आहे, त्याची माहिती घेऊन त्यामध्ये ज्या काही त्रुटी असतील त्या दूर करुन संबंधित वाहन मालकावर योग्य ती कारवाई केली जाईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आता 15मिनिटांचे मध्यंतर घ्यावे, अशी सर्व सदस्यांची मागणी आहे.

तालिका सभापती (श्री. मोहन जोशी) : कालच्या कामकाज पत्रिकेतील विरोधी पक्षाच्या नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते ऑन लेग होते व त्यांचे भाषण झाल्यानंतर उत्तराला सुरुवात केली जाईल. यानंतर पुरवणी मागण्यांवरील चर्चा घेतली जाईल.

आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होऊन सायंकाळी 5.15 वाजता पुन्हा भरेल.

(4.53 ते 5.15 पर्यंत मध्यंतर)

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरा नंतर)

सभापती स्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी.

पृ.शी. : वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांनी परीक्षेच्या कामांवर घातलेला बहिष्कार

मु.शी. :वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांनी परीक्षेच्या कामांवर घातलेला बहिष्कार या विषयावर सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र.पाटील, चंद्रकांत पाटील, डॉ.दीपक सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री रामनाथ मोते, सुमंतराव गायकवाड, ॲड.आशिष शेलार, ॲड. अनिल परब, डॉ.रणजित पाटील, सर्वश्री नागो गाणार, भगवान साळुंखे, कपिल पाटील वि..प.स.यांचा प्रस्ताव.

(प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.....

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, म.वि.प.नियम 260 अन्वयेच्या शिक्षण विषयक प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे. काल या प्रस्तावावरील चर्चेला सुरूवात झाली. वेळे अभावी ही चर्चा पुढे ढकलण्यात आली. मी ऑन लेग होतो. त्याच विषयाची चर्चा मी आता पुढे सुरू करीत आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावाच्या निमित्ताने अनेक माननीय सदस्यांनी विविध विषयांसंबंधी आपले मनोगत व्यक्त केले आहे. मी दोन भागांमध्ये माझे मनोगत व्यक्त करणार आहे. सातत्याने आमच्याकडून अपेक्षा व्यक्त केली जाते की, आम्ही शिक्षकांच्या वेतनासंबंधात किंवा अन्य समस्यां संबंधात बोलतो. आम्ही गुणवत्तेसाठी देखील सातत्याने प्रयत्न करीत असतो. म्हणून मी माननीय मंत्र्यांना विनंती करणार आहे की, आपल्या राज्यामध्ये विषय संघटनांना खूप महत्व आहे. या विषय संघटनांचे बळकटीकरण करणे, सक्षमीकरण करणे आवश्यक आहे. या विषय संघटनांच्या माध्यमातून वेगवेगळ्या प्रकारचे उपक्रम राबवून त्या त्या विषयाच्या शिक्षकांचे उद्बोधन व प्रबोधन होणे खूप आवश्यक आहे. शिक्षण संचालकांच्या बैठकीमध्ये देखील हा विषय मी मांडला होता. त्याची दखल घेण्यात आली, पण कार्यवाही काहीच झाली नाही. ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

मी फक्त थोडक्यात मुद्दे मांडणार आहे. जिल्हा व राज्य स्तरावर विषय संघटनांचे बळकटीकरण करण्यासाठी आपण काय करणार आहात ? गणित व विज्ञान हे कठीण वाटणारे विषय आहेत. नुकतेच मी कल्याण येथे गणित अध्यापकांचे राज्य स्तरिय दोन दिवसांचे शिबिर घेतले. गणित हा विषय हसतखेळत कसा शिकवावा यासाठी शिबिर घेतले होते. राज्यातील जवळ जवळ 800 शिक्षक या कार्यक्रमाला उपस्थित होते. हा अत्यंत चांगला कार्यक्रम झाला. त्याद्वारे शिक्षकांना चांगले उद्‌बोधन झाल्यामुळे त्याचा देखील विचार व्हावा असे मला सुचवायचे आहे.

आपण शालेय स्तरावर एनसीसी हा विषय सुरू केला होता. तो विषय का बंद केला हे मला कळत नाही. स्काऊट आणि गाईड हा ऐच्छिक विषय आहे. विद्यार्थ्यांवर खऱ्या अर्थाने संस्कार करायचे असतील, विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण जोपासायचे असतील, त्यांचा व्यक्तिमत्व विकास करायचा असेल तर स्काऊट आणि गाईड हा विषय अनिवार्य केला पाहिजे. तो ऐच्छिक ठेवता कामा नये. हा विषय अनिवार्य करण्यासंबंधी शासनाने विचार करावा अशी माझी सूचना आहे.

सर्व शिक्षा अभियान योजने अंतर्गत होणारी गट संमेलने हा फार्स आहे. मी अनेक गट संमलेनांना भेटी दिलेल्या आहेत. अगदी 100 टक्के फार्स आहे असे देखील नाही. काही ठिकाणी चांगले उपक्रम होतात. ओव्हर ऑल यात शिक्षकांच्या वेळेचा अपव्यय आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होते. राजकीय पुढाऱ्याला बोलावून हार-गुच्छ देऊन स्वागत केल्यानंतर हा कार्यक्रम संपतो. या गट संमलेना पेक्षा आपण वेगळा उपक्रम द्यावा. त्याचा उपयोग खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांना होईल.

मध्यंतरी मी आपल्याला जीवन शिक्षणा संबंधीचा ठराव दिला होता. आमचे खऱ्या अर्थाने उद्‌बोधन करायचे असेल, बदलत्या युगात, स्पर्धेच्या युगात आपले ज्ञान अपडेट करायचे असेल तर जीवन शिक्षण आणि शिक्षण संक्रमण या मासिकां शिवाय पर्याय नाही. यासंबंधीचा प्रस्ताव मी राज्य शासनाला, माननीय शिक्षण मंत्र्यंना दिला होता.

यानंतर श्री.अजित....

अशुद्धीत मूल / शीघ्रलेखापाठी नाही

श्री.रामनाथ मोते.....

जीवन शिक्षक मासिक आणि शिक्षण संक्रमण मासिक शाळेत आणि ग्रंथालयात देण्यापेक्षा ती मासिके शिक्षकांच्या घरी पाठविली तर शिक्षकांना ती घरी वाचता येतील आणि त्यातून शिक्षकांचे चांगले उद्बोधन होऊ शकेल. त्यांना अनेक चांगल्या उपक्रमांची माहिती मिळू शकेल. ही मासिके शिक्षकांच्या घरी पाठविण्या संदर्भात मी काही अधिकाऱ्यांशी चर्चा केली. त्यांनी मला सांगितले की, शिक्षकांसाठी लाखो अंक काढणे, त्याचे पोस्टींग करणे, रजिस्टर्ड ठेवणे इत्यादी बाबी कराव्या लागतील. परंतु मी सांगू इच्छितो की, त्यामुळे 100 लोकांना रोजगार मिळू शकेल. आपण हा उपक्रम सुरु केल्यास आमच्या शिक्षकाच्या दारापर्यंत हा चांगला उपक्रम पोहचू शकेल. शिक्षकांनी ही मासिके शाळेत आणि ग्रंथालयात वाचावीत अशाप्रकारची अपेक्षा आपण करु नये. ती मासिके शिक्षकांच्या घरी आल्यास शिक्षक त्यांचे वाचन करुन त्याचा लाभ विद्यार्थ्यांना देऊ शकतील.

सभापती महोदय, आपण दरवर्षी शंभर शिक्षकांचा गौरव करतो. केंद्र शासनाच्या राष्ट्रपती पुरस्काराने शिक्षकांना गौरविण्यात येते. आपण राज्य स्तरावर देखील शेकडो शिक्षकांचा गौरव करतो. आपण हे पुरस्कार खिरापत म्हणून वाटत नाही. शिक्षकांची गुणवत्ता विचारात घेऊन त्यांना पुरस्काराने सन्मानित करतो. शिक्षकांमध्ये गुणवत्ता आहे म्हणूनच आपण त्यांना पुरस्काराने सन्मानित करतो. पुरस्कारप्राप्त शिक्षकांनी वेगवेगळे उपक्रम राबविले आहेत. आपल्या राज्यात असे हजारो शिक्षक आहेत. आपण या शिक्षकांचा उपयोग करुन घेणार आहात की नाही ? आमच्या ठाणे जिल्ह्यामध्ये वाजपेयी सर, टिळक सर आहेत. श्री.सर्जेराव जाधव हे बोर्डाचे संचालक झालेले आहेत. या सर्व शिक्षकांमध्ये चांगल्या तऱ्हेची उपक्रमशीलता आहे. ही सर्व माणसे वेगवेगळी उपक्रम राबविणारी आहेत. आपणास त्यांची मते विचारात घेता येतील काय याचा विचार केला पाहिजे. शिक्षण क्षेत्रातील आणि शिक्षण क्षेत्रा बाहेरील व्यक्तींचा तसेच निवृत्त झालेल्या मुख्याध्यापकांचा, शिक्षकांचा विचार जाणून घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आपण आता संगणकीय युगात आहोत. सर्व कामकाज संगणकाच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न करीत आहोत. राज्य शासनाने संच मान्यता संगणकीय केलेली आहे. परंतु आपण अन्य बाबतीतही अजून मागे आहोत, तेव्हा त्याकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे. मी आपणास कोल्हापूर येथील उदाहरण सांगतो. कोल्हापूर विभागातील एकाही शाळेचा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.....

मुख्याध्यापक किंवा कनिष्ठ किंवा वरिष्ठ लिपिक पे-युनिटमध्ये पगाराचे देयक देण्यासाठी जात नाहीत. त्यांनी सर्व ऑन-लाईन केलेले आहे. ते शाळेमध्ये बसून ऑन-लाईनद्वारा पे-बील पाठवितात आणि हार्ड कॉपी नंतर चार-आठ दिवसांनी पाठवितात. थोडीफार दुरुस्ती असेल तर लगेच दुरुस्त करतात. ऑन-लाईन पध्दतीमुळे मुख्याध्यापकांचा आणि लिपिकांचा एक दिवसाचा वेळ वाचत आहे. त्याशिवाय ऑन लाईन पध्दतीमुळे कागदपत्रे रंगविण्याची काही आवश्यकता नाही. आम्हाला भविष्य निवार्ह निधीची माहिती पाहिले असेल तर ती एका मिनिटामध्ये मिळते. कोल्हापूर विभागामध्ये जी ऑन-लाईन पध्दत राबविण्यात आलेली आहे तशी पध्दत राज्यभर सुरु करता येईल काय याचा विचार करण्यात यावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, माझी राज्यमंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, आपणास ज्या गोष्टी करणे शक्य नसेल तर तसे स्पष्ट सांगावे. आम्ही त्यासाठी आग्रह धरणार नाही. मग आम्ही न्यायालयात जायचे किंवा अन्य कोठे जायचा याचा विचार करु. नाही तरी आता शालेय शिक्षणा संदर्भातील बहुतेक निर्णय न्यायालयात होत आहेत. न्यायालयाच्या निर्णयाचा कधी शासन आधार घेत आहे तर कधी आम्ही आधार घेत आहोत.

सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी मूल्यांकनाच्या संदर्भात जे आश्वासन दिले होते त्याची त्यांना आठवण करुन देतो. विनाअनुदानित शाळांतील शिक्षक आंदोलन करीत आहेत त्यांनी आत्मदहनाचा इशारा दिलेला आहे. त्यांनी इतकी टोकाची भूमिका घेण्याचे कारण काय ? कारण त्यांचा आमच्यावर विश्वास नाही आणि त्याही पेक्षा त्यांचा मंत्रिमंडळावर व मंत्री महोदयांवर विश्वास नाही. दिनांक 13.12.2012 रोजी माननीय महोदयांनी या सभागृहात आश्वासन दिले होते की, "हे अधिवेशन संपण्याच्या अगोदर या विषयामध्ये जो बदल करावयाचा आहे, तो निश्चितपण जाहीर करु, एवढेच मी या ठिकाणी सांगू इच्छिते." त्यापूर्वीही दिनांक 7 ऑगस्ट रोजी बैठक झाली होती. पण अजूनही त्याबाबत निर्णय झालेला नाही. तेव्हा माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, या प्रश्नाच्या संदर्भात आमची फसवणूक करु नका. शिक्षकांची फसवणूक करु नका आणि त्यांना अशाप्रकारे टोकाची भूमिका घ्यायला लावू नका. तेव्हा मूल्यांकनाचे निकष बदलण्याच्या संदर्भात तातडीने निर्णय घेऊन हा प्रश्न मिटवून टाकावा.

यानंतर श्री.बोर्डे...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

महोदय, या राज्यात पट पडताळणीच्या अनुषंगाने दि.2 मे, 2012 रोजी जी.आर.काढण्यात आला. त्यानुसार या राज्यात पट पडताळणीच्या अनुषंगाने अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांना समायोजित करण्यासाठी भरतीवर राज्यभर बंदी आणली. मी या बाबतचा विषय उपस्थित केला होता. मी असा विषय उपस्थित केला की, दि. 2 मे, 2012 पूर्वीच्या ज्या नेमणुका आहेत त्यांना मान्यता देण्यात काय अडचण आहे ? आम्ही या बाबत संचालकांना सांगितले व पटवून दिले. त्यांनी या बाबत आदेश काढला. हा आदेश काढल्यानंतर राज्याच्या विद्वान शिक्षण सचिवांनी आदेश दिले की, पट पडताळणीचा निर्णय होईपर्यंत मागील नेमणुकींना मान्यता देऊ नका. महोदय, 2 मे, 2012 पूर्वीच्या ज्या शिक्षकांना नेमणुका दिल्या होत्या त्यांच्या मान्यता रद्द करुन त्या नेमणुकांना स्थगिती दिली.

राज्यामध्ये दि.2 मे, 2012 च्या आदेशानुसार भरतीवर बंदी होती तर राज्यात एकाही जिल्ह्यात शिक्षक किंवा शिक्षकेतर कर्मचाऱ्याच्या नेमणुकीला मान्यता मिळावयास नको होती. आमच्या भागातील शिक्षणाधिकारी श्रीमती सुमन शिंदे यांनी 214 पदांना मान्यता दिली. धुळे, अमरावती, नागपूर अशा अनेक जिल्ह्यांमध्ये या पदांना मान्यता दिली आहे. या बाबत जर राज्यभर बंदी होती तर कोठेच मान्यता द्यावयास नको होती आणि जर बंदी नव्हती तर 2012-2013 च्या ज्या पदांना शिक्षणाधिकाऱ्यांनी मान्यता दिली नाही त्यांना निलंबित करावे. शासनाने कृपया दोन्ही दगडांवर पाय ठेवू नये. मी तर म्हणेन की, शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना शिक्षण मंत्री आणि शिक्षण राज्यमंत्र्यांचा काहीच धाक राहिला नाही. त्यांनी दि.2 मे, 2012 रोजीचा आदेश कचरा पेटीत टाकला. पाकिटे घेऊन 200-300 पदांना मान्यता दिली. सदरहू जी.आर. नुसार भरतीवर बंदी असताना कोणत्या शिक्षणाधिकाऱ्यांनी ही पदे भरण्यास मान्यता दिली आणि कोणी दिली नाही या बाबतची माहिती मिळाली पाहिजे. ज्यांनी परवानगी दिली नाही त्यांच्यावर किंवा ज्यांनी परवानगी दिली त्यांच्यावर कारवाई करावी.

महोदय, पायाभूत पेक्षा वाढीव पदांचा एक विषय आहे. मी मागे चर्चेच्या वेळी राज्यामध्ये ही पदे नाहीत असे सांगितले होते. मंत्री महोदयांनी ते उत्तरामध्ये मान्य केले होते. आपण अजून किती वर्षे या पदाला मान्यता देणार नाही ? चार-चार वर्षे मान्यता देणार नाही काय ? 2008 ते 2013 पर्यंतच्या पदांना मान्यता दिली नाही. 2011-2012 या वर्षातील प्रस्ताव संचालकांकडून

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

प्राप्त झालेले नाहीत. मी या बाबत संचालकांना विचारणा केली असता मला अशी माहिती देण्यात आली की, सन 2011-2012 चे प्रस्ताव शिक्षण उप संचालकांकडून आले नाहीत. म्हणूनच मी विधान केले की, आज या अधिकाऱ्यांना आपला धाक राहिला नाही. दोन-दोन वर्षे शिक्षण उप संचालक या बाबतचे प्रस्ताव पाठवित नाहीत, माहिती देत नाहीत. महोदय, आमच्याकडून एक दिवस उशीर झाला तर एस.एस.सी. बोर्डाला 80 हजार रुपये दंड भरावा लागला. शिक्षकांच्या पदांना वेळेवर मान्यता मिळत नसेल तर त्याची जबाबदारी सरकारने घेतली पाहिजे. किंबहुना या बाबत संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित केली पाहिजे. मी शासनाच्या प्रोसिजरच्या विरोधात नाही. परंतु जी काही प्रोसिजर आहे त्यात सुलभता आणावी. किमान त्या त्या वर्षाचे प्रस्ताव त्या त्या वर्षी मंजूर करावेत.

महोदय, अर्धवेळ ग्रंथपालांच्या बाबतीत दि.20 जुलै, 2012 रोजी आश्वासन दिले होते. माननीय सभापतींनी सुध्दा आश्वासन दिले होते. मी विनंती करतो की, हा विषय तातडीने मार्गी लावावा. पट पडताळणीच्या अनुषंगाने ज्यांनी बोगस संख्या दाखविली त्यांच्यावर जरुर कारवाई करावी. आम्ही बोगस नोंदणी दाखविणाऱ्यांचे समर्थन करीत नाही.

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

महोदय, ज्या शाळांतील विद्यार्थ्यांची उपस्थिती संख्या 50 टक्क्यांपेक्षा कमी आहे त्या शाळा बंद करण्यास आमचा विरोध नाही. परंतु शाळा बंद करुन शिक्षकांना वाऱ्यावर सोडणार असाल आणि त्यांचे समायोजन करणार नसाल तर त्याला आमचा विरोध आहे. त्यामुळे या सर्व शिक्षकांचे समायोजन करण्याची आवश्यकता आहे. या बाबत निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

महोदय, राज्य पुरस्कर प्राप्त शिक्षकांना दोन वेतनवाढी अनुज्ञेय आहेत. परंतु आता सातत्याने सांगितले जात आहे की, अशा प्रकारे वेतन वाढी देण्याचा निर्णय घ्यावयाचा आहे. माननीय हकीम समितीच्या अहवालातील पृष्ठ क्र.53 वर नमूद केले आहे की, राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षकांना सुध्या 3 टक्के प्रमाणे वेतनवाढी मिळतात. त्यांना 4 टक्क्याप्रमाणे वेतन वाढ द्या.

नंतर श्री.बरवड....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .....

सभापती महोदय, हकीम समितीच्या अहवालाच्या पृष्ठ क्रमांक 73 वर असे म्हटले आहे की, सर्वसामान्य कर्मचाऱ्यांना 3 टक्के वेतनवाढ द्यावी. ही काही नवीन योजना नाही. आम्ही दोन वेतनवाढी मागतो म्हणजे नवीन काही देत नाही. ही पूर्वीचीच योजना आहे. फक्त वेतनवाढ देण्याची पध्दत बदललेली आहे. जसे सेवांतर्गत उत्कृष्ट कामाबद्दल शासकीय कर्मचाऱ्यांना 3 टक्के ऐवजी 4 टक्के वेतनवाढ देतो तसे राज्य आणि राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त शिक्षकांना 4 टक्के प्रमाणे वेतनवाढ द्यावी. राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षकांचा गेल्या चार वर्षापासून जो अवमान होत आहे, जी अवहेलना होत आहे ती थांबवावी. उगीच त्यांना राज्य पुरस्कार देऊन आपण कौतुक करतो पण काहीच करत नाही असे होता कामा नये. या संपूर्ण गोष्टींचा विचार करुन या सर्व विषयांच्या संदर्भात आतापर्यंत दिलेली आश्वासने, ज्युनिअर कॉलेजच्या संदर्भात दिलेली आश्वासने, काय मिळाले यापेक्षा आपण जी आश्वासने दिलेली आहेत त्यासाठी आम्हाला परत भांडावे लागणार नाही याची काळजी घ्यावी अशी विनंती करतो. सभापती महोदय, आपण मला बोलण्यासाठी वेळ दिला त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देऊन मी माझे भाषण संपवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, या सभागृहामध्ये शिक्षणासंबंधीच्या प्रस्तावावर चर्चा झालेली आहे. आपणा सर्वांना माहीतच आहे की, देश उभारणीसाठी शिक्षण हे अतिशय महत्वाचे साधन आहे आणि म्हणूनच या प्रक्रियेमध्ये शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भूमिका अतिशय क्रुशियल आणि महत्वाची आहे याची जाणीव सुध्दा सर्वांना आहे. त्यामुळे या सभागृहामध्ये नेहमीच त्यांच्या हितासाठी अनेक वेळा चांगल्या चर्चा होत आहेत, मागण्या करण्यात येत आहेत, अनेक उपयोगी सूचना करण्यात येत आहेत. या चर्चेमध्ये सुध्दा अनेक उपयोगी सूचना करण्यात आलेल्या आहेत. खासकरुन गुणवत्तेच्या बाबतीत चांगल्या सूचना करण्यात आलेल्या आहेत. कारण या सभागृहात या विषयावर बोलणारे सदस्य अतिशय विद्वान आहेत आणि शिक्षणाच्या बाबतीत त्यांना इतकी माहिती आहे की, कधी कधी असे वाटते की, त्यांनाच तज्ज्ञ समजून त्यांच्याकडूनच माहिती घ्यावी, अशा पध्दतीची चर्चा या सभागृहामध्ये होते.

सभापती महोदय, शासन म्हणून दोन प्रकारच्या भूमिकेतून आम्ही काम करण्याचा प्रयत्न करतो. एका बाजूला गुणवत्ता कशी वाढवावयाची, त्यामध्ये सुधारणा कशी करावयाची ही शासनाची भूमिका आहे आणि दुसऱ्या बाजूला आपले जे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आहेत किंवा काम करणारी जी यंत्रणा आहे त्यांच्या हितासाठी सुध्दा निर्णय घेण्याचा प्रयत्न शासनाकडून होतो. गुणवत्तेसाठी शासनाने काय काय निर्णय घेतलेले आहेत आणि शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या हितासाठी काय काय निर्णय घेतलेले आहेत हे मी थोडक्यात सांगू इच्छिते. आपण शिक्षण हक्क कायदा लागू केला. त्याची नियमावली तयार केली. 1 किलोमीटर, 3 किलोमीटर, 5 किलोमीटरवर शाळा उपलब्ध व्हावी यासाठी बृहत आराखडा तयार करुन प्रत्येक ठिकाणी शाळा असावी अशी भूमिका घेऊन शासनाने त्याबाबत अंमलबजावणी सुरु केलेली आहे. ही शासनाची जबाबदारी आहे. शासनाला ज्या ठिकाणी आवश्यकता आहे त्या ठिकाणी शाळा सुरु करावयाच्या आहेत. त्याची निश्चिती झालेली आहे आणि त्याचा निर्णय सुध्दा शासनाने घेतलेला आहे. प्रत्येक 1 किलोमीटर, 3 किलोमीटर, 5 किलोमीटरवर शाळा असणारच आहे, ही शासनाची भूमिका आहे. क्वालिटीसाठी ही भूमिका आपण स्वीकारलेली आहे.

सभापती महोदय, विशेष पटपडताळणी याच भूमिकेतून घेण्यात आलेली आहे. आज आपण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान ....

32 हजार कोटी रुपये खर्च करतो. त्यात जर असे काही गैरप्रकार होत असतील तर त्याला आळा बसावा आणि आपले जे पैसे असे वाया जात आहेत त्यातील काही पैसे जर वाचले तर ते दुसरीकडे सकारात्मक कामांसाठी उपयोगी पडू शकतात. पडपडताळणीची विशेष मोहीम याच भूमिकेतून घेण्यात आली. याचबरोबर शिक्षण सेवकांच्या अर्हतेमध्ये सुधारणा करण्यासाठी प्राधान्य देण्याचा निर्णय शासनाने घेतला. त्यांची नियुक्ती करीत असताना ते ग्रॅज्युएट असावेत, पोस्ट ग्रॅज्युएट असावेत, त्यापेक्षा ज्यांचे क्वॉलिफिकेशन जास्त असेल त्यांना प्राधान्याने नियुक्ती द्यावी असा निर्णय क्वालिटीसाठी शासनाने घेतला.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान.....

या पध्दतीचा क्वॉलिटीसाठी हा निर्णय शासनाने घेतलेला आहे. कॉपीमुक्त अभियान राज्यात राबविले आहे. या अभियानाचा राज्यामध्ये चांगला परिणाम झालेला आहे. काही ठिकाणी असे प्रकार होत असतील. परंतु कॉपीमुक्त राज्य झालेले आहे. शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी शासनाने हा निर्णय घेतलेला आहे.

सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून अनेक इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंटवर लक्ष दिले जात आहे. त्यामुळे कितीही रिमोट एरियामध्ये गेलो तरी सर्व शिक्षा अभियाच्या माध्यमातून बांधकाम केलेली कामे प्रत्येक गावात दिसत आहेत. वर्ग खोल्या बांधणे, शाळा बांधणे, पिण्याचे पाणी देणे, स्वच्छतागृहे हे सुध्दा या योजनेच्या माध्यमातून टार्गे अचिव्ह केलेले आहे. मूल्यांकनासंबंधी सभागृहात अनेकदा चर्चा झालेली आहे. त्याचा निर्णय लगेच होणार आहे. अंतिम टप्प्यामध्ये त्याची प्रक्रिया आहे. मंत्रिमंडळाच्या पुढील बैठकीमध्ये तो विषय घेण्याचा आमचा प्रयत्न आहे. नियमांची शिथिलता आणावयाची आहे. ते काम केले जाईल. मूल्यांकन करण्याचा शासनाचा हेतू आहे की, गुणवत्ता वाढली पाहिजे. यासाठी काही निकष केलेले आहेत. राज्यात पहिल्यांदा लर्निंग आऊटकम् साठी 50 टक्के ठेवले आहे. यापूर्वी फक्त इन्फ्रास्ट्रक्चरवर लक्ष केंद्रीत केले होते. परंतु आता लर्निंग आऊटकम्साठी निकष केलेले आहे. त्याबाबत कोणाचीही तक्रार नाही. त्याचे निकष अवघड होते, पण त्यात शिथिलता दिल्यामुळे त्याचे रिझल्टही चांगले दिसून येतील असा मला विश्वास वाटतो. अभ्यासक्रमामध्ये सुधारणा केलेली आहे.

प्रत्येक मुलाचा आधार नंबर असावा व चाईल्ड ट्रॅकिंग सिस्टिम सुरु करण्याचा निर्णय घेतलेला आहे. या दृष्टीकोनातून मोठ्या प्रमाणावर आधार कार्डाची नोंदणी सुरु झालेली आहे. संगणकाच्या विषयासाठी आयसीटीची योजना सुरु केलेली आहे. त्यामुळे अनेक शाळांमध्ये संगणकाचे शिक्षण दिले जात आहे. ब्रिटिश कौन्सिल बरोबर एमओयू करुन इंग्लीश मध्ये सुधारणा करण्याचा एक मोठा निर्णय शासनाने घेतलेला आहे. शिक्षकांना इंग्लीशसाठी तयार करण्याचे काम मोठ्या प्रमाणावर होत आहे. टिचर्स एलिजिबिलीटी टेस्टचा निर्णय घेतला आहे. शिक्षकाची सीईटी घेतली जाते. पण आता शिक्षकांना टीईटी द्यावी लागेल. क्वॉलिटीच्या दृष्टीने हा देखील महत्वाचा निर्णय आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

प्रा.फौजिया खान....

पूर्व प्राथमिक शिक्षणासाठी एक समिती नेमलेली आहे. त्या समितीने अहवाल सादर केलेला आहे. अल्पसंख्याक शैक्षणिक धोरणासाठी शासन विचार करीत आहे. त्यासाठी माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा प्रस्ताव तयार करीत आहोत. हा निर्णयही क्वॉलिटीसाठी घेतलेला आहे. 48 केंद्राच्या मदतीने मुलींची वसतिगृहे किंवा मॉडेल स्कूल्स सुरु केलेली आहेत. शिक्षण विभागाच्या माध्यमातून काहीच केले होत नाही असे नाही. क्वॉलिटीसाठी अनेक निर्णय शासनाने घेतलेले आहेत. सभागृहात या विभागाच्या विरोधात सूर उमटल्याचे दिसून येते. पण या विभागाने मूलभूत निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करण्याचे काम केलेले आहे. "असर" या संस्थेने केंद्र सरकारला रिपोर्ट सादर केलेला आहे. त्यांच्या रिपोर्टमध्ये असे नमूद केले आहे की, दहावीच्या विद्यार्थ्यांना दुसरीचे पुस्तक वाचता येत नाही. गणित सोडविता येत नाही. जर असेच चित्र असेल तर त्याबाबत कोठे तरी जबाबदारी निश्चित होणे गरजेचे आहे. सन्माननीय सदस्यांनी गुणवत्तेबाबत चर्चा केली आहे याचा मला आनंद होत आहे.

शिक्षकांसाठी व शिक्षण क्षेत्रात सेवा करणारा जो घटक आहे त्यांच्यासाठी शासनाने निर्णय घेतलेला आहे. या घटकांसाठी या वर्षी किमान 1 हजार कोटी रुपये खर्च करण्याचा निर्णय घेतलेला आहे. हे सांगताना मला आनंद होत आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान...

या शिक्षण क्षेत्रामध्ये हजारो कोटी पेक्षाही जास्त रक्कम खर्च होईल अशा प्रकारचे निर्णय शासनाने घेतलेले आहेत. वेतनेतर अनुदान 13 एप्रिल पासून देण्याचा निर्णय घेतलेला आहे. शिक्षण सेवकांचे मानधन वाढविण्याचा निर्णय घेतलेला आहे, अनेक वर्षापासून नवीन तुकड्या देण्यात आलेल्या नव्हत्या. या वर्षी 5 हजार नवीन तुकडयांना मंजुरी दिलेली आहे. कायम शब्द काढण्यात आलेला आहे. नवीन शाळा उघडण्याचा निर्णय घेतलेला आहे. प्रत्येकी 1 कि.मी., 3 कि.मी., 5 कि.मी.वर शाळा देण्यासाठी शासन तयार आहे. सीमा भागामध्ये अनुदानित शाळा देण्याचा निर्णय घेतलेला आहे. सीमा भागातील स्थानिक संस्थांनी मान्यता दिली तर ताबडतोबीने शाळा सुरु करता येतील. या सर्व गोष्टीसाठी पैसे खर्च करण्यास शासनाने कुठेही संकोच केलेला नाही.

श्री. रामनाथ मोते : या गोष्टी तीन वेळा रेकॉर्डवर आलेल्या आहेत. आम्ही देखील त्याबाबतीत शासनाचे अभिनंदन केलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्या मुद्यांच्या संदर्भात उत्तर द्यावे अशी त्यांना विनंती आहे.

प्रा. फौजिया खान : सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांना मी उत्तर देणारच आहे. परंतु शासनाने शिक्षण क्षेत्रासाठी कशा प्रकारे हजारो कोटी रुपये खर्च करण्याचा निर्णय घेतलेला आहे ते देखील रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. सर्वप्रथम कायम शब्द काढण्याचा मुद्दा या ठिकाणी उपस्थित करण्यात आला. जेव्हा कायम विनाअनुदानित तत्वावर शाळा देण्यात आल्या होत्या त्यावेळी सर्वांना याची जाणीव होती की या शाळा कायम विनाअनुदान तत्वावरच चालवाव्या लागणार आहेत. त्यावेळी तसे ॲफिडेव्हिट देखील करुन दिलेले होते. त्यानंतर कायम शब्द काढण्याच्या बाबतीत सरकारने सकारात्मक भूमिका घेतली. यामध्ये शासनाने कुणाची फसवणूक केलेली नाही.

सभापती महोदय, आपण शासन म्हणून जेव्हा सर्व गोष्टींचा विचार करीत असतो त्यावेळी आर्थिक रिसोर्सेस मर्यादित असतात. नवनवीन आव्हाने शासनासमोर येत असतात. दुष्काळ, पूर, आरोग्याच्या समस्या अशा सर्व गोष्टींचा विचार करणे गरजेचे असते. या सर्व गोष्टींचे नियोजन करुन शासन निर्णय घेते. जेव्हा सकारात्मक पध्दतीने विचार केला जातो त्यावेळी थोडा फार विलंब होण्याची शक्यता असते.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी मूल्यांकनाच्या निकषासंबंधीचा मुद्दा उपस्थित केला. वेतनेतर अनुदान 6व्या वेतन आयोगाप्रमाणे असावे असेही त्यांनी सांगितले. दिनांक 13 एप्रिल पासून वेतनेतर अनुदान सुरु होत आहे. सर्व शाळांना या निर्णयामुळे मदत होणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. निरंजन डावखरे यांनी महत्वाचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. केवळ मराठी शाळांचाच बृहत आराखडा केलेला आहे, ऊर्दू आणि गुजराथी शाळांना देखील अनुदान देण्याची गरज आहे असे त्यांनी सांगितले. याबाबतीत लवकरच जाहिरात काढण्याची प्रक्रिया सुरु करण्यासंबंधीचा निर्णय घेण्याचा विचार शासनस्तरावर सुरु आहे. नवीन ॲकेडेमिक वर्षापासून अनुदानित शाळा देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी सांगितले की, परीक्षेमध्ये कॉपी करण्याचे प्रकार बंद झालेले नाहीत. या बाबतीत त्यांनी खूप मोठा आरोप केलेला आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान...

या ठिकाणी मी नम्रपणे सांगू इच्छिते की, कॉपी प्रकरणावर मोठ्या प्रमाणात आळा बसलेला आहे. सामुदायिक कॉपी एखाद्या ठिकाणी झाली असेल तेथे तातडीने ॲक्शन घेण्याचे काम शिक्षण विभागाने केलेले आहे. परंतु कॉपी प्रकरण कोठेही झाले नाही असे मी सांगू शकत नाही. ज्या ज्या ठिकाणी कॉपी प्रकरणे दिसून येतील, तेथे ॲक्शन घेण्याचे काम शिक्षण विभागामार्फत केले जाईल.

सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी सांगितले की, हा मास्टर प्लॅन इयत्ता 1 ली ते इयत्ता 8 वी पर्यंतचा आहे. नंतरच्या इयत्तांच्या मास्टर प्लॅनच्या बाबतीत काय केले जाणार आहे, या बाबतीत मी सांगू इच्छिते की, 5 कि.मी.अंतरावर असलेल्या शाळेत मुलींसाठी इयत्ता 12 वी पर्यंत मोफत शिक्षण असावे असे शासनाचे धोरण आहे. तसेच इयत्ता 10 वी व इयत्ता 12 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी शाळा किंवा ज्युनिअर कॉलेज उपलब्ध करुन त्यांची फी ची प्रतिपूर्ती करण्याचे देखील शासनाचे धोरण आहे.

सभापती महोदय, नंदुरबार येथे सामुहिक कॉपी प्रकरणाचा उल्लेख सन्माननीय सदस्य डॉ.अपूर्व हिरे यांनी केला. त्या प्रकरणाची पूर्णपणे चौकशी करण्यात येईल. या संदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

सन्माननीय सदस्य श्री.रामदास मोते यांनी श्वेतपत्रिकेच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला. शासनाची शिक्षणासबंधी श्वेतपत्रिका काढण्याची तयारी आहे. पुढच्या अधिवेशनापर्यंत श्वेतपत्रिका काढण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

श्री.दिवाकर रावते : कशाची श्वेतपत्रिका काढणार आहात ?

प्रा.फौजिया खान : शिक्षकांच्या मागण्यांचा शासनाने स्वीकार केलेला आहे. आपण सांगा पारदर्शकता कशात हवी आहे? त्या बाबतीत श्वेतपत्रिका काढण्याची शासनाची तयारी आहे. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी दोन महत्वाचे मुद्दे या ठिकाणी उपस्थित केलेले आहेत. शाळांचे इन्स्पेक्शन होत नाही ही बाब सन्माननीय सदस्यांनी लक्षात आणून दिलेली आहे. या बाबतीत नियोजन करण्याचे काम अवश्य होणार आहे. हा अतिशय महत्वाचा विषय आहे. सगळया शाळांचे इन्स्पेक्शन झाले होईल या पध्दतीचे शासनाकडून नियोजन तयार केले जाणार आहे. त्यांनी दुसरा मुद्दा प्रशिक्षणाच्या बाबतीत उपस्थित केलेला आहे. हा मुद्दा अनेक सन्माननीय

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान...

सदस्यांनी देखील उपस्थित केलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी या बाबतीत जे मत मांडले, त्याच्याशी मी सहमत आहे. प्रशिक्षण चांगले व प्रभावी होणे गरजेचे आहे. प्रशिक्षणासाठी शिक्षकांचा वेळ वाया जाऊ नये म्हणून प्रत्येक डायटला व्हीडीओ कॉन्फरन्सींगची सवलत दिलेली आहे. त्याचा उपयोग कसा करता येईल याचा विचार करण्यात येत आहे. प्रशिक्षणाच्या धोरणाचा विचार करुन त्यात काही सुधारणा करणे आवश्यक आहे असे मला वाटते. सगळयांना विश्वासात घेऊन मूलभूत प्रशिक्षणाच्या बाबतीत निश्चितपणे विचार करु.

सभापती महोदय, या ठिकाणी शिक्षकांच्या गट सम्मेलनाचा देखील उल्लेख केला गेला. यातही सुधारणा होणे आवश्यक आहे असे मला वाटते. जीवन शिक्षण आणि शिक्षण संक्रमण हे शिक्षकांपर्यंत पोहोचले पाहिजे अशी सूचना केली गेली. ती खूप चांगली सूचना आहे. या सूचनेवर सुध्दा विचार करण्यात येईल.

सभापती महोदय, शिक्षकांच्या पुरस्काराच्या बाबतीत या ठिकाणी उल्लेख केला गेला. पुरस्कार मिळालेल्या शिक्षकांना वेतनवाढ देण्याची शिक्षण विभागाची योजना होती. या बाबतीत सामान्य प्रशासन विभागाने असे ठरविले की, सहावा वित्त आयोग आला आहे, त्यात वेतनवाढ देण्याची तरतूद नाही. त्यामुळे ते धोरण स्वीकारु नये. या बाबतीत सामान्य प्रशासन विभाग जे धोरण ठरवून देईल त्याप्रमाणे शिक्षण विभाग करील असे ठरविले आहे. मला असे वाटते की, शिक्षण विभागाच्या माध्यमातून सुध्दा आपण अशा प्रकारचे धोरण राबवू शकतो. पुरस्कार मिळालेल्या शिक्षकांना वेतनवाढ द्यावयाची असेल, एक रक्कमी रक्कम देण्याचे नियोजन असेल तर ते सुध्दा करता येईल....

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान.....

आदरणीय मुख्यमंत्री महोदयांनी लॅपटॉप देण्याबाबत शब्द दिलेला आहे. एकही पुरस्कारप्राप्त शिक्षक वंचित राहणार नाही. धोरणात्मक निर्णय घेण्यामध्ये थोडाफार विलंब होऊ शकतो. पण सगळ्यांना त्यांचा जो अधिकार आहे तो मिळणार आहे, एवढेच मी सांगू इच्छिते.

सभापती महोदय, पट पडताळणीनंतर प्राथमिक शाळांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात 1528 आणि अनुदानित क्षेत्रात 1922 म्हणजे प्राथमिक विभागात एकूण 3450 पदे व माध्यमिक शाळांमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात 34 आणि अनुदानित क्षेत्रात 739 अशी एकूण 773 पदे समायोजित करणे आवश्यक आहे. याची कार्यवाही शेवटच्या टप्प्यात आलेली आहे. नजिकच्या काळात ही प्रक्रिया सुरु होणार आहे. ही सगळी पदे समायोजित झाल्यानंतर पदे आवश्यक असतील तर भरतीची प्रक्रिया सुरु करण्यात येईल.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी आग्रहाने सांगितले की, 2 मे पूर्वी भरती बंद केली आहे. त्याबाबत माहिती घेण्यात येईल आणि त्यावर विचार करण्यात येईल. मी महत्वाच्या प्रश्नांना उत्तरे देण्याचा प्रयत्न केलेला आहे. बारावीच्या परीक्षांवर शिक्षकांनी बहिष्कार घातला होता, याबाबत मी प्रश्नाच्या अनुषंगाने उत्तर दिले होते. येत्या तीन महिन्यात त्यावर निर्णय घेण्याचे काम शासनाच्या माध्यमातून होणार आहे, एवढेच सांगून माझे भाषण पूर्ण करते.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, शासनाने सन 2012-13 मध्ये भरतीवर बंदी घातली होती. राज्यामध्ये अनेक जिल्हयांमध्ये जे प्रामाणिकपणे वागले त्यांना मान्यता दिली नाही. नेमणुकीला परवानगी दिली नाही.. ज्या जिल्हयामध्ये नेमणुकीला परवानगी नाही तेथे एनओसी दिली, मान्यता दिली. आम्ही प्रामाणिक राहिलो आम्हाला अनुमती दिली नाही. याबाबत शासनाची भूमिका काय आहे?

प्रा.फौजिया खान : याबाबत माहिती घेण्यात येईल. सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.निरंजन डावखरे यांनी एक महत्वाचा मुद्दा निदर्शनास आणून दिला आहे. मराठीच्या पेपरमध्ये करेक्शन करावयास पेपर शिक्षकांच्या घरी पाठविले जातात. उर्दू आणि गुजराथी विषयाच्या पेपरबाबत सेंट्रलाईज पध्दतीने बोलावण्यात येते. ही तफावत सूचना देऊन दूर करण्यात येईल. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.डी.पी.सावंत (उच्च शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे यांनी नियम 260 अन्वये शिक्षण क्षेत्रासंबंधी प्रस्ताव मांडला होता. या संदर्भात बहुतांश माननीय सदस्यांनी शालेय शिक्षणासंबंधी आपले विचार मांडले आहेत. उच्च शिक्षणाबाबत माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, वसंतराव खोटरे, डॉ.दीपक सावंत, डॉ.सुधीर तांबे, माननीय सदस्य सर्वश्री नागो गाणार, कपिल पाटील व डॉ.अपूर्व हिरे यांनी विचार मांडले आहेत.

सभापती महोदय, सध्या प्राध्यापकांचा जो संप सुरु आहे, त्याबद्दल भाष्य करण्यात आले आहे. कालच मी प्रश्नाच्या अनुषंगाने उत्तर देताना सभागृहाला सविस्तर माहिती दिली होती. हा संप मुख्यत्वे दोन कारणांसाठी सुरु आहे. त्यातील पहिले कारण म्हणजे सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनातील 80 टक्के फरकाची रक्कम एकरकमी आणि तातडीने देण्याची त्यांची मागणी आहे. मी काल सभागृहात सांगितले होते की, विद्यापीठ अनुदान आयोगाने महाराष्ट्र शासनाला सांगितले की, तुम्ही अगोदर खर्च करावा आणि नंतर आम्ही तीन टप्प्यात त्याची पूर्तता करु.

नंतर 4सी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. डी.पी.सावंत .....

त्यावेळेला तीन टप्पे तीन वर्षात देऊ की, तीन महिन्यात देऊ असेही सांगण्यात आले नव्हते. यामध्ये संदिग्धता होती. आज राज्यात दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे शासनाला एकदम 1526 कोटी रुपयांची रक्कम नॉन बजेटेड असल्यामुळे एक रकमी देणे शक्य नाही व ही बाब आम्ही प्राध्यापकांच्या संघटनेला सांगितली होती. सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांबरोबर दि. 6.2.2012 रोजी बैठक झाली त्यावेळेस त्यांना सांगण्यात आले की, 500 कोटी रुपये एप्रिल महिन्यात देऊ आणि केंद्रशासनाकडून 500 कोटी रुपये मिळाल्यानंतर दोन टप्प्यामध्ये दुसरे 500 कोटी रुपये देऊ. ही सर्व बाब प्राध्यापकांच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. परंतु यासंदर्भात त्यांच्याकडून काही रिप्लाय आलेला नाही.

सभापती महोदय, प्राध्यापकांच्या संपाच्या संदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, युजीसीने 1991 ते 2000 या कालावधीत प्राध्यापकांसाठी नेटसेटची परीक्षा उत्तीर्ण होणे कंपल्सरी केलेले आहे. परंतु 1991 ते 1999 या काळात नेटसेटचा रिझल्ट फार कमी लागत होता. नेटसेटचा रिझल्ट .1% लागत होता व आजही तो रिझल्ट तसाच लागतो. त्यावेळेस प्राध्यापक मिळत नव्हते. ही परिस्थिती फक्त महाराष्ट्रातच होती. महाराष्ट्रासारखे प्राध्यापक देशातील कोणत्याही राज्यात नेमले गेले नाहीत. दुसऱ्या राज्यात तासिका बेसीसवर प्राध्यापकांची नियुक्ती झाली हाती. परंतु महाराष्ट्रात 1991 ते 1999 या काळात शिक्षक नेमले गेले आणि त्यांना आपण वेळोवेळी सांगत आलो की, तुम्हाला नेटसेट किंवा पी.एचडी. परीक्षा उत्तीर्ण व्हावीच लागेल. परंतु अजून पावेतो 2307 प्राध्यापकांनी शैक्षणिक अर्हता प्राप्त केलेली नाही. परंतु तरी सुध्दा दि. 6.3.2013 रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत शासन यांच्या सेवा संपुष्टात आणणार नाही, शासन ज्या दिवसापासून निर्णय घेईल त्या दिवसापासून त्यांना सर्व फायदे दिले जातील व आज पासून त्यांच्या सेवा नियमित केल्या जातील अशा प्रकारे निर्णय घेण्यात आला आहे.

सभापती महोदय, जे प्राध्यापक 1991 ते 1999 मध्ये सर्व्हीसला लागले परंतु 1999 नंतर ज्यांनी अर्हता प्राप्त केली आहे त्यांच्या संदर्भात शासनाने नव्याने विचार करण्याचा निर्णय घेतलेला आहे. या विषयाच्या संदर्भात उद्या सायंकाळी 4.00 वाजता प्राध्यापकांच्या संघटनेचे पदाधिकारी,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. डी.पी.सावंत .....

माननीय मुख्यमंत्री तसेच दोन्ही खात्याचे आम्ही मंत्री मिळून ही बैठक घेतली जाणार आहे. या आठवडयात संपावर तोडगा निघू शकेल अशी मला खात्री आहे. तसेच परीक्षा लवकरात लवकर घेण्याचा प्रयत्न केला जाईल एवढेच या निमित्ताने मी सांगू इच्छितो.

उप सभापती : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सन 2012-2013 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा

उप सभापती : पूरक मागण्यांवरील चर्चेचा आजचा दुसरा दिवस व शेवटचा दिवस आहे. कार्यक्रमपत्रिकेवर दर्शवलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवर आज चर्चा घेण्यात येईल. पूरक मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधी माहिती सदस्यांना पत्रक भाग दोन द्वारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. चर्चा संबंधित बाबीपुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे आपणास विदित आहे. कार्यक्रम पत्रिकेवर दर्शवलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर आजच पूर्ण करावयाचे आहे हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे.

शीर्षक : विविध मंत्र्यांच्या विभागांच्या पुरक मागण्या

उप सभापती : खालील मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेला घेण्यात येतील.

(1) वने, पुनर्वसन व मदत कार्य आणि भूकंप पुनर्वसन मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक सी-5, सी-6

(2) ग्रामविकास मंत्र्यांच्या मागण्या क्रमांक एल-1,एल-2,एल-3,एल-4,एल-7

(3) महसूल व खार जमिनी मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक सी-1, आय-5

(4) वैद्यकीय शिक्षण आणि फलोत्पादन मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक एस-1

(5) जलसंपदा (कृष्णा खोरे-पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक आय-3,आय-6

(6) उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक डब्ल्यू-1, डब्ल्यू-2, डब्ल्यू-3, डब्ल्यू-4, डब्ल्यू-8

(7) शालेय शिक्षण मंत्र्यांच्या पूरक मागण्या क्रमांक ई-1, ई-2

(8) वस्त्रोद्योग,अल्पसख्याक विकास आणि औकाफ मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक व्ही-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती ....

(9) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण आणि राजशिष्टाचार मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक आर-1

(10) कामगार आणि विशेष सहाय्य मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक के-4

(11) क्रिडा व युवक कल्याण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक ई-3

(12)महिला व बालविकास मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक एक्स-1

(13)मर्यावरण आणि सांस्कृतिक कार्य मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक यू-1,इ ोडडी-2

आता माननीय विरोधी पक्षाकडून चर्चेला सुरुवात करण्यात येईल.

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, बाब क्रमांक 21, पृष्ठ क्रमांक 20 आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या वारसांना वित्तीय सहाय्यता देण्यासाठी 5 कोटी 23 लक्ष 61 हजार रुपयांची मागणी केलेली आहे. पंत प्रधान पॅकेज झाले, माननीय मुख्यमंत्र्यांचे पॅकेज झाले परंतु तरी सुध्दा या राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण काही कमी झाले नाही. दि.1 जानेवारी, 2012 ते 31 डिसेंबर 2012 पर्यंत जवळपास 127 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. 1 जानेवारी 2013 ते आतापर्यंत जवळपास 29 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना मदत देतांना जे निकष लावले आहेत ते निकष बदलण्याची आवश्यता आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

आज खालच्या स्तरावर शेतकऱ्यांच्या आत्महत्या अधिकृत ठरविल्या जात नाहीत. मी आपणाला बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव तालुक्यातील उदाहरण देतो. खामगाव तालुक्यात एकूण 30 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या. त्यापैकी 6 प्रकरणे ग्राह्य धरण्यात आली. बाकीच्या आत्महत्या ग्राह्य धरण्यात आल्या नाहीत. आपण पुरवणी मागणीद्वारा निधीची मागणी करीत आहोत. हा पैसा जिल्हाधिकारी व तहसीलदार स्तरावरून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना मिळत नाही.

विदर्भामध्ये दिनांक 2.1.2013 पासून ते 9.3.2013 पर्यंत एकूण 27 आत्महत्या झाल्या. परंतु, अजून पर्यंत त्यांच्या वारसांना कुठल्याही प्रकारची मदत मिळालेली नाही. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना आपण मदतीचा हात देत आहोत असे दाखवायचे. पण त्यांना मदत द्यायची नाही हे योग्य नव्हे. ज्या शेतकऱ्याने आत्महत्या केली आहे त्याची आत्महत्या ग्राह्य न धरता, तो दारू पितो, त्याला दारूचे व्यसन लागले, आजारामुळे आत्महत्या केली असे सांगून त्या शेतकऱ्याला बदनाम केले जाते. त्या शेतकऱ्याला पैसे देऊ नका पण किमान बदनाम तरी करू नका. असे मी या मागणीच्या निमित्ताने शासनाला सांगू इच्छितो. शेतकरी परिस्थितीमुळे आत्महत्या करतो. पण आपले अधिकारी त्याची बदनामी करून मदती पासून वंचित करणार असतील तर त्याची किमान चौकशी झाली पाहिजे.

मी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती करणार आहे की, 1जानेवारी 2012 ते 31 डिसेंबर 2012 पर्यंत किती आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना आपण मदत दिली आहे, 1 जानेवारी 2013 ते 31 मार्च 2013 किती शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत व किती शेतकऱ्यांच्या घरा पर्यंत आपण मदत पोहोचवली आहे ? हे आपल्या उत्तराच्या भाषणातून आपण सांगितले पाहिजे.

सभापती महोदय, मी बाब क्रमांक 23 वर बोलणार आहे. या राज्यात एका बाजूला दुष्काळ पडलेला आहे, तर दुसऱ्या बाजूला महाराष्ट्रावर परमेश्वराचा कोप झाल्याप्रमाणे अतिवृष्टी आणि गारपीट झालेली आहे. त्यामुळे हजारो एकर शेतातील पीक उद्ध्वस्त झालेले आहे. याचा फटका मराठवाडा, विदर्भ व सोलापूर जिल्ह्यातील काही भागांना मिळाला आहे. या भागात अतिवृष्टी, गारपीट, वादळ यामुळे गहू, फळबागा, हरभरा या रब्बी पिकांचे फार मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. हिंगोली, परभणी, औरंगाबाद, नांदेड, औरंगाबाद, उस्मानाबाद सह सर्व जिल्ह्यांमध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

पाऊस आणि गारपीटीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले. आपले पुनर्वसन मंत्री हिंगोलीमध्ये गेले तेव्हा त्यांनी सांगितले की, अतिवृष्टी व गारपीटमध्ये सापडलेल्या सर्व शेतकऱ्यांचे पंचनामे करून तातडीची मदत दिली जाईल. माझी मागणी आहे की, हे पंचनामे कधी केले जातील. या राज्यातील शेतकरी गारपीट व अतिवृष्टीमध्ये सापडला आहे. नैसर्गिक संकटात सापडला आहे. या शेतकऱ्यांना ताबडतोब मदत कधी देण्यात येणार आहे हे मंत्रिमहोदयांनी सांगितले पाहिजे. यामुळे महाराष्ट्रात किती नुकसान झाले हे देखील येथे सांगावे.

सभापती महोदय, मी बाब क्रमांक 100 वर बोलणार आहे. आर्थिक वर्षासाठी सन्माननीय लोकप्रतिनिधींनी ग्रामीण भागांतर्गत रस्ते, गटारे, व अन्य मूलभूत सुविधांच्या कामांसाठी बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव तालुक्यात विशेष अनुदान देण्याबाबत ग्रामविकास व जलसंधारण विभागाने 31.3.2011 रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे आदेश निर्गमित केले होते. मौजे नारखेड, तालुका नांदूरा, जिल्हा बुलढाणा तसेच, मौजे अटाळी, तालुका खामगाव, जिल्हा बुलढाणा येथील गावांतर्गत रस्ते सिमेंट काँक्रीटीकरण करणे यासाठी प्रत्येकी दहा-दहा लक्ष या दोन गावांसाठी मागितले होते.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

ग्रामीण भागातील रस्त्यांचे डांबरीकरण केल्यास ते उखडल्यानंतर त्याची देखभाल नीट होत नाही. तेव्हा तेथील गावकऱ्यांची मागणी कॉंक्रीटचा रस्ता करण्याची होती. त्या संदर्भात मी पत्र व्यवहार केलेला आहे. परंतु त्या संदर्भातील आदेश मिळालेले नाहीत.

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, बाब क्रमांक 54, पृष्ठ क्रमांक 45- विविध स्तरावरील क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या खेळाडुंच्या भोजन व निवासाचा खर्च भागविण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, मी हा विषय सभागृहात दोन वेळा मांडलेला आहे. माननीय प्रा.वसंत पुरके शिक्षण मंत्री असताना पुरवणी मागण्यांच्या वेळी मी हा विषय मांडला होता. आता ॲड.पद्माकर वळवी हे मंत्री आहेत त्यांच्या पुढे मी हा विषय मांडत आहे. या राज्यात कबड्डीच्या खे्ळाला प्राधान्य दिले जाते. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात कबड्डीचे सामने होतात. विदर्भ वगळता उर्वरित महाराष्ट्रातील कबड्डी खेळाडूंना एस.टी.चा पास मोफत देण्यात येतो. पश्चिम महाराष्ट्र, खान्देश, मराठवाडा या भागातील कबड्डी खेळाडूंना मोफत पास दिलेला आहे. परंतु विदर्भातील कबड्डी खेळाडूंना तशी सवलत दिलेली नाही. माननीय मंत्री महोदयांनी मागील वेळेस उत्तर देताना अशी सवलत देण्यात येईल असे सांगितले होते. परंतु अजूनपर्यंत तशी सवलत विदर्भातील कबड्डी खेळाडूंना मिळालेली नाही. तेव्हा विदर्भातील कबड्डी खेळाडूंना राज्यातील इतर भागातील कबड्डी खे्ळाडूंप्रमाणे मोफत पास देण्यात येतील असे आश्वासन देऊन त्या संदर्भात ताबडतोब आदेश काढावेत अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, तत्कालीन शिक्षण मंत्री प्रा.वसंत पुरके साहेबांनी विदर्भातील कबड्डी खेळाडुना मोफत पासेस देण्यात येतील असे सभागृहात आश्वासन दिल्यानंतर विदर्भातील कबड्डी खेळाडुंना मोफत पासची सवलत देण्यात आली असे मला पत्राद्वारे कळविण्यात आले. परंतु ती सवलत खालपर्यंत गेली नाही. फक्त माझ्या पत्रापुरतीच मर्यादित राहिली. तेव्हा यापुढे असे होता कामा नये याची दक्षता घ्यावी एवढ सांगून मी माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी सन 2012-2013 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी उभा आहे.

बाब क्रमांक 31 पृष्ठ क्रमांक 20 - महसूल आणि पुनर्वसन विभाग - मौजे पागोटे, ता.उरण, जिल्हा रायगड येथील जागा 1940 मध्ये श्री.काशिनाथ बाळू ठाकूर, यांनी सर्व्हे नं.181 (1) व 181 (2) अशी 8 एकर 30 गुंठे जागा भाडेपट्टयाने शेती लागवडीसाठी दिली. सन 1991 पासून सदरच्या जागेवर कंटेनर यार्ड केलेला आहे. हा प्रश्न एवढ्या पुरता मर्यादित नाही. ही जागा पाण्याखाली गेली आणि राहिलेल्या जागेतून रेल्वे गेली. 1961 साली उरणमध्ये रेल्वे आली त्यामध्ये ती जागा गेली. त्या जागेची कागदपत्रे बदलून दुसऱ्या मोकळ्या जागेमध्ये त्या जागेचा 7/12 उतारा दाखविण्यात आला. श्री.ठाकूर यांनी ती जागा महिन्याला 60 लाख रुपये भाड्याने दिली आहे. ही जागा द्रोणागिरीनोडच्या बाजूला आहे आणि द्रोणागिरीनोड येथील जमिनीचा भाव 40 लाख रुपये गुंठा आहे. अशी एकूण 60 एकर जागा त्यांनी गिळंकृत केलेली आहे. त्या जागेची किंमत 960 कोटी रुपये आहे. हा सिडकोचा अधिकृत रेट आहे. ज्या तहसीलदाराने, तलाठ्याने नोंद बदलली आणि ज्या प्रांत अधिकाऱ्याने संमती दिली त्यांची चौकशी होऊन त्यांच्यावर ताबडतोब कारवाई झाली पाहिजे. एवढेच नाही तर या गृहस्थाने डोंबिवली नागरी सहकारी बँकेकडून 35 कोटी रुपयांचे कर्ज घेतले, पण त्याचा सर्च देखील घेतला नाही, त्यांनी बँकेची सुध्दा फसवणूक केलेली आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

महोदय, मी या प्रकरणाची सर्व सर्टीफाईड कागदपत्रे सोबत आणलेली असून ती आपल्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांना देतो. या जमिनीच्या नोंदी कशा फिरल्या, कोणाकडे रजिस्टर केल्या, कोणाकडून 60 लाख रुपये भाडे घेतले जाते आणि वर अग्रीम म्हणून काही कोटी रुपये या कंपनीने कसे घेतले हे त्या कागदपत्रांवरुन निदर्शनास येईल. या जमीन व्यवहारात जवळजवळ 1 हजार कोटी रुपयांचा घोटाळा झाला आहे. या प्रकरणी मी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे. माझी अपेक्षा आहे की, हे अधिवेशन संपण्यापूर्वी या विषयी आपण मला न्याय द्याल. माननीय राज्यमंत्री श्री.प्रकाश सोळंके, राज्यात दुष्काळ आहे आणि आपल्याकडे पुनर्वसन विभाग आहे. एका बाजूला इतक्या मोठ्या प्रमाणावर पैसा असताना शासनाकडे पुनर्वसनासाठी पैसा नाही. माझी विनंती आहे की, हा विषय माननीय महसूल राज्यमंत्र्यांनी हाताळावा. हे अधिवेशन दीड महिना चालणार आहे. त्यातील दोन आठवडे संपत आले आहेत. माझी माननीय राज्यमंत्र्यांना विनंती आहे की, या विषयी त्यांनी एक बैठक आयोजित करावी. मी त्या बैठकीमध्ये तक्रारदार, सरपंच आणि ग्रामस्थांना घेऊन येईन.

महोदय, माननीय श्री.मनोहर जोशी मुख्यमंत्री असताना आय.पी.सी.एल. कंपनीमध्ये 90 पात्र खातेदारांना सामावून घेण्याबाबतचा करार केला होता. त्यानुसार त्यांना सामावून घेतले आहे, परंतु त्यांना कायम केले नाही. त्यांना कंत्राटी म्हणून वागविले जाते. आता केवळ 30 खातेदार आहेत. ते आजपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषणास बसले आहेत. या प्रकरणी आपण दखल घेऊन जिल्हाधिकाऱ्यांबरोबर चर्चा करावी आणि त्या कामगारांना न्याय मिळवून द्यावी, अशी मी विनंती करतो.

महोदय, पर्यावरण विभागाच्या बाब क्र.136 बाबत मी बोलतो. पनवेल तालुक्यातील तळोजा येथील दीपक फर्टीलायझर या कंपनीचा सेफ्टी ऑफीसर त्या ठिकाणी राहत नाही. तो अलिबागला राहतो. वास्तविक पाहता या कंपनीकडून आजूबाजूच्या गावांना सेफ्टी ट्रेनिंग आणि ग्रामस्थांना सेफ्टी साहित्य पुरविले पाहिजे होते. परंतु ते पुरविले गेले नाही. एवढेच नव्हे तर या सेफ्टी ऑफिसरने कंपनीतील कायम कामगारांना काढून तेथे बाहेरचे टेंपररी कामगार आणले आहेत. त्यामुळे त्या कंपनीतील कायम कामगार संपावर गेले आहेत. महोदय, या कंपनीकडून सेफ्टीबाबत आणि पर्यावरणाबाबत जी काळजी घ्यावयास पाहिजे ती घेतली जात नाही. या कंपनीच्या माध्यमातून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

सर्व कायदे पायदळी तुडविण्याचे काम मोठ्या प्रमाणावर सुरु आहे. तेथील जिल्हा परिषद सदस्य श्री.अरविंद म्हात्रे यांनी या प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार केली आहे. ग्रामपंचायत दांगडेने सुध्दा तक्रार केली आहे. सर्वपक्षीय आमदार आणि सर्व पक्षांनी या या कंपनीकडून पर्यावरणाची काळजी घेतली जात नाही म्हणून तक्रारी केलेल्या आहेत.

नंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील .....

मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, या बाबतीत अधिवेशन काळात आपण एक बैठक दीपक फर्टीलायझर कंपनीबरोबर घ्यावी जेणेकरुन कंपनीची जी दादागिरी चाललेली आहे आणि जे बेकायदेशीर उत्पादन त्या ठिकाणी केले जाते ते थांबविण्याचे काम करावे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई गिरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या महाराष्ट्रामध्ये शिक्षकांचा संप चालू आहे, प्राध्यापकांचा संप चालू आहे. आरोग्य विभागाच्या बाबतीत मघाशी सांगण्यात आले की, आम्हाला डॉक्टर्स मिळत नाहीत, आम्हाला एम.डी. डॉक्टर्स मिळत नाहीत. या महाराष्ट्रातील साडेतीन हजार निवासी डॉक्टरांचा प्रश्न आहे. हे निवासी डॉक्टर्स 24 तास काम करीत आहेत. जुलै-ऑगस्ट, 2009 मध्ये त्यांच्या मागण्या मान्य केल्या होत्या. आता या मागण्या 9 ऑक्टोबर, 2012 रोजी दिल्या होत्या. त्यांच्या केवळ 32 कोटी रुपयांच्या मागण्या आहेत. आता आठ महिने झालेले आहेत. त्यांच्या मागण्या मान्य करुन त्यांचा संप टाळावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, महिला व बालकल्याण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 154 वरील बाब क्रमांक 154 बाबत बोलणार आहे. यामध्ये स्वागत केंद्रे, राज्य गृहे व संरक्षण गृहे यांच्यासाठी प्रतिकात्मक तरतूद केलेली आहे परंतु जी वाजपेयी समिती आहे त्यांनी असे सुचविले आहे की, हे होम्स शासनाने चालवावीत. त्याची शासनाने गांभीर्याने दखल घ्यावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर मी ग्रामविकास विभागाच्या पृष्ठ क्रमांक 91 वरील बाब क्रमांक 100 बाबत बोलणार आहे. यामध्ये ग्रामसभेचा जो निर्णय आहे त्यामध्ये अंतर्गत रस्ते, गटारे व इतर सुविधांबरोबरच मुलींसाठी वेगळ्या खास अभ्यासिका शाळेमध्ये आणि वस्तीच्या ठिकाणी असण्याच्या संदर्भात ग्रामविकास विभागाने विचार करावा अशी मी विनंती करते.

सभातपी महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभागाने जागर जाणिवांचा यासाठी भरपूर तरतूद केलेली आहे परंतु आपल्याच राष्ट्रवादी पक्षाच्या मोहिमेशी जुळते नाव शासनाने घेणे म्हणजे अप्रत्यक्षरित्या प्रचार होतो. ही गोष्ट योग्य नाही असे मला सांगितले पाहिजे. एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, तो कार्यक्रम पक्षाच्या वतीने घेण्यात आलेला नव्हता. तो स्वतंत्र कार्यक्रम होता. स्त्री भ्रूणहत्येच्या विरोधात घेतलेला तो कार्यक्रम होता. त्याचा पक्षाशी काहीही संबंध नाही. हा चुकीचा उल्लेख या ठिकाणी करणे योग्य होणार नाही. पक्षाचा कोणताही भाग त्या कार्यक्रमामध्ये नव्हता. ते चांगले नाव होते म्हणून विद्यापीठाला वाटले. जागर हा जाणिवांचा, तुमच्या आमच्या लेकींचा ही राज्यभर एक मोहीम घेतली होती. ही मोहीम पक्षविरहित होती. त्या मोहिमेला विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे हे स्वत: सुरुवात करताना हजर होते. ही पार्श्वभूमी असताना प्रत्येक गोष्टीमध्ये राजकार आणि पक्षाचे नाव आणण्याची गरज नाही. हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. त्यामुळे यापुढे असे उल्लेख व्हावयास नको.

उप सभापती : तो उल्लेख कामकाजातून काढून टाकण्यात येईल.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे (विरोधी पक्ष नेते) : सभापती महोदय, सन 2012-13 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी येथे उभा आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्र.20 वरील महसूल व वन विभागाच्या बाब क्र.21 बाबत मी माझे विचार मांडू इच्छितो. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या वारसांना वित्तीय सहाय्य करण्यासाठी ही तरतूद केलेली आहे. उस्मानाबाद जिल्ह्यातील परांडा तालुक्यातील शेतकरी अंबादास गिरी यांनी 8 मार्च, 2013 रोजी आर्थिक विवंचनेला कंटाळून आत्महत्या केली. परंतु त्याने दारु पिऊन आत्महत्या केल्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांना मदत देता येणार नाही असे शासनाचे मत आहे. या शेतकऱ्याच्या शवविच्छेदन अहवालात अशा प्रकारची कोणतीही बाब आढळून आलेली नाही. (अडथळा) अंबादास गिरी यांच्या वारसांना वित्तीय मदत मिळाली पाहिजे अशी मी मागणी करतो.

यानंतर मी क्रीडा विभागाच्या बाब क्र.53 वर बोलत आहे. यातील दोन गोष्टी मला महत्वाच्या वाटतात. तत्कालीन माननीय क्रीडा मंत्री श्री.सुरेश शेट्टी यांनी चांगले क्रीडा धोरण आणले होते. त्यांच्यानंतर माननीय श्री.पद्माकर वळवी हे क्रीडा मंत्री झाले. ते चालताना सुध्दा एखाद्या क्रीडापटू सारखे वाटतात. ते या विभागासाठी काही तरी जोरदार करतील असे वाटले होते. परंतु त्यांचे असे म्हणणे आहे की, मला चांगला विभाग दिलेला नाही. पण या विभागासाठी त्यांनी काही तरी ठोस करुन दाखविले पाहिजे. क्रीडा धोरणानुसार कमिट्या स्थापन करावयाच्या आहेत. त्या देखील स्थापन केलेल्या नाहीत. एकूण मतदारांपैकी 40 टक्के मतदार युवा आहेत. अशा मतदारांचे भले केले तर मंत्री महोदयांचा फायदा होईल. या विभागाच्या अंतर्गत बीपीएड कॉलेज येतात. ही कॉलेज उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे ट्रान्सफर केली तर युजीसीकडून ग्रँट मिळेल. त्यामुळे शासनाचे 8 ते 10 कोटी रुपये वाचतील. त्यामुळे त्यांना सहावा वेतन आयोग लागू करता येईल. देशात महाराष्ट्र आणि अन्य एका राज्यामध्ये बीपीएड कॉलेज क्रीडा खात्याकडे ठेवलेली आहेत. अन्य राज्यांनी ही कॉलेज उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे दिल्यामुळे त्यांना युजीएसकडून अनुदान मिळते. त्यामुळे ही कॉलेज या विभागाकडे तातडीने वर्ग करावीत अशी माझी विनंती आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/

श्री.विनोद तावडे....

यानंतर मी पृष्ठ क्र.72 वरील जलसंपदा विभागाच्या बाब क्र.74 वर बोलणार आहे. महाराष्ट्र जलसंपदा नियमन प्राधिकरणाच्या कार्यालयाची जागा खरेदी करण्यासाठी 6 कोटी 69 लक्ष रुपयांची तरतूद केलेली आहे. शासनाने वर्ल्ड ट्रेड सेंटर लिजवर दिलेले आहे. या लिजच्या अटीनुसार ती जागा विकता येत नाही. भाड्याने देता येते. ती जागा जलसंपदा विभाग 6 कोटी रुपये देऊन विकत घेणार आहे. शासनाच्या जमिनीवर ते सेंटर उभे राहिले आहे, शासनाच्या मालकीचे ते सेंटर आहे. ते सेंटर फार तर भाड्याने देता येते. जागतिक व्यापार केंद्राबरोबर करार झालेला आहे. त्याची याला मान्यता आहे का ? दि.16.10.1970 रोजी म.विश्वेश्वरेय्या इंडस्ट्रिअल रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेण्ट सेंटर यांना 71.071 चौ.मी.जागा देण्याबाबत महसूल व वन विभागाने करार केला आहे. या जमिनीचा वापर औद्योगिक सुविधांकरिता तसेच प्रदर्शन भरविण्याकरिता करण्यात यावा, या जमिनीवर हॉटेल उभारु नये अशा अटी आहेत. परंतु कलंत्रीने सर्व कला तेथे दाखविल्या आहेत. त्यामुळे लिजच्या अटींचा भंग होत आहे. म्हणून ही जागा शासन विकत कशी काय घेऊ शकते ? त्यामुळे शासनाचे नुकसानच होणार आहे. याबाबतचे मुद्दे मी यापूर्वीही मांडलेले आहेत. परंतु शासन काहीही कार्यवाही करीत नाही. कारण शासनाला त्यांची भरती चालू ठेवावयाची आहे.

मंत्रालयाला आग लागल्यानंतर शासनाचे सचिव वर्ल्ड ट्रेड सेंटरमध्ये गेल्यावर त्या सेंटरच्या लोकांनी प्रथम पैसे आणा नंतर आत शिरावे असे सांगून त्यांना दाराबाहेर उभे केले होते. शासनाच्या जागेवर आणि पैशावर ते सेंटर उभे राहिले आहे. तरीही त्यांची दादागिरी चालते. ते सेंटर कोणी तरी चालवितो म्हणून त्यांचे चालवून घेतले जाते.

(सभापतीस्थानी तालिका सभापती डॉ.रणजित पाटील)

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. विनोद तावडे...

जलसंपदा विभाग, बाब क्रमांक 76, पृष्ठ क्रमांक 72. नाशिक जिल्हयातील मालेगाव तालुक्यातील मोसम नदीवर वडनेर-खाकुर्डी सिमेंट बंधारा या कामास पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त असून सदर कामास प्रशासकीय मंजुरी देऊन तातडीने निधी उपलब्ध करुन दिल्यास वडनेर-खाकुर्डी गावाचा पिण्याच्या पाण्याचा व परिसरातील शेतीचा काही प्रमाणात प्रश्न सुटू शकेल.

मोसम नदीवर वडनेर-खाकुर्डी सिमेंट बंधारा (अ.क्र.7 धारिका क्रमांक 59, दिनांक 16 फेब्रुवारी 2013) या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात यावी अशी मागणी मी या पुरवणी मागण्यांद्वारे करीत आहे. आता मी फाईल क्रमांक देखील सांगितलेला आहे. तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी काही तरी करावे.

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग. बाब क्रमांक 125, पृष्ठ क्रमांक 123. या बाबी अंतर्गत मुफसल क्षेत्रातील शासकीय अध्यपन रुणालयांच्या आहार खर्चासाठी तरतूद करण्यात आली आहे. पण चिंचवड, जिल्हा पुणे येथील भारत विकास शिक्षण संस्था ही हॉस्पिटलमध्ये मदतनीस म्हणून काम करणा-या लोकांना विविध विद्यार्थ्यांना मदतनीस व प्रशिक्षणार्थीचे प्रमाणपत्र देते. डॉक्टरांकडून मूळ कार्य अहवाल मागितला जातो. सदरच्या संस्थेकडून विविध खाजगी हॉस्पिटलमध्ये काम करणारे शिकाऊ मदतनीस यांचेकडून प्रत्येकी 5 ते 6 लाख रुपये फी घेऊन हॉस्पिटलमध्ये डॉक्टरांना मदतनीस म्हणून काम करणा-या प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र दिले जाते. उक्त प्रमाणपत्राच्या आधारे सदरचे प्रशिक्षणार्थी हे विविध हॉस्पिटलमध्ये निवासी डॉक्टर R.M.O. म्हणून काम करतात ही बाब गंभीर असून सदर संस्था ही शासकीय नोंदणीकृत आहे अथवा नाही याची पडताळणी करावी व वैद्यकीय शिक्षण विभागाची किंवा सार्वजनिक आरोग्य विभागाची सदरच्या अभ्यासक्रमास मान्यता आहे अथवा नाही याची खात्री करावी. तसेच सदरहू संस्थेकडून कोणते अभ्यासक्रम चालविले जातात, किती फी घेतली जाते व कोणते प्रमाणपत्र दिले जाते याची माहिती घ्यावी. माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांच्या चिंचवड गावातील ही संस्था आहे.

सभापती महोदय, जेण्डर सेन्सेटायझेशनचा विषय काढलेला आहे. त्याप्रमाणे सोशल सेन्सेटायझेनची आवश्यकता मी मांडलेली आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

उच्च व तंत्र शिक्षण विभाग. बाब क्रमांक 146, पृष्ठ क्रमांक 149. सायन, मुंबई येथील पद्मविभूषण वसंतदादा पाटील प्रतिष्ठान कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या प्रशासनातील गैरकारभाराची चौकशी करणे आवश्यक आहे. हा खूप जुना विषय आहे. महापालिकेचे नियम धाब्यावर बसविलेले आहेत. सदर महाविद्यालयाच्या इमारतीचा पाचवा व सहावा मजला अनधिकृत असल्याचे उघडकीस आले आहे. महानगरपालिकेने याबाबतीत संस्थेला नोटीस देखील बजावलेली आहे. सदरील कॉलेजच्या प्रशासनाकडून खोट्या प्रमाणपत्राच्या आधारे परवानग्या व मान्यता घेतल्या गेल्या आहेत हेही लोकांनी सिद्ध करुन दाखविलेले आहे.

विशेषत: पीआयसी-1 ही लॅबोरेटरी म्हणून दर्शविली आहे. परंतु अशी कोणतीही लॅबोरेटरी अस्तित्वात नाही. फॅकल्टी रुम अस्तित्वात असून 460 चौ.मी.क्षेत्र दर्शविले आहे. तथापि संपूर्ण महाविद्यालयात कोठेही 460 चौ.मी.क्षेत्र अस्तित्वात नाही. परीक्षा नियंत्रण कार्यालय 30 चौ.मी. क्षेत्राचे दर्शविले आहे. पण असे कोणतेही कार्यालय अस्तित्वात नाही. 250 चौ.मी.चे मुलींचे वसतिगृह दर्शविले आहे. परंतु असे कोणतेही वसतिगृह अस्तित्वात नाही. अशी मुलींच्या वसतिगृहाची परिस्थिती आहे. परवानगी मिळण्याकरिता एडब्ल्यू-2, सीएलआर-1, ईएलआर-1 अशा खोल्या दर्शविल्या आहेत. पण अशा स्वरुपाच्या कोणत्याही खोल्य अस्तित्वात नाहीत. अशा सर्व अनधिकृत गोष्टी असताना त्या कॉलेजला आपण पाठीशी का घालता ? त्या ठिकाणी विद्यार्थी आंदोलन करतात, प्राध्यापक आंदोलन करतात. जे प्राध्यापक आंदोलन करतात त्यांना काढून टाकले जाते. स्व. वसंतदादा पाटील यांच्या नावाने कोणी गैरकारभार करीत असेल तर उच्च व तंत्रशिक्षण खाते गप्प बसून राहाणार आहे काय ? या बाबतीत मंत्री महोदय काय कारवाई करणार आहेत हे मला समजून घ्यायचे आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2012-2013च्या पूरक मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग. बाब क्रमांक 142, पृष्ठ क्रमांक 147. विद्यापीठाच्या विकासासंबंधीची ही बाब आहे. जसा मुंबई विद्यापीठामध्ये घोळ आहे तसा शिवाजी विद्यापीठामध्ये देखील घोळ आहे. शिवाजी विद्यापीठाच्या अखत्यारिमध्ये जी महाविद्यालये येतात त्या महाविद्यालयाच्या परीक्षा देखील त्यांनी बेमुदत पुढे ढकलल्या आहेत. या परीक्षा नेमक्या कधी होणार आहेत यासंबंधी विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. मुंबई विद्यापीठाच्या कारभाराबाबत देखील अनेक गोष्टी सांगता येतील. मी माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री महोदय श्री. राजेश टोपे यांना विनंती करतो की, त्यांनी जशी आमदारांची आणि विद्यापीठांच्या कुलगुरुंची बैठक घेतली होती तशा प्रकारची बैठक घ्यावी जेणे करुन त्यांच्या समोर आम्हाला विद्यापीठांचे प्रश्न मांडता येतील.

महिला व बालविकास विभाग. बाब क्रमांक 151, पान क्रमांक 153. सभापती महोदय, ज्या तीन कंपन्यानी पोषण आहार पुरविला त्यांच्या संदर्भात या सभागृहामध्ये चर्चा झाली.

...नंतर श्री. गिते..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

या तीन कंपन्यांना काळया यादीत टाकण्यात आले आहे काय, त्या कंपन्या आजही आहार पुरवित आहेत काय या बाबतची माहिती सभागृहाला देणे गरजेचे आहे. हा विषय आम्ही माननीय राज्यपाल महोदयांकडे देखील मांडला होता. परंतु तो विषय त्यांनी आपल्याकडे रेफर केला आहे. परंतु या बाबतीत शासनाकडून माननीय राज्यपालांना उत्तर दिले गेलेले नाही ही वस्तुस्थिती आहे.

तालिका सभापती (डॉ.रणजित पाटील) : सभागृहाचे कामकाज माननीय मंत्र्यांची उत्तराची भाषणे पूर्ण होईपर्यंत वाढविण्यात येत आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, या बाबतीत पुन्हा निविदा प्रक्रिया केली आहे काय, त्या कंपन्यांनाच कंटीन्यू केलेले आहे, या कंपन्यांना काळया यादीत टाकावयाचे होते, त्यांना काळया यादीत का टाकण्यात आले नाही या विषयी शासनाची भूमिका सभागृहात स्पष्ट झाली पाहिजे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 23 ही सार्वजनिक आरोग्य विभागाची आहे. सदर बाब ही जीवनदायी योजने विषयी आहे. अमरावती सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये जीवनदायी योजना बंद आहे असे मी स्वत: जाऊन पाहिलेले आहे. अमरावती येथे करोडो रुपये खर्च करुन सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल बनविले. परंतु त्या ठिकाणी जीवनदायी योजना बंद आहे ही दुर्देवाची गोष्ट आहे.

सभापती महोदय, एक दुसरी बाब मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. एका दूरदर्शन चित्रवाहिनीवर असे दाखविण्यात आले की, नेमीनाथ फाऊंडेशन, कांदिवली, मुंबई यांना रुग्णालय चालविण्यासाठी दिले आहे. येथील डायलिसेस सेंटमध्ये जीवनदायी योजनेच्या लाभार्थ्यांकडून पैसे घेतले जातात. या संदर्भात स्ट्रींग ऑपरेशन झालेले आहे. ते एका दूरदर्शन चित्रवाहिनीने दाखविले आहे. त्याच बरोबर सेव्हनहिल रुग्णालयात जीवनदायी योजना पूर्णपणे बंद आहे.

सभापती महोदय, अमरावती येथील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या बाबतीत आणखी एक गोष्ट मी निदर्शनास आणून देत आहे. अमरावती येथील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये कन्सल्टंट

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

येतात आणि त्याची बिले राज्य शासनाच्या नावावर टाकतात. ही ऑपरेशन्स आम्ही जीवनदायी योजनेतून केली असे दाखवितात. जवळ 7 कोटी रुपयांची बिले पेंडींग आहेत असे दाखविले गेले आहे. ती बिले कोणी वसूल करावयाची? ती रक्कम वसूल करण्यासाठी एका डॉक्टरने ठेका सुध्दा घेतलेला आहे. दोन दिवस अमरावती येथील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल मधील डॉक्टर्स आणि कर्मचारी संपावर होते. या बाबतीत चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्यात यावी अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबंधित एक मुद्दा आहे. आजच्या कार्यक्रम पत्रिकेत तारांकित प्रश्नाची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली. दिनांक 19 डिसेंबर, 1997 रोजी सन्माननीय श्री.छगन भुजबळ, श्री.वसंत चव्हाण, श्री.बबनराव ढाकणे, श्रीमती विद्या बेलोसे यांनी विचारलेल्या कुपोषणाच्या प्रश्नासंबंधीची माहिती आज रोजी दिली गेली आहे. ही अतिशय दुर्देवी बाब आहे. या सभागृहात अनुपूरक माहिती सादर करण्यास आरोग्य विभागास 16 वर्षे लागली ही खेदाची गोष्ट आहे.

सभपती महोदय, पान क्रमांक 119, बाब क्रमांक 122 ही वैद्यकीय शिक्षणाशी संबंधित आहे. यंत्रसामुग्री खरेदी करणे यासंबंधीची मागणी आहे. व्हेंटीलेटर कसे खरेदी करावेत या बाबत राज्य सरकार आणि केंद्र सरकार यांनी काही नॉर्मस् ठरवून दिलेले आहेत. त्या नॉर्मस् प्रमाणे व्हेटीलेटर खरेदी करावेत अशा प्रकारचे वैद्यकीय शिक्षण खात्याच्या संचालकांना पत्र लिहून सांगण्यात आले आहे. आपल्याकडे महिला डॉक्टर श्रीमती भांडाळीकर आहेत, त्या बधिरीकरणाच्या त्या प्रोफेसर आहेत. त्या हे सगळे काम पाहतात. त्यांनी मला असे उत्तर दिले की, व्हेटीलेटर खरेदी करण्यासंबंधी केंद्र शासनाने जे नॉर्मस् ठरवून दिलेले आहेत, ते नॉर्मस् आमच्यावर बंधनकारक नाहीत. आम्ही आमचे नॉर्मस् ठरवून आम्हाला पाहिजे तसे व्हेंटीलेटर खरेदी करणार आहोत. आज अमरावती येथील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलकडून व्हेंटीलेटरची खरेदी वेगळया पध्दतीने केली जात आहे. मुंबई, पुणे, नाशिक येथील रुग्णालये व्हेंटीलेटर वेगळया पध्दतीने खरेदी करीत आहेत. त्या ठिकाणी असलेल्या डॉक्टरांचे कंपन्याशी असलेले लांगेबांधे पाहून व्हेंटीलेटरची खरेदी चालली आहे. वैद्यकीय शिक्षण विभागाच्या संचालकांना पदावरुन हटवावे अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

डॉ.दीपक सावंत...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, बाब क्रमांक 125, पान क्रमांक 123 ही मुफसल क्षेत्रातील शासकीय अध्यापन रुग्णालयांच्या आहार खर्चासंबधीची मागणी आहे. जी खाजगी वैद्यकीय महाविद्यालये आहेत त्यांचे बरेचसे प्रवेश रखडलेले आहेत. ही बाब न्यायप्रविष्ठ आहे.

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

तारांकित प्रश्नाच्या यादीत देखील हा प्रश्न उपस्थित झालेला होता. अनेक खाजगी मेडिकल कॉलेजांमध्ये मुलांना प्रवेश मिळालेला नाही. ते मेरिटमध्ये असूनही त्यांचे मेरिट डावलले गेले. शासनाची या संदर्भात नेमकी भूमिका काय आहे, या विद्यार्थ्यांना कॉलेजबाहेर ठेवणार की त्यांना प्रवेश मिळवून देण्यासाठी खाजगी मेडिकल कॉलेजांना सांगितले जाणार आहे? एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन 2012-2013 च्या पुरवणी मागण्यांना विरोध करण्यासाठी आणि त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, महिला व बालविकास विभागाची मागणी क्रमांक 53, पृष्ठ क्रमांक 44. मागील वेळेस मी हा विषय उपस्थित केला होता. केंद्र शासनाच्या महिला व बालविकास योजनेतील 1000 कोटी रुपयांचा घोटाळा उघडकीस आला. या प्रकरणाची सीबीआयने चौकशी केली. त्यांनी आरोप निश्चित केले. महाराष्ट्राच्या आयोगाने आरोप निश्चित केले. माननीय राज्यपाल व माननीय मुख्यमंत्री यांना कळविले गेले. मात्र त्यानंतर या प्रकरणात पुढील कार्यवाही थांबली आहे.

सभापती महोदय, आदिवासी समाजाच्या खाद्य खरेदीमध्ये 1000 कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याबद्दल सीबीआयने चौकशी केली व आरोपपत्र दाखल केले. राज्याच्या आयोगाने चौकशी केली आणि आरोपपत्र निश्चित केले. माननीय मुख्यमंत्र्यांना अहवाल सादर करण्यात आला. हे प्रकरण महाराष्ट्र शासनाने थांबवून ठेवले आहे. सीबीआयने स्पष्ट म्हटले आहे की, या प्रकरणात महाराष्ट्राच्या राजकीय क्षेत्रातील मोठे नेते सहभागी आहेत. माझ्याकडे सीबीआयचा अहवाल उपलब्ध आहे. आदिवासी समाजाच्या खाद्य खरेदीमध्ये अशा पध्दतीने घोटाळा करण्यात आला. शिवालिक बिल्डरचे श्री.जाधव यांचेही नाव यात आहे. दोन कंपन्या आहेत. त्यांचे हित जोपासण्यापेक्षा आज राज्य शासनाकडे पैसा नाही, दुष्काळी स्थिती आहे त्याकडे लक्ष दिले पाहिजे. घोटाळ्यामध्ये जे लोक सामील आहेत त्याबाबत श्री.विराज पटनाईक यांचा अहवाल आलेला आहे. त्यांनी शिक्कामोर्तब केले आहे. या अनुषंगाने कोणती कारवाई केली हे महिला व बालविकास मंत्री महोदयांनी सभागृहाला सांगावे.

सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या मागण्यांबाबत बोलत असताना एका महत्वाच्या विषयाकडे मी मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो. परळच्या हाफकीन इन्स्टिट्यूटमध्ये जी कामे झाली ती वास्तविक पाहता सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत होणे अपेक्षित होते. हाफकीन संस्थेने आपले सर्व विभाग बंद करुन ठेवले आहेत, तेथे औषध निर्मिती होत नाही. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत टेंडर न काढता संस्थेचे प्रमुख श्री.साबदे यांनी.....

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

कामे केली आहेत. मी मंत्री महोदयांना, विभागाच्या सचिवांना पत्र पाठवूनही श्री.साबदे यांच्याविरुध्द कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. श्री.साबदे यांचा तीन वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर त्यांची तेथून बदली करण्यात आली. परंतु ते मंत्री महोदयांचे अतिशय लाडके अधिकारी असावेत, त्यांना पुन्हा तेथे नेमण्यात आले. त्यांच्याविरुध्द ठोस कारवाई कोणती करणार आहात हे सभागृहाला सांगण्यात यावे. मी संपूर्ण प्रकरण मंत्री महोदयांकडे यापूर्वी पाठविले आहे. पुन्हा संपूर्ण प्रकरण त्यांच्याकडे देतो. माननीय राज्यमंत्री श्री.सतेज पाटील यांचे कोणीही ऐकत नाही अशी माहिती मिळालेली आहे. अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त श्री.महेश झगडे हे सुध्दा त्यांचे ऐकत नाहीत, अशीही माहिती बाहेर आली आहे.

नंतर 4एल.1..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

असे जर असेल तर तुम्ही त्यांच्यावर कारवाई का करीत नाही ? पुण्याला आयुक्त असतांना श्री. गायकवाड यांच्यावर केस केल्यानंतर कोर्टाने श्री. महेश झगडे यांच्यावर ताशेरे ओढले होते.झगडे यांनी श्री.गायकवाड यांना अनाधिकृत बांधकाम करण्यासाठी मदत केली होती तसेच समोरच्या पार्टीकडून 50 हजार रुपयांची लाच घेण्यासाठी मदत केली होती असा ठपका कोर्टाने ठेवला आहे. महेश झगडेच्या संदर्भात आम्ही आपल्याला पत्र दिले असतांना आपण त्यांच्यावर काय कारवाई केली ते आपण येथे सांगण्याची गरज आहे. कोर्टाने ताशेरे मारल्यानंतही त्याची दाद घ्यायची नाही, भ्रष्टाचाराला पूर्ण मुभा द्यावयाची असा काही तुम्ही निर्णय घेतला आहे काय ? त्यामुळे यांसदर्भात आम्हाला माहिती दिली तर आमच्या ज्ञानात काही तरी भर पडेल.

सभापती महोदय, सिंचनाच्या संदर्भात बाब क्रमांक 74, पृष्ठ क्रमांक 74 वर मी माझे विचार मांडणार आहे. शिवशाहीच्या काळात कोकणामध्ये एकंदर 35 पाटबंधाऱ्यांची कामे सुरु करण्यात आली होती. परंतु आमची सत्ता गेल्यानंतर सर्व कामे ठप्प झाली. कोकणाच्या विकासासाठी,कोकणाच्या 35 पाटबंधाऱ्यासाठी आपण किती तरतूद करणार आहात ? आम्ही त्यावेळेस जे 35 पाटबंधारे घेतले होते ते कधी पूर्ण केले जाणार आहे ? याची माहिती दिली तर चांगले होईल. हे 35 पाटबंधारे खेड तालुक्यातील आहेत. पोयनार, तळवड, मांडवे, खुटी पिंपळवाडी, तळवडखेड ही सहा धरणे तशीच पडून आहेत. या ठिकाणच्या गावांसाठी 10 टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे. त्यामुळे या शासनाची कोकणासाठीची भूमिका एकदा आपण सभागृहात स्पष्ट करावी अशी विनंती करतो. आपण मला बोलण्यासाठी वेळ दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद.

जय हिंद, जय महाराष्ट्र

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती वर्षा गायकवाड (महिला व बालविकास मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे,सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत, सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी पुरवणी मागण्यांच्या संदर्भात चांगल्या सूचना केलेल्या आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी जो मुद्दा उपस्थित केला होता त्यासंदर्भात मी सर्व बाबी पुन्हा एकदा तपासून धेईन एवढे या निमित्ताने सांगते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम तसेच सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी सुप्रीम कोर्टाच्या संदर्भात विषय उपस्थित केला असून त्यासंदर्भात मी सांगू इच्छिते की, सीबीआयचा आदिवासी विकासाच्या संदर्भात विषय उपस्थित झाला होता. मला या ठिकाणी सांगावयाचे आहे की, आम्हाला केंद्र शासनाचे पत्र दि. 24.2.2000 मध्ये रिगार्डींग माइक्रो न्युट्रीयन्स फूडसाठी आले होते. हा पोषण आहार कशा प्रकारे दिला पाहिजे यासाठी हे पत्र आले होते. त्यानुसार 6 महिने ते 3 वर्षे बालके, गर्भवती माता, स्तनदा माता असा याचा क्रायटेरिया होता. मधल्या काळात सुप्रीम कोर्टाने केंद्रशासनाच्या ज्या गाईड लाईन्स दिल्या होत्या त्यांना सुप्रीम कोर्टाने दि. 22.4.2000 रोजी मान्यता दिली.

राज्य शासनाने सुप्रीम कोर्टाच्या आणि केंद्र शासनाच्या गाईडलाईन्स नुसार राज्य शासनाने 24.8.2009 रोजी जीआर काढला होता. त्यानंतर असे सांगण्यात आले की, माईक्रो न्युट्रीयन्स आणि फॉर्टिक्युलस फुडच्या संदर्भात निविदा मागण्यात आल्या. या आधी महाविमलाही सन 2004 च्या जीआर नुसार आपण हे काम घेणार आहात का याबाबत आपण त्यांना विचारणा केली होती परंतु त्यांनी नकार दर्शवल्यामुळे निविदा काढल्या व त्यामध्ये 3 संस्था पात्र झाल्या त्यांना पुरवठा देण्याचा आदेश दि.14.5.2010 रोजी निर्णय काढण्यात आला.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती वर्षा गायकवाड....

पण त्यासंबंधी काही तक्रारी करण्यात आल्या. त्यामुळे अधिकाऱ्यांची समिती नियुक्त करण्यात आली. समितीने दिनांक 5.2.2010 रोजी अंतिम मान्यता दिली. त्यावरची स्थगिती दिनांक 22.2.2010 रोजी उठविण्यात आली व तो पुरवठा सुरू करण्यात आला. या विरोधात काही जण मुंबई उच्च न्यायालयात, तर काही जण नागपूर खंडपीठामध्ये गेले. काहींनी केस मागे घेतली. केस हरल्यानंतर काही जण सुप्रीम कोर्टात गेले. शगुन महिला औद्योगिक संस्था विरूद्ध महाराष्ट्र शासन प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले. त्याचा निर्णय राज्य शासनाच्या बाजूने लागला. आयसीडीएसचे सारखे चेकिंग होणे आवश्यक आहे.

196/2001 पीयुसीएल विरूद्ध भारत सरकार प्रकरणाची केस आहे. त्यानुसार सातत्याने आयसीडीएसवर मॉनेटरींग करून रिव्ह्यू घेतला जातो. डॉ.एन.सी.सक्सेना, सुप्रीम कोर्ट कमिशनर, श्री.हर्ष मंदेल, सुप्रीम कोर्ट स्पेशल कमिशनर, श्री.विराज पटनायक, प्रिन्सिपल ॲडव्हायझर फॉर द ऑफिस ऑफ सुप्रीम कोर्ट कमिशनर, यांच्या माध्यमातून पहिला अहवाल दिनांक 2.11.2012 रोजी देण्यात आला. त्यांनतर दुसरा अहवाल दिला गेला. मधल्या कळात माननीय मुख्यमंत्र्यांनी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. या समितीला त्यांनी सगळ्या चौकशीचे अधिकार दिलेले आहेत. त्यांच्या माध्यमातून ॲफिडेव्हीट करण्यापासून सगळ्या बाबी होणार आहेत. हे प्रकरण आता सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे यावर भाष्य करणे योग्य होणार नाही. या प्रकरणासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांनी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे. ज्यावेळी ह्या गोष्टी झाल्या त्यास सुप्रीम कोर्टाने मान्यता दिलेली आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, कोर्टाचा स्टे असला तरी सप्लाय सुरू आहे.

श्रीमती वर्षा गायकवाड : सभापती महोदय, हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे आम्हाला सुप्रीम कोर्टामध्ये जाऊन परवानगी घ्यावी लागेल. आम्ही ॲफिडेव्हीट फाईल केलेले आहे. आम्ही मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे. त्या समितीच्या माध्यमातून मॉनेटरींग करण्याचे काम सध्या सुरू आहे. त्यावेळी झालेल्या घडामोडी मी सन्माननीय सदस्यांना सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. मी आपल्या मार्फत सभागृहाला विनंती करते की, महिला व बालविकास विभागाच्या मागण्या मान्य कराव्यात. धन्यवाद.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.पद्माकर वळवी (क्रीडा मंत्री) : सभापती महोदय, क्रीडा विभागाच्या मागण्यांवर बोलताना सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी विदर्भातील कबड्डीच्या खेळाडूंना एस.टी.पासमध्ये सवलत देण्यात यावी अशा प्रकारचा मुद्दा उपस्थित केला आहे. याबाबत परिवहन विभागाशी चर्चा करून योग्य त्या सूचना देण्यात येतील.

सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे की, क्रीडा विभागाच्या अखत्यारित असलेले शारीरिक शिक्षण महाविद्यालय उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे वर्ग करण्यात यावे. त्यासंबंधी आम्ही होकारार्थी आहोत. क्रीडा विभाग हे महाविद्यालय त्यांच्याकडे देण्यास तयार आहे. यासंबंधात आमची प्रोसेस सुरू आहे. हे काम लवकरात लवकर होईल. तसेच क्रीडा धोरणा संबंधातील समित्या करावयाच्या आहेत. त्याबाबत देखील कारवाई केली जाईल. सभागृहाने मागणी क्रमांक ई-3 अंतर्गत बाब क्र.53 व 53 खालील रूपये 2000 ची लाक्षणिक मागणी केली आहे त्यास सभागृहाने मान्यता द्यावी ही विनंती. धन्यवाद.

.....

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील (ग्राम विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी डांबरीकरणाऐवजी क्राँक्रीटचे रस्ते करावेत असे सांगितले. काँक्रीटचे रस्ते करण्यासाठी निश्चितपणे परवानगी दिली जाईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या संदर्भात मी वांरवार पत्र व्यवहार केलेला आहे परंतु त्याची दखल घेण्यात आलेली नाही.

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, दोन दिवसांत परवानगी देण्याची व्यवस्था करण्यात येईल. यामध्ये काही अडचण नाही.

सभापती महोदय, या ठिकाणी मुलींसाठी अभ्यासिका करण्यासाठी सूचना करण्यात आली ती स्वागतार्ह आहे.

सभापती महोदय, ग्राम विकास विभागाच्या बाब क्रमांक 96,97,98, 100 आणि 101 अशा एकूण 121 कोटी 28 लाख 92 हजार इतक्या रकमेच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी माझी विनंती आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, कोकणामध्ये विशेषत: रत्नागिरी जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर पाऊस झाला. मागील तीन वर्षापासून सरकारने रस्ते दुरुस्तीसाठी काहीही निधी दिलेला नाही. तेव्हा एस.टी.महामंडळाने लेखी कळविले आहे की, रस्त्यांची दुरुस्ती झाली नाही तर एस.टी.सेवा बंद करण्यात येईल. काही ठिक्राणी एस.टी.सेवा बंद झालेली आहे त्यामुळे लोकांना दहा-दहा कि.मी.अंतर पायी चालत जावे लागत आहे. आम्ही तीन तालुक्यातील रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी तीन कोटी रुपयांची मागणी केली. परंतु आम्हाला फक्त 1 कोटी रुपये देण्यात आले. कोकणातील रस्ते् दुरुस्तीसाठी निधी दिला नाही तर 1 तारखेपासून एस.टी.सेवा बंद करण्यात येईल अशी नोटीस एस.टी.महामंडळाने ग्रामपंचायतींला दिलेली आहे. तेव्हा माझा मंत्री महोदयांना प्रश्न आहे की, आपण रस्त्याच्या दुरुस्तीसाठी पैसे देणार आहात की, एस.टी.सेवा बंद करणार आहात ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, एस.टी.सेवा बंद करण्याची कोणतीही नोटीस आली असेल तर निश्चितपणे त्या रस्त्याला प्राधान्य दिले जाईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान (सार्वजनिक आरोग्य आणि शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाची बाब क्रमांक 122, 123, 124 आणि शालेय शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 51 आणि 52 सभागृहाने मान्य कराव्यात अशी मी विनंती करते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी दोन-तीन प्रश्न उपस्थित केलेले आहेत. अमरावती सुपर स्पेशालिटी हॉस्पीटलमध्ये जीवनदायी योजना बंद आहे असे त्यांनी सांगितले. परंतु तशी वस्तुस्थिती नाही. त्या ठिकाणी राजीव गांधी जीवनदायी योजना सुरु आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य त्या ठिकाणी जाऊन आले आहेत. सन्माननीय सदस्यांना आपणावर हक्कभंग प्रस्ताव आणण्याचा अधिकार राहील.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, माझ्याकडे जी माहिती आली ती मी सांगितली आहे..या संदर्भात विभागाकडून माहिती घेण्यात येईल. त्या ठिकाणी राजीव गांधी जीवनदायी योजना सुरु आहे. जीवनदायी योजना सुरु नाही.

सभापती महोदय, सेव्हन हिल्स हॉस्पीटलमध्ये राजीव गांधी जीवनदायी योजना सुरु आहे. जीवनदायी योजना आणि राजीव गांधी जीवनदायी योजना अशा दोन वेगवेगळ्या योजना आहेत. राजीव गांधी जीवनदायी योजना आठ जिल्ह्यात सुरु आहे. सेव्हन हिल्स हॉस्पीटलमध्ये मोठ्या प्रमाणावर केसेस होतात अशी माझी माझ्याकडे माहिती आहे.

सभापती महोदय, सुपर स्पेशालिटी हॉस्पीटलमधील कन्सल्टंटच्या बाबतीत मुद्दा उपस्थित करण्यात आला. त्याबाबत चौकशी करण्यात येईल. त्याचप्रमाणे नविनात फाऊडेन्शन सेंटर, कांदिवली, संदर्भात माहिती देण्यात आली त्याबाबत देखील चौकशी करण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर यांनी निवासी डॉक्टरांच्या मागण्यांच्या संदर्भात उल्लेख केला त्याबाबत माहिती घेऊन ती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल. सार्वजनिक आरोग्य विभाग आणि शालेय शिक्षण विभागाच्या पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी विनंती आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

अशुद्धीत पत्र / मुद्रितेषा नाही

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर (जलसंपद मंत्री(कृष्णा खोरे-पाटबंधारे महामंडळ)) : सभापती महोदय, जलसंपदा विभागाच्या बाब क्रमांक 74 ते 78 या पुरवणी मागण्या सभागृहासमोर विचारार्थ ठेवण्यात आल्या होत्या.

या पुरवणी मागण्यांवर चर्चा करताना माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी या मागण्यांच्या बाबतीत थोडा आक्षेप घेतला. एमडब्ल्यूआरएलला जमीन लीजवर देताना शासनाने घातलेल्या अटींचा भंग होत असल्याचे त्यांनी सांगितले. परंतु तसा काही विषय नाही. जलसंपदा विभागाच्या प्रस्तावानुसारच वर्ल्ड ट्रेड सेंटरमधील 9 व्या मजल्याच्या सिकॉमकडे असलेल्या लीज राईट आपण ट्रान्सफर करीत आहोत. त्यामुळे अटींचा भंग होईल असे नाही.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी कोकणातील 35 पाटबंधाऱ्यांचा विषय मांडला. त्यांनी या बंधाऱ्यांसाठी निधीची मागणी केली आहे. त्यांनी गोपी पिंपळवाडी आणि इतर पाच पाटबंधाऱ्यांबाबत सांगितले. 2013-14 च्या बजेटमध्ये या बंधाऱ्यांचा निश्चितपणे विचार केला जाईल.

महोदय, माझी विनंती आहे की, जलसंपदा विभागाच्या पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके (महसूल, मदत व पुनर्वसन राज्यमंत्री) : सभापती महोदय, महसूल विभागाची सी-1 बाब क्र.20 तसेच मदत व पुनर्वसन विभागाच्या बाब क्र.21 ते 25 या सर्व पुरवणी मागण्या मी सभागृहास सादर करीत आहे. तसेच वस्त्रोद्योग विभागाची बाब क्र.139 ही पुरवणी मागणी सभागृहासमोर सादर करीत आहे.

महोदय, महसूल व मदत कार्य विभागाच्या बाबतीत आदरणीय ज्येष्ठ सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी दोन मुद्दे उपस्थित केले आहेत. विशेषत: गारपीट आणि अतिवृष्टी झालेल्या भागातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्यासाठी त्या ठिकाणी सर्वेक्षण करुन पंचनामे कधी सुरु करण्यात येतील असे त्यांनी विचारले आहे. प्राथमिक अंदाजानुसार 65 हजार हेक्टर क्षेत्रावर हानी झाली आहे. या क्षेत्राचे पंचनामे करण्याचे आदेश शासनाच्या माध्यमातून दिलेले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी पंचनामे करण्याचे काम त्यांच्या यंत्रणेमार्फत सुरु केलेले आहेत. पंचनाम्यांचा अहवाल आल्यानंतर फळबागाच्या नुकसानीपोटी प्रती हेक्टर 10 हजार रुपये आणि इतर पिकांच्या नुकसानीपोटी प्रती हेक्टर 5 हजार रुपये देण्याचा निर्णय झालेला आहे. पंचनामे प्राप्त झाल्यानंतर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना ही मदत तातडीने पोहचवली जाईल.

तसेच त्यांनी आत्महत्यांच्या बाबतीत काही माहिती विचारलेली आहे. दि.1 जानेवारी, 2012 ते दि.31 जानेवारी, 2012 या कालावधीत आत्महत्यांची एकूण 1145 प्रकरणे जिल्हा समित्यांकडे दाखल झाली. विविध समित्यांच्या माध्यमातून 473 प्रकरणे पात्र ठरविली गेली. 178 प्रकरणे प्रलंबित आहेत आणि अपात्र प्रकरणांची संख्या 494 आहे. मदतीच्या पात्रतेसाठी नापिकी आणि कर्जबाजारीपणा हे दोन निकष ठरविलेले आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या दोन निकषात बसत असताना सुध्दा शेतकऱ्यांना अपात्र ठरविले आहे.

श्री.प्रकाश सोळंके : महोदय, आपण माझ्याकडे यादी द्यावी. जर या दोन निकषात बसून सुध्दा शेतकरी पात्र ठरले नसतील तर त्यांची फेरतपासणी करण्यात येईल.

श्री.रामदास कदम : माननीय श्री.प्रकाश सोळंके साहेब, आपण राज्यमंत्री असताना सन्माननीय सदस्यांकडून कशाला माहिती मागविता ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके : महोदय, जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली प्रत्येक जिल्ह्यात समित्या नेमलेल्या आहेत. मी सांगितल्याप्रमाणे उपरोक्त दोन निकषात प्रकरणे बसत नसतील तर ती प्रकरणे अपात्र ठरविली जातात. मी अगोदर सांगितले की, ज्या प्रकरणात निकष पूर्ण होऊनही त्यांना मदत मिळाली नसेल तर त्या प्रकरणी फेरतपासणी करण्यात येईल.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी एका प्रकरणी माझ्याकडे कागदपत्रे दिली आहेत.

नंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके.....

त्या संदर्भामध्ये मी अधिवेशन काळातच आयुक्त, जिल्हाधिकारी आणि जे तक्रारदार आहेत त्यांची बैठक या ठिकाणी घेईन. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी श्री. अंबादास गिरी या शेतकऱ्याला मदत मिळाली नाही अशी तक्रार केलेली आहे. या प्रकरणाची सुध्दा फेरतपासणी करुन लवकरात लवकर मदत द्यावी असे आदेश देण्यात येतील. सभापती महोदय, या पुरवणी मागण्या मान्य कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ ST/ D/

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर (जलसंपदा मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे साहेबांनी एक मागणी केली होती की, मालेगाव तालुक्यातील मोसल नदीवर वडनेर काकोडी सिमेंट बंधाऱ्यास प्रशासकीय मान्यता देण्याच्या बाबतीत उत्तर द्यावे. सिमेंट बंधारा म्हणजे जर सिमेंट प्लगचे काम असेल तर कदाचित हा प्रस्ताव जलसंधारण खात्याकडे जाईल. याची योग्य ती तपासणी करुन लवकरात लवकर प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. डी.पी.सावंत (उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या पुरवणी मागण्यांच्या संदर्भात सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे तसेच सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी काही सूचना केल्या. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी वसंतदादा कॉलेज ऑफ इंजिनिअरींग सायन्स संदर्भात विचारणा केली. या कॉलेजच्या संदर्भात शासनाकडे तक्रार प्राप्त झाली होती. त्या अनुषंगाने उच्च व तंत्रशिक्षण विभागाने संचालक, तंत्रशिक्षण यांना सदर बाबीची चौकशी करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. तसेच हे तंत्रशिक्षण एआयसीटी मार्फत कंट्रोल केले जाते. त्यामुळे एआयसीटीला काही त्रुटी दिसून आलेल्या आहेत का याबाबत आपण एआयसीटीला सुध्दा लिहिले आहे. सदर कॉलेजचे जेवढे अकॅडमिक इश्यूज आहेत त्या बाबतीत मुंबई विद्यापीठाकडून माहिती मागविण्यात आलेली आहे. या बाबतीत काय कारवाई केली या संदर्भात नक्की आपल्याला अवगत करण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी 'जागर जाणिवांचा' कार्यक्रमाच्या संदर्भात वक्तव्य केले. मी त्यांना सांगू इच्छितो की, गेल्या काही महिन्यांमध्ये महिलांवर अत्याचार झाले. त्या संदर्भात कॉलेजमध्ये किंवा विद्यार्थी दशेतच विद्यार्थी-विद्यार्थीनींमध्ये चांगले सलोख्याचे वातावरण निर्माण व्हावे, विद्यार्थीनींना सन्मान कसा द्यावा हे कॉलेजमध्ये शिकवावे आणि विद्यार्थीनींसाठी कोणते कॉलेज चांगल्या सुविधा देते, कॉलेजचे वातावरण छेडछाडमुक्त कसे करता येईल यासाठी या वर्षापासून 'जागर जाणिवांचा' हा कार्यक्रम राबविला. त्याची प्रेरणा कोठूनही घेतली असेल पण हा कार्यक्रम अतिशय चांगला आहे. आपण विद्यापीठ पातळीवर, जिल्हा पातळीवर आणि राज्य पातळीवर या तीनही ठिकाणी 2-2 बक्षिसे देत आहोत. जवळजवळ 1 कोटी रुपये यावर खर्च करीत आहोत. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांना सांगू इच्छितो की आपण या कार्यक्रमाचे खरोखरच स्वागत केले पाहिजे.

श्री. दिवाकर रावते : जागर जाणिवांचा हा कार्यक्रम स्त्री भ्रूणहत्येवर होता.

श्री. डी.पी.सावंत : आमच्या विभागाचा जो कार्यक्रम होता तो छेडछाडमुक्त वातावरण निर्माण करण्याच्या बाबतीत होता. मी आमच्या विभागाच्या 'जागर जाणिवाचा' कार्यक्रमाबाबत सांगत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. डी.पी.सावंत ....

आहे. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी मुंबई आणि शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा पुढे ढकलल्या त्याबाबत सांगितले. प्राध्यापकांच्या संपाच्या निमित्ताने परीक्षा पुढे ढकलल्या जात आहेत परंतु उद्या आणि परवा प्राध्यापकांच्या संघटनेच्या सभासदांबरोबर एक बैठक बोलविलेली आहे आणि त्यावर दोन तीन दिवसात जरुर तोडगा निघेल. मुंबई विद्यापीठाबरोबर चर्चा करण्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी सांगितले. आमचे मंत्री महोदय, मी स्वत: आणि आपण बसून नक्की या बाबत बैठक घेऊन आणि मुंबई विद्यापीठाच्या ज्या समस्या आहेत त्या सोडविण्याचा प्रयत्न करु.

सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत तसेच माननीय विरोधी् पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी या ठिकाणी सांगितले. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी भारत विकास शिक्षण संस्थेच्या संदर्भात सांगितले. या संदर्भात आज माझ्याकडे माहिती नाही पण याबाबत लवकरात लवकर माहिती घेऊन आपल्याला देईन. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी यंत्रसामुग्रीच्या संदर्भात, व्हेंटिलेटर्स खरेदीच्या संदर्भात सांगितले. माझी सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांना विनंती राहील की, आपण माझ्याकडे यावे. आपण कधीही सभागृह चालू असतानाच भेटतो. आपण माझ्याकडे आला तर बसून या संदर्भात नक्की चर्चा करु. आपण प्रायव्हेट मेडिकल कॉलेजच्या ॲडमिशनच्या संदर्भात सांगितले. प्रायव्हेट मेडिकल कॉलेजच्या बाबतीत थोडासा प्रॉब्लेम झाला होता.

यानंतर श्री. खंदारे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री.डी.पी.सावंत....

त्यामध्ये प्रवेश नियम समितीला काही अनियमितता आढलेल्या आहेत. त्यासंबंधी काय करता येईल याबाबत शासनाने एमसीआयला कळविलेले आहे. त्यांच्याकडून उत्तर आल्यानंतर त्याची माहिती अवगत केली जाईल.

श्री.रामदास कदम : प्रवेश नियंत्रण समितीसंबंधी मी कालच चर्चा केलेली आहे. त्यांच्याकडे खुलासा केलेला आहे. माझ्या कॉलेजची काही चूक नसताना पेपरला बातम्या येत आहेत. त्यामुळे फार अस्वस्थ आहे. मी मागील 3 वर्षात 90 मुलांकडून शासनाची 2.25 लाख फी असताना सुध्दा 1.50 लाख रुपये घेतलेले आहेत. अशा प्रकारे 70 लाख रुपयांची मी मदत त्या मुलांना केली आहे. असे असताना प्रवेश नियंत्रण समितीने माझ्या कॉलेजवर ठपका ठेवलेला आहे त्याबाबत मी खुलासा त्यांच्याकडे दिलेला आहे. काही विशिष्ट कॉलेज समोर ठेवून, मंत्र्यांची काही कॉलेज समोर ठेवून त्यांना त्यातून डावलले जात आहे. तीन वेळा असे झालेले आहे. त्यात मी विरोधी पक्षाचा आहे. विशिष्ट पक्षाच्या विशिष्ट मंत्र्यांचे कॉलेज ठेवावयाचे, त्यांना 3-3 कॉलेज द्यायचे, बाकीच्यांची कॉलेज बाहेर काढावयाची असा एकमेव कार्यक्रम चालला आहे.

श्री.डी.पी.सावंत : सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी सांगितल्या प्रमाणे कोणाला टार्गेट करण्याचा हा प्रश्न नाही. प्रवेश समितीने जो निर्णय घेतलेला आहे त्यासंबंधी शासनाने एमसीआयला कळविले आहे. शासनाने कोणताही निर्णय घेतलेला नाही. याबाबत करावयाच्या कारवाईबाबत एमसीआयकडून खुलासा मागविलेला आहे.

सभापती महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या पुरवणी मागण्यांना सभागृहाने मंजुरी द्यावी अशी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ D/

श्री.राजेंद्र गावित (कामगार व विशेष सहाय्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, कामगार विभागाच्या मागण्यांसंबंधी सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडलेले नाहीत.

कामगार विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्या अशी मी आपल्यामार्फत सभागृहाला विनंती करतो.

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय देवतळे (पर्यावरण व सांस्कृतिक कार्य मंत्री) : सभापती महोदय, पर्यावरण विभागाची बाब क्र.136 वरील पुरवणी मागणी व सांस्कृतिक कार्य विभागाची बाब क्र.159 वरील पुरवणी मागणी या दोन्ही मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी अशी मी सभागृहाला विनंती करतो.

उप सभापती : सन 2012-2013 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावरील चर्चा आता संपलेली आहे.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार दिनांक 20 मार्च, 2013 रोजी सकाळी 10 वाजता पुन्हा भरेल. सकाळी 10 ते 11 वाजेपर्यंत विशेष बैठक होईल. या बैठकीमध्ये आजच्या कामकाज पत्रिकेवर दर्शविण्यात आलेला नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव घेण्यात येईल. त्यानंतर दुपारी 11.15 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक संध्याकाळी 7 वाजून 8 मिनिटांनी बुधवार, दिनांक 20 मार्च 2013 रोजीच्या सकाळी 10 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही